
म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : १९१२



# चंबळची [illegible]भूमी




REFBK-0014397


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ विभाग निबंध
क्रमांक ........ नों दि. ........

चंबळची दस्युभूमी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
७२५१८ वि: निबंध
१०९२ नों दि. ८/३/०७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०




मौज प्रकाशन गृह मुंबई ४


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अ. क्र.
क्रमांक

गीता साने

# चंबळची दस्युभूमी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८३१०

चंबळची दस्युभूमी




REFBK-0014397

मौज प्रकाशन : १११
पहिली आवृत्ती : मे, १९६५

© १९६५, गीता साने

किंमत १५ रुपये

मुखपृष्ठ :
केशव फडके

छायाचित्रे :
राजिंदरलाल गर्ग

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ क्र. ...... विभाग ......
क्रमांक ...... नों दि. ......

# निवेदन

गेली दोन वर्षे ज्याचा शोध करीत मी हिंडले तो शोध आज संपला आहे. माझी जिज्ञासा संपूर्णतः तृप्त झाली आहे, असे मात्र नाही परंतु तिच्या समाधानासाठी जास्त प्रयत्न करणे आता माझ्या शक्तीबाहेरचे आहे. नव्या दमाचे, उत्साही यौवन आता हा प्रश्न आपल्या हाती घेऊन धसाला लावील ही आशा मात्र मी बाळगून आहे.

ह्या दोन वर्षांच्या अवधीत कित्येक लोकांची मदत मला झाली. दस्युक्षेत्रात फिरण्याची संधी मला शांति-समितीने उपलब्ध करून दिली, तर क्रिमिनॉलॉजीचे वाङ्मय दिल्लीच्या स्कूल ऑफ सोशल वर्कमधून उपलब्ध झाले. त्यासाठी डॉ० रानडे, श्री० कुमेदन व माझी मैत्रीण श्रीमती कार्थियानी यांना धन्यवाद दिले पाहिजेत. समाजशास्त्राचे विद्यार्थी श्री० राजिंदरलाल गर्ग ह्यांचा व माझा परिचय येथेच झाला. त्यांच्या परिश्रमाला इष्ट व्यक्तींचे व संस्थांचे सहकार्य न लाभल्याने झालेली त्यांची निराशा मलाच जास्त जाणवली. आपले सारे साहित्य ज्या निर्लोभी वृत्तीने त्यांनी मला दिले त्यांचे मला कौतुक वाटते. ही निर्मत्सर पोरे पुढे खूप काही करून दाखवतील असा मला भरंवसा आहे. श्री० गर्ग यांच्या नोटस् व निबंध वापरण्याची परवानगी गांधी पीस फाउंडेशनतर्फे श्री० जयप्रकाश नारायण ह्यांनी मला दिली. या दोघांची मी ऋणी आहे.

माझे निष्कर्ष माननीय आचार्य विनोबा भावे ह्यांना ऐकवणे हे माझे कर्तव्यच होते. कारण मी त्यांना सांगितल्याप्रमाणे, "आपण एक थोर सामाजिक कार्यकर्ते आहात. आपल्याविरुद्ध काढलेले निष्कर्ष चुकीचे असल्यास, त्यांची प्रसिद्धी आपल्याला अन्यायमूलक व मला कमीपणा आणणारी आहे; म्हणून मी आपल्याशी चर्चा करावयास आले आहे."

ह्या चर्चेच्या वेळी, आचार्य खूप कार्यव्यग्र असतात पण घाईत मात्र नसतात असा अनुभव मला आला. त्यांचे व्यक्तिमत्त्व किती सोज्वळ व मधुर आहे ह्याचाही प्रत्यय मला आला. त्यांच्याशी अनेक मतभेद असूनही मला त्यांच्याबद्दल प्रगाढ आदर आहे. त्यांच्या पदयात्रेच्या निमित्ताने ह्या पुस्तकाचे प्रयोजन उद्भवले. मी त्याबद्दल कृतज्ञ आहे.

ह्या प्रकरणी ज्यांची निवेदने वादग्रस्त ठरली, ते श्री० रुस्तुमजी, इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, मध्यप्रदेश, ह्यांचीही भेट मी सप्टेंबर १९६३ मध्ये भोपाळ येथे घेतली. अत्यंत मोकळ्या मनाने चर्चा करून त्यांनी आपले रेडिओ-टॉकचे हस्तलिखित मला दिले. मध्यप्रदेशचे गव्हर्नर श्री० पाटसकर ह्यांच्या मुलाखतीचा उल्लेख इतरत्र आलेला आहे. इंडियन पिनल कोड, क्रिमिनल प्रोसीजर कोड, एव्हिडन्स ॲक्ट ह्यांबद्दल बोलताना ते म्हणाले, "त्याबद्दल मी मध्यवर्ती सरकारला आपल्या सूचना पाठवल्या आहेत; त्या फार कडक आहेत. मी तुम्हाला त्या सांगणार नाही." त्यांचे ते मिस्किल हास्य मला अत्यंत हृद्य वाटले. ओहोळ भरण्याची योजना मला विशेष कमिशनर श्री० कर्णीकर ह्यांनी समजावून दिली. ह्या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

ह्या प्रबंधासारखी कामे अनेकांच्या मदतीने होतात. तेव्हा सर्व साहाय्यकांची नावे देण्याचा मोह टाळणे मला भाग आहे. दिल्लीलाही क्रिमिनॉलॉजीचे अद्यावत ग्रंथालय नाही, ही उणीव दिल्ली विश्वविद्यालयाचे प्रोफेसर श्री० श्रीनिवास ह्यांनी तळमळीने व्यक्त केली. "पुस्तके दान मिळाल्यावाचून आमची कुचंबणा थांबणार नाही," हे त्यांचे शब्द ऐकून मला फार वाईट वाटले. चंबळच्या दस्युभूमीत एखादे अद्यावत ग्रंथालय व संशोधन-केंद्र स्थापन होऊन, ती दिल्ली विश्वविद्यालयाला जोडली गेल्यास अभ्यासकांची एक उणीव दूर होईल आणि डाकूसमस्येचे मूलग्राही संशोधन होऊ शकेल.

हे संपूर्ण पुस्तक चाळल्यावर एकच प्रश्न मला विचारण्यात आला : "तू सर्वांवरच टीका करितेस. तुला कोणाबद्दल आदर वाटत नाही का? साधारण प्रचलीत समजुतींविरुद्ध तुझे निर्णय जात नाहीत का?"

प्रश्न गंभीरपणे विचार करण्याचा होता. पुन्हा हस्तलिखित चाळताना वरील आरोप खरा असल्याचे मलाही दिसू लागले. पण जास्त विचार करिता ही उणीव माझ्या दोषैक-वृत्तीची नसून माझ्या विषयाची आहे असे माझ्या ध्यानी आले. एका विषवृक्षाच्या मुळाला मी येथे हात घातलेला आहे. हा विषवृक्ष तोडून नष्ट करण्यात आपल्याला पुन्हापुन्हा अपयश येत गेले आहे. ह्या अपयशाचे विश्लेषण करिताना मला संबधित व्यक्तींचे दोषच पाहणे भाग होते. ही समस्या सुटण्याच्या मार्गाला लागल्यावर जी पुस्तके लिहिली जातील ती ह्या दोषातून मुक्त असू शकतील. ते भाग्य ह्या पुस्तकाला कसे लाभावे?

ह्या पुस्तकाने लोकांची जिज्ञासा जागावी, ही माझी इच्छा पूर्ण झाली तरी पुस्तक-लेखनाचा कार्यभाग साध्य होऊन मी कृतार्थ होईन.

धनबाद, १-१२-६४

**गीता साने**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
[illegible] शाखा.
अ. क्र. .................. विभाग ..............
क्रमांक .................. नों. दि. ..............

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १-१३ |
| २ | दस्यूंची समस्या | १४-२७ |
| | १. डाकूगिरीचे दर्शन | १४ |
| | २. अपराध व अहिंसा | १९ |
| | ३. कायद्याचा दृष्टिकोन | २३ |
| ३ | दस्युभूमीचे दर्शन | २८-७१ |
| | १. चंबळेचे खोरे | २८ |
| | २. दस्युभूमीत | ३२ |
| | ३. दस्युभूमीने काय सांगितले ? | ६८ |
| ४ | इतिहासाचा मागोवा | ७२-९७ |
| ५ | अर्वाचीन डाकू आणि डाकूगिरी | ९८-११८ |
| | १. बंडानंतरचे कवित्व | ९८ |
| | २. डबक्याचे पाणी | १०७ |
| | ३. डाकू आणि त्याचे पाठीराखे | ११२ |

६ उपाययोजना आणि यशापयश १११-१४५
१. राजाची दया आणि दंड ११९
२. लोकसत्तेचा पराभव १२६
३. लोकशिक्षणाची हार १३४
४. पाश्चात्य अनुभव व प्रयोग १३९

७ डाकूग्रस्त जीवन : एक स्थान व एक तंत्र १४६-१५७
१. गुमानसिंग का पूरा : एक स्थान १४६
२. अपहरण : एक तंत्र १५५

८ पुनः परिभ्रमण १५८-१७७
(अ) चंबळघाटीची सामाजिक परिस्थिती १५८
(ब) दस्युभूमीत अंत्यज १६१
(क) दस्यूंसह एक दिवस १६३
(ड) डाकूपीडित कुटुंबातील काही मुले १६५
(ई) दस्यू व वेहड १६८
(फ) चंबळघाटी-शांति-समिती १७३

९ निरोप १७८-१८७

१० परिशिष्ट १८९-१९३

११ संदर्भ ग्रंथ १९४-१९६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ विभाग ...
क्र.पा. ........ ता. दि.



मानसिंगाची गढी



पुतळी




मानसिंगाची पत्नी



खेडुताच्या दारात
पोलीस-चौकशी



चंबळ खोऱ्यातील
एक महिला





शांतिसमितीच्या साहाय्याने शिक्षण घेणारी तीन मुले



वटेश्वरच्या जत्रेसाठी आलेले जोडपे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ ... विभाग ..... ........
क्रमांक ......... नों. दि. ..............

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ०२५९८ ... वि: ...
९१९३ ... नों. दि. ...२८।३।६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. .........

# उपोद्घात

चंबळची दस्युभूमी दिल्लीच्या दक्षिणेला दीडशे मैलांवर लागते. हिचा आकार किंचित उघडलेल्या पंखासारखा आहे. ह्या पंखाची नाभि उत्तर रेल्वेवरील इटावा शहरी कल्पिता येईल. आग्र्याच्या दक्षिण-पूर्वेला, यमुना नदीवर इटावा वसलेले असून त्याच्या खालच्या अंगाला सरासरी पंचवीस मैलांवर चंबळ, कुयरी व सिंध ह्या नद्या यमुनेला एकापाठोपाठ एक येऊन मिळतात.

इटाव्याहून निघालेली दस्युभूमीची सीमारेखा, यमुनेच्या काठाने इटावा जिल्ह्याचा भाग पोटात घेऊन, नंतर आग्रा जिल्ह्याचा दक्षिण भाग आत्मसात करिते व उत्तर प्रदेशातून राजस्तानमध्ये शिरते. येथे धोलपूर जिल्ह्याला कवेत घेऊन, चंबळेला समांतर जाताना ती भरतपूर व माधोपूर जिल्ह्यांचे पट्टे कापून घेते व पार्वती नदीच्या संगमापाशी चंबळ ओलांडून मध्य प्रदेशात शिरते. मोरेना व शिवपुरी जिल्ह्यांच्या दक्षिण सीमांवरून कुयरी व सिंध ह्या नद्या मार्गात ओलांडून ही सीमारेखा उत्तरप्रदेशाच्या सीमेवर पुनश्च पोचते आणि तेथून ती उत्तरेला वळून, उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश ह्यांच्या सीमेवरून इटाव्यापर्यंत जाते. वर उल्लेखिलेल्या जिल्ह्यांशिवाय दतिया, भिंड व ग्वाल्हेर हे जिल्हेही दस्युभूमीत समाविष्ट झालेले आहेत.

दस्युभूमीचा मध्य-प्रदेश राज्यात मोडणारा प्रदेश, हा राज्यपुनर्रचनेपूर्वी मध्यभारतात व त्यापूर्वी ग्वाल्हेर संस्थानात मोडत असे. राजस्तानमध्ये गेलेल्या प्रदेशामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात डझनभर इवलाली राजपूत राज्ये अस्तित्वात होती.

सरासरी २,५०० चौरस मैलांच्या ह्या प्रदेशाचा उत्तर भाग नद्यांनी धुपलेला व दक्षिण भाग टेकड्या व जंगले ह्यांनी व्याप्त असलेला असा असून सारा प्रदेश

दुर्गम आहे. ह्या प्रदेशातून वाहतुकीचे महत्त्वाचे मार्ग दोन आहेत. त्यांपैकी एक आग्रा-मुंबई हमरस्ता (Highway) असून तो आग्र्याहून धोलपूर, ग्वाल्हेर व नंतर शिवपुरीकडे जातो. अमृतलाल नावाच्या दरोडेखोराने ह्या हरमस्त्यावरून काही श्रीमान लोक खंडणीसाठी पळवून नेले, ही घटना स्वातंत्र्योत्तर काळातील आहे.

वाहतुकीचा दुसरा मार्ग म्हणजे मध्य रेल्वेचा दिल्लीहून दक्षिणेकडे जाणारा मुख्य मार्ग होय. हा रूळरस्ता दिल्लीहून आग्रा—धोलपूर—ग्वाल्हेर येथून दतियाला जातो व तेथून झाशीला पोचतो. धोलपूरला चंबळ ओलांडल्यावर लोहमार्गाच्या दोन्ही बाजूंना वेहडांचा प्रदेश लागतो. वेहड हा शब्द हिंदीमधील बीहड—दुर्गम वा विकट —ह्या शब्दावरून आलेला असावा.

रेल्वेच्या दोन्ही अंगांना जमिनीला एका विशिष्ट दिशेने उतार असलेला आढळतो. ह्या उतारावर लहानमोठे, विविध आकाराचे मातीचे उंचवटे आढळून येतात. ह्या उंचवट्यांच्या पायाला विळखे घालून, सुकलेल्या ओढ्यांची पात्रे उताराच्या दिशेने धावत असतात. जमीन रेताड असल्याने ती पावसाच्या पाण्याने तात्काळ धुपून जात असली पाहिजे हे आपल्या ध्यानी येते. ह्या उंचवट्याच्या माथ्यावर कोठेही समतल जागा आढळत नाही; किंवा कुठेही बसण्यासारखी जागा दिसत नाही. उंचवट्यांचे माथे रेल्वे-लाईनपेक्षा उंच पातळीवर नाहीत. हे माथ्याचे भाग जोडल्यास तो पृष्ठभागही खालच्या जमिनीच्या दिशेने उतार घेतो, असे ध्यानी येते. बहुतेक भाग खुरटलेल्या काटेरी वनस्पतींनी झाकलेला असून, सारा प्रदेश रुक्ष व डोळ्यांना बोचणारा आहे. हे वेहड कुयरी, सिंध व चंबळ ह्यांच्या प्रवाहांच्या शेवटच्या पन्नाससाठ मैलात सर्वत्र आढळतात.

वरील दोन मार्गांशिवाय दळणवळणाची साधने फारच थोडी आहेत. क्वचित नद्या ओलांडण्यासाठी त्याच्यावर पूल बांधलेले आहेत, हा अपवाद. त्यामुळे पावसाळ्यात चिखल माजल्यावर दळण-वळण जवळपास बंद पडते व येथील खेडी बाह्य जगापासूनच नव्हे तर परस्परांपासूनही तोडली जातात. पोस्ट व तार ऑफिसे फार विरळ आहेत. पावसाळ्यात डाक पोचवण्याची शक्यता फार थोड्या ठिकाणी उद्भवते.

राजस्तान व दस्युभूमी येथील लोक एकाच वंशाचे आहेत. उंच बांध्याचे, रुंद हाडापेरांचे, गव्हाळी वर्णाचे, नाकीडोळी नीटस असे हे लोक धोतर नेसून अंगात पंजाबी (सदरा) घालतात. डोक्याला मुंडासे, खांद्यावर खादीची जाड चादर, हातात भक्कम लाठी व पायात चढाव असा ह्यांचा वेष असतो. स्त्रिया घागरा नेसून वर ओढणी घेतात. घरात पाचवारी पातळ वेढतानाहि बऱ्याच स्त्रिया आढळल्या. पडद्याची पुरातन प्रथा अजून प्रतिष्ठित आहे.

खेड्यातून घरे कौलारू व बहुशः मातीचीच दिसली. ही खेडी इतर भारतीय ग्रामीण विभागासारखींच मागासलेली व गलिच्छ आहेत. चंबळच्या वेहडात—आपण त्यांना ओहोळ म्हणू या—पाऊस थोडा व तो पावसाळ्यात पडतो. येथे पाटबंधारे

फारसे नाहीत. त्याचप्रमाणे जमिनीच्या पृष्ठभागाखालची पाण्याची पातळी तीस-चाळीस फूट खोल असल्याने विहिरींवर चालणारी बागाइतही फारशी कुठे आढळत नाही. असा प्रयत्न कोणी केल्यास, दळणवळणाच्या साधनांच्या अभावी, बागाइती मालाला बाजारपेठहि उपलब्ध होत नाही.

शेतात निघणारी पिके, ज्वारी, बाजरी, तूर, लाख, चणा व थोडा गहू ही दिसली. तंबाखू प्रत्येक शेतात स्वतःच्या उपयोगापुरता पेरला जातो. येथे पैसे देणारे व्यापारी पीक (cash crop) कुठलेच नाही; त्यामुळे दारिद्र्याने ह्या प्रदेशात आपले ठाण मांडावे हे स्वाभाविक आहे. भारताच्या इतर दरिद्री प्रदेशातून शहरात मजुरीसाठी जाणारांचा प्रचंड ओघ दिसून येतो. दस्युभूमीतून बाहेर जाणारांची संख्या लहान आहे.

या प्रदेशातले लोक धार्मिक व आतिथ्यशील आहेत; पण त्यांची धार्मिकता, अंधश्रद्धेत परिवर्तन पावलेली आहे. तुलसीरामायणावर लोकांची श्रद्धा असून त्याचे पाठ निरंतर होत असतात. शिक्षणाचा प्रसार फार कमी आहे.

ग्रामीण भागात सर्वत्र आढळणारी भांडणे व गटबाजी येथेही आहे. जमीन किंवा स्त्रिया ह्यापैकी एखादे कारण ह्या भांडणांच्या मुळाशी बहुशः आढळते. ह्याच दोन कारणांवरून भारताच्या इतर ग्रामीण भागातही मारामाऱ्या होतात, खून पडतात; फरक इतकाच की इतरत्र लाठ्या, क्वचित सुऱ्या व भाले ह्या आयुधांचा वापर होतो. दस्युभूमीत हाताशी असलेल्या बंदुकांचा वापर होतो. बिनपरवाना बाळगलेल्या बंदुका तर आहेतच, पण परवान्याने बाळगलेल्या बंदुकांचे प्रमाण मोठे असून ते वाढतच आहे.[1] ग्रामीण भागात येथे खांद्यावर बंदूक, गळ्यात काडतुसाचा पट्टा ह्या थाटात छाती वर करून चालणारा माणूस लोकांना आश्चर्यकारक वाटत नाही. त्या माणसामागे पोलिसदळ किंवा डाकूदळ असेल अशी त्यांची खात्री असते. 'दुर्जनं प्रथमं वंदे' ह्या न्यायाने लोक त्या माणसाला वचकून असतात.

या समाजात जातिबंधने दृढ असून मुख्य भरणा ब्राह्मण, राजपुत व चांभार ह्यांचा आहे. राजपुतांना येथे ठाकूर म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळात बहुतेक जमीन ब्राह्मण व ठाकूर ह्यांच्या मालकीची असे. लहान जमीनदार शेती हाताने करीत; मध्यम जमीनदार काही हाताने करून काही खंडाने देत; तर मोठाले जमीनदार सर्व शेती खंडाने देऊन, ग्वाल्हेर-इटावासारख्या शहरी वास्तव्य करीत. शेतीची कुळे मोठ्या प्रमाणावर चांभार असत. ते जमिनदारांना वेठ-बिगार देत; त्यांची शेतीही नांगरीत. स्वतंत्र भारतामध्ये कुळसंरक्षण आले आणि जमीनदारी व वेटबिगार ह्यांचा

१. बंदुकांचे परवाने (भिंड जिल्हा) :
सन १९६० : ३५४ माणसांमागे १ बंदुक
सन १९६३ : २९ माणसांमागे १ बंदुक
हे आकडे जिल्हाधीशाकडून लल्लूसिंगजींनी मिळवले आहेत.

कायद्याने उच्छेद करण्यात आल्यावर चांभार स्वतंत्र शेतकरी-म्हणजे जमीनदार झाले. त्यांना स्वत्वाची जाणीव होऊन, मेलेली जनावरे ओढण्याचेही त्यांनी अनेक ठिकाणी नाकारले. त्यामुळे या भागात निर्माण होणारे तंग वातावरण व त्याचा परिपाक महाराष्ट्राला नित्य परिचयाचा आहे.

दस्युभूमीत मी हिंडले तेव्हा सर्वत्र शांतता व म्हणून निर्भयता होती. त्यामुळे या प्रदेशाला दस्युभूमी—डाकूंचा देश—का म्हणावे हा मला प्रश्न पडला. येथील लोक बुद्धिमान आहेत. आपल्याला वाटणारा वर वर्णिलेला संभ्रम त्यांना तात्काळ समजतो. ते पोलिसांच्या अत्याचाराची भडक वर्णने आपल्याला सांगतात. ती वर्णने शक्यतेच्या कोटीतील असल्याचे आपल्याला स्वानुभवावरून माहीत असल्याने आपला त्यांच्यावर विश्वास बसतो. त्यामुळे दस्युभूमीत जनता पोलिसांच्या टाचेखाली रगडली जाते आहे असा आपला समज होतो. ही जनता म्हणजे ब्राह्मण-ठाकूर हे वर्ग असून ते शूद्रातिशूद्रांना रगडीत आहेत हे मात्र आपल्या ध्यानी लौकर येत नाही.

ह्या प्रदेशातून पूर्वी राजस्तानाकडे तस्कर-व्यापार (smuggling) जोरात चाले. ओहोळांच्या दुर्गम मार्गाने जनावरे व लादलेले उंट राजपूत संस्थानात जात. खेड़ा-राठोडचा मानसिंग, नागराचा लाखनसिंग हे सुखवस्तु घरातले तस्कर-व्यापारी होते. आजही ह्या चोरट्या व्यापाराचा ओघ पश्चिमेकडे, पाकिस्तान सीमेवरून पलीकडे वाहत आहे.

जातिबंधनाच्या दास्यातून मुक्त केलेला पण स्वसंरक्षणास असमर्थ असलेला असा दुबळा अस्पृश्य आणि चोरट्या व्यापारात गुंतलेला व कायद्याची पत्रास न बाळगणारा ब्राह्मण-ठाकूर हा द्विज—ह्या समाजांचे परस्परसंबंध गुन्हेगारीला उपयुक्त अशी पार्श्वभूमी निर्माण करण्यास समर्थ आहेत हे उघड आहे.

हे गुन्हे अनेक असतात. ते लुटालुटीचे, दरवड्याचे, माणसे पळवून खंडणी वसूल करण्याचे, अस्पृश्यांकडून ‘ चंदा ’ (खंडणी वा वर्गणी) वसूल करण्याचे, सूड उगवण्यासाठी शत्रूंची किंवा प्रतिष्ठा राखण्यासाठी, दहशत घालण्यासाठी इतरांची हत्त्या करण्याचे असे विविध प्रकारचे असतात. हुशार, नेतृत्वकुशल गुन्हेगार आपल्या टोळ्या संघटित करतात. गुन्हे करून त्या दुर्गम बेहडांचा आश्रय घेतात. ह्या टोळ्या अगदी अलीकडच्या काळापर्यंत ठाकूर-ब्राह्मणांच्या असत. त्यांच्यापैकी बऱ्याच टोळ्या युनिफॉर्ममध्ये असत आणि आपल्या सदस्यांना लष्करी शिक्षण देत. त्यांचे हस्तक त्यांना पोलिसांच्या हालचाली कळवीत व अन्नही पुरवीत. जमीनदारांचा ह्या टोळ्यांना पाठिंबा असे. टोळ्यांशी संबंध ठेवण्याचे कार्य अस्पृश्य व शूद्र जातींच्या साहाय्याने करण्यात येई. पूर्वी जमीनदारांची एकनिष्ठ कुळे ह्या नात्याने व आता प्राणभयाने दलित वर्ग ते काम नेहमी करीत आला आहे.

दस्युभूमीतील लोकांशी बोलताना आपला ग्रह असा होतो की चंबळचे डाकू स्वाभिमानी, अन्यायाचा प्रतिकार करणारे, पाणीदार असे लोक आहेत. ते दरवडे

घालतात, खून करतात; कारण प्रतिकाराची इतर साधने व मार्ग त्यांना अवगत नाहीत. परिस्थितीमुळे त्यांची गाडी भलत्या रुळावर गेलेली असून, सांधे बदलल्यास ते योग्य मार्गाला लागतील आणि भारताची लोक-सत्ता सार्थ करावयास ह्या निर्भय लोकांची फार मदत होईल.

ह्या चित्राचे निरीक्षण जवळ जाऊन व बारकाईने केल्यावर, आपण स्वतःची फसवणूक करून घेत असल्याचे ध्यानी येते. ह्या प्रदेशात आठदहा वर्षांपूर्वी चकमकीत मारल्या गेलेल्या मानसिंगाचेच चित्र पाहा.

उत्तर-प्रदेशच्या आग्रा जिल्ह्यातील खेडा-राटोड ह्या गावचा मानसिंग हा राहाणारा. खेडा-राठोड हे गाव चंबळेच्या तिरापासून दोन-अडीच मैलावर असून प्रचंड वेहडांच्या काठी वसलेले आहे. मानसिंगाचा बाप पाच विघे जमिनीचा मालक असून, तो चोरटा व्यापार करी. गावाच्या पुढारीपणावरून त्याचे, त्याचा ब्राह्मण उपाध्याय तलफीराम ह्याच्याशी वैमनस्य सुरू झाले. गावामध्ये दोन तट पडले; व त्यांच्यात चकमकी झडू लागल्या. एकदा भरदिवसा तुमुल युद्ध होऊन, तलफीरामच्या पक्षातील एका माणसाचे घर आतील कोठारासह भस्मसात करण्यात आले. रक्ताची नदी वाहिली. ह्या दंगलीत प्राणहानी झाल्याने मानसिंग पकडला गेला व पुढे त्याला कारावासाची शिक्षा झाली. त्याचा भाऊ व मुले मात्र पळून ओहोळांच्या आश्रयाला गेली.

ओहोळात गेल्यावर पोटाचा प्रश्न निर्माण होतो. तो सोडवण्यासाठी वरील लोकांनी चोऱ्या-दरवडे घालायला सुरुवात केली. त्यांच्या टोळीला इतर गुन्हेगार येऊन मिळू लागले. कुठल्याही खेड्यात जावे, पाहिजे ती सामग्री जबरीने घ्यावी, प्रतिकार करणाराला यमसदनी पाठवावे, असा प्रकार सुरू झाला. पोलिसांचा ससेमिरा फार झाल्यास भोवतालच्या संस्थानात पळून जाताच टोळी सुरक्षित होई. केव्हातरी हे लोक खेडा-राठोडला आपल्या घरी येत. अशा एका प्रसंगी पोलिसपार्टीने त्यांच्या टोळीला घेरले. दोन्ही पक्षी गोळीबार होऊन मानसिंगचा मोठा मुलगा मेला व बाकीची टोळी ओहोळात पोचली.

सन १९३९ मध्ये मानसिंग सुटून आल्यावर त्याची बायको रुक्मिणी हिने मानसिंगला सूड घेण्यास उद्युक्त केले. आपला मुलगा घरी आल्याची खबर तलफीरामाने पोलिसांना दिली असावी असा तिला संशय होता. त्यानंतर तलफीरामाचा सूड उगवण्याच्या हेतूने मानसिंगने पुढील सात-आठ वर्षांत त्याच्या नातेसंबंधितांपैकी दहा-बारा लोक मारले; त्यापैकी काही तर अल्पवयी कुमार होते. तलफीरामाच्या घरावर मानसिंगने वारंवार आक्रमण केले, त्याच्या वास्तूची जाळपोळ केली. त्या कुटुंबाला संरक्षण देण्यास पोलिस संपूर्णतः असमर्थ ठरले.

मानसिंगाचे अपराधी कर्तृत्व चमकून उठले. त्याचा दरारा सर्वत्र बसला. त्याच्या जुलमाविरुद्ध पोलिसांकडे जाण्याचे साहस कोणी करीनासे झाले. एक-दोन

माणसांनी तेवढा पराक्रम केला, पण त्यानंतर ती माणसे कोणाला दिसली नाहीत. एकदोनदा तर मानसिंगाने पोलीसचौक्यांवरही आक्रमण केले. तो नंतर 'राजा' मानसिंग झाला. लोक त्याला करभार देत; आपले कज्जे निवाड्यासाठी त्याच्यापुढे मांडीत. त्यांच्या लग्नाकार्यात मानसिंग आल्यास त्यांची प्रतिष्ठा वाढे. इसवी सन १९४२ च्या चळवळीतील भूमिगतांना त्याचा आश्रय मिळाला. दुसऱ्या महायुद्धात गुंतलेल्या सरकारला त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे लागले.

सन १९४७ साली स्वातंत्र्यदिनी 'राजा' मानसिंग उजळ माथ्याने खेडा-राठोडला परतला. १५ ऑगस्टला त्याने मणोगणती मिठाई वाटली. गुन्हेगारीने मिळवलेल्या संपत्तीतून त्याने घर बांधले. ती त्याची गढी 'भुइकोट किल्ला' ह्या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने मिळवलेल्या अफाट संपत्तीचा अंदाज आपण आणखी एका गोष्टीवरून घेऊ शकतो. मानसिंग व त्याचा शिष्य रुपा मेल्यावर, गावकरी त्याची जमीन नांगरू देईनात. सन १९६० मध्ये आचार्य विनोबा भाव्यांच्या प्रेरणेने, सर्व-सेवासमितीने, मध्यस्थी करून जमीन वहितीला मोकळी केली ती नऊशे बिघे होती.

सन १९४७ नंतर मानसिंग प्रतिष्ठेने घरात राहू लागला. त्याने आपल्या नातवाचे, मृत मुलाच्या मुलाचे, लग्न मोठ्या थाटात पार पाडले. लग्नाची वरात हत्तीवरून काढण्यात आली. मोटरकार ही चीज खेडा-राठोडच्या ग्रामीण विभागाने तेव्हा प्रथम पाहिली. ह्या भागातले प्रतिष्ठित लोक अहेर घेऊन हजर राहिले व काही सरकारी अधिकारीही पाहुणे म्हणून आले होते. 'राजा' मानसिंगला स्वतंत्र भारत सरकारची गर्भित मान्यता, अशा रीतीने मिळाली.

सरकारने 'राजा' मानसिंगला मान्यता दिली, तरी त्याने भारत सरकारला मान्यता दिली नव्हती. डाके घालावे, लूट करावी, आडवे येणारे कापावे, हा त्याचा नित्यक्रम पुन्हा सुरू झाला. त्याला पकडण्याचे नित्याचे मार्ग विफल झाल्याने पोलिस अधिकाऱ्यांची बैठक बसून 'मानसिंग (विरुद्ध) मोहीम' तयार करण्यात आली.

मानसिंगानेही लढाईची तयारी केली. सगळ्या दस्युभूमीत तो लूट व हत्या करीत फिरू लागला. दस्यूंवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांचे 'मुखबीर' म्हणजे हेर असत. एकादा माणूस मुखबीर असल्याची शंका आल्यास, त्या माणसाचे हाल-हाल करून त्याला मारण्यात येई व त्यामुळे इतरांना दहशत बसे. पोलिस पाठीवर घेऊन मानसिंग महिनेच्या महिने उत्तर प्रदेश, राजस्तान, मध्य भारत, मध्य प्रदेश, विंध्य प्रदेश ह्या पाच राज्यांच्या सीमेवरून दंगल माजवीत राहिला.

जवळपास दोनशे लोकांची हत्या निर्दयतेने करणारा मानसिंग वृत्तीने धार्मिक होता. जप जाप्य, पूजा व रामायणाचा पाठ ह्यात त्याचे दोन-दोन तास प्रत्यही खर्ची पडत. तलफीरामाचा सूड उगवण्यास त्याला उद्युक्त केल्यावर रुक्मिणी त्याला म्हणाली होती,

"ब्रह्महत्या नाही ना करणार?"

"घाबरतेस काय? देव सुचवील ते खरे. प्रभु रामचंद्राने रावणाचा वध केला, तोही ब्राह्मणच होता." मानसिंगाने उत्तर दिले होते.

मानसिंग निर्व्यसनी होता. मदिरा-मदिराक्षी-द्यूत ह्यांचा मोह त्याला कधी पडला नाही. स्त्रियांच्या अब्रूवर त्याने कधी हात उचलला नाही. तो दानधर्म करी. कधी मुलीच्या लग्नात हुंडा देण्याला कोणा बापाला मदत करी, कधी शाळांना साहाय्य करी. त्याच्या तडाख्यात न सापडलेल्या लोकांना वाटे, "काय झालं सावकारांना लुटून गरिबांना पैसे दिले तर? लोकांना पिळूनच सावकार गब्बर होतात ना?"

मानसिंग एवढा काही दयाळू, गरिबांचा कैवारी नव्हता, ह्याची साक्ष परसोना खेड्याचा चौदापंधरा वर्षांचा विश्वनाथ देईल. विश्वनाथ जातीने अहीर म्हणजे गवळी आहे. मानसिंगाचा मुलगा तहसीलदारसिंग इटाव्याजवळ १९५४मध्ये पकडला गेला ते गाव अहिरांचे होते. आपल्या मुलाला निसटून जावयाला गावाने मदत दिली नाही हा मानसिंगाचा त्या गावावरचा राग. तेथे पोलीस बसवण्यात आल्याने, त्याला गावावर राग काढता येईना. तेव्हा तेथील अहिरांचे सोयरेसंबंधी परसोन्यात होते त्यांच्यावरच मानसिंगाने सूड उगवला.

सायंकाळी शेतीची कामे संपवून लोक बाहेरच्या ओट्यावर हुक्का पीत गप्पा मारीत बसले होते, तो एकाएकी झंझावाताप्रमाणे मानसिंग आपल्या टोळीसह येऊन धडकला. थाड-थाड गोळ्या घालून सहा माणसांची प्रेते पाडण्यात आली व नंतर घर पेटवून देण्यात आले. चार-पाच वर्षांचा विश्वनाथ ह्या आगीतून केवळ नशीब म्हणून बचावला.

तहसिल्दारसिंगाविरुद्ध साक्षी मिळू नयेत म्हणून उघडलेल्या सत्रात मानसिंगाने तेहतीस माणसे बळी दिली. त्यानंतर मानसिंगाला गोळी लागून तो पडेपर्यंत आणखी दोन वर्षे गेली. तथापि आजही अनेकांना खेडा-राठोडच्या परिसरात मानसिंगाबद्दल आदर वाटतो.

कुठलाही शक्तिशाली डाकू जिवंत असेतो लोकांना त्याचा दरारा वाटतो. त्याच्या मृत्यूनंतर त्याची टोळी दुबळी होते व अनेकदा फुटते. त्याच्या अन्यायाने संत्रस्त झालेले लोक आता मागे उरलेल्या त्याच्या परिवारावर सूड घेण्यास सिद्ध होतात. डाकूंची संपत्ती मित्राजवळ अनामत असते किंवा त्याच्या मालकीच्या जमिनीत गुंतवलेली असते. मित्रमंडळी अनामत रक्कम खाऊन जातात; जमिनीच्या वहितीला लोक अडथळा करितात. एखादा गरजू नांगर घालावयास पुढे आला तर गाव त्याला 'मुडदा पाडण्या'ची धमकी देते. पोट भरण्याचे साधन न उरल्याने, शेवटी त्याचा परिवार भिकेला वा फिरून गुन्हेगारीच्या मार्गाला लागतो. मानसिंगाच्या परिवाराने गुन्हेगारीचा अवलंब केलेला नाही. त्याचे कारण तहसीलदारसिंगाला फाशीची शिक्षा होऊन, त्याचा दयेसाठी केलेला अर्ज राष्ट्राध्यक्षांच्या पुढे गेलेला होता. त्यानंतर राष्ट्राध्यक्षांच्या दयेने तहसीलदारसिंगाची शिक्षा जन्मठेपेत बदलण्यात आली.

त्या परिवाराची जमीन वहितीत आली, आणि आजही रुक्मिणीला आशा आहे की माझा मुलगा एक दिवस माफी मिळून घरी परत येईल.

मानसिंगाप्रमाणेच दुसरी गाजलेली टोळी लाखनसिंगाची. हा मध्यप्रदेशातील मोरेना जिल्ह्यातील नागरा गावचा राहणारा. नागराही ओहळांच्या काठावर वसलेले आहे. लाखनचे घर सुखवस्तू व त्याचाही चोरटा व्यापार होताच. त्या घराचे मानसिंगाच्या टोळीशी व्यापारी संबंध होते. आपल्या प्रतिस्पर्धी ठाकूर कुटुंबाशी मतभेद होऊन लाखन डाकू झाला. विरोधी परिवारातले पंधरा-सोळा लोक त्याने मारले. प्रत्येक विजयादशमीला तो त्यांच्या घरावर आक्रमण करी. पोलिसांनी त्या घराला संरक्षण देण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी लाखन हुलकावण्या दाखवी, पोलिस फसून दूर जाताच तो शत्रूच्या घरावर हल्ला करून हत्या करी. हत्या, लूट, माणसेमुले पळवून नेणे ह्याची अखंड परंपरा त्याने दहा-बारा वर्षे चालू ठेवली. एका गावात त्याला एक मनुष्य मुखबीर असल्याचा संशय आला. चव्हाट्यावरच्या बाभळीला त्या माणसाला बांधून लाखनने त्याला गोळी घातली. त्याला कोणी विरोध करावयास धजले नाही प्रेताला कोणी हात लावला नाही. पोलिसांना खबर मिळून पोलिस तेथे पोचेतो प्रेतावर कावळे घिरट्या घालू लागले होते.

स्त्रियांमध्ये दस्युराणी पुतळींचा इतिहास मोठा करुण आहे. मोरेनाची ही मुसलमान नृत्यांगना एका लग्नात नाचायला गेली असताना सुलताना डाकूने तिला भर लग्नमंडपातून पळवून नेली. सुलतानाने तिच्यावर जिवापाड प्रेम केले, पण त्याची गुन्हेगारी तिला दृष्टिआड करिता येईना. तिच्या विनवण्यांनी दयार्द्र होऊन सुलतानाने तिला आपल्या आईजवळ आणून सोडली. येथेच सुलतानापासून झालेली तिची कन्या तन्नो जन्माला आली.

पुतळी मोरेनाला सुखाने नांदू मात्र शकली नाही. सुलतानाची माहिती तिने द्यावी म्हणून पोलिसांनी तिचा फार छळ केला आणि एक दिवस पुतळी सुलतानाकडे परतून गेली. त्यानंतर तिच्याकडून एक खून करवून, सुलतानाने तिचे परत फिरण्याचे दोर कापून टाकले.

पुतळी प्रथम सुलतानाबरोबर राहत होती. टोळीतील वैमनस्यामुळे सुलतानाचा खून झाल्यावर तिने व कल्ला नावाच्या डाकूने 'पुतळी-कल्ला' टोळी तयार केली. पुतळी फार चतुर होती. पोलिसांकडून घेरा पडल्यास ती चटकन घुंगट काढून स्वयंपाकघरातल्या स्त्रियांमध्ये सामील होई. पोलीस झडती घेऊन पुढे जात. एका पोलीसकारवाईत तिच्या डाव्या हाताला गोळी लागली. लखनौच्या एका सर्जनकडून तिने हात कापून (amputate) घेतला. त्यानंतर त्या थोट्या हातावर बंदूक ठेऊन पुतळी बंदूक चालवी. मुंबईहून स्पेशल ड्यूटीवर आलेल्या इन्स्पेक्टर भाजेकरांचा बळी तिने ह्या थोट्या हातानेच घेतला. परंतु मरण्यापूर्वी पुतळीच्या थोट्या हाताचे गुपित फोडून भाजेकरांनी तिच्याही मरणाचा मार्ग निश्चित केला.

सन १९५०-६० मध्ये दस्युभूमीत सोळा टोळ्या होत्या. त्या टोळ्या चंबळेच्या दोन्ही तीरांवरच्या राज्यातून उपद्रव करीत स्वच्छंद फिरत. अशा टोळ्यांना पोलिसांच्या परिभाषेत लिस्टेड गँगस् म्हणतात. ह्या टोळ्यांचे आपसातही शत्रुत्व व वैमनस्ये असतात. मानसिंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या टोळीचे नेतृत्व रूपा महाराज ह्या ब्राम्हणाकडे गेले. दस्युभूमीत कुठेही ब्राम्हण व ठाकूर ह्यांचा कलह झाल्यास ब्राम्हण रूपाला व ठाकूर लाखनसिंगाला आपली बाजू राखण्यासाठी आमंत्रण देत. दोन्ही दळे त्या गावाचे रणांगण करून त्याचा सत्यानाश करीत.

स्वतंत्र भारतात, अस्पृश्य स्वतंत्र होऊन निर्माण झालेले तंग वातावरण ह्यापूर्वी उल्लेखिले गेले आहे. दस्युभूमीतला चांभार हा मेहनती व त्याचे कुटुंबही कामकरी असल्याने, चांभारांची आर्थिक स्थिती सुधारली, उलट उच्चवर्ण द्विजांची परिस्थिती मात्र खालावत गेली. ह्याचे परिणामही दुबळ्या चांभारांना भोगावे लागत आहेत. त्यांना जागोजाग गोळ्या खाव्या लागल्या व लागत आहेत. जमीनदारांच्या खंडातून त्यांची मुक्तता झाली; पण आज त्यांच्याकडून 'चंदा' मागितला जातो व तो ते प्राणभयाने देतातही. ते खेड्यात राहतात, पण सदैव दबून, प्राणभय बाळगून. आपले लोकसत्ताक राज्य त्यांना संरक्षण देण्यास असमर्थ ठरले आहे. हा आपला पराभव व आपल्या समस्येचा गाभा आहे.

डाकूंचे दुसरे तंत्र माणसे पळवून नेण्याचे आहे. अशा पळवलेल्या माणसांच्या नातलगांकडून हजारो रुपयांच्या मागण्या करावयाच्या व त्या मागण्या पूर्ण न झाल्यास पळवलेली माणसे मारून टाकावयाची. नातलगांवर दडपण आणण्यासाठी, बंदीत ठेवलेल्या लोकांकडून पत्रे लिहून घेऊन पाठवावयाची. पळवले जाणारांमध्ये मुलांची संख्या अधिक असते. त्यांना पळवणे सुलभ व लपवणेहि सोपे असते. बंदुका सरसावीत दहा-पाच डाकू घर, शाळा वा जिथे त्यांना हवा असलेला माणूस असेल तेथे येतात. काही बाहेर पाहरा देत उभे राहतात. बाकीचे आत जाऊन माणसाला घेऊन येतात. त्यांच्या कारवाईत कोणी हस्तक्षेप करू धजल्यास, त्याला धमकी देण्यात येते व धमकी अपुरी पडल्यास गोळी घालण्यात येते. भिंड जिल्ह्याच्या अडोखर गावातून, डाकूंनी एका बनियाचा शाळकरी पोरगा शाळेतून उचलून नेला. मुलाचा बाप ग्वाल्हेरला दुकानदार होता. डाकूंनी त्याच्याकडे पन्नास हजार ते एक लाख रुपयांच्या मागण्या केल्या. पोराकडून करुण पत्रे येत. बापाकडून पैसे मिळावयास विलंब झाल्याने त्याला खाण्यापिण्याची ददात पडू लागली. वरण खाण्यासाठी वाटी म्हणून कोणाच्या तरी जोड्याचा उपयोग करण्यात येई. पाच महिन्यातही पैसा पावता करणे बापाला शक्य न झाल्याने पोराला मारून त्याचे प्रेत भिंड शहराच्या चवाठ्यावर फेकण्यात आले.

ह्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी सरकारने दस्युक्षेत्रात पोलिसांची संख्या वाढवली; पण तीन राज्यात वाटलेल्या दस्युभूमीत पोलिसांच्या उपायांना एकसूत्रीपणा आला नाही—आजही पूर्णपणे येत नाही. पोलीसदळ वेगवेगळ्या राज्यांच्या सीमां-

वरून अनिर्बंध जाऊ शकत नाही. शिवाय डाकू अद्यावत शस्त्रांनी सुसज्ज व निशाण-बाजीत निष्णात आहेत. त्यांना समाजाच्या समर्थ भागाचा पाठिंबा आहे. ह्या गोष्टी ध्यानी घेता, पोलिसांचे प्रयत्न अपुरे व निष्फळ ठरावेत ह्याचे नवल वाटत नाही.

पोलिसांच्या मार्गात दुसरीही एक धोंड आहे. तहसीलदारसिंगासारखा एखादा मोठा डाकू त्यांनी शर्थीने पकडला तरी आपल्या सध्याच्या फौजदारी कामकाजाच्या पद्धतीमुळे होणाऱ्या विलंबात त्या डाकूचे साथी व समर्थक हे हत्या, लाच अशा बऱ्यावाईट उपायांनी साक्षीपुरावा नष्ट करतात आणि कोर्टात गुन्हा सिद्ध करणे कठीण होते. गुन्हा सिद्ध करून शिक्षा झाली तरी ती शिक्षा दयाबुद्धीने कमी होऊ शकते. त्यामुळे, 'पोलीस डाकूंना पकडण्याच्या भानगडीत न पडता त्यांना गोळ्या घालतात', ह्या दस्युभूमीत सर्वदूर कानी येणाऱ्या तक्रारीत तथ्य असण्याची शक्यता मनाला वाटू लागते. डाकूंना कारावासापेक्षा मृत्यू श्रेयस्कर वाटतो हेही येथे लक्षात ठेवले पाहिजे.

पोलीस वेगवेगळ्या डाकू-टोळ्यांमध्ये पक्षपात करितात असाही प्रवाद वेळोवेळी कानावर येतो. नुसत्या संशयाने किंवा आकसाने प्रथम गोळी घालून मग आपल्या कृत्याचे समर्थन करण्यासाठी तो माणूस पोलिसांकडून डाकू ठरवण्यात येतो, असेही अनेकांचे म्हणणे होते. आपल्या शत्रूंना नामशेष करण्यासाठी मुखबिरांना मोकळे रान सापडते व पोलीस नेहमी त्यांची पाठराखण करितात, हाही प्रवाद आपण ऐकतो. हा प्रवाद खरा असण्याचा संभव पुष्कळ आहे; कारण डाकूंची माहिती पोलिसाला मुखबिरांकडूनच मिळावयाची असते; व आपल्या शत्रूंची नावे गुन्हेगारात गोवण्याची सुवर्णसंधी त्यांना सापडते, हे उघड आहे. गावात कलह झाला म्हणजे अनेकदा एक पक्ष ओहोळात एखाद्या प्रसिद्ध डाकूला जाऊन मिळतो व विरोधी पक्ष पोलिसकडे जाऊन मुखबीर होतो. त्यानंतर त्या गावात सर्व प्रकारच्या गुन्हेगारीला ऊत येतो व दोन्हीपैकी एक पक्ष नामोहरम होईतो ही दंगल चालू राहते.

सन १९६० मध्ये ह्या रक्तपाताला पर्याय शोधण्याच्या हेतूने आचार्य विनोबा भावे यांना ह्या प्रदेशात पदयात्रेला पाचारण करण्यात आले. ह्या निमंत्रणाला पोलीस-अधिकारी, विविध मंत्री-गण, समाजसेवक यांनी व स्वतः डाकूंनीही पाठिंबा दिला होता. आचार्य विनोबा भावे मे महिन्यात ह्या क्षेत्रात चार आठवडे हिंडले. त्यांच्या प्रयत्नाने मानसिंगाची उर्वरित अर्धी टोळी व एकंदर एकवीस डाकू स्वाधीन झाले. ही माणसे पुढे कायद्याच्या कारवाईसाठी पोलिसांच्या हवाली करण्यात येऊन त्यांच्यावर रीतसर खटले भरण्यात आले.

ह्या चार आठवड्यांच्या अवधीत परिस्थितीचे संपूर्ण आकलन करण्याची संधी मात्र आचार्यांना मिळाली नाही. डाकूंची धार्मिकता व पोलिसांचा जुलूम ह्यांच्या कहाण्यांनी त्यांचे मन द्रवले. डाकूंच्या शौर्याबद्दल त्यांनी डाकूंचे कौतुक केले; डाकूंच्या मागण्याप्रमाणे त्यांना डाकू न म्हणता त्यांचा 'बागी' (विद्रोही) म्हणून त्यांनी स्वीकार केला व पोलिसांना त्यांच्या जुलमासाठी त्यांनी दोषही दिला. ह्या घटनेमुळे

डाकू हे जनतेचे हीरो बनले व पोलिसांना उपरति होऊ लागल्याने मोठा बिकट प्रसंग उभा राहिला. पोलीसअधिकाऱ्यांनी निरुपायाने आचार्यांविरुद्ध निवेदने केली व सारे वातावरण विषारी झाले.

पुढे उद्भवलेल्या शाब्दिक वादळात आचार्य मूक राहिल्याने ते वादळ शमले. पण ह्या वादळामुळे मने कलुषित झाली व आचार्यांनी त्या वेळी केलेल्या मौलिक व महत्त्वाच्या उपक्रमांची उपेक्षा झाली. चंबळओहोळातून "डाकू नव्हेत तर डाकूवृत्ती नष्ट करावी लागेल" ह्या तर्कशुद्ध दृष्टिकोनातून कार्य करण्यासाठी व त्या कार्यात सातत्य राखण्यासाठी त्यांनी चंबळ–घाटी–शांति–समितीची स्थापना केली होती. ह्या समितीला सहकार्याचे हात फारच थोडे लाभले. सरकारने तर तिची दखल जवळपास घेतलीच नाही. जे मूठभर कार्यकर्ते होते त्यांच्या विचाराचा गुंता ह्या विरोधी परिस्थितीत जास्तच गुंतल्याचे सन १९६१ अखेर झालेल्या सेमिनारमध्ये माझ्या प्रत्ययाला आले. आज समितीने एक महत्त्वाचे कार्य अंगावर घेतले आहे. डाकूपीडित परिवारातली मुले खेड्यातल्या सूडाच्या कल्पनेने भारलेल्या विषारी वातावरणातून काढून, त्यांच्यावर विद्येचे संस्कार करण्याच्या हेतूने भिंडला एक वसतिगृह यंदा उघडण्यात आले आहे. सर्व मुलांना समभावाने वागवण्याचा हा प्रयोग येथील समाजव्यवस्थेमध्ये अभिनव आहे. हा प्रयोग आज तरी संपूर्णपणे उपेक्षित आहे.

आचार्यांच्या स्वाधीन झालेले बरेच लोक आता सुटून आले आहेत; पण हे गुन्हेगार पुढे कसे वागतील हे अजून काळाच्या पोटात दडलेले गुपित आहे.

विनोबांच्या पदयात्रेनंतर, डाकूंच्या उरलेल्या तीन टोळ्या लौकरच पोलिसांच्या गोळ्यांनी नामशेष झाल्या व सरासरी दोन वर्षे दस्युभूमी शांत होती. सन १९६२ च्या अखेर मात्र पुन्हा नवीन वीस एकवीस टोळ्यांनी दंगलीला सुरुवात केली. त्याबद्दल देण्यात येणारी कारणे दोन प्रकारची आहेत. काही लोकांच्या मते मध्यप्रदेशाच्या मंत्रिमंडळात झालेला खांदेपालट ह्या दंगलीला कारणीभूत झाला. काहींच्या मते सन १९६२ ह्या वर्षात दस्युभूमीच्या बाहेरच्या प्रदेशात दंगल जागोजाग उसळल्याने दस्युभूमीतील संरक्षक पोलीसदल तिकडे पाठवण्यात आले. कायद्याची, शासनाची पकड ढिली पडली व त्याचे पर्यवसान नवीन टोळ्या संघटित होण्यात झाले.

डाकूंना शस्त्रे मिळतात कशी व लुटीच्या मालाची विल्हेवाट कशी लागते, हे प्रश्नही विचारार्ह आहेत. हैद्राबादच्या पोलीसकारवाईनंतर तेथील शस्त्रे भूमिगत झाली व ती दस्युभूमीत विकण्यात आली; शिवाय पाकिस्तानमधून चोरटा पुरवठा होत असतो; ही कारणे माझ्या कानावर आली. भारताच्या शस्त्रागारातून (armory) डाकूंना शस्त्रे मिळत असावीत, असा कयास बांधावयास जागा आहे. चोरीच्या मालाचे, काळ्या बाजाराचे व्यापारी भारतात सर्वत्र आहेत; त्याला दस्युभूमी अपवाद नाही. वरील दोन्ही वर्गांवर आपले नियंत्रण फारसे प्रत्ययाला येत नाही.

पूर्वीच्या मध्यभारत सरकारने खेडुतांनी डाकूंपासून स्वसंरक्षण करावे ह्या हेतूने खेड्याखेड्यांनी डाकूप्रतिबंधक समित्या स्थापन केल्या होत्या. ह्या समित्यांचे सदस्य बहुतेक ब्राह्मण-ठाकूर आहेत. डाकूंशी त्यांचे मतभेद असलेच तर ते वैयक्तिक हेव्यादाव्याच्या स्वरूपाचे आहेत. 'चंदा' घेण्यासारख्या अन्याय्य उपक्रमाला तोंड देण्याला त्याचा उपयोग होण्यासारखा नाही. शिवाय खेड्यावर डाका पडल्यास गोळ्या झाडण्याऐवजी समितीचे सदस्य शस्त्रे टाकून पळून जातात व शस्त्रे आणि दारूगोळा डाकूंच्या हाती आयता पडतो असेही मला काही लोकांनी सांगितले.

सरकारी कारवाईला तोंड देण्याचे आपले तंत्र डाकूंनी अलीकडे बदलले आहे. लिस्टेड टोळ्या आता बहुशः नामशेष झाल्या आहेत. उरल्या आहेत त्या एकात्र राज्यात गुन्हे करणाऱ्या अन्‌लिस्टेड (unlisted) टोळ्या व त्याहीपेक्षा सहज संधी साधेल तेव्हा गुन्हे करणारी माणसे. एखाद्या रात्री अचानक एखाद्या गावावर झडप घालावी, लूट-हत्या कराव्यात, परत जाताना एखाद्या मोठ्या डाकूचे नाव घेऊन, "रामसिंगाची टोळी आहे ही. पोलिसला सांगाल तर याद राखा" अशी धमकी देऊन निघून जावे. लोक रामसिंगाच्या नावाने भयभीत होतात. पोलिसांना खबर मिळावयास विलंब होतो. आपल्याला मिळालेली माहिती चूक आहे, डाका रामसिंगाचा नाही, ही माहिती काढण्यात पोलिसांचा पुन्हा कालापव्यय होतो. ह्या अवधीत गुन्हेगारांचे माग अस्पष्ट होतात वा पुसून जातात आणि गुन्हेगार सहीसलामत सुटून जातात. डोळ्यासमोर असणाऱ्या टोळ्यापेक्षा हे भुरटे डाकू नियंत्रणाला जास्त जड जातील हे उघड आहे.

दस्युवृत्तीसारख्या गुन्ह्यांनी समाजजीवनाचा निर्वेधपणा संपुष्टात येतो, समाज-धारणेला आवश्यक असे उत्पादनाचे कार्य शिथिल पडण्याचा संभव असतो. प्रस्थापित शासनाच्या मूलभूत शक्तींना आव्हान देणारा हा प्रश्न लौकर सोडवण्याची निकड शासनाला नेहमीच असते. गेल्या दोन वर्षांत ह्या समस्येत झालेल्या एक-दोन उपक्रमांनी तिचे गांभीर्य व निकड खूपच वाढवली आहेत.

ह्या मागासलेल्या भागात दळणवळणाची साधने, पाटबंधारे व इतर सोयी वाढवल्यास तेथील सुबत्ता वाढून दस्युवृत्ती कमी होण्याचा संभव आहे. चंबळेवर सध्या तयार होत असलेल्या धरणांचे पाणी व वीज ही ह्या क्षेत्रात खेळणार आहेत, हे त्या दृष्टीने स्वागतार्ह आहे. त्या सोयींचा संपूर्ण फायदा घेता यावा म्हणून येथे सध्या रस्ते बांधण्याचे काम सुरू केलेले आहे. ही कामे करणाऱ्या इंजिनियर-ओव्हरसीयर वगैरे लोकांना जबर खंडणीसाठी पळवून नेण्याचे दोन प्रकार अगदी अलीकडे घडलेले आहेत. एका कामावर तर ठेकेदारांनी काम करण्याचे नाकारल्याच्या बातम्या आल्या आहेत. डाकूंच्या ह्या उपक्रमाचा अर्थ व त्याची भयावहता कोणालाही सहज समजेल.

दुसरा उपक्रम ह्यापेक्षाही जास्त चिंताजनक आहे. चंबळच्या ओहोळांमधील दंगल ही सरंजामशाहीने नव्या युगाला दिलेली धडक आहे. नव्या जगाचे कायदे

ह्या जुन्या व्यवस्थेच्या आधारस्तंभांना पसंत नसल्याने त्यांनी केलेला हा विद्रोह आहे. ह्या विद्रोहाला यश लाभण्याची कुठलीही शक्यता संभवत नाही. परंतु आपले लोकसत्ताक राज्य, आपल्या समता, स्वातंत्र्य, न्याय ह्या मूल्यांचे संरक्षण करण्यास अद्यापपर्यंत असमर्थ ठरल्याने, येथील परिवर्तनाचा, विकासाचा डाव कुजत पडला आहे. त्या कुजलेल्या डावामधून डाकूगिरीचा नवा उपक्रम निर्माण झाला आहे.

सरकार आपल्याला संरक्षण देण्याला असमर्थ असल्याचे उमजून आल्यावर दलित अस्पृश्य लोक आज स्वसंरक्षणार्थ उभे ठाकत आहेत. पण त्यांनीही 'कायदा व सुव्यवस्था' ह्यांची प्रतिष्ठा न ठेवता डाकूच्या टोळ्या उभारावयास सुरुवात केली आहे. आपले उत्पादनाचे कार्य सोडून चांभार व भंगी ह्यांच्या एकेक टोळ्या अलीकडे अस्तित्वात आल्या आहेत. हा प्रश्न लष्कर, पोलीस अशा शक्तीच्या दंडुकेशाहीने सुटणार नाही हे आपण अजून उमजलो नाही. दस्युवृत्तीचा सामाजिक आशय आपल्या ध्यानी येईतो रक्तपाताचे चक्र असेच चालू राहणार आहे.

आचार्य विनोबा भावे ह्यांच्या पदयात्रेमुळे माझे लक्ष ह्या समस्येकडे आकृष्ट झाले. त्यानंतर मी जे पाहिले, ऐकले, वाचले वा चर्चिले ते ह्यापुढे जसेच्या तसे नमूद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामधून दस्युसमस्येचे वाचकांना दर्शन घडेल ते खरे!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. .................... विभाग ..................
क्रमांक .................. नों दि. ...............

# दस्यूंची समस्या

## १. डाकूगिरीचें दर्शन

भारत स्वतंत्र झाल्याला आज एक तप उलटून गेले आहे. पेशवाईतील काळाप्रमाणे आज आम्हा सामान्य सुशिक्षित नागरिकांचा भूगोल भविष्यपुराण व दंडकारण्यमाहात्म्यापर्यंत[1] परिमित नसला तरी आमच्या दृष्टीचे क्षेत्र विशेष विस्तारलेले नाही. अखिल भारतीय समस्यांकडे जिज्ञासू व अभ्यासू दृष्टी न टाकता 'आपण काय करणार आहोत त्यात?' अशी उपेक्षेची वृत्ती बहुशः दिसून येते. आमचा आदर्श आजही 'कोणाच्या अध्यात नाही, कोणाच्या मध्यात नाही' असा अलिप्ततेचा आहे. हे स्थितप्रज्ञतेचे कवच भेदून ज्या अत्यंत थोड्या समस्या सुशिक्षितांच्या अंतरंगापर्यंत पोचल्या, त्यांच्यापैकी दीर्घकालपर्यंत आमचे लक्ष वेधून ठेवण्याचा अग्रमान चंबळच्या दस्युसमस्येला द्यावा लागेल.

भारत सन १९४७मध्ये स्वतंत्र झाला. सन १९५०मध्ये त्याची नवी राज्यघटना अमलात आली. ह्या दरम्यान वृत्तपत्रांच्या वार्ताविभागात चंबळेच्या दस्यूंनी चंचुप्रवेश केला. चार ओळींच्या तारा ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, मैनपुरी, इटावा अशा ज्ञात, अर्धज्ञात स्थळावरून येऊन वृत्तपत्रात छापलेल्या असत. ह्या बातम्याकडे आपले लक्ष वेधण्याचे काहीच कारण नव्हते, कारण दस्युवृत्तीची परंपरा भारतात सनातन आहे.

डकैती हा शब्दच आपल्या दंडसंहितेला बंगाल व मद्रास ह्या प्रांतांची देणगी आहे.[2]

---

१. मराठे आणि इंग्रज (उत्तरार्ध) : न० चिं० केळकर; पान ९६

२. ए स्टडी इन इंडियन क्राइम : पेरीन सी० केरावाला; पान ७९

त्याला मुंबईसारखे राज्यही अपवाद नाही.[१] ह्या डाक्यांबद्दल एक विशिष्ट चित्र आपल्या मनाने रंगवलेले असते. त्या चित्राची तुलना चैत्रातील वातचक्राशी करिता येईल. तडकलेले ऊन, स्तब्ध व क्षुब्ध वातावरण—अशा वेळी, कुठेतरी अचानक हवा गिरक्या घेत धावू लागते. जमिनीवर लोळणारी धूळ आणि पालापाचोळा ही तिच्याबरोबर आकाशाला गवसणी घालावयास वर उठतात. तिच्या वाटेतून आपण बाजूला सरतो. काही क्षण पिंगा घालीत पुढे धावल्यावर ही वातकन्या उत्पन्न झाली तितक्याच अचानकपणे आपल्या मूळ स्वरूपात विलीन होते. तिच्या शक्तीप्रमाणे तिने केलेली नासधूस आणि काही नाही तर वर उडवलेला पालापाचोळा तिच्या अस्तित्वाची साक्ष काही काळ देत राहतात.

वरील चित्राशी विसंगत व म्हणून आपल्या मनाला अनाकलनीय असे वृत्तांत जेव्हा चंबळखोऱ्यातून येऊ लागले तेव्हा आपले कुतूहल जागे झाले. आपल्या अनुभवातील डाक्यांमध्ये, गुन्हेगार सर्वांनाच अपरिचित असतात. उलट चंबळच्या डाकूंची नावे, त्यांची खेडी, वैरे, नातलग, जमीनसंपत्ती—सर्वांची संपूर्ण माहिती पोलिसांना असल्याचे वृत्तपत्रांवरून स्पष्ट होई. ह्या डाकूंविरुद्ध मोहिमा चालत. पोलीसदल पाठीवर घेऊन, हे दस्यु महिनेच्या महिने त्यांना झुकांड्या देत अत्याचार करीत फिरत. सामना झाल्यास, नियमित युद्ध होऊन दोन्ही बाजूंना मृतांची व घायाळांची संख्या दिसे.

डाकूंचे अत्याचारही जितके भयानक तितकेच लोकविलक्षण. अपहरण करून माणसे आठवडेच्या आठवडे कुठे लपवली जातात ? बंदीत होणारे त्यांचे हाल, त्यांची केविलवाणी पत्रे, डाकूंच्या प्रचंड रकमांच्या मागण्या, धरून नेलेल्या लोकांचे बंदीत होणारे मृत्यु व नंतर मिळणारी त्या अभागी जीवांची प्रेते, हे सत्य का कपोलकल्पित कटू काव्य ? एकदा एका डाकूने देवीला नररुंडमाळा वाहण्याचा नवस करून एका खेड्यात पाच निरपराध मीना युवकांना गोळ्या घातल्या,[२] तर दुसऱ्या एकाने एकशेएक नाके कापण्याचा संकल्प सोडून एका दिवसात पसतीस नाके उडवल्याने ग्वाल्हेरच्या रुग्णालयात त्या विद्रूप लोकांची रीघ लागली.[३] हे अत्याचार एखाद्या एकाट खेड्यात घडत वा आग्रा-दिल्लीचा हमरस्ताही हे तांडव सादर करी.

चंबळ खोरे हे तीन—त्या वेळी चार—राज्यांच्या सीमांना लागून असल्याने चंबळ पार करताच पाठीवरचे पोलीस हतबल होत व अपराधी निसटून जात.[४] अखेर आंतरराज्यीय बैठक भरवण्यात येऊन, त्या प्रदेशात निवडक पोलीस, लष्करी पोलीस, विशेष प्रशिक्षित पोलीस, वगैरे पोलीसदल ठेवण्याच्या योजना तयार झाल्या. डाकूंना

---

१. द लॉ ऑफ क्राइम्स : धीरजलाल व रतनलाल ठाकूर; पान ९६९

२. अभिशप्त चंबळ : तरुणकुमार भादुडी; पान १२८

३. अभिशप्त चंबळ : तरुणकुमार भादुडी; पान ४८

४. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट; १९५३; परिच्छेद १६

जिवंत किंवा मृत पकडण्यासाठी मोठाली बक्षिसे जाहीर झाली. पोलिसांचे हेरखाते जास्त कार्यक्षम करण्यात आले, व मोहिमांचा धूमधडाका खूप जोराने सुरू झाला. डाकूही काही दुबळे नव्हते. त्यांच्या टोळयाही फौजेप्रमाणे युनिफॉर्ममध्ये असत. नेमबाजीत तर ते पोलिसांपेक्षाही जास्त बाकबगार आढळून येत.[१] सरकारच्या हेरांना, त्यांचे प्रतिहेरांचे प्रत्युत्तर होते. त्यामुळे अनेकदा सरकारी शक्ती जिंकल्या तरी त्यांचे नुकसान अतोनात होई. मानसिंग मेला पण बरोबर गोविंद बहादूर थापाही त्याच्या गोळीला बळी पडला. दस्युराणी पुतळीने सबइन्स्पेक्टर भाजेकरांना प्राणांतक जखम केली. प्रश्न पडे : पोलिसांनी वेढलेले हे डाकू जातात तरी कुठे? त्यांच्याजवळ काय अल्लाउद्दिनाचा जादूचा दिवा आहे?

क्रमशः डाकू मारले जाऊन संपू लागले. मानसिंग, सुलताना, पुतळी, कल्ला, रूपा—अनेक नावे वृत्तपत्रातून झळकली. त्यांची अभयस्थाने म्हणजे चंबळचे ओहोळ. त्या ओहोळांचे फोटो कधी प्रसिद्ध होत तर कधी डाकूंच्या प्रेतांचे. दणकट शरीर, वाढलेली दाढी, थकलेला चेहरा, शांत पण संतुष्ट, निश्चित. 'हमने किया सो ठीक किया।' ही रग तेथेही दिसून येई. अर्धतपाच्या रक्तपातानंतर सोळा टोळ्यांपैकी साडेतीन टोळ्या उरल्या : पाना, बहादुरा व लाखनसिंग ह्यांच्या तीन आणि मानसिंग-रूपा टोळीचे, लुक्काच्या नेतृत्वाखाली असलेले अवशेष ही अर्धी टोळी. मानसिंगाचा लाडका मुलगा तहसीलदारसिंग आग्रा जेलमध्ये फाशीची शिक्षा होऊन आयुष्याचे शेवटचे दिवस मोजीत होता. तोवर १९५९-६० साल उजाडले होते.

चंबळ खोरे थोडे विसावले, पण ही भयानक शोणितगाथा संपण्याची शाश्वती नागरिकाला वाटत नव्हती. कारण जुने डाकू मारले गेले तरी डाकूगिरीची वृत्ती नष्ट करण्याची भाषा कुठेच कानावर येत नव्हती. केवळ कुठाराघाताने गुन्हेगारीचा खोल रुजलेला वटवृक्ष समूळ उखडून निघणे शक्य नव्हते. ही कल्पना अनेकांना असल्याने दीर्घकाल टिकणारी शांतता स्थापण्याचे मार्ग बरेच लोक शोधीत होते. त्यात डॉ० ललित, श्री० मिस्थल व श्री० लल्लूसिंग ह्यांच्यासारखे सामाजिक कार्यकर्ते होते, त्याचप्रमाणे एके काळी राष्ट्रपतींचे ए० डी० सी० असणारे साधू–जनरल जदुनाथ सिंह किंवा पोलिस डी० आय० जी० कोहिलीही होते.[२] त्या सर्वांना आचार्य विनोबा भावे ह्यांचे नाव सुचणे स्वाभाविक होते. कारण नवस्वतंत्र भारताच्या जीवनात फाळणीनंतर रक्तपाताची एकच घटना तेलंगणात घडली आणि तेथे शांततास्थापन करण्यात आचार्यांना यश मिळाले होते. तहसिलदारसिंगाने फाशी जाण्यापूर्वी आचार्यांच्या दर्शनाची इच्छा प्रकट केली होती.[३]

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्कायरी कमिटीचा रिपोर्ट; १९५३; परिच्छेद ३०
२. चंबळ के बेहडोमे : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान १३७, ३८
३. चंबळ के बेहडोमे : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान २१

डाकूगिरी माजलेल्या या प्रदेशात विनोबांनी पदयात्रा करावी, आणि डाकूंचे हृदयपरिवर्तन घडवून त्या भागात शांतता प्रस्थापित करावी, ही कल्पना वृत्तपत्रातून चर्चिली जात असताना, सुशिक्षित भारताने तिचे निर्भेळ स्वागत केले नाही; कारण हृदयपरिवर्तनाच्या थोतांडावर त्याचा विश्वास नव्हता. वाल्मीकी, अंगुलिमाल ह्यांच्या कहाण्या त्याने ऐकल्या होत्या. पण रक्तपाताला कंटाळलेल्या व्यक्तींची नावे इतिहासात काही थोडी नाहीत. काळाच्या वालुकेत आपल्या पावलांच्या शाश्वत खुणा ठेवून गेलेला सम्राट अशोक हा त्यातलाच आहे. चंबळ-खोऱ्यात प्रश्न व्यक्तींचा नव्हता. येथील अपराध सामूहिक होते व सामुहिक हृदयपरिवर्तनाचे दर्शन जगाला अजून तरी घडावयाचे आहे. आचार्यांच्या—त्यांना त्यांचे निकटवर्ती बाबा म्हणतात—पदयात्रेचे स्वागत झाले नाही, तरी आमचे कुतूहल मात्र जागे राहिले.

पडद्यामागे अनेक सूत्रे हलून अखेर आचार्य २१ एप्रिल १९६०ला चंबळघाटीत उतरले व तेथे चार आठवडे पदयात्रा करून इंदूरकडे गेले. ह्या अवधीत मानसिंगाची अर्धी टोळी 'समर्पित' झाली, त्याचप्रमाणे तहसिलदारसिंगाची फाशी रद्द होऊन त्याला जन्मठेप झाली. 'कायदा व सुव्यवस्था' ह्यांना जबाबदार असलेल्या सरकारने, सर्वतोपरीने आचार्यांशी सहकार्य केले, परंतु डाकूंच्या उरलेल्या तिन्ही टोळ्या त्यांच्यापासून दूर राहिल्या. ह्या टोळ्यांचा प्रश्न नंतर अल्पावधीत पोलिसांच्या गोळ्यांनी सोडवला असला तरी आचार्यांचा पराजय झाल्याची कबुली आचार्य धर्माधिकाऱ्यांनीही दिली.[1]

डाकूंच्या निःपातानंतर चंबळ घाटीत थोडी शांतता निर्माण होऊन ही समस्या नागरिकांच्या डोळ्याआड झालीही असती. पण मध्यप्रदेशाच्या पोलिस प्रमुखांच्या (I. G. Police) दोन निवेदनांमुळे ह्या प्रश्नाला पुनश्च चालना मिळाली. नवलाची गोष्ट ही की, त्या निवेदनाच्या आशयाशी आमचा मतभेद नव्हता; पण हे निवेदन सनदी नोकराने करावे हे अनुशासनाला सोडून आहे, असे नागरिकाला वाटणे अपरिहार्य होते.

चंबळमध्ये कशीबशी प्रस्थापित झालेली शांतता सरासरी दोन वर्षांच्या अवधी-नंतर पुन्हा रक्ताच्या शिंपणाने भिजली आहे. मानसिंग, पुतळी, कल्ला, अमृतलाल ही नावे गेली. पण त्यांच्या जागी हरबिलास किराट, जोरावरसिंग गणेशसिंग, गुलबहार, चंद्रा इत्यादी नवी नावे कानावर येत आहेत. पुनश्च अपहरण, खंडण्या, डाके, अत्याचार, हत्या ह्यांचे सत्र सुरू झाले आहे. अलीकडे आंतर-राज्यीय पोलिस-अधिकाऱ्यांची बैठकही बरेलीला भरवण्यात आली होती.[2]

---

१. ग्वाल्हेरचा परिसंवाद

२. हिंदुस्तान टाइम्स : तारीख २१-१-१९६३

जुन्या जखमा चिघळल्या म्हणजे जास्त क्लेशदायक होतात, तसाच प्रकार चंबळ-घाटीत झाला आहे व तेथे डकैती पिढीजात होणार की काय असे भय वाटत आहे. अमृतलालचा मुलगा बालो आणि पुतळीची बहीण तारा आज गुन्हेगारीच्या मार्गाने जात आहेत.[१]

इतके दिवस कुतूहलाचा विषय झालेली दस्युभूमी आता चिंतेचा, संतापाचा विषय होऊ पाहत आहे. चिनी आक्रमणानंतर हिंदी जनतेने अभेद्य एकजूट केली. नागालँडची मागणी, स्वतंत्र द्रविडीस्तानची चळवळ, पंजाबी सूबाचे आंदोलन, ह्या आणीबाणीच्या वेळेपुरत्या मागे घेण्यात आल्या. उलट चंबळ-घाटीची गुन्हेगारी कमी झाली नाही, तर थोडी वाढलीच.

इतके दिवस चंबळ-घाटीत सामावलेली ही समस्या आता ओसंडून राजस्तानच्या पाकिस्तानी सीमेवर अस्तनीतील निखाऱ्याचे कार्य करीत आहे. ह्या वेळीं पाक सरकारने सहकार्य करून गुन्हेगारांचे शासन करण्यास मदत केली आहे. पण पाकचे सहकार्य आपल्याला नेहमीच लाभेल का? हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

चंबळ-समस्येबद्दल सामान्य सुशिक्षित नागरिकाला जे कमाल कुतूहल आहे त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे. चंबळचे डाकू, ज्यांना आचार्य भाव्यांनी 'बागी' मानले, ते आहेत कोण? त्यांचे बंड–बगावत कशाविरुद्ध, कोणाविरुद्ध आहे? त्यांचे ध्येय काय आहे? त्यांना राष्ट्रीयत्वाची बूज का नाही?—असे अनेक प्रश्न वेटोळीं घालून त्याच्यासमोर उभे आहेत.

ह्या विषयावर दोनच पुस्तके मला उपलब्ध झाली: श्री० तरुणकुमार भादुडी ह्यांच्या 'देश' ह्या बंगाली साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांचे संकलन 'अभिशप्त चंबळ' व श्रीकृष्णदत्त भट्ट यांचे, विनोबांच्या पदयात्रेचे दैनंदिनीच्या स्वरूपात वृत्तांत देणारे 'चंबळ के बेहडों में'. ही दोनही पुस्तके आरंभी वृत्तपत्रसृष्टीसाठी लिहिली गेली. गुन्हेगारीच्या समस्येबद्दल संपूर्ण माहिती मिळवण्याचे ध्येयच त्यांच्यापुढे नव्हते. अशा वेळीं आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'अपराध व अहिंसा' ह्या परिसंवादाचे अनन्यसाधारण महत्त्व कोणालाही वाटले असते. त्या परिसंवादासाठी ग्वाल्हेरला मी मोठ्या उत्साहाने गेले तर ते स्वाभाविकच होते.

---

१. स्टेट्स्मन : तारीख १६-१०-१९६३

अ. क्र. ........
क्रमांक ........

## २. अपराध व अहिंसा

जुलैचा महिना, गदगदणारी गरमी पडत होती. घामाने जीव घाबरत होता. परिसंवादाची अयोजना ग्वाहेरातील एका धर्मशाळेच्या मुख्य हॉलमध्ये करण्यात आली होती. पांढऱ्याशुभ्र खादीच्या वेषात दादा उच्चासनावर बसून बोलत होते.

दादा—आचार्य धर्माधिकारी—आम्हा विद्यार्थ्यांचे १९३० मध्ये पुढारी होते. दादांचे अमोघ वक्तृत्व, त्यांचा विशाल व्यासंग आणि तीक्ष्ण विश्लेषणशक्ती ही मला पूर्वपरिचित होती. पण ह्या परिसंवादामध्ये मात्र त्यांच्या वक्तृत्वावाचून कशाचाच साक्षात्कार मला झाला नाही. दादांच्या व्याख्यानाच्या नोट्स् वारंवार वाचून माझ्या हाती एकच महत्त्वाचे सूत्र लागले : आम्ही डाकूंची समस्या ही कायदा व सुव्यवस्थेची समस्या मानली, सामाजिक-नैतिक समस्या मानली नाही.

परिसंवाद अपेक्षेप्रमाणे रंगला नाही आणि सुदैवाने लांबलाही नाही. चंबळमध्ये निरलस परिश्रम करणारे श्री० लल्लुसिंग, शांतिसमितीचे महत्त्वाचे कार्यकर्ते श्री० मित्थल, ह्या प्रदेशात वकिलीचा धंदा करणारे श्री० आनंद व कम्युनिस्ट श्री० बन्सल वकील, टाटा फौन्डेशन फॉर गांधीयन फिलॉसफीचे एक तरुण अभ्यासक श्री० कृष्णकुमार ही मंडळी बोलली. बहुतेकांची कारणमीमासा विनोबांनी केलेल्या मीमांसेशी जुळती होती. ह्या मीमांसेत एकंदर सहा महत्त्वाची कारणे पुढे आली :

१. दारिद्र्य व संग्रह[1]
२. पोलिसांचा जुलूम[2]
३. संतापी वृत्ती व हातातल्या बंदुका[3]
४. प्रदेशाची दुर्गमता.
५. कायद्याच्या उणीवा
६. डाकूंना मिळणारी प्रतिष्ठा

ह्यापैकी दारिद्र्य-संग्रहाला गुन्हेगारीसाठी दोष देण्याचा पायंडा प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो ह्याने पाडला. मनुष्य गुन्हे करितो ते आपल्या पोटांतील आग विझवण्यासाठी, किंवा आपल्या प्रियजनांच्या हितासाठी, असा समज अठराव्या

---

१. चंबळ के बेहडोमे : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान ९७, ९८, १०५, ११०
२. चंबळ के बेहडोमे : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान १०५, १०९, १३४, १७८
३. चंबळ के बेहडोमे : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान १७९, १८९

व एकोणीसाव्या शतकात सर्वदूर आढळतो. ह्या कल्पनेवर भारतात व विदेशात झालेल्या संशोधनात तिला कुठेही आधार सापडलेला नाही.

मुंबईतील गुन्हे व गुन्हेगार ह्यांच्याबद्दल चर्चा करिताना, चोरांचे मासिक उत्पन्न, त्यांची राहणी, त्यांचे व्यापाऱ्याशी संबंध इत्यादी माहिती देऊन, 'ए स्टडी इन इंडियन क्राइम'ची लेखिका म्हणते, "गुन्हेगारीला दारिद्र्य मुख्यतः कारण आहे, ही समजूत वेडगळ असल्याचे स्पष्ट दिसून येते. वस्तुतः, लायकीच्या मानाने पुष्कळ अधिक पैसा मिळवण्याची संधी हे गुन्हेगारीला जबरदस्त आकर्षण असते."[1] ह्याशिवाय मदिरा, मदिराक्षी, द्यूत ह्यांचा उल्लेख करून ती पुढे म्हणते, "सूत्ररूपाने सांगायचे तर गुन्हेगारी फायद्यात पडते."

श्री० जिजीभॉय ह्या लेखकानेही ह्याच तऱ्हेचा निष्कर्ष काढून म्हटले आहे, "आजच्या मुंबईत सद्वर्तनाचा पाय घसरतो तो केवळ दारिद्र्याच्या खडकावर नव्हे, तर सत्ता व संपत्तीच्या भव्य प्रासादाच्या गुळगुळीत फरशीवरही."[2]

भारतीय अभ्यासकांचा हा निष्कर्ष विदेशी तज्ज्ञांच्या निष्कर्षांशी तादात्म्य राखून आहे. हारवर्ड जोन्सने म्हटले आहे, "गुन्हेगारीचे प्रमाण गरिबीबरोबर वाढते हे खरे, पण बहुजनसमाज हा सरळमार्गीच असतो."[3] ह्या लेखकाने दुसरा एक अभ्यासक सदरलंड ह्यांचे मत पुढे उद्‌धृत केले आहे. सदरलंडच्या मते, गरिबांच्या गुन्ह्यांचे प्रमाण अधिक दिसते, कारण श्रीमंत पैशाच्या बळावर कायद्याच्या कचाटीतून सुटून जातात, व गरीब मात्र त्यांच्या जाळ्यात अडकतात.

इंग्लंडचे एक मान्यवर संशोधक हरमान मानहीम ह्यांनी वरील मताचाच पुरस्कार केला असून त्यांच्या मते केवळ दारिद्र्याने मनुष्य गुन्ह्याला प्रवृत्त होत नाही. "आपल्याला ध्यानात ठेवले पाहिजे की दारिद्र्याची गतिमानता किंवा प्राप्तीमधला चढउतार गुन्हेगारीला विशेषेकरून कारणीभूत होतो."[4]

टेरेन्स मॉरिस ह्या दुसऱ्या अभ्यासकाने म्हटले आहे की, 'दारिद्र्य व सामाजिक स्थैर्याची उणीव ह्याच्यामुळे घडणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण मोठे आहे हे खरे, परंतु आज, युद्धोत्तर भरभराटीच्या व सामाजिक स्थैर्याच्या काळात अपराधाची प्रचंड लाट येताना पाहून मन बुचकळ्यात पडते."[5]

सर्वसाधारण विचारी माणसाला हे मत तेव्हाच पटते. कारण दारिद्र्य-संग्रहाच्या जोडगोळीमुळेच दस्यु निर्माण होत असते तर चंबळ खोऱ्यापेक्षा अधिक दरिद्री

---

१. ए स्टडी इन इंडियन क्राईम : पेरीन सी० केरावाला; पान १५९.

२. ब्रायबरी अँड करप्शन इन बॉम्बे : जिजीभॉय जे० आर० आर०; पान २२७

३. क्राइम अँड पिनल सिस्टिम : जोन्स हॉर्वर्ड; पान ५९

४. सोशल आस्पेक्ट् ऑफ क्राइम इन इंग्लंड बिटवीन वॉर्स : मानहीम हरमान; पान १२४

५. द क्रिमिनल एरिआ—ए स्टडी इन सोशल इकलॉजी; पान १०१

भागात त्यांचा तीव्र प्रादुर्भाव झाला असता. उत्तर प्रदेशाचा गोरखपूर जिल्हा व आल्मोडा डिव्हिजन, मध्यप्रदेशाचा बिलासपूर जिल्हा, महाराष्ट्राचा कोकण आणि काश्मीर ही दारिद्र्याची माहेरघरे आहेत. ह्यापैकी बहुतेक प्रदेशातून, पै-पैसा मिळवून घरी पाठविण्यासाठी हजारो तरुणांची रीघ शहरांकडे लागलेली आहे. चंबळमधून असा लोकांचा प्रचंड ओघ शहरांकडे वाहताना दिसत नाही. उलट महत्त्वाच्या डाकूंपैकी काहींच्या घरी चोरीच्या मालाचा व तस्करव्यापार (smuggling) होता. राजा ह्या नावाने आजही परिचित असलेला मानसिंग व नागराचा लाखनसिंग पैसेवाले होते. चोरीच्या पैशावर अमृतलालने लाखो रुपये जमविले आणि शिवपुरीला मोठा प्रासाद बांधला. पोलिसांनी केलेले सारे प्रयत्न विफल होऊन, ह्याच पैशासाठी त्याचा मुलगा बालो आज कठोर डाकू बनला आहे. अमृतलालने[1] मद्य-मदिराक्षींचा षौक केला; त्याचा पुत्र आज त्याच मार्गाने जात आहे.[2]

मध्यभारताच्या भिंड-मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीने हाच निष्कर्ष काढलेला आहे.[3] "ह्या क्षेत्रातील आर्थिक झरे येथील लोकसंख्येला अपुरे पडतात असे अनेकदा सुचवण्यात येते. शेतीचे लहान-लहान तुकडे झालेले आहेत. पाणीपुरवठ्याची सोय जवळपास शून्य आहे. जोडधंद्याचाही येथे अभाव आहे. परंतु दारिद्र्य ही अखिल भारताला जडलेली व्याधी आहे, केवळ भिंड-मोरेनाला नाही. शिवाय अग्रेसर डाकू ठळकपणे दरिद्री वर्गातून येताना दिसत नाहीत, आणि त्यांचा जीवनेतिहास तशी साक्षही देत नाही. पाटबंधारे साऱ्या प्रदेशातच (मध्य भारत) तुटपुंजे आहेत. त्यातल्या त्यात भिंडमध्ये परिस्थिती बरी आहे. पण पाटाच्या पाण्याने भिजलेला अंचल इतर अंचलापेक्षा गुन्हेगारीत मागे असल्याचे दिसून येत नाही. म्हणून, आमच्या मते गुन्हेगारीचे कारण आर्थिक आहे असे म्हणता येणार नाही."

दारिद्र्याप्रमाणेच संग्रहदेखील भारतात सर्वत्र कमीअधिक प्रमाणात आढळून येतो. त्यामुळे अधूनमधून वावटळी उठतात. सन १९३० मध्ये बुलढाणा जिल्ह्यात व सन १९४८ मध्ये तेलंगण येथे झालेले अत्याचार त्या संघर्षाचे आविष्कार होते. चंबळच्या ओहोळातून मात्र साम्यवादी विचारसरणीलाच नव्हे तर समतेच्या विचारालाही कोठे थारा मिळालेला नाही. चंबळचे अधिराज्य आहे रामराज्य परिषद व हिंदुमहासभा ह्यांच्याकडे. हरिजनांना कायद्याने समता व स्वतंत्रता देणाऱ्या काँग्रेसला मतदान करण्याबद्दल चंबळच्या चांभारांना अद्दल घडवण्यात आलेली आहे.[4] पोलीस डाकू बनवतात,[5]

---

१. अभिशप्त चंबल : तरुणकुमार भादुडी; प्रकरण १५

२. द स्टेट्स्मन : तारीख ८-२-१९६३

३. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट : परिच्छेद १८

४. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट : परिच्छेद १२ व १८

५. चंबळ के बेहडोमें : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान १०६

हे म्हणणेही सयुक्तिक वाटत नाही. हे खरे असेल तर पोलीसवाहिनी हलवतात्र ह्या क्षेत्रात शांती प्रस्थापित होईल. पण स्वतः विनोबांना हा मार्ग व्यवहार्य वाटला नाही, तेव्हा त्याचा विचार करण्याचे आपल्याला कारण नाही. कारण शांती प्रस्थापित झाल्याविना पोलीस हलवता येणार नाही. तसेच कुठल्याही प्रदेशात दंगल झाल्यावर, मोठ्या प्रमाणात सरकारी, अनिर्बंध सत्ता (पोलिस, सैन्य, इत्यादी) त्या क्षेत्रात उपयोगात येते. ती लोकांना उपकारक होत नाही. ह्याची जाणीव माधवराव शिंद्यानी सन १९२० मध्ये जमीनदारांना दिलेली होती.[1] ह्याबाबत चंबळघाटी अपवाद ठरली नाही.

बंदुकीचे मोठ्या प्रमाणात दिलेले परवाने विनोबांप्रमाणेच श्री० लल्लूसिंगजीनाही येथील दस्युवृत्तीला कारणीभूत वाटतात. कुठलीही समस्या मनगटाच्या जोरावर सोडवण्याचे ठरले म्हणजे हत्याराचे महत्त्व केवळ तुलनात्मक ठरते. डाकू व जनता दोघांचीही आधुनिक शस्त्रे जादूने काढून घेता आली तर तेच काम भाले-तलवारी, लाठ्या-पलिते ह्यांनी करता येईल. येथे दुसरा एक महत्त्वाचा तात्त्विक प्रश्न असा उद्‌भवतो की शांतता राखण्यासाठी परकीय सरकारने भारत निःशस्त्र केला होता. त्याच्याविरुद्ध आपण सतत पन्नास वर्षे संघर्ष करून आज आपण तोच मार्ग स्वीकारणार आहोत काय ?

ह्या विचाराचा आणखी एक पैलू, एका अशिक्षित शेतकऱ्याने कर्नल स्लीमनला समजावला होता.[2] "हत्यारे न बाळगण्याचा कायदा, माझ्यासारखे कायद्याला भिणारे लोक पाळतील. गुन्हेगार कायदा मोडून हत्यारबंद राहतील." निःशस्त्रांना सशस्त्र व निर्दय लोकांच्या जुलमाला तोंड द्यावे लागले म्हणजे काय होईल, हे सांगण्याचीही जरुरी नाही.

चंबळचे ओहोळ दुर्गम आहेत. पण भारताचे इतर अनेक भागही दुर्गम आहेत. चंबळचे सारे खोरेच जंगले व 'बेहड' यांनी व्याप्त आहे खरे. पण बेटवा-यमुना संगमाभोवती बेहड आहेत. कोल्हापूर-साताऱ्याच्या दुर्गम भागातच सन १९४२ साली पत्री-सरकार अधिकार गाजवीत राहिले. तेलंगणाचा संघर्षही तीव्र होण्याचे एक कारण त्या प्रदेशाची दुर्गमता हेही होते. तेथील दंगलीप्रमाणे चंबळची दंगलही मोडण्यात आपल्याला यश न आल्याने प्रदेशाच्या दुर्गमतेचे कारणही मला पटले नाही.

श्री० बन्सल वकिलांनी कायद्याचे काही सर्वसाधारण दोष दाखवले होते. आपली आजची दंडसंहिता परकी सरकारचे हितसंबंध सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने गेल्या शतकात रचलेली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात तिची अनेक कलमे अपुरी (inadequate), कालौघात मागे पडलेली (absolete) किंवा निरुपयोगी (redundant) होऊन जनतेला अन्यायकारक वा डोईजड वाटत असण्याचा संभव

१. जनरल पॉलिसी दरबार १९२२ ए० डी० जिल्द नं० १—रियासत ग्वाल्हेर; पान ५९९
२. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान १२८

आहे. कायद्याच्या अशा कलमांवर कधी नकळत घाव घातले जातात तर पुष्कळ वेळा प्रतिष्ठित व सामाजिक जाणीव जिवंत असणारे नागरिक त्यांच्यावर घाव घालण्यास उद्युक्त होतात. चंबळची दस्युवृत्तीची समस्या आपला कायदा अपुरा, जुनाट किंवा निरुपयोगी असल्याने झाली आहे का? ह्या प्रश्नाचे उत्तर दंडसंहितेतच शोधणे जरूर होते.

## ३. कायद्याचा दृष्टिकोन

ग्वाल्हेरच्या परिसंवादाचा विषय 'गुन्हेगारी व अहिंसा' असा होता. गुन्हेगारी किंवा अपराध हा शब्द व्यवहारात दोन अर्थांनी वापरला जातो. समाजाची नैतिक मूल्ये अमान्य करणारी क्रिया किंवा त्याचा कायदा मोडणारे कृत्य, ह्या दोन्ही गोष्टी आपल्या हिशेबी अपराधात समाविष्ट होतात. तथापि अपराधाच्या नैतिक व कायदेशीर व्याख्या समव्यापिक मात्र नसतात, ह्याची जाणीव आपल्याला अनेकदा नसते. प्रत्येक नैतिक मूल्याची अवहेलना 'अवैध आणि दंडार्ह' म्हणजे बेकायदेशीर व म्हणून शिक्षेस पात्र असत नाही. उदाहरणार्थ, विवाहबाह्य संबंध व संतती सामाजिक संकेताप्रमाणे अनैतिक व त्याज्य असलीं तरी बेकायदा व दंडनीय नाहीत. प्रत्येक बेकायदा कृत्य दंडार्ह असले तरी समाज त्याला अनैतिक व म्हणून त्याज्य मानीलच असेही सांगता येत नाही. सायकलला दिवा नसणे हे दंडनीय आहे, पण त्याला कोणीच अनैतिक म्हणणार नाही. नैतिक अपराध व कायद्याच्या दृष्टीने असलेले अपराध यांच्यामधील दुसरा महत्त्वाचा फरक असा आहे की नैतिक अपराधांच्या व्याख्या सहसा केलेल्या नसतात. उलट पिनल कोड वा दंडसंहिता हा शासनाचा अत्यंत शक्तिशाली बाहू असून, त्या संहितेत प्रत्येक अपराधाची व्याख्या अत्यंत बारकाईने व निश्चित मर्यादा देऊन केली जाते; त्याचप्रमाणे त्या अपराधाची कमाल शिक्षाही त्याच्या गंभीरतेनुसार निश्चित केली जाते. नैतिक अपराधाची दखल शासन-संस्थेला घेण्याचे कारण नसते किंवा तिला तसा अधिकारही प्राप्त झालेला नसतो; ह्याच्या उलट, कायद्याने ठरणारे अपराध शासनसंस्थेला आपल्या स्थैर्यासाठी मोडून काढावे लागतात. पोलिस, न्यायालये, बंदीशाला ह्या संस्था शासनसंस्था उभारते, त्या हे आपले कार्य पूर्ण करण्यासाठी. दरवडेखोरी हा गुन्हा नैतिक असो वा नसो, तो अवैध व म्हणून दंडनीय आहे. ह्याचा अर्थ ह्या अपराधाची व्याख्या सुस्पष्ट रीतीने आपल्या दंडसंहितेत असणे अपरिहार्य आहे. भारतीय दंडसंहितेने दरवडेखोरीची दखल आपल्या पद्धतीप्रमाणे सुस्पष्ट परिभाषेने घेतलेली आहे, त्याचे कारणही हेच आहे.

दुसऱ्याच्या संपत्तीची अभिलाषा माणसाच्या स्वभावातच आहे की काय कोण जाणे. चोरून आणलेला पेरू जास्त गोड लागतो ह्याचा अनुभव कोणाला नाही? सांडलेली दहा रुपयाची नोट रस्त्यात सापडली, तर ती रुग्णालयाला किंवा अनाथालयाला आपण कितीजण धर्मादाय करतो?—आणि एखाद्याने असे काही केल्यास इतरांना तो माणूस हास्यास्पद वाटतो ना?

परक्याच्या धनाची अभिलाषा व अपहार ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अपहाराचे प्रकार कालमानाप्रमाणे बदलतात. चोरी, जुगार हे परंपरागत मार्ग, तर सट्टा, फसवेगिरी, खोटे हिशेब, काळा बाजार, हे आधुनिक पांढरपेशे प्रकार आपल्या नेहमी दृष्टोत्पत्तीला येतात. समाजात शांतता राखण्याच्या हेतूने हे गुन्हे दंडनीय ठरवले जातात. डाक्याचा गुन्हा दंडसंहितेच्या दृष्टीने ह्या सर्वांपेक्षा गंभीर आहे; कारण इतर अपराधांमुळे समाजाचे नुकसान होते पण त्यातून समाजात दहशत—विशेषतः जिवाचे भय—निर्माण होत नाही. माणसाला जीवन असुरक्षित वाटत नाही; त्याचे दैनंदिन व्यवहार सुरळीत चालू राहतात.

भारतीय दंडसंहितेचे 'लूटमार व डकैती' असे एक प्रकरण असून त्यावर एकंदर तेरा कलमे (३९० ते ४०२) खर्ची पडलेली आहेत.[१] 'शारीरिक इजा किंवा मृत्युदंड ह्यांचा उपयोग करून वा त्याचे भय दाखवून, किंवा बंदीवासात ठेवून, संपत्ती वसूल करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणे, हा लुटमारीचा अपराध होतो. (कलम ३९०) पाच किंवा पाचापेक्षा अधिक माणसांनी एकत्रित (conjointly) लूटमार केल्यास ती डकैती होते (कलम ३९१) प्रथमदर्शनी, लूटमार व डकैती ह्या अपराधात अंतर फक्त गुन्हेगारांच्या संख्येचे दिसते, परंतु दंडसंहितेची पुढील कलमे वाचता 'डकैती' ह्या गुन्ह्याबद्दल पुष्कळच जास्त कडक धोरण संहितेने अवलंबिल्याचे दिसून येते. डाका घालताना खून झाल्यास डाकूंपैकी प्रत्येकाला फाशी होऊ शकते (कलम ३९६) 'कोणत्याही विशिष्ट डाकूने खून केल्याचे सिद्ध करण्याची जरूर नसते...साधारणतः खालील मुद्दे सिद्ध केल्याने काम भागते : १ डाका पडला; २ गुन्हेगारांनीच हा डाका घातला; ३ तो डाका घालताना खून झाला.' एरव्ही खुनाच्या खटल्यामध्ये विशिष्ट गुन्हेगाराकडून गुन्हा झाला हें निःसंशय सिद्ध व्हावे लागते, तसे डाक्यात होत नाही. ह्याचा अर्थ डाका घालणाऱ्या टोळींचा प्रत्येक सदस्य शिक्षेला पात्र समजला जातो.

कोठल्याही अपराधाची 'तयारी' करणे हा सर्वसाधारणतः गुन्हा होत नाही. उदाहरणार्थ, घरफोडी किंवा लूटमार ह्याच्यासाठी तयारी करणे हा गुन्हा नाही. त्याचप्रमाणे गुन्ह्याचा प्रयत्न झाल्यावरच कायद्याची चक्रे हलविता येतात.[२] डकैतीबाबत प्रत्यक्ष प्रयत्न करणेही आवश्यक समजले जात नाही.

---

१. इंडियन पिनल कोड : सर हरिसिंग गौर; पान १९९०

२. लॉ ऑफ क्राइम्स : रतनलाल अँड धीरजलाल ठाकूर; पान ९८४

भारतीय दंडसंहितेप्रमाणे केवळ तीनच 'गुन्ह्यांची तयारी' शिक्षार्ह आहे. ते तीन गुन्हे येणेप्रमाणे :

१. भारत सरकारविरुद्ध युद्धाची तयारी — कलम १२२

२. भारत सरकारशी सख्य असणाऱ्या विदेशी सत्तेच्या प्रदेशात लूटमारीची तयारी — कलम १२६

३. डाका घालण्याची तयारी — कलम ३९९

पहिल्या दोन अपराधांवरून, त्यांच्या ओळींला बसलेला तिसरा गुन्हा किती प्रखर स्वरूपाचा समजला जातो, ह्याचा अंदाज घेता येतो.

नेहमी डाके घालणाऱ्या टोळींचा सदस्य होणे, हाही कलम ४०० प्रमाणे गुन्हा आहे. डाका घालण्याच्या हेतूने पाच अगर जास्त माणसांनी एकत्र जमणे हादेखील शिक्षार्ह अपराध असून त्याला सात वर्षेपर्यंत बंदिवास सांगितलेला आहे. (कलम ४०२)

डकैतीचा गुन्हा इतका गंभीर मानला जाण्याचे कारण सहज सापडण्याजोगे आहे. डकैती हा गुन्हा ग्रामीण स्वरूपाचा समजला जातो. ग्रामीण भागात 'कायदा सुव्यवस्था' ह्यांचा बलशाली बाहू सहजपणे पोचत नाही. तेथे डकैती म्हणजे 'बळी तो कान पिळी' हा जंगलातला कायदा लागू झाल्यास प्रस्थापित सरकारचे अस्तित्व फार काळ टिकू शकणार नाही. ही अंदाधुंदीची परिस्थिती टाळण्यासाठी असे कडक उपाय योजण्यात आलेले आहेत.

भारतात सर्वत्र डाके पडतात, येवढेच नव्हे तर भिंड-मोरेना गुन्हेगार चौकशी समितीने आपल्या अहवालात म्हटल्याप्रमाणे "केवळ अपराधांच्या संख्येचे प्रमाण, किंवा दरहजारी पडणारे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वा चोरीस गेलेल्या मालाचे मूल्य, ह्यांचा विचार करिता, तुलनेने शांत समजले गेलेले मध्यप्रदेशाचे इतर काही जिल्हे भिंड-मोरेनाच्या जिल्ह्यांपेक्षा आपला क्रमांक वर लावताना दिसतात."[1]

चंबळच्या डाकूंनी केलेल्या अत्याचाराच्या अतिकरुण कहाण्या प्रत्यही कानी येतात. गोळीने मरणे भाग्याचे वाटावे, इतके क्रूर अत्याचारही होतात. पण चंबळच्या बाहेरचा डाकूही अत्याचार करण्यात कोणाला हार जातो असे दिसत नाही. खालील दोन वृत्तपत्रीय वार्ता याची साक्ष देतील:

"डाकूंनी पाच माणसे जिवंत जाळली

कलकत्याहून आलेल्या वृत्तावरून मालदा (जिल्हा)च्या गझोल ठाण्याच्या कक्षेतील एका खेड्यात एका झोपडीत झोपलेली पाच माणसे, डाकूंनी जिवंत जाळल्याचे समजते. झोपडीचा दरवाजा बंद सापडल्याने चिडून जाऊन त्यांनी

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्कायरी कमिटीचा रिपोर्ट : परिच्छेद १०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वा

अंगणात सापडल्लेया कंदिलाच्या साहाय्याने झोपडी पेटवून दिली असे कळते."

हे आणखी एक वृत्त पाहा :

"डाकूंची टोळी सशस्त्र पोलिसांना ठोकते

(आमच्या प्रतिनिधीकडून)

आसनसोल, मे १३—आज सकाळी राणीगंज पोलिस-ठाण्याचा मुख्य अधिकारी व त्याच्या बरोबरचे पोलीसदल, ह्यांच्यावर हल्ला करून दुखापती केल्यामुळे पोलिसांनी एका डाकूंच्या टोळीवर गोळीबार केला असे समजते.

डाकूंनी पकडून ठेवलेल्या एका शिपायाला मुक्त करण्याच्या प्रयत्नात हे पोलीसदल त्यांच्या तावडीत सापडले होते. असेही समजते की, पोलिस घटनास्थळी पोचले तेव्हा डाकू त्या शिपायाला निःशस्त्र करून डागण्या देण्याच्या प्रयत्नात होते.

तत्पूर्वी खाणीच्या जवळून जात असलेल्या दोन शिपायांना पाहून काही लोक पळू लागल्याने, त्या शिपायांना संशय आला. त्यांनी धोक्याची सूचना दिल्यामुळे चार सशस्त्र शिपाई त्या स्थळी पाठवण्यात आले. ह्या सर्व शिपायांना डाकूंनी चांगला चोप दिला. त्यांच्यापैकी तीन निसटून आले, पण चवथा त्यांच्या हाती सापडला. त्याला एका झोपडीत खेचून नेऊन, निःशस्त्र करून, भिंतीला साखळदंडाने जखडून बांधण्यात आले. त्याला डागण्या देण्यासाठी लोखंडी सळ्या तापत टाकण्यात आल्या होत्या.

त्यानंतर पुनश्च केलेल्या हल्ल्यात, ठाण्याचा अधिकारी, पोलीस सब-इन्स्पेक्टर व दोन शिपायांना दुखापत झाल्यामुळे गोळीबार करण्यात आला.

ह्याच जागी पूर्वीही दोनदा पोलीस-दलावर झालेल्या हल्ल्याचे स्मरण राहावे."[२]

डाकूंवरील मोहीमही चंबळ-घाटीतच उघडली जाते असे म्हणता येत नाही. 'आसनसोल डाकूंविरुद्ध मोहीम (drive)'[३] ह्या मथळ्याखालची बातमी वाचून गावाचे नाव चुकून भलते पडले असावे व ही तार भोपाळ, लखनौ किंवा ग्वाल्हेर इथून आली असावी अशी शंका कोणालाही येईल.

भारतात सर्वत्र कमीजास्त प्रमाणात पडणाऱ्या डाक्यांचा दंडसंहितेच्या उणीवांशी काही संबंध नाही हे उघड आहे. डाक्यांचा गुन्हा समाजाच्या संघटित जीवनाला

---

१. स्टेट्स्मन : तारीख १३-४-१९६२

२. स्टेट्स्मन : तारीख १५-५-६२.

३. स्टेट्स्मन : तारीख १७-७-६२.

विघातक व म्हणून गंभीर असून दंडसंहितेने तो तसा मानला हे यथायोग्यच आहे.

दस्युभूमीतली डाकेगिरी अधिक भयावह मानली जाते ह्याचे कारण तेथील डाकूंच्या प्रतिष्ठेत आहे. मानसिंग 'राजा' होऊ शकतो. 'वेहडमे चला गया' ही खानेसुमारीने दखल न घेतलेली परंतु जनतेला मान्य असलेली वृत्ती आहे. डाकूंना लोकांकडून मिळणारा सन्मान क्षेत्रात जाऊन येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्ययाला येतो. सेमिनारच्या प्रत्येक वक्त्याने ह्या पैलूवर जोर दिला होता. हेच समस्येच्या भयावहतेचे कारण.

चंबळखोऱ्यामधील दस्युवृत्तीची इतर कारणे त्या वृत्तीला साहाय्यक मात्र आहेत. खरे कारण आहे त्यांना मिळणाऱ्या सामाजिक प्रतिष्ठेचे. "सामाजिक परिस्थिती व ऐतिहासिक परंपरा ह्यांच्यात दृढमूल झालेली ही समस्या कितीही शक्ती लावली तरी सुटण्याजोगी नाही."

वरील विधानाचा अर्थ समजावून घेण्याची संधी मला सन १९६१ च्या नोव्हेंबर-मध्ये लाभली. चंबळ ओहळात जाण्यापूर्वी माझ्या विसरलेल्या भूगोलाची उजळणी करणे मला क्रमप्राप्तच होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ विभाग ........
क्रमांक ........ दि. ........

# दस्युभूमीचे दर्शन

## १. चंबळेचे खोरे

चंबळ ही भारताच्या पवित्र सोळा नद्यांपैकी एक आहे. उत्तरेला हिमालय व दक्षिणेला विंध्य ह्यांनी निर्माण केलेल्या सारणीच्या दक्षिण उतारावरचे पाणी दोन प्रचंड प्रवाहांनी वाहते. ह्या उताराच्या पूर्व भागात शोण नद पाटण्याजवळ गंगेला मिळतो, पश्चिम भाग चंबळ व तिच्या उपनद्यांच्या आधिपत्याखाली विसावतो.

चंबळेचा उगम जनपावा ह्या उच्च विंध्यशिखरांपाशी, माळव्यात मांडूजवळ होतो. नर्मदेचा प्रवाह येथून केवळ पंधरा मैल असून, मध्ये विंध्याची ओळ मात्र पडते. चंबळेच्या उगमापाशी कुठलेही महत्त्वाचे यात्रास्थान नाही, त्यावरून हा प्रदेश फार दुर्गम असावा व त्याचा छडा प्रथम युरोपियन लोकांनी लावला असावा, असे वाटते. चंबळेबरोबरच येथून, चंबेला व गंभीरा हे प्रवाहही निघून, पुढे हे तिन्ही एकत्र होतात. त्यानंतर उत्तरेकडे वाहताना, चंबळ किंचित पूर्वेला झुकते. उज्जयनीच्या महाकालेश्वराचे पादप्रक्षालन करून क्षिप्रा तिला पूर्वेच्या अंगाने येऊन मिळते. ह्यात्र बाजूने तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या उपनद्या म्हणजे वाग्रीहून येणारी काळी सिंध व अमलखेराच्या दरीतून प्रवास करणारी पार्वती. ह्या सर्व नद्या व त्यांच्या शाखा विंध्याद्रीत उगम पावतात. काळी सिंध व चंबळ यांच्या संगमावर नोनेरा स्थान आहे, व पुढे तीस मैलांवर पार्वतीचा संगम.

पश्चिमेकडून चंबळला एकच मोठी नदी मिळते; ती म्हणजे अरवलीपासून सर्व पूर्व राजस्तानचे पाणी वाहणारी बनास. बनासचा उगम अरवलीच्या सततप्रवाही झऱ्यांमध्ये आहे. मेवाडच्या राजांनी शेतीसाठी, पुष्कळ सरोवरे निर्माण केली. त्यातून वाहून जाणाऱ्या पाण्यापासून वेरिसचा जन्म होतो. वेरिस ही बनासची

उपनदी आहे. चंबळेला मिळण्यापूर्वी जयपूरचा दक्षिण भाग व केरोवलीचे पठार ह्यांना बनास जलदान करते.

उगमापासून एकशे साठ मैलांचा प्रवास माळव्यातून करीत चंबळ चोराशीगढ ह्या स्थानी एका खोल दरीतून, राजस्तानात प्रवेश करिते. सत्तर मैलांचा प्रवास करून, ही दरी पार करताच तिला कोटा हे शहर लागते. ह्या सत्तर मैलांच्या अंतरातच भैसारोर नावाचा किल्ला भैसाशाह नावाच्या व्यापाऱ्याने वंजाऱ्यांच्या तांड्यांना विश्रामस्थान म्हणून बांधलेला आहे.

राजस्तानातून पंचाण्णव मैलांचा प्रवास संपवून, चंबळ पुन्हा एकदा मध्य-प्रदेशाच्या सीमेवर येते, पण त्या राज्यात न शिरता, पलिया ते पिनहाट ह्या दीडशे मैलांच्या अंतरात, वरील दोन राज्यांची सीमा मात्र निश्चित करते. ह्या अवधीत तिचा व बनासचा संगम होतो. पिनहाट येथे ती अग्नेयेला वळते. त्यानंतर राजस्तान संपून तिच्या पश्चिम अंगाला उत्तर प्रदेश लागतो, व पुढील पासष्ट मैलांपर्यंत ती ही नवी सीमारेषा धरून आहे. त्यानंतर आपल्या काठचा रम्य, भव्य, पण दुर्गम प्रदेश मागे टाकून ती उत्तर प्रदेशात शिरते. मग गंगेच्या मैदानामधून पंचवीस मैल अंतर आक्रमून, ती इटावा शहरापासून पंचवीस मैलांवर मुरादगंज येथे यमुनेत आपले जीवन विसर्जित करते. ह्या संगमावरही महत्त्वाचे देवालय नाही. इतिहासप्रसिद्ध बटेश्वराचे मंदिर तिच्या परिसरात पण यमुनेच्या काठावर उभे आहे. चंबळेच्या अंतिम चरणात पूर्वेकडून येणारी लहान नदी कुयरी तिला समांतर वाहून तिच्या शेजारीच यमुनेला मिळते, आणखी किंचित पूर्वेकडून वाहाणारी सिंध पलीकडून यमुनेत विसर्जन पावते. चंबळेच्या काठावर कोणतेही मोठे यात्रास्थळ नाही किंवा कोटा शहर सोडता मोठाली शहरेही नाहीत. तेव्हा प्राचीन काळात संस्कृतीच्या विकासाला आवश्यक अशा साधनांचा हिच्या काठी अभाव असावा हे उघड आहे.

चंबळची लांबी पाचशे-साडेपाचशे मैल असली तरी त्या छोट्या अंतरात तिला जो उतार उतरावा लागतो, त्यामुळे तिचा प्रवाह तीक्ष्ण व अवखळ असणे क्रमप्राप्त आहे. हा प्रदेश अजूनही मागासलेला असल्याने येथे घनदाट अरण्येही असणे स्वाभाविक आहे. तिच्या तीराचे स्वाभाविक सौंदर्य कोणालाही मुग्ध करील असे आहे. त्यापैकी एकदोन वर्णने खाली उद्धृत करीत आहे :

"नदी येथे (भैसारोरपाशी) पाचशे यार्ड रुंद असून कोणत्याही ऋतूत तिला पायउतार मिळत नाही. आज (फेब्रुवारीमध्ये) तिचे पारदर्शक समुद्रहरित पाणी येथे चाळीस फूट खोल आहे. तिचा प्रवाह अत्यंत वेगवान असून, पावसाळ्यात समोरचा हरावतीचा प्रदेश जलमय होतो, तेव्हा मोठ्या शिळाही तिच्या प्रवाहात वाहून जातात. भैसारोरगढच्या खालच्या अंगाला प्रवाहाला संथपणा कोठेच नाही. तीसचाळीस फुटांचे प्रपात व मोठाले भोवरेही जागोजाग लागतात. ह्या भोवऱ्यात घासून गोल झालेले दगड शेंदूर लावून लोक पूजेला घेतात. हाच राजपुतान्याचा भैरव—त्याची

युद्धदेवता. भैसारोरच्या वरच्या अंगाला चंबळेने एक सरोवर निर्माण केलेले आहे. ह्या सरोवरापासून गडापर्यंतच्या एक मैलाच्या अंतरात दोनशे फुटांचा उतार असून, तो उतरताना नदी साठ फुटांची एक उडी घेते." एका मैलात एकशे चाळीस फूट उतार घेणारा प्रवाह किती जोराचा असेल ह्याचा अंदाज आपण करू शकतो.

"आश्चर्याची गोष्ट अशी की तीनशे मैलांचे अंतर कापलेल्या ह्या नदीचे पात्र तीन यार्डांइतके अरुंदही होऊ शकते. नदीचे प्रचंड भोवरे तीस-चाळीस फूट खोल, खड्या व विस्तृत विवरांमुळे निर्माण होतात. ह्या विवरांपैकी काही भूपृष्ठाखालून परस्परनिगडित असल्याने, त्यांचे पाणी सदैव उकळत असते. ह्या भोवऱ्यांची कोठे कोठे पूजा करण्यात येते. कोट्याकडे जाताना अनेक मैलपर्यंत प्रवाहाने खडकांना छिद्रे केलेली असून, त्यांचा आकार व प्रवाहाचा वेग ह्यांच्या प्रमाणात लहानमोठ्या शाळिग्रामांनी ती भरलेली आहेत."

चंबळेला कोट्याच्या सभोवतालीही 'वेहड' आहेत. पूर्वी येथे असलेली वस्ती हारांच्या तडाख्यात नष्ट झाली. 'कोटा' हे नावही कोटी ह्या भिल्ल नावावरून पडलेले आहे.

"भैसारोरच्या किल्ल्याची नदीची बाजू उंच कड्यांनी बनलेली असून, जनपावा व भैसारोर ह्यांच्या उंचीचा फरक ध्यानात घेऊनहि हे कडे जनपावापेक्षा शेकडो फूट अधिक उंच असावेत. ही गोष्ट खरी असल्यास हे कडे चंबळेच्या प्रवाहाने खचित कापलेले नाहीत."

चंबळेसारखी खळाळत वाहणारी व भरपूर पाणी आणणारी नदी अर्वाचीन भारताच्या विजेच्या व पाणीपुरवठ्याच्या प्रकल्पांना फार उपयुक्त व सोईची आहे. मध्यप्रदेश व राजस्तानच्या मागासलेल्या प्रदेशांना तर अशा प्रकल्पांची विशेष आवश्यकता असताना तृतीय पंचवार्षिक योजनेपर्यंत त्यांची योजना का झाली नसावी हे एक कोडेच आहे. आता मात्र चोरासीगढ ते कोटापर्यंतच्या सत्तर मैलांच्या दरीत तीन बांध विद्युत्-निर्मितीसाठी, व चौथा कोटा बराज, कोट्याच्या खालच्या अंगाला शेतीसाठी तयार होणार आहेत. त्यापैकी चोरासीगढजवळचा गांधीसागर तयार झालेला असून कोट्याखालचा कोटा बराज पूर्ण झाला आहे. ह्या दोन्हीमध्ये प्रतापसागर व कोटा धरण होणार असून प्रतापसागराचे काम सुरू झालेले आहे. हा प्रकल्प प्रचंड प्रमाणावर आखलेला असून, त्याचा संकल्पित खर्च शंभर कोटींच्या घरात आहे. ह्या प्रकल्पामुळे चौदा लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्याखाली भिजेल व अडीच लाख किलोवॅट वीज उद्योगधंद्यांना उपलब्ध होईल. चंबळेचा उगम विंध्यासारख्या अनिश्चित पावसाच्या प्रदेशात असल्याने गांधीसागराचे धरण वर्षाला लागणाऱ्या पाण्याच्या दुप्पट पाण्याचा साठा करील व मानवी योजनेचे सातत्य भंगणार नाही, अशी व्यवस्था केलेली आहे. ह्या प्रकल्पाचा दुसरा विशेष म्हणजे बहुतेक काम मानवी मेहनतीने पुरे करून त्याने येथील जनतेला मजुरी पुरवलेली आहे, हा होय.

प्रकल्पाने पुरवलेली स्वस्त वीज उपलब्ध होताच चंबळेचा परिसर विविध उद्योगांनी गजबजेल. पण असे विविध उद्योग सुरू करण्याला, स्वस्त विजेपेक्षाही जास्त गरज स्वस्थतेची, निरामयतेची आहे, हेही आपण विसरता कामा नये.

चंबळेचे वेहड तिला अखेरपर्यंत साथ देतात; पण कुप्रसिद्धि पावलेले वेहड शेवटच्या पन्नास-साठ मैलात लागतात. लहान पोराने पाटीवर भिरगुड्या ओढाव्यात तसे वरून दिसणारे हे अस्ताव्यस्त व अव्यवस्थित ओहोळ तिच्या दोन्ही तीरांवर कित्येक मैल खोलवर विखुरलेले आहेत; मात्र ते चंबळेच्या पाण्याने खोदलेले नाहीत. चंबळेच्या काठावरची माती मऊ व पाण्यात पटकन विरघळणारी असून ओहोळांच्या प्रदेशात खडकांचा अभाव आहे. त्यामुळे पाऊस पडताच माती विरघळून वाहू लागते, व तेथे ओहोळाचे पात्र निर्माण होते. कसलाच अडसर नसलेले पाणी चारी दिशांनी स्वैर धावते. त्यामुळे ह्या ओहोळांची दिशा, खोली, रुंदी ह्यांचा अंदाज लागत नाही. ओहोळांपलिकडच्या सपाट जमिनीची माती धुवून नवीन ओहोळ दरवर्षी तयार होत राहतात. ओहोळांनी घेरल्यावर खेडी जागा चालून इतरत्र वसतात. ह्या ओहोळांना 'वेहड' अशी संज्ञा आहे. हिंदीमध्ये बीहड शब्दाचा अर्थ उंच-सखल, खडबडीत, दुर्गम असा होतो. वेहड शब्द बीहडमधून निघाला असणे संभवनीय आहे.

ओहोळांच्या प्रदेशातील पाऊस जादूने थांबवला तर चंबळचे भग्नतेचे गान लागलीच थांबेल. उलट प्राकृतिक अवस्था अशीच राहिल्यास, विज्ञानाच्या साहाय्याने वेहड समतल केले तरी काही शतकात असेच विकट वेहड येथे निर्माण होतील. ह्या वेहडांचे क्षेत्रफळ शेंकडों चौरस मैल असल्याने, कदाचित, 'पुढे पाठ मागे सपाट' या न्यायाने आपण ओहोळ बुजवीत राहू आणि वर्षाराणी नवे खोदीत राहील. चंबळप्रमाणेच वेटवा नदीलाही अखेरीला वेहड आहेत.

चंबळच्या परिसरात भूस्तरज्ञ (Geologist) अजून गेलेले नाहीत. परंतु येथील जमीन, माती व प्रदेश ह्यांची संपूर्ण पाहाणी करून त्यांची धूप थांबवावी लागेल; कारण ओहोळाचे स्वरूप व त्यांच्या विस्ताराची कारणमीमांसा शास्त्रीय दृष्ट्या अवगत करीपर्यंत ह्या समस्येचे स्वरूप अनिश्चित राहणे अपरिहार्य आहे.

दस्युसमस्येच्या सीमा मागे विदित केलेल्या आहेत. सन १९६२-६३ मध्ये ही सीमा विस्तारून पश्चिमेकडे पाकिस्तानला भिडली होती. त्या सीमेवर त्या अवधीत डाकूंनी केलेली दंगल वृत्तपत्रे गाजवून होती व आजही त्या डाक्यांचा उपशम पूर्णपणे झालेला नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
... शाखा.
अ. क्र. ... विभाग ...
क्रमांक ... नों. दि. ...

## २. दस्युभूमीत

त्या दिवशी मी सकाळीच बसमध्ये चढले होते. थंडी कडाक्याची पडली होती. नोव्हेंबरचा महिना अर्धाअधिक निघून गेला होता. शिवाय परवा रात्री ह्या भागात जोराचे वादळ व पाऊस होऊन कित्येक ठिकाणी गारा पडल्या होत्या. मला ह्या गोष्टींची माहिती मात्र नव्हती.

अंगात लांब बाह्यांचा स्वेटर, वर ओव्हरकोट नी स्कार्फ घातला होता तरी हुडहुडी हाडांमधून भरून येत होती. बसच्या उघड्या दारांखिडक्यांमधून वारा भरारा आत भरत होता. डोळ्याचे पाणी खळत नव्हते, नाक सोसावत होते. त्या सकाळच्या वेळीही बसला उतारू होते. सर्वांची अवस्था तीच होती. उण्यापुऱ्या उंचीचे, रुंद छातीचे हे लोक जाड पासोड्या डोक्यावरून पायापर्यंत लपेटून आत चढत. हातातल्या काठ्या खाली ठेवत नी मग पाय पोटाशी घेऊन गुडघ्यावर मान वाकवून बसून राहत. बसचा आतला भाग मोठा विचित्र दिसत होता. सामानाच्या पोटळ्या जणू चाकांवरून रचून ठेवलेल्या होत्या.

बस धावत होती—नव्हे, अडखळत पुढे धडपडत होती. कोणत्या युगात तिचा सांगाडा तयार झाला होता नी कोणत्या युगात तिची बॉडी बांधण्यात आली होती हे सांगणे कठीण होते. ती खिळखिळी झालेली बस खडखडत, कसाबसा वीस मैलांचा वेग घेत होती, व मागे धुरळ्याचे लोट उडवीत होती. माझ्या मनात एकदा आले— हा धुरळाच लोटतो आहे का हिला पुढे? शरीराला हिसके व धक्के बसत होते. जणू चाकांना खराच्या टायरऐवजी बैलगाडीच्या लोखंडी धावा बसवलेल्या होत्या, आणि तिच्या स्प्रिंग्ज काल रात्री चोरांनी काढून नेल्या होत्या.

सूर्य वर आला, पण त्याचे ऊन मलिन, पिवळट, क्षयी होते. बस पुढे सरकत होती. बसमधले उतारू खोकत होते. बाहेर तोंड काढून थुंकत होते.

गाडीचा ड्रायव्हर नी क्लीनर हे त्याच प्रदेशातले असावेत. त्यांच्या वेषांवर मात्र शहरी छाया पडलेली होती. ड्रायव्हर होता रोडच पण उंचीला पुरा. त्याच्या अंगात गरम कोट नी सीटवर धारीवालचे ब्लँकेट होते. इतर लोक विड्या फुंकीत होते. त्याच्या तोंडात सिगारेट होती.

अंबाह आले. गाडी थांबली, थोडा वेळ. हेमदेवजी आले नी म्हणाले, "बहनजी, हमे काम है आज ग्वालेर मे. आप को हवाला करे जाता हूं चरनजी के."

आता मला आठवण आली की हेमदेव माझ्या संगती होते. हेमदेव शांति-समितीचे चंबळमधले कार्यकर्ते. ग्वाल्हेरमध्ये चाललेल्या 'समर्पणकारी' डाकूंच्या

खटल्यांची कायदेशीर बाजू ह्यांच्या स्वाधीन आहे. हेमदेव हा एक बी० ए०पर्यंत शिकलेला तरुण आहे. माझे व त्यांचे बोलणे असे फार थोडे झाले; पण माझ्या मनावर त्यांनी ठसा ठेवला असंतोषाचा. 'आपल्या गुणांचे चीज होत नाही' अशी त्यांची भावना दिसली.

चरणसिंग एखाद्या लांबच लांब बांबूसारखे. त्यांच्या हातात होत्या दोन पिशव्या हसरा चेहरा, मोठाले, नेहमी चांगली बाजून पाहणारे, खेळकर डोळे नी मोकळा स्वभाव ह्यांचे भांडवल घेऊन हिंडणारे चरणसिंग. चरणसिंग दोन दिवस माझ्याबरोबर होते—मी कामात असल्याने त्यांचा व माझा व्यक्तिगत संबंध थोडा आला. पण तेवढ्यातच एका लोभस व्यक्तिमत्त्वाचा परिचय मला झाला.

पोरसा आले तो नऊ-साडेनऊ होत होते. आतापावेतो आमचा प्रवास पूर्णपणे ग्रामीण भागातून झाला होता. इथपर्यंत भोवतालचा प्रदेश रिकामा वाटला होता. बहुतेक पिके निघालेली होती. काही जागी बाजरी अजून उभी होती. कुठे हरभरा, गहू, लाख मातीतून डोकी वर उचलीत होते. शेतांच्या बांधांना दूरवर कुठे कुठे मोठाले वृक्ष दिसत; पण एरव्ही सर्वदूर बाभळी-किंकरीचेच राज्य. निसर्ग काही फारसा आकर्षक नव्हता, पण बेहड का काय म्हणतात त्याचेही दर्शन कुठे झाले नव्हते लहानपणी वाशीम-अकोला रस्त्यावरून जा-ये करताना पाहिलेल्या बसेससारखीच ही एक बस. तसाच खडबडीत अरुंद रस्ता नी त्याच जातीचा आसमंत.

पोरसा आले. इथे बस चहासाठी थांबते. पोरसा गावहि काही फारसा मोठा दिसला नाही. चार-दोन लाकडी फळ्यांचा दर्शनी भाग असणारी अर्धनिद्रित दुकाने, त्यांचे आरामशीर व्यवहार. भारताच्या कुठल्याही ग्रामीण भागाचा हाच खाक्या सर्वदूर आढळतो. रस्त्याच्या किनाऱ्याला पुष्कळशी चहामिठाईची दुकाने मात्र दिसली. ही बसची गावाला देणगी. मातीच्या कच्च्या भिंतीवर टेंगणे, कौलारू, क्वचित पत्र्याचे, छप्पर. जागा कमी पडल्यास पुढे झापऱ्या लावून केलेली छाया. एखादे बाकडे पुढे टाकले की झाले दुकान. प्रत्येक दुकानापुढे पत्रावळीच्या पानांचा खच पडलेला दिसला. किती दिवसांपासून पडलेला होता कोण जाणे. स्वच्छतेचे कार्य करणारे नोकर म्हणजे कावळे, कुत्री आणि वारा.

चहा पिण्यासाठी जाण्याची सूचना चरणसिंगांनी केली आणि आम्ही उतरून समोरच्या दुकानात गेलो. बाकीचे उतारू केव्हाच पांगले होते.

दुकानात एका शेगडीवर लोखंडी कढईत दूध उकळत होते. तिच्या बैलावर अल्युमिनमच्या किटलीत चहा 'शिजत' होता. समोरच्या दुसऱ्या शेगडीवर ताज्या जिलब्या तयार होत होत्या. उत्तर भारताला सकाळी जिलब्या फार आवडतात, आणि महाराष्ट्राला कलाकुसरीचे वाटणारे हे पक्वान्न इथे रोज सकाळी बनत असते. जिलबीला नळी न पडण्याची चिंता कोणी करीत नाही वा पाक भरला नाही असेही कधी होत नाही.

आम्ही कुठल्याशा मैलाच्या दगडावर उतरलो—बहुधा एकविसाव्या मैलाचा असावा. चरणजींनी आपल्या दोन पिशव्या नी माझे सामान खाली काढले. एक होल्डॉल आणि एक छोटी बॅग. बस धडधडत, विमानाचा आवाज करीत, धुरळा उडवीत निघून गेली. चरणजी म्हणाले, "आपण सुप्रसिद्ध नागराला जातो आहोत." ते म्हणाले, "ह्या गावात पक्षोपपक्ष आहेत. आपण गावाबाहेर शाळेत सामान टाकू या. नंतर आपण गाव घेऊ; म्हणजे तुम्ही पक्षातीत राहाल." मला त्यांचे म्हणणे पटले.

सामान न्यायला हमाल मिळण्याचा प्रश्नच नव्हता. नागरा येथून चार मैल दूर होते. तेथवर सामान आणि तेही चरणसिंगजी वाहून नेणार. माझे मलाच विचित्र वाटू लागले. पण त्याला उपाय काय होता? सामानावाचून चालण्याची मला सवय आहे—नव्हे, आवडहि—परंतु वजन घेऊन चालणे म्हणजे माझ्या दृष्टीने एक अशक्य काम आहे. तरी माझी बॅग मी उचलली, आणि बाकीचे सामान चरणसिंगजींच्या खांद्यावर. आम्ही रस्ता उतरून शेताच्या बांधाला लागलो.

सूर्य वर आला होता. उन्ह चटकले होते. वारा गार असला तरी उन्हात जीव कळवळू लागला होता. बांधावांधाने जायचे. म्हणजे पावसाळ्यात नागरा बाहेरच्या जगापासून कापले जात असेल हे उघड होते.

अर्ध्या मैलावर एक नवे बाभुळवन लागले. "लाखनची जमीन आहे ही. गावकरी हिला नांगरू देत नाहीत. अशीच पडून आहे. गावकऱ्यांना समजावून पाहतो आहोत आम्ही, पण अजून तरी त्यांना पटलेले नाही." चरणजी म्हणाले.

आम्ही पुढे जात होतो. चरणजी आपल्या लांब-लांब टांगा टाकीत पन्नास पावले पुढे होते. वजन घेऊन चालण्यामुळे बोलण्याची मला इच्छा नव्हती. आम्ही गुपचूप पुढे जात होतो.

मध्येच चरणजी म्हणाले, "संभाल के आइये." पुढे पाऊलवाट एक अर्धवर्तुळ करून जाते आहे हे माझ्या ध्यानी आले होते. त्या वर्तुळाच्या पोटात एखाद्या राक्षसाने बोट खुपसावे तसा खड्डा पडलेलाही माझ्या ध्यानी आला होता. वहीत शेताच्या आत घुसणारा हा खड्डा शेतकऱ्यांनी भरला कां नसेल?—असाही प्रश्न मला चाटून गेला होता. आता प्रश्न पडला, "चरणजींनी माझे लक्ष का वेधले असावे ह्या खड्ड्याकडे?"

मी पाऊलवाट सोडून, जपून खड्ड्याच्या तोंडाशी गेले. सुरीच्या धारेने कापल्यासारखी माती पंधरा एक फूट खोलवर कापलेली होती. ह्या बोटाचे निमुळते टोक असेल एक-दीड फूट रुंद—पण त्याच्या भिंतीची उंची मात्र तेवढीच होती. बोटाच्या टोकावरून पाणी खाली वाहिले असावे असे त्याच्या कडा पाहून वाटत होते. हे बोट शेताच्या पोटात दहा पावले घुसलेले असून बाहेर आणखी पंचवीस पावले लांब होते. त्यानंतर मात्र त्याचा बाजू खचलेला साधा ओढा झाला होता.

"हा खड्डा इतका खोल कसा झाला चरणजी?" मी विस्मयाने विचारले.

"हीच इथल्या ओहोळांची, वेहड होण्याची सुरुवात. हे ओहोळ असेच वर्षानुवर्षे चरत जातात. इथली माती मोठी विचित्र आहे. एरव्ही पहारीने फोडावी लागणारी ही माती पाण्याचा थेंब पडताच विरघळते नी वाहून जाते."

चरणजींनी पुरवलेली माहिती पचवीत मी पुढे सरकत होते. साडेतीन मैल आल्यावर, डाव्या हाताला निंबाचे मोठाले वृक्ष नी त्याच्या खाली सफेती केलेली लहानशी इमारत चरणजींनी दाखवली. नागराला कायमचा पोलीस-पोस्ट आहे. येथे क्विनसाहेबांचे मुख्य ठाणे आहे. ही इमारत नागराच्या इतिहासात हवेली ह्या नावाने प्रसिद्ध असल्याचे मागाहून मला समजले.

ही इमारत ओलांडून आम्ही आणखी पुढे गेलो. वाटेत एका ओहोळाच्या खाईचे दुरून दर्शन झाले तेवढेच. आम्ही शाळेच्या आवारात गेलो. तीन खोल्या आणि एक व्हरांडा अशी शाळेची रचना होती. इमारत विटेबंदी असली तरी भुई मातीचीच होती. सत्तरएक मुले शाळेच्या बाहेर विविध प्रकारच्या आसनांवर बसून आपापले धडे घोकीत होती. आम्ही शाळेच्या व्हरांड्यावर गेलो. मास्तरसाहेब चुला पेटवून एका खोलीत स्वयंपाक करण्यात गुंतले होते. त्यांचे हातमागाचे जाडे धोतर, अंगातला अंगरखा, डोक्याला लावलेले चपचपीत तेल हे सर्व हा माणूस खेड्यातलाच आहे असे ओरडून सांगत होते. मास्तरांनी आमच्यासाठी एक खाट व्हरांड्यात मुलांकडून टाकवून घेतली, आणि माझ्या स्नानासाठी पाण्याची व्यवस्था करावयास चरणजी निघून गेले.

मास्तर इथून दहा मैलावर असलेल्या खेड्यातले होते. इथे त्यांची राहण्याची सोय नव्हती. ते शाळेच्याच एका खोलीत राहत व हाताने स्वयंपाक करून खात. खुंटीवर लटकलेल्या एका लोट्यात त्यांचे तूप असावे. एका बाजल्यावर त्यांचे अंथरूण पडलेले दिसले. एक थाळी, लोटा-फुलपात्र, गुंडगोळे ही पितळेची आणि तवा व पळी ही लोखंडाची भांडी येवढाच साजसरंजाम त्यांच्याजवळ दिसला.

"पटावर ऐशी मुले आहेत; आज सत्तर हजर आहेत." ते म्हणाले. ही 'एक-मास्तरी' शाळा होती. इथे एकंदर वर्ग चार होते. एक मास्तर ऐशी मुले संभाळून चार वर्ग कसे शिकवीत असतील ते दिसतच होते. त्यात वरची देखरेख नसल्यासारखीच. मग शाळेच्या वेळात मास्तर स्वयंपाक शिजवीत, स्नान-जेवण उरकीत ह्यात काय नवल? बिऱ्हाडाला जागा नाही म्हणून बायकामुले गावी राहतात आणि आठवडाअखेर घरी जातो, असे त्यांनी मला सांगितले.

स्नानाचे पाणी आल्याने मी कपडे उचलून स्नानाला गेले. खेड्यात जर काही अडचण वाटत असेल तर ती आडोशाची. वारा भो-भो वाहत होता. पाणी थंडगार होते. त्यातही कपडे न काढताच स्नान करणे भाग होते. कारण मुले चारी बाजूंनी कुतूहलाने डोकावून जात होती. काल ह्याच वेळेला मी आग्रा-ग्वाल्हेर मार्गावर

पहिल्या वर्गाच्या डब्यात ह्यापेक्षाही थंड पाण्याने केस धुऊन नहात होते. पण काल आडोसा होता.

खेड्यात दोन-तीन गोष्टींची जरुरी नसते. कंगवा, घड्याळ ही दोन्ही नांवे विसरलात तरी चालते; साबणालाही मी एका आठवड्याची सुटी दिली होती. मी कपडे पिळून काट्यांवर वाळत टाकले. ओले केस पाठीवर सोडून, कुंकवाचे बोट टेकून शाळेतून चरणसिंगांबरोबर बाहेर पडले. गाव थोड्या अंतरावर होते. माझे मन विविध विचारात मग्न होते.

विनोबा नागऱ्याला आले होते, त्याला आज पंधरा महिने होऊन गेले होते. ह्या अवधीत खूपच मंडळी येथे येऊन खेडुतांशी भेटून व बोलून गेली होती.

"कुठल्या प्रश्नाला काय उत्तरे द्यायची हे त्यांनी आता ठरवलेले आहे. त्यांना सगळे आता पाठ झाले आहे. तुला नवीन काही ऐकायला मिळणार नाही." असा मला ग्वाल्हेरमध्ये इशारा मिळाला होता. म्हणूनच घरात स्त्रियांकडे तेवढे जाण्याचा निर्णय मी घेतला होता.

मला ग्वाल्हेरला काकासाहेब सहस्रबुद्ध्यांशी झालेली बोलणी आठवत होती. ग्वाल्हेर संस्थानच्या नोकरीत काकांनी उभी हयात घालवली व साध्या कारकुनापासून आपल्या अंगच्या गुणांनी ते चढत जाऊन पोलिस सुपरिंटेंडंट व नंतर जिल्हाधीश झाले. तेही भिंड जिल्ह्यात. आता सत्तरीला आलेले काका आपल्या छोट्या घरात स्वस्थपणे लेखन-वाचनात वेळ घालवतात. मी गेले तेव्हा ते एका संस्कृत पुस्तकाच्या नोट्स करीत होते. त्यांच्या देहावर सुरकुत्या पडल्या आहेत, तरी अंगयष्टी किरकोळ पण ताठ आहे. डोळे थकलेले, तेजोहीन असले तरी आवडता विषय येताच चमकून उठतात. ते म्हणाले होते,

"भिंडमध्ये खून-मारामाऱ्या भरपूर होतात. पण त्याचे कारण लोक दुष्ट आहेत असे नाही. आपण चटकन थप्पड मारतो; ते पटकन गोळी घालतात. ह्यात काही चूक आहे हे त्यांना कोणी पटवलेले नाही. शिवाय ते लोक खूप शूर आहेत. सैन्यभरती करण्याची वेळ आली तेव्हा एकट्या भिंड जिल्ह्यातून, बाकी साऱ्या ग्वाल्हेर स्टेटपेक्षा जास्त रिक्रूट मिळाले असा माझा अनुभव आहे."

त्यानंतर त्यांनी मला एक धोक्याची सूचना दिली. "ते लोक फार हुशार आहेत. आपल्याला हातोहात चकवतात. खूप जुनी गोष्ट. डाकूंच्या टोळीचा एक एकोणीस-वीस वर्षांचा नायक आम्ही युक्तीने पकडला होता. त्या डाकूचे डावपेच मोठे सुंदर असत आणि म्हणून त्याला पकडणे फार कठीण होते.

त्या डाकूवर खटला झाला. त्याचा वृद्ध आजा साक्षीला आला. तो म्हणाला, 'साहेब, तुम्ही म्हणता पोरानं डाका टाकला. पोरगं असं भित्रं की रात्री लघ्वीला जायचं तर मला बरोबर जावं लागतं अजून. हे नालायक पोर काय डाका घालणार?'

मॅजिस्ट्रेट एक इंग्रज होता. त्याने ह्या साक्षीवर विश्वास ठेवून, त्या पोराला निर्दोष ठरवून सोडून दिला!"

काकांच्या शब्दांचा विचार करीत मी चालले होते; स्वतःला सावध करीत होते. तथापि काही गोष्टी शिकवून समजत नाहीत, अनुभवाने शिकाव्या लागतात; ह्याची आठवण मला त्या वेळीं झाली नाही. माझे पाय पुढे सरकत होते, मन विचारमग्न होते नी कुठले तरी सुप्त मन सभोवार निरखीत होते. तसे म्हटले तर नागराची रचना मला काही विशेष किंवा विलक्षण वाटली नाही. ज्या बोळातून आम्ही पुढे जात होतो ती अरुंद गल्ली, तिच्या दोन्ही बाजूंनी जणू अंगावर येणाऱ्या चिखलाच्या भिंती, वरची कौलारू छपरे, भिंतींना आधार म्हणून बुडाशी घातलेल्या मातीच्या राशी नी त्यांनी अधिकच निरुंद केलेली गल्ली, गल्लीतली घाण आणि कचरा—कुठे शेण तर कुठे कुत्र्याच्या लेंड्या तर कुठे पहाटे उरकलेले प्रातर्विधी, पालापाचोळा, भांडणारी कुत्री, मोकाट सुटलेली जनावरे, काय नवीन असणार ह्या चित्रात? 'बळी तो कान पिळी' ह्या नियमाचे अधिराज्य स्पष्टच होते.

मध्येच एका घरासमोर थांबून चरणजी म्हणाले, "यहा एक आदमी मारा गया है. उसकी मां है. बहू-बच्चे है. एक बच्चे को प्रतिमास समिती की ओर से साडेसोला रुपयोंकी सहायता मिलती है पढाई के लिए."

मी क्षणभर सभोवारचा प्रदेश न्याहाळला. रस्ता भराभर उतरत होता. घराच्या मागेच बेहड सुरू होतो असे मला समजले. घराच्या समोर मोठ्या कडुनिंबाखाली म्हैस बांधली होती. तोच तिचा गोठा असावा, कारण घराच्या दाराशी आम्ही उड्या मारूनच गेलो. घर म्हणजे गाऱ्याची छोटी झोपडी अवगळलेली दिसत होती. दाराच्या फळ्या जीर्ण झाल्या होत्या. चरणजींनी एक हाक दिली आणि कोणीसे दार उघडले. दाराच्या आत दोन फुटांवर सहा फूट उंचीची पडवी बांधलेली दिसली. आतील स्त्रियांचा पडदा जपणारी, पडदी! मी आत शिरले. अंगणात सकाळी साडेदहाला निंबाच्या छायेने गोठल्यागत वाटत होते. अंगण मात्र झाडूनसारवून स्वच्छ ठेवलेले होते. एक तुटायला झालेले खाटले एका तिशीतल्या बाईने पुढे टाकले. तिच्या कपड्याच्या चिंध्या दिसतच होत्या. डोळा तिरळा नी केविलवाणा होता. माझ्याकडे पाहून ती हसली; पण ते हास्यही निर्जीव होते. अंगण अगदी लहान; दोन किंवा तीन खाटा मावण्याएवढे. अंगणाच्या उजव्या हाताला पाच फूट रुंदीची नी आठ फूट लांबीची छपरी होती. डाव्या हाताच्या समोरच्या कोपऱ्यात, पडवीच्या समोर दुसरी छपरी झाडाच्या फांद्या घालून केलेली होती. त्या छपरीतली चूल थंड होती. ह्या छपरीतून आत जायला रस्ता होता, तेथे एक लहानशी खोली होती.

कमरेत वाकलेली एक वृद्धा पुढे आली आणि म्हणाली, "बस ना."

तिचे खेडवळ हिंदी मी अंदाजानेच ओळखत होते. ह्यापुढे ह्याच हिंदीशी मला टक्कर द्यायची होती. त्या स्त्रियांच्या कहाण्या ऐकायच्या होत्या, त्यांची हृद्गते जाणायची होती.

मी खाली बसले. माझ्याजवळ ती वृद्धा बसली, पण खाटेवर नाही, जमिनीवर. माझ्या शेजारी बसण्याचे तिला पटेच ना. अखेर मीच उठून जमिनीवर बसले. तेव्हा तिला भारी अवघड वाटले. ती स्त्री अगदी थकलेली होती. डोळे थिजले होते. एकावर साराही आला होता बहुधा.

इतक्यात चरणजी एका गृहस्थांना घेऊन आत आले, आणि म्हणाले, "ह्या बाईचा हा धाकटा दीर आहे." त्यानंतर बाईच्या मुलाच्या मृत्यूची कहाणी मला त्या बाईनी सांगितली आणि तिच्या दिराने त्याचे साधे हिंदी केले. ती मैनपुरी जिल्ह्यातली राहणारी. तिचा नवरा मेला तेव्हा पोरगा लहान, चारपाच वर्षांचा असावा. त्यानंतर म्हशी ठेवून दूध विकून तिने त्याचा प्रतिपाळ केला. पोरगा समजूतदार झाल्यावर ती त्याला घेऊन नागऱ्याला परत आली, कारण त्यांची जमीन येथे होती. "पोराचे लग्न करून दिले, ही त्याची पोरं बाई." तीन पोरे—एक मुलगा, दोन मुली—समोरच होती. सगळ्यांचेच कपड्याचे दैन्य होते. "पोरगा चांगला निघाला. मी म्हणाले, देवाने पांग फेडले माझे. पण कशाचं बाई! माझ्या कपाळात दुःखच होतं. एका दिवशी, पहिल्या रात्रीला, जेवून पोरगा बाहेर ओट्यावर लिंबाखाली उभा होता, तर 'तो मेला' आला आणि लागला शिव्या मोजायला दुसऱ्या लोकांना. बाई, माझं पोरगं सरळ. कोणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही. पोरगा म्हणाला, 'माझ्या घरी काही बोलू नकोस. मी कोणाच्या भांडणात नाही.' तेवढ्या अदावतीवर घंट्याभरानं येऊन माझ्या पोराला गोळी घातली." म्हातारी बोलत होती. तिचा आवाज एका सुरात विषण्णपणे, घरघर लागल्यासारखा येत होता.

तिने झापरीकडे हात केला. "ह्या—ह्या इथेच गोळी घातली त्याला बाई. मी मध्ये पडले, नको मारू म्हटलं. पण दया नाही आली बाई. कपाळ फुटलं माझं. तो मरून गेला; मी ही किरडं वाढवायला मागं राहिले. आता खेती कोण करणार? पुन्हा म्हैस घेतली आहे. ओलं कोरडं भेटलं ते खातो..."

बराच वेळ आम्ही स्तब्ध होतो. नंतर प्रश्न विचारल्यावर मला कळून आले की, त्या माणसाला त्याच्या पत्नीच्या देखत, मुलांबाळांदेखत गोळी घातली नी तो आईच्या मांडीवरच मेला. त्याला गोळी घालणाऱ्या 'त्या मेल्या'चे नाव ती घ्यायला तयार होईना. "देवानं त्याचाही हात तोडून ठेवलाय. झोळीत (sling) घालून फिरतोय." एवढेच ती म्हणाली. त्याचे नाव घ्यायला कोणीच तयार नव्हते—भिंतीला कान असतात. बाहेर फुटलं तर रात्री आणखी एखादा जीव गोळीला बळी पडायचा. नवीन सरकारी सडकेसाठी सरकार तिची जमीन घेत असल्याचे (acquire) दीर म्हणाला. भांडायला कोणी नसल्याने भरपाई पुरेशी मिळणे कठीणच आहे, असे एकंदर मत

दिसले. 'ज्यांची वर वग आहे, त्यांची शेते वगळून सडक काढली जाते' असेही मत एका ठिकाणी ऐकले.

आम्ही तेथून उठलो. त्या गरीब घरात आम्हाला द्यायला थोडेसे दूध तेवढे होते. ते घ्यावेसे मला वाटेना. परंतु तिला मदत देणाऱ्या समितीची माणसे दुपारच्या वेळी उपाशी जाऊ देणे तिला पटेना. तिच्या दिराने आपल्या घरून पाच-सहा जाड पोळ्या आणल्या आणि दूधपोळी खाऊनच आम्ही बाहेर पडलो. नंतर दीर म्हणाला, "चाललंय कसंतरी. सून मोलमजुरी करते. म्हशीचं तूप होतं. दूध पोरांच्या तोंडी पडतं. करायचं काय, भोग आलाय खरा."

आम्ही बाहेर पडून मार्गाला लागलो, तो आम्हाला पोलीसठाण्याचे अधिकारी गावचा 'राउंड' घेतांना आढळले. थोडे पुढे गेल्यावर मी काही एक विचार करून परत फिरले, व त्या अधिकाऱ्यांना स्वतःचा परिचय करून दिला. त्यांनी आपला परिचय मला दिला. त्यांपैकी एक श्री० क्विन व दुसरे डी० आय्० जी०. परस्परांशी चार शब्द बोलून मी व चरणजी आपल्या वाटेने निघालो.

त्यानंतर आम्ही खेड्यातल्या जीवनाची चाचणी करीत हिंडलो. सर्वदूर चरणजींना आत येण्यास बंदी होती—पडदापद्धती ना !

मी येत होते ती सारी घरे रजपुतांची होती. एक शिकलेली, पडदा न करणारी, डोक्यावर पदरसुद्धा न घेणारी, कासोट्याचे नेसणे नेसणारी प्रौढ स्त्री गावात आल्याची वार्ता त्यांना लागली होती. एका बोळातल्या घरात आम्ही शिरलो. समोरच पंधरा फूट लांब आणि सहा-सात फूट रुंद अशी लहानशी खोली होती. ह्या खोलीतून आत गेले म्हणजे अंगण. अंगणाच्या डाव्या-उजव्या बाजूंना दोन खोल्या दिसल्या. घरातली स्त्री मला पुढच्या खोलीच्या दारातच भेटली. बाहेर आणून तिने मला बसायला एक पीढा दिला. हळूहळू सात-आठ बायका गोळा झाल्या. सर्व कमी वयाच्या, सर्वच खेळकर, हसऱ्या. मला त्या बाहेरच्या जगाचे प्रश्न विचारीत होत्या. त्यात तुम्हाला मुले किती ? दोनच ? मग 'आम्हाला सांगा की काही जुगत त्याची.' इथपर्यंत सर्व प्रश्न होते. धनबाद किती दूर आहे त्याचे आकलन मात्र त्यांना नीट झाले नाही. शिकलेली बाई, त्यातून आई. तिला वैद्यकी येत असलीच पाहिजे, असा खेडुतांचा गैरसमज माझ्या नेहमी प्रत्ययाला येतो, तोच इथेही आला.

"बाई हिला रोज ताप येतो. नाडी पाहा ना हिची." त्या बाईला लक्षणे विचारताच मलेरिया वाटला. इथे काय सांगणार औषध मी ? "डॉक्टर नाही का जवळ कुणी ?" "नाही बाई पोरशाला जावं लागतं." उत्तर मिळाले. म्हणजे चार मैल पाऊलवाटेने, मग सहा मैल सडकेने. बहुधा सगळे पायीच. कारण खेडुता-जवळ नगदी पैसा सहसा सापडत नाही. आणि असला तरी खर्चायची त्याची प्रवृत्ती

नाही. त्यातून दुखणेकरी होती एक स्त्री. भारतात स्त्रीच्या जीवनाचे आर्थिक मूल्य फारच थोडे आहे. कारण 'एक मेली तर दुसरी' ही विचारसरणी.

त्यानंतर दुसरीने आपली अडचण सांगितली, तिसरीने आपली. खवडे तर बऱ्याच पोरांना दिसले. ह्या ऋतूत पडसे, खोकला असणे स्वाभाविकच होते. मला आठवतील ती आजीच्या झोळण्यातली औषधे मी सांगत होते. आणि मग एकीने आपले पदराखाली झाकून झोपवलेले मूल माझ्यापुढे केले.

त्याचे नगारा झालेले पोट, बाहेर पडलेल्या बरगड्या, हातापायाच्या काड्या, डोक्याचा वेडावाकडा आकार—माझे निरीक्षण आणि सामान्य ज्ञान ओरडून म्हणाले, "रिकेटस्."

वरकरणी मी मुलाचे वय, दुखण्याचा काळ, त्याला दिलेले औषधपाणी ह्यांची चौकशी करीत होते. सात-आठ महिन्यांचे वाटणारे ते मूल 'ह्या होळीला दोन वर्षांचे' व्हायचे होते. त्याच्या गळ्यात केसाळीत ओवलेला ताईत होता, मनगटाला काळा गंडा. आया-बायांचे अंगारे-धुपारे हेच औषध. ते पोर तेवढ्यात डोळे उघडून उठले, नी चिरचिरू लागले. त्याला रडण्याइतकी शक्ती नव्हती. त्याच्या आईने त्याला पदराखाली झाकले. मी तिला तेलाचे मालीश नी सूर्यस्नान सांगितले. इतर काही आठवेल तर प्रयत्न करीत होते. माझे 'प्रथमोपचारा'चे ज्ञान आतल्याआत चाळीत होते.

मालिशबद्दल तिने मन लावून ऐकून घेतले. बरेच प्रश्न इतर स्त्रियांनीही विचारले. मग हळूच त्या बाईने मागे लपवलेली बाटली काढली. बाटली बरीच मोठी, चार किंवा सहा औसांची असावी. बाटली अजूनही वरच्या डब्यातच होती. तिने तो माझ्या हातात देऊन विचारलें, "हे देऊ का त्याला?" तिच्या डोळ्यात एक तेज लकाकले. मला फसवल्याचा आनंद त्यात होता का?

मी डब्यातली बाटली काढून हातात घेतली. त्या बाटलीतला पांढरा पिठूळ पदार्थ मला दिसत होताच. बहुधा कॅलशियम् असेल, असा माझा कयास होता. पण त्याच्यावर लिहिले होते, 'क्लोरोमाइसिटीन.' क्लोरोमाइसि टीन? कुणी दिले हे? पोरसाला डाक्टरसाहेबांच्याकडे? नंतर ती अभिमानाने म्हणाली, "बारा रुपये दिले मी बाई." होय, हाच आनंद होता तिचा—बाईंना वाटतंय, आम्ही पैसे देऊन डॉक्टरकडे जात नाही...इत्यादी.

"कधी आणलंस औषध तू हे?"

"झाले असतील दोनएक आठवडे!"

"मग दिलं नाहीस ते?"

"कोण जाणे, चांगलं औषध आहे का वाईट. देऊ का सांगा तुम्ही, मग करीन सुरू."

तिने असे अभिवचन दिले तरी माझ्या शब्दावर विसंबून ती औषध सुरू करील हे मला पटत नव्हते. आणि तरीही क्लोरोमाइसिटीन नावाखाली दिलेली

ओल्या चुन्यासारखी दिसणारी ही पेस्ट 'दे' म्हणून सांगू कशी? आणि डॉक्टरांनी औषध दिले असले तर 'नको' म्हणून सांगण्याचा मला काय अधिकार? मी म्हणाले, "मी काय सांगू? हे औषध माझ्या ओळखीचे नाही. मला त्याची काही माहिती नाही."

मग बायका पोरसाच्या डॉक्टरबद्दल बोलू लागल्या. त्याची फी एकच दिसली: बारा रुपये. मग ते इंजेक्शन असो की क्लोरोमाइसिटीन. त्यानंतर गोष्टींचा प्रवाह वेगवेगळ्या दिशांनी वाहिला. मी जाण्यासाठी निरोप मागू लागले की त्या स्त्रिया म्हणत, "बसा ना बाई. पुन्हा तुमचं दर्शन आम्हाला कसलं घडतंय?" नवीन-नवीन शेजारणी येत होत्या. चारी बाजूला बसत होत्या. त्या आल्या की बहुधा 'पाया पडत'. माझी ब्राह्मण जात त्यांनी आधीच विचारून घेतली होती. पाया पडायचे म्हणजे माझ्या पोटऱ्या त्या चारदोन वेळा दाबीत. मग हात कपाळाला लावीत. त्यांच्या पाया पडण्याला माझा विरोध निरुपयोगी होता. त्यांच्या 'आई'सारखी वडील, इतकी शिकलेली, शिवाय ब्राह्मण.

शेवटी एक बाई म्हणाली, "बाई, हिचा नवरा हिला भारी मारतो हो. काय करावं सांगा तरी?"

चवळीच्या शेंगेसारखी सडपातळ, उजळ वर्णाची, हसऱ्या डोळ्यांची एक तरुणी, बोलणारीला दाबीत होती. "दाखव, दाखव ना. लपवायचं काय बाईपासून?"

मग त्या बाईने आपले पाऊल मला दाखवले. लहान लिंबाचे अर्धुक मावेल अशी खोल जखम आता वाळून बरी झालेली होती. जखम पावलाच्या वरच्या बाजूला, दुसऱ्या व तिसऱ्या बोटाच्या रांगेत होती. एक दिवस नवरा पिऊन आला नी रागाच्या भरात त्याने कोयता फेकून मारला, हा त्या जखमेचा इतिहास. "एऱ्ही नवरा चांगला आहे बाई. पण पितो नी मग हाती सापडेल त्याने मारतो." ती अजूनही हसत होती. तिच्या त्या हसतमुखाचे मूळ कोठे होते बरे? तिच्या विचारीपणात? का तिच्या तुळशीवृंदावन जीवनात?—पाणी मिळाले की तरारून यावे, पाणी तुटले की सुकावे. तशीच पूजनीय पण तितकीच उपेक्षित!

दुपारी तीनच्या सुमाराला मी आणखी एक घर घेतले. 'यहां एक मौत हुवी है' म्हणून. घर सुखवस्तू लोकांचे दिसले. घराचा दर्शनी भाग विटेबंदी होता. घराचे दर्शन काही स्वागतशील वाटत नव्हते. जगाला विटलेले आणि मानवी भावनांना सर्वथा बंद झालेले ते दार उघडण्याचे साहस मी कसेबसे केले व एकटीच आत गेले. खालचे अंगण टाकून वरच्या अंगणात चढले. ह्या खालच्या अंगणाच्या सन्मुख नी डाव्या बाजूला अंगणे होती. आणि त्या अंगणांच्या बाजूला खोल्या बांधलेल्या होत्या. वऱ्हाडात सापडणाऱ्या जुन्या तऱ्हेच्या वाड्यांसारखी त्याची रचना होती. मी चढले होते डाव्या अंगणात, कारण तेथे बऱ्याच स्त्रिया कामे करीत होत्या. बाजरीची

कणसे तोडून, झोडपून बाजरी मोकळी होत होती. उडीद भरडून त्यांची डाळ पाखडली जात होती. स्त्रियांनी माझ्याकडे नजर टाकली. त्यांना माझे आगमन भावले नसावे. या बसा कोणी म्हटले नाही, विचारपूस केली नाही. काही सेकंदांनी—मला तो अवधी युगांचा वाटला—एका पोरगेल्या स्त्रीने एक घडीची खुर्ची आणून मांडली. मी जवळच पडलेल्या खाटेवर बसले. मग ती पोरगेली स्त्री त्या खुर्चीवर बसली. बोलण्याला गती येत नव्हती. सगळे स्तब्ध होते. सूप फटकत होते. काही जणी कणसे झोडपीत होत्या.

क्रमशः एकेरी प्रश्नोत्तरे, मग माहिती. भाषा मला नीटशी कळत नव्हतीच. पण त्या स्त्रीने सांगितले, "मारले गेले ते माझे काका. एक दिवस पोलीस बरोबर घेऊन हवेलीवाले आले. त्यांनी भडाभड बोटे दाखविली. एकंदर सहा माणसे पोलीस पकडून घेऊन गेले. त्यानंतर आमचे काका आम्ही जिवंत पाहिलेच नाहीत. रात्री बेहडामध्ये गोळ्यांचे आवाज आले. सकाळी आम्ही प्रेते उचलून आणली नी अग्निसंस्कार केला." आतापावेतो जणू गोष्ट सांगणारा तिचा थंड व संथ आवाज एकदम तडकला. "कुत्र्यासारख्या गोळ्या घालून मारली माणसं, नी कोल्ह्या-गिधाडांना खायला प्रेतं ओहळात टाकून चालते झाले. काय—काय केलं होतं माझ्या काकांनी? ते काय चोर होते? डाकू होते?" तिचा आवाज वाढत चालला होता. मी एकनजर तिच्या विस्फारलेल्या, ठिणग्या टाकणाऱ्या डोळ्यांकडे पाहत राहिले. वीस-एकवीस वर्षांची, खेडवळ राहणीची ती साधारण स्त्री आता तेजाळून आली होती. ती मला पुढे अभिमानाने म्हणाली, "बाई, ते बागी होते."

तो बागी शब्द तेव्हाही माझ्या स्मृतिपटलावर खोदून निघाला. 'कायदा व सुव्यवस्था' पलायनवादी का, ह्याचा अंदाज मला येथेच आला. "हवेलीवाले आले की असा धुमाकूळ होई. आता सरकारने त्यांना सांगितलंय, 'खबरदार नागऱ्याला याल तर. तुम्ही ग्वाल्हेरला राहा'" प्रसिद्ध डाकू लाखनसिंगच्या क्रोधाचे स्थान झालेला हा हवेलीवाले 'परिवार' ग्वाल्हेरला संरक्षणार्थ पाठवलेला होता. लोकांची मनोरचना समजण्यासाठी त्याचा वरील अन्वयार्थ उपयुक्त आहे.

नागराची आणखी एक दुःखी स्त्री माझ्या आठवणीत राहिली आहे. ती म्हणजे रतनसिंगची तिशीतली करुण विधवा. गव्हाळी रंग, मोठाले भावदर्शी डोळे, सडपातळ बांधा नी अत्यंत कोमल आवाज. तिच्या सांगण्याप्रमाणे पोलिसांनीच तिच्या नवऱ्याचा खून केला होता. तिला एक मुलगा होता. शेजारच्या खेड्यातल्या एका शाळेत हायस्कूलच्या आठव्या वर्गात तो होता. ती मला म्हणाली, "सर्वांचं सगळं ठीकच आहे. पण माझं काय? सारा जन्म असा वैधव्यात पिचतच घालवायचा ना मी? माझ्या दुःखाचं परिमार्जन कोण करील?"

त्यानंतर एका पेन्शनर लष्करी जमादाराच्या 'स्त्री'शी बोलणे झाले. तिच्या मते तिचा नवरा पोलिसांनी चुकून मारला होता. आणि मग आपली चूक सावरण्यासाठी

त्याला डाकू म्हणून सरकारदरबारी 'दर्ज' केला होता. त्यामुळे ती पेन्शनला पारखी झाली होती. परमेश्वराने मूल दिले नव्हते. दोन्ही डोळ्यांत मोतीबिंदू पडत होते. त्यामुळे डोळ्यांना अंधत्व येत होते. कामाला निरुपयोगी. आता कोणी चार घास घातले तर खाते, नाहीपेक्षा पडून राहते. तिच्या शब्दात नव्हती आशा, ना उपरोध ना क्रोध. तिच्या त्या वृत्तीने माझे अंतरंग जास्तच पिळवटून आले.

नागराची माझी फेरी येथे संपूर्ण झाली. सूर्य अस्ताचलाला चालला होता. आणखी दोनचार घरे आम्ही घेतली होती. हात मोडका 'तो' मी पाहिला होता. त्याच्या खांद्यावर बंदूक होती, गळ्यात काडतुसांचा पट्टा होता. तो बोलत होता त्यात अहंमन्यता होती, अरेरावी होती, दुसऱ्यांना दुखविण्याची खोल इच्छा होती. त्याचे नाव, मला वाटते, भीमसिंह असावे.

सायंकाळी शाळेत सामान आणण्यासाठी गेलो. गार वारे सुटले होते. मास्तर खोलीला कुलूप लावून 'गावी' गेले होते. चार गुरखा लष्करी शिपाई बंदुकी घेऊन शाळेत आले होते. रात्रभर त्यांचा पाहारा येथे असतो. ह्या थंडीत त्यांना जागायचे होते.

आम्ही पंचायतीच्या ऑफिसात सामान टाकले आणि सरपंचाकडे जेवण्याचा ठिय्या लावला.

पौर्णिमेची रात्र. सारे खेडे रजतरसात बुचकळून निघाल्याने त्याची कुरूपता लपली होती. परंतु मनात एक विचित्र भय, विचित्र आशंका होती. जवळच उभ्या असलेल्या तीनचार प्रचंड निंबांची छाया काळीकुट्ट वाटत होती. त्या छायेत बांधलेले बैल चारा खाताना 'खस-बस' असा आवाज येत होता, तोही भयानक वाटत होता. दिवसभर एकांतासाठी आसुसलेली मी आता मात्र म्हणत होते, "चरणजी, रात बाहर जाना पडे तो किसी को कहकर जाना होगा?" थंडी खूप पडली होती. दिवसा खांद्यावरून आणताना पश्चात्ताप करायला लावणारा होल्डॉल, आता त्यातली गादी, दुलई, ब्लॅंकेट इत्यादी सर्व पांघरुणे कमी पडत होती. हातपाय पोटाशी घेऊन मी पडले होते—साऱ्या दिवसाच्या घटना आठवीत होते. सगळ्या गोष्टी स्मृतिमंजूषेत साठवायच्या होत्या. कागद-पेन्सिल घेऊन जागोजाग टिपणे घेण्याने लोक साशंक झाले असते. रात्री लिहायचे तर उजेडसुद्धा नव्हता.

झोप लागताना अर्धसुपुतीत मला आठवत होत्या, मला रात्री जेऊ घालणाऱ्या जावा. पिके नुकती निघाली होती. त्यामुळे नव्या बाजरीच्या ताज्या पिठाच्या लहानलहान भाकरी तव्यावर पचवून चुलीत सरकवताच टंब फुगून येत. मग दुसरी त्यावर घरचे साजूक तूप ओती. मला आवडणारे उडदाचे वरण होते. डाळही आजच दुपारी भरडली होती. भरलेल्या दोडक्याची भाजी छान झाली होती, पण जहाल. चुलीत जळणाऱ्या तुराट्या भुरूभुरू जळून जात, जळताना धूर करीत. डोळे

चुरचुरू लागून पाणी येई. जळून उरलेल्या कोळशावर फुंकर घातली की त्याचा तांबडा-लाल प्रकाश त्या नाकी-डोळीं नीटस युवतीच्या मुखावर पडे.

त्यांचे बोलणे हळू—अगदी तोंडातल्या तोंडात. चौकाच्या भोवती सारे भाऊ-भाऊ राहत होते ना? पुरुषांना आवाज ऐकू जाईल असे का बोलतात बायका? आमच्या धनबादला आम्ही काय खातो—तांदूळ, का बाजरी, का गहू? पालेभाज्या खातो का? कोणत्या? हरभऱ्याची पालेभाजी मला आवडते का? सारे प्रश्न झाल्यावर लाजत-लाजत पळीभर भाजी माझ्या पानात वाढली होती. ताकातली, लसणीच्या फोडणीची. "वा! इतकी छान भाजी आधी का नाही वाढली मला?" "ही भाजी बायकांनी खायची. आमचे पुरुष नाही असले कदन्न खाणार. तुम्ही पाहुण्या..."

नागराची दहशत मी आता विसरले आहे. मला अजून आठवण आहे ती त्याला विळख्यावर विळखे देणाऱ्या बेहडांची. एके दिवशी ह्या विळख्यात ओढला जाणारा नागरा नामशेष होईल, ह्या कल्पनेने माझे मन शहारून येते. चंबळ-घाटीच्या लोकांना मात्र ही घटना नवलाईची वाटत नाही. ओहोळांची वाढ नी गावाचा नाश ही त्यांच्या लेखीं नित्याचीच घटना आहे. गावाची वस्ती उठून इतरत्र जाऊन वसते. सतत पश्चिमेकडे ओघळणाऱ्या गंगेच्या काठच्या खेड्यांची प्रतिक्रियाही अशीच दिसली होती मला.

नागराची आणखी एक स्मृती माझ्या मनात अनेकदा रुंजी घालून जाते. ती आहे पहाटेच्या प्रहरी शेतात रचलेल्या बाजरीच्या पेंढ्यांवर तुटून पडलेल्या मोरांच्या थव्यांची. त्यांचे डौलदार पिसारे, माणसाबद्दलची निर्भयता, कर्णकर्कश आवाज, आपल्या शहरातल्या कावळ्यासारखेच पण अतीव सुंदर. नागराला त्यांच्याकडे कोणी लक्षही देत नाही. मी मात्र कितीतरी वेळ त्यांच्याकडे कौतुकाने पाहत उभी होते. माना उंचावून माझ्याकडे मधून कटाक्ष टाकीत ती पाखरे दाणे टिपण्यात दंग होती.

१८–११–६१ ला सकाळी घाईने आम्ही तीच मळलेली पाऊलवाट धरली. त्याच खडबडीत, वटवटीत रस्त्यावर आलो. बसबाई यायच्या होत्या. खेड्यात जाताना "घडी, कंगी, साबून" घरी न ठेवण्याची चूक भोवत होती. वारंवार घड्याळाकडे नजर जाई—आज बस आम्ही थोडी पुढे पकडणार होतो, म्हणून जयगढला पोचलो होतो. जयगढ रस्त्यावर असून तेथे मुलांचे हायस्कूल आहे. अध्यापकांनी अगत्याने आम्हाला आपल्या निवासात नेले. निवास म्हणजे एक झोपडीच होती. त्या झोपडीच्या १७'×८' च्या खोलीत तीन खाटा टाकलेल्या होत्या. क्वचित चवथी गर्दीने टाकून घेण्यात येत होती. इतरत्र असते तीच अध्यापकांची कहाणी होती! पगार थोडा, इतर सोयी शून्य, मॅनेजिंग कमेटीचे मतभेद, इत्यादी.

मग केव्हा तरी बस आली. कालचीच बस. पुन्हा आम्ही कुठल्याशा मैलाच्या दगडावर उतरलो आणि पुनश्च पाऊलवाट—शेतातून जाणारी, डौलदार वळणे घेणारी

नी पावसाळ्यांत बाहेरच्या जगांशी नाते तोडणारी पाऊलवाट—पार करून दुपारी अकराच्या सुमारास आम्ही कनेराला पोचलो. कनेराला समितीचे छोटेसे केंद्र आहे. इथे श्री० गुतेश्वर सुंदरलाल, दुर्गादास व नित्यानंद हे समितीचे स्वयंसेवक भेटले. साठीला पोचूनही तरुणांचा उत्साह नी धडपड असणारे मोकळ्या मनाचे गुतेश्वर, नियमित दंड-बैठकांचा व्यायाम करणारे, पिळदार शरिराचे, अत्यंत गोड आवाजात रोज रामायण पाठ करणारे लाजाळू सुंदरलाल. हळू आवाजात बोलून कम्युनिस्ट पुढारी मुजफ्फर अहमदची आठवण देणारे व आपल्या घरच्या काळजीने गांजलेले असूनही आपले अंगीकृत कार्य करणारे दुर्गादास आणि तिशी गाठण्यापूर्वीच संन्यास घेऊन लोककार्याला वाहून घेतलेले स्वामी नित्यानंद. ह्या चौघांशी माझा येथे परिचय झाला. त्यांचे रोजचे काम येथे राहून—निर्भयतेने राहून—प्रचार करणे हेच दिसले. विशेष म्हणजे इथे मला ह्या 'भाईजी' लोकांनी चहा दिला. साऱ्या दिवसांत वीस–पंचवीस कप चहा पिणाऱ्या माणसाला चोवीस तास चहाचे दर्शनही न झाले म्हणजे विलक्षण चुकल्यासारखे वाटते. त्यातून दिवस हिवाळ्याचे असले तर फारच. सुदैवाने मला डोकेदुखीचा त्रास झाला नव्हता. तरीही चहाचा बंपर पाहताच मला मोठा आनंद झाला. स्नान झाल्यावर आम्ही समर्पणकारी (विनोबांच्यापुढे जे डाकू हजर झाले त्यांना समर्पणकारी म्हणतात.) मुहरमनकडे गेलो. मुहरमनला पाच मुले. त्यांपैकी दोघांना समितीकडून शिक्षणासाठी प्रत्येकी रुपये साडेसोळाची मदत मिळते. तेहतीस रुपये नगदी! ग्रामीण जीवनात केवढा श्रीमान मनुष्य तो. मुहरमनची पत्नी खुश दिसली. "हां, ठीकही किया हाजीर हुवें. एक ना एक दिन पुलीस के गोली से मारे ही तो जाते."

कनेरा गाव तीन 'टोली'मध्ये विभाजित आहे. त्या तीनही विभागात मिळून पाच हत्या झालेल्या होत्या. परस्परशत्रुत्व हे कारण असावे असे वाटले. त्या पाचपैकी सीता दर्जीची पत्नी अत्यंत अल्पवयस्क—विशीची—वाटली. 'शेजाऱ्याने तिला घरात घातल्या'चा प्रवाद ऐकला. तिने माझ्याशी मनमोकळेपणाने बोलू नये म्हणून शेजारणी जावा-जावा तिला चिकटून होत्या. त्या पोरीचे भविष्य कोण सांगणार? आपले घुंघट उचलून आपले मोठाले डोळे तिने क्षणभर माझ्यावर रोखले आणि तिचा गोरटेला उभट चेहरा पुन्हा त्या घुंघटाआड दडला. मी तिला प्रश्न विचारीत होते : इथे तुझे कोण आहे? तू कोणाच्या आधाराने राहतेस? पुढे काय करणार? साऱ्या प्रश्नांची उत्तरे शेजारणींनीच दिली. काय करणार? राहणार, मोलमजुरी करून खाणार. बायका आणखी काय करतात?

आणखी एक घर 'गुजर' लोकांचे होते. घरची जमीन, धाकटा अविवाहित दीर व दहा वर्षांचा मुलगा. त्या संसारात ती रंगलेली दिसली.

संध्याकाळी, आमच्या शेजाऱ्याशी गप्पा मारल्या. ठेंगणा, स्थूल, एका पायाने

चुरचुरू लागून पाणी येई. जळून उरलेल्या कोळशावर फुंकर घातली की त्याचा तांबडा-लाल प्रकाश त्या नाकी-डोळी नीटस युवतीच्या मुखावर पडे.

त्यांचे बोलणे हळू—अगदी तोंडातल्या तोंडात. चौकाच्या भोवती सारे भाऊ-भाऊ राहत होते ना? पुरुषांना आवाज ऐकू जाईल असे का बोलतात बायका? आमच्या धनबादला आम्ही काय खातो—तांदूळ, का बाजरी, का गहू? पालेभाज्या खातो का? कोणत्या? हरभऱ्याची पालेभाजी मला आवडते का? सारे प्रश्न झाल्यावर लाजत-लाजत पळीभर भाजी माझ्या पानात वाढली होती. ताकातली, लसणीच्या फोडणीची. "वा! इतकी छान भाजी आधी का नाही वाढली मला?" "ही भाजी बायकांनी खायची. आमचे पुरुष नाही असले कदन्न खाणार. तुम्ही पाहुण्या..."

नागराची दहशत मी आता विसरले आहे. मला अजून आठवण आहे ती त्याला विळख्यावर विळखे देणाऱ्या बेहडांची. एके दिवशी ह्या विळख्यात ओढला जाणारा नागरा नामशेष होईल, ह्या कल्पनेने माझे मन शहारून येते. चंबळ-घाटीच्या लोकांना मात्र ही घटना नवलाईची वाटत नाही. ओहोळांची वाढ नी गावाचा नाश ही त्यांच्या लेखी नित्याचीच घटना आहे. गावाची वस्ती उठून इतरत्र जाऊन वसते. सतत पश्चिमेकडे ओघळणाऱ्या गंगेच्या काठच्या खेड्यांची प्रतिक्रियाही अशीच दिसली होती मला.

नागराची आणखी एक स्मृती माझ्या मनात अनेकदा रुंजी घालून जाते. ती आहे पहाटेच्या प्रहरी शेतात रचलेल्या बाजरीच्या पेंढ्यांवर तुटून पडलेल्या मोरांच्या थव्यांची. त्यांचे डौलदार पिसारे, माणसाबद्दलची निर्भयता, कर्णकर्कश आवाज, आपल्या शहरातल्या कावळ्यासारखेच पण अतीव सुंदर. नागराला त्यांच्याकडे कोणी लक्षही देत नाही. मी मात्र कितीतरी वेळ त्यांच्याकडे कौतुकाने पाहत उभी होते. माना उंचावून माझ्याकडे मधून कटाक्ष टाकीत ती पाखरे दाणे टिपण्यात दंग होती.

१८–११–६१ ला सकाळीं घाईने आम्ही तीच मळलेली पाऊलवाट धरली. त्याच खडबडीत, वटवटीत रस्त्यावर आलो. बसबाई यायच्या होत्या. खेड्यात जाताना "घडी, कंगी, साबून" घरी न ठेवण्याची चूक भोवत होती. वारंवार घड्याळाकडे नजर जाई—आज बस आम्ही थोडी पुढे पकडणार होतो, म्हणून जयगढला पोचलो होतो. जयगढ रस्त्यावर असून तेथे मुलांचे हायस्कूल आहे. अध्यापकांनी अगत्याने आम्हाला आपल्या निवासात नेले. निवास म्हणजे एक झोपडीच होती. त्या झोपडीच्या १७'×८' च्या खोलीत तीन खाटा टाकलेल्या होत्या. क्वचित चवथी गर्दीने टाकून घेण्यात येत होती. इतरत्र असते तीच अध्यापकांची कहाणी होती! पगार थोडा, इतर सोयी शून्य, मॅनेजिंग कमेटीचे मतभेद, इत्यादी.

मग केव्हा तरी बस आली. कालचीच बस. पुन्हा आम्ही कुठल्याशा मैलाच्या दगडावर उतरलो आणि पुनश्च पाऊलवाट—शेतातून जाणारी, डौलदार वळणे घेणारी

नी पावसाळ्यांत बाहेरच्या जगांशी नाते तोडणारी पाऊलवाट—पार करून दुपारी अकराच्या सुमारास आम्ही कनेराला पोचलो. कनेराला समितीचे छोटेसे केंद्र आहे. इथे श्री० गुतेश्वर सुंदरलाल, दुर्गादास व नित्यानंद हे समितीचे स्वयंसेवक भेटले. साठीला पोचूनही तरुणांचा उत्साह नी धडपड असणारे मोकळ्या मनाचे गुतेश्वर, नियमित दंड-बैठकांचा व्यायाम करणारे, पिळदार शरिराचे, अत्यंत गोड आवाजात रोज रामायण पाठ करणारे लाजाळू सुंदरलाल. हळू आवाजात बोलून कम्युनिस्ट पुढारी मुजफ्फर अहमदची आठवण देणारे व आपल्या घरच्या काळजीने गांजलेले असूनही आपले अंगीकृत कार्य करणारे दुर्गादास आणि तिशी गाठण्यापूर्वीच संन्यास घेऊन लोककार्याला वाहून घेतलेले स्वामी नित्यानंद. ह्या चौघांशी माझा येथे परिचय झाला. त्यांचे रोजचे काम येथे राहून—निर्भयतेने राहून—प्रचार करणे हेच दिसले. विशेष म्हणजे इथे मला ह्या 'भाईजी' लोकांनी चहा दिला. साऱ्या दिवसांत वीस–पंचवीस कप चहा पिणाऱ्या माणसाला चोवीस तास चहाचे दर्शनही न झाले म्हणजे विलक्षण चुकल्यासारखे वाटते. त्यातून दिवस हिवाळ्याचे असले तर फारच. सुदैवाने मला डोकेदुखीचा त्रास झाला नव्हता. तरीही चहाचा वंपर पाहताच मला मोठा आनंद झाला. स्नान झाल्यावर आम्ही समर्पणकारी (विनोबांच्यापुढे जे डाकू हजर झाले त्यांना समर्पणकारी म्हणतात.) मुहरमनकडे गेलो. मुहरमनला पाच मुले. त्यांपैकी दोघांना समितीकडून शिक्षणासाठी प्रत्येकी रुपये साडेसोळाची मदत मिळते. तेहतीस रुपये नगदी! ग्रामीण जीवनात केवढा श्रीमान मनुष्य तो. मुहरमनची पत्नी खुश दिसली. "हां, ठीकही किया हाजीर हुवे. एक ना एक दिन पुलीस के गोली से मारे ही तो जाते."

कनेरा गाव तीन 'टोली'मध्ये विभाजित आहे. त्या तीनही विभागात मिळून पाच हत्या झालेल्या होत्या. परस्परशत्रुत्व हे कारण असावे असे वाटले. त्या पाचपैकी सीता दर्जीची पत्नी अत्यंत अल्पवयस्क—विशीची—वाटली. 'शेजाऱ्याने तिला घरात घातल्या'चा प्रवाद ऐकला. तिने माझ्याशी मनमोकळेपणाने बोलू नये म्हणून शेजारणी जावा-जावा तिला चिकटून होत्या. त्या पोरीचे भविष्य कोण सांगणार? आपले घुंघट उचलून आपले मोठाले डोळे तिने क्षणभर माझ्यावर रोखले आणि तिचा गोरटेला उभट चेहरा पुन्हा त्या घुंघटाआड दडला. मी तिला प्रश्न विचारीत होते : इथे तुझे कोण आहे? तू कोणाच्या आधाराने राहतेस? पुढे काय करणार? साऱ्या प्रश्नांची उत्तरे शेजारणींनीच दिली. काय करणार? राहणार, मोलमजुरी करून खाणार. बायका आणखी काय करतात?

आणखी एक घर 'गुजर' लोकांचे होते. घरची जमीन, धाकटा अविवाहित दीर व दहा वर्षांचा मुलगा. त्या संसारात ती रंगलेली दिसली.

संध्याकाळी, आमच्या शेजाऱ्याशी गप्पा मारल्या. ठेंगणा, स्थूल, एका पायाने

लंगडा, सावकारी करणारा, हसतमुख मनुष्य होता तो. माझ्या ध्यानात सर्वांत जास्त त्याचे पागोटे राहिले. चोरीच्या मालाचा व्यापारही तो करीत असे—असा प्रवाद आहे. माझे पाय त्याच्या घराला लागून घर पावन झाले,—असली नागरी भाषा त्याला बोलता येते. रात्री त्यांच्याच बैठकखान्यात मी झोपले. चहाला दूधही त्यांच्याच घरचे होते. बैठक म्हणजे बराच मोठा हॉल होता. भिंतीवर विविध वर्षांची, विविध प्रकारची कॅलेंडर्स होती. त्या कॅलेंडरच्या चित्रात दत्तात्रेयापासून नग्न स्त्रियांपर्यंत सर्व चित्रांचे प्रदर्शन होते. त्या बैठकखान्यात खूप लोक निजतात, म्हणून खूपशा बाजा टाकलेल्या होत्या. उत्तर भारतात जमिनीवर निजणे अशुभ मानले जाते, त्यामुळे गरीब-श्रीमंत सर्वत्र जण बऱ्या-वाईट खाटांवरून निजतात. मला एका कोपऱ्यातला नवारीचा पलंग देण्यात आला व नवीन भरून आलेली गादी देण्याचाही 'हुकूम' झाला. "माझ्याजवळ आहे गादी" ह्या माझ्या बोलण्याला उत्तर आले, "एकदम नवीन आहे आमची गादी. खुशाल वापरा तुम्ही."

माझ्या शेजारी रामचे अंथरुण होते. राम मॅट्रिकच्या वर्गात शिकणारा विद्यार्थी. हा रोज इथून जयगढच्या हायस्कूलमध्ये जातो. सावळा, उंच, गंभीर प्रकृतीचा राम मला आवडला. त्याचे वडील हे आमच्या घरमालकांचे भाऊ. ते दिल्लीला कुठल्याशा ऑफिसात चप्रासी होते व आता पेन्शन घेऊन घरी येऊन राहिले होते. दिल्लीचा हा माणूस अत्यंत अबोल दिसला, पण दिल्ली शहरात राहिलेला म्हणून त्याला खूप मान मात्र दिसला. त्याचा मुलगा शिकलेला म्हणून मोठ्या पगारावर 'इनस्पेटर'—कशाचा ह्याचा बोध मात्र होऊ शकला नाही. एका 'बस'चा पासही ह्या 'इनस्पेटर'च्या प्रयत्नाने मिळालेला आहे. त्यांच्याच बसने आम्ही प्रवास केल्याची माहितीही कोणी तरी दिली. घरमालक एकटेच होते, पण त्यांच्या चप्रासी भावाचा परिवार होता. 'इनस्पेटर' मुलाचे कुटुंब इथेच होते. घरात दूधदुभते, दाणा-गोटा, सर्व काही देवदयेने परिपूर्ण होते. मी मुहरमनकडे जाऊन आल्याचे ऐकून घेऊन घरमालक म्हणाले, "त्याच्या पोरांना महिन्याला ३३ रुपये मिळतात बाई. दहा-पाच खून करावे, पाच-पन्नास दरोडे घालावे, मग करावं 'आत्मसमर्पण'; की महिना ३३ रुपये भेटतात, हे खरं की नाही, बाई? आपल्याला धंदा पसंत." आणि मग आपल्या सवयीप्रमाणे ते गृहस्थ मोकळेपणाने हसले.

रात्री मी लौकर झोपले, तेव्हा बाकी बाजा उभ्या करून मध्ये मोकळ्या जागेत सुंदरलाल आपल्या गोड आवाजात तुलसी-रामायण सांगत होते.

सकाळी लौकर स्नान-नाश्ता करून आम्ही तयार झालो. आज 'खडीत'ला जाण्याचा कार्यक्रम होता. खडीत इथून जवळपास आठ मैल आणि ओहोळांच्या पोटात. इतके जाऊन येऊन मी थकून जाईन असे गुप्तेश्वरजींना वाटत होते. "ताई, घोड्यावर बसाल का?" घोड्यावर अजून तर कधी बसण्याचा प्रसंग आला नव्हता.

परंतु मी थाटात म्हणाले, "घोडे मिळणार कसे ? मिळाले तर बसता येईल. पण मला वाटते, मी इतके अंतर चालूही शकेन."

रात्रीचे हे बोलणे मी केव्हाच विसरले होते. सकाळीं पाहते तो आमच्या लंगड्या घरमालकाचे तट्टू, वरती दुलईचे जीन नवारीच्या पट्टयांनी कसून तयार. ह्या तट्टावर स्वार होणे हाही मोठा प्रसंगच होता. तट्टाच्या चांगुलपणामुळे सारा प्रवास मी सहीसलामत केला. 'तट्टू म्हणेल त्याप्रमाणे, म्हणेल ती गती व घेईल तो रस्ता' असे वागून त्याचे स्वातंत्र्य मान्य करणे अखेर फायद्याचे व शहाणपणाचे ठरले.

'समर्पणकारी' लच्छीचे घर खडीतच्या मार्गावर कनेरापासून चार साडेचार मैलांवर—रस्ता ओलांडून गेल्यावर आहे. लच्छीची आई बाजरीच्या शेतात बसलेली होती. तिच्या अंगात ताप होता, त्यामुळे ती कण्हत होती. मजूर कापणीला लावलेले होते, त्यामुळे बसणे भाग आहे असे म्हणाली. "आपण न बसलं तर कोण काम करतंय ?" जवळच लच्छीची आठनऊ वर्षांची मुलगीहि होती. लच्छीची आई मन-मोकळेपणाने बोलेना. "आमचं कोण आहे ?—पोरगा बाबाच्या नादानं जेलात जाऊन बसला." असे मत तिने व्यक्त केले. "मुहरमनच्या मुलांना दोघांना मदत दिली, माझ्या नातवानं काय पाप केलं ? माझ्या लेकानं नाही 'आत्मसमर्पण' केलं ?"

गुप्तेश्वरजी तिला गोड शब्दात समजावीत होते. "तुमची शेतं गाववाल्यांनी पाडून ठेवली होती, ती पुन्हा नांगरटीखाली आणायला समितीनं मदत केली की नाही ? तुमच्याजवळ पन्नास बिघे जमीन आहे. तुम्हाला काय कमी आहे ? तुम्हाला मदत देण्याची जरूर आहे का आई ?"

'हं'करून त्या बाईनी तोंड वाकडे केले. "होतय् काय त्या वावरात ? गोटे ? तरी मी म्हणत होते, नको जाऊ. चांगला मुंबईला होता, इथं आला तडमडायला."

शेतातून आम्ही पुढे गेलो. लच्छीची पत्नी तर खूप शिव्या घालते असे ऐकले; पण त्या शिव्या खायला मला जाता आले नाही.

इथून लौकरच आम्ही वरची सपाट जमीन सोडून खाली उतरू लागलो. आपल्या जबाबदारीवर खाली उतरण्याजोगी पाऊलवाट तट्टू शोधीत होते. इथे कोणत्याही दोन शेतांची पातळी एक नव्हती नी कुठल्या बांधावरून किती खोलीवर उतरावे लागेल हे सांगता येत नव्हते. सारा आसमंत रुक्ष होता. क्वचित एखादा वृक्ष नजरेला येई तेवढाच. खडीतला पोचेपर्यंत, मला वाटते, आम्ही दोनशेतीनशे फूट तरी उतरून गेलो होतो. खडीत हा शंभरदीडशे घरांचा गाव दिसला. इथे पंचायत-घर बनत होते व एक डिस्पेन्सरीही उघडणार होती. त्या डिस्पेन्सरीसाठी आलेली नर्स इथेच भेटली. ती ग्वाल्हेरला प्रशिक्षित झालेली आहे. ह्या ग्रामीण जीवनातल्या उलट-सुलट फेऱ्यांनी नी पक्षोपपक्षांच्या सुंदोपसुंदीने ती कंटाळलेली दिसली. अजून तिचे राहण्याचे ठिकाण बांधून झालेले नव्हते. वीस-एकवीस वर्षांची ती अविवाहित कन्या

तेथे एकाकी ठेवणे मला उचित वाटले नाही. मिशनरी लोक अशा कार्यात पडतात हे खरे आहे, पण त्यांच्या मागे त्यांच्या प्रचंड संघटनांचे पाठबळ असते. भारतात पोट, आवड वा कर्तव्य यापैकी कुठल्याही भावनेने स्त्री घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडली की साऱ्या समाजाची प्रतिक्रिया तिला 'क्षुल्लक' समजून वागवण्याची असते. ही पोरगीही त्याला अपवाद नव्हती. पण अजून तिचा ध्येयवाद जिवंत होता, आणि तो मोठा हृद्य होता हे खरे.

खडीतला केदारकडे घोडा सोडून मी आत गेले. सरकारच्या बाजूने साक्ष न द्यावी म्हणून केदारने गाववाल्यांचा मार खाल्ला आणि साक्ष द्यावी म्हणून पोलिसांच्या धमक्या सोसल्या. अखेर त्याची मुक्तता समितीच्या कार्यकर्त्यांनी केली. त्याचे घर अगदी चिमुकले, एक खोली, पुढे छोटे अंगण व अंगणाच्या पलीकडे छोटीशी पडवी येवढे होते. ह्या घरात केदार, त्याची पत्नी, आई व एक मूल असा संसार आहे. आत जाताच आई म्हणाली, "आता इथेच जेवायचं हं."

त्या घराच्या खचलेल्या भिंती आणि इतर दारिद्र्य पाहून माझे मन कच खात होते. पण माझ्या सोबत्यांनी 'बरंय, गाव फिरून येतो; मग जेवू' असे सांगितल्यावर आम्ही बाहेर पडलो. इथे आम्ही एका घरी गेलो. तिथल्या बाईचा धाकटा मुलगा गोळीला बळी पडला होता.

"काही कारण नव्हतं बाई. कोणाचं भांडण नाही—तंटा नाही. पहिल्या रात्रीची गोष्ट. अंधार झाला होता. पोराची वाट पाहत होते; तो वरच्या बाजूनी हाक आली, 'मी लच्छी. तुमच्या पोराला मीच गोळी घातलीय. दुसऱ्या कोणाचं नाव नका घेऊं.'' ह्या गोष्टीला आता दहा वर्षे झाली आहेत. त्याची आई आता सर्व प्रसंग विसरली आहे. "काय राहतंय बाई आपलं? एक दिवस तर अन्नावाचून निघत नाही. देवाची मर्जी, नेलं त्यानं." त्या बाईच्या तोंडून एक शब्दही कडू निघाला नाही—नवलच सारे.

'समर्पणकारी' प्रभूचे घर इथेच आहे. त्याची पत्नी असेल तिशीच्या आसपास; लहान-लहान चार मुले आहेत. साऱ्याच मुली. ती नवऱ्याला खूप शिव्या देत होती. "मरू दे जेलमध्येच. येवढा पोरवडा करून गेला. पोटात काय भरू काटे?" शेजारपाजारच्या पोरी आणि पोरेही भोवती गोळा झाली होती. ह्या वेळेला शेतात व शेतकऱ्यांच्या घरात खायची चंगळ होती, पण इथली पोरे कशी निस्तेज वाटली. संतुलित आहाराची उणीव त्यांना पडत असावी असे वाटले. पिचपिचे डोळे, फुगलेली पोटे, हातापायांच्या काड्या, फुटून चिंध्या झालेले पाय. सर्वांची कहाणी तीच होती.

आम्ही आणखी एकदोन घरी गेलो होतो. बायका बोलल्या नाहीत. मागून मला समजले की बाबांनी केलेले 'सव्यापसव्य' ह्या कुटुंबांना मंजूर नव्हते. गावाची शांती त्यांना नुकसानीत आणीत होती. त्यांच्या सावकारी करण्याच्या धंद्यात 'शक्ती'चा उपयोग त्यांना करता येत नव्हता. खडीतला मिडल स्कूलची इमारत पाहिली. मुलांची

संख्या मोठी. त्या मानाने व्यवस्था अभावाचीच. मास्तरांची राहण्याची सोय नव्हतीच.

केदारकडे परतलो तो दोनचा सुमार होता. बाजरी दळून झाली होती. बाई पीठ परातीत घेत होत्या. सून मदतीला होती. घरात पोर चिरचिरत होते. मी त्याला उचलून घेऊन आले. नागऱ्याच्या पोराचीच आवृत्ती. साऱ्या अंगावर सुरकुत्या पडलेल्या, डोळे बटबटीत, पोटाचा नगारा, डोक्याचे केस विरळलेले, छातीच्या बरगड्या मोजण्यासाठी बाहेर काढलेल्या, रडण्याचीसुद्धा ताकद संपलेली. आईचा स्तन चोखणे अवघड झालेले. औषध काय ? गळ्यात बांधलेली केसाळी आणि देवाचे नाव...

रात्री मी लवकरच झोपले, परंतु नजरेसमोर वारंवार तेच पोर येत होते. समृद्धीतले दारिद्र्य कसे असेल ह्याचे जणू चित्रच ! खेड्यात पैसा नव्हता खरा तरी ह्या सुगीच्या वेळी अन्न व दुभते ह्यांना तोटा नव्हता, परंतु अज्ञानाला उत्तर मात्र अजून तरी सापडायचे होते.

खडीतहून परतल्यावर श्री० भागवतसिंगजीचा परिचय झाला. टेंगणी परंतु दुहेरी हाडाची त्यांची मूर्ती, थंडीपासून वचाव करण्यासाठी डोक्यावरून लपेटून घेतलेली चादर, चटकन हसण्याची लकब, नी डोळ्यात चमकणारी पण हाती न येणारी सखोलता माझे लक्ष पटकन वेधून गेली. भागवतजींना पाहून प्रथम स्थानिक शेतकऱ्याचे दर्शन झाल्यासारखे वाटले. माझे बाकीचे परिचित सेवक (समितीचे कार्यकर्ते) स्थानिक भाषा बोलत, पण उपरेपणी. भागवतजी चंबळ खोऱ्याचे भदोरिया रजपुत—त्यांच्यापैकीच एक. इथून चंबळच्या सामाजिक जीवनाचे अपुरे का होईना दर्शन घडावयास सुरुवात झाली. इथेच प्रथम ‘पालागन’ हा शब्द मी ऐकला. ब्राह्मण्याची थोरवी आणि इतर जातींवर असणारा त्यांचा पगडा शरच्चंद्र चटोपाध्यायांच्या कादंबऱ्यांतून पदोपदी प्रत्ययाला येतो. एकच कमला नाव, ब्राह्मणात कमलादेवी, क्षत्रियकायस्थात कमलारानी आणि इतर जातीत कमलादासी होते, हे मी शिकले होते. चंबळ-खोऱ्यात प्रत्येक ब्राह्मणाला ‘पालागनजी’ असा प्रणाम केला जातो. विदर्भात पन्नास वर्षांपूर्वी खेड्यातून ‘पाया लागू जी’ असा प्रणाम-प्रचारात होता त्याची मला आठवण झाली. साधारणतः उच्चवर्णियांना रस्ता मोकळा देण्याची प्रवृत्तीही दिसली.

चंबळमध्ये इवलाल्या अंतरावरची ठिकाणे किती दूर आहेत नी पंचवीस मैलांचे महुआ–केनेरा अंतर लंडन–दिल्लीपेक्षा दूर कसे पडते ह्याचा अनुभव मला आज यायचा होता. सकाळीच सर्व आन्हिके उरकून आम्ही पुनश्च आपल्या मैत्रिण–सडकेवर आलो, पण प्रथम शिरलो होतो त्याहून थोडे जास्त उत्तरेकडे. येथे कोणी तरी एक पक्की विहीर बांधलेली होती. तिच्या कट्ट्यावर आम्ही ऊन खात बसलो.

आम्ही बसलो होतो, तेथून जवळच आमचे घरमालक आपले तट्टू चारीत बसलेले होते. बऱ्यावाईट गप्पा चालू होत्या. दुर्गादासजींनी मला इथे आपली मनोव्यथा सांगितली. त्यांचे घर उत्तरप्रदेशात मेरठ येथे. घरी पत्नी, मुले व, मला वाटते,

वृद्ध आई होती. हा संसार त्यांच्या अर्थार्जनाविना कसा सावरायचा हा त्यांचा यक्षप्रश्न होता. त्यांची पत्नी अशिक्षित होती. सुईण, दाई, यासारखे काम करणे तिला पटलेच असते अशी त्यांना खात्री नव्हती आणि तिने मान्य केले तरी त्यांचा मागासलेला समाज तिला सुखासमाधानाने समाजाच्या मते गलिच्छ काम करू देईल अशी शाश्वती नव्हती. त्यांच्या समस्येला माझ्याजवळसुद्धा काही उत्तर नव्हते खरे तर!

गुप्तेश्वरजी काय काम झाले हे सांगत होते. समितीने इथे कार्य सुरू केले तेव्हा लोकात सर्वदूर विलक्षण भय होते. डाकूची शक्ती असेतो तो राजा असे. तो अत्याचार करी. त्याची सद्दी संपली की गाववाले राजे होत. मग डाकूचे घर वाळीत पडे. त्याची जमीन नांगरणारा मार खाई व केव्हाकेव्हा तर प्राणाला मुके. समितीच्या सेवकांनी जागोजाग जाऊन समाजातील पुढाऱ्यांची मने वळवून जमीन पुनश्च नांगराखाली आणलेली होती. लच्छीची जमीन त्यापैकीच होती.

उन्हे वर चढत होती. आम्ही सकाळी आठला विहिरीवर दाखल झालो होतो. साडेनऊ-दहापर्यंत गप्पांमध्ये बसचा विलंब समजूनही आला नाही. त्यानंतर मात्र ही प्रतीक्षा कंटाळवाणी होऊ लागली. भागवतजी म्हणाले, "ओहोळामधून महुआ सारं नऊ मैल पडेल." त्यांनी वायव्येच्या कोपऱ्यात हात दाखवला नी म्हणाले, "इथून दिसतंसुद्धा आपलं ठिकाण. ओहोळातून जायला ताईंना त्रास होईल, नाही तर गेलो असतो पायीच."

ओहोळातून नऊ मैल जाण्याची भीती मला वाटत नव्हती. परंतु माझा होल्डॉल नी बॅग हे सामान घेऊन 'भाईजी' लोकांना नऊ मैल जाणे सुलभ नव्हते. त्या लोकांजवळ मुंबईकराप्रमाणे सामान थोडे—एक, नाहीतर दोन पिशव्या. एक धोतर, एक सदरा नी एक चादर असा सरंजाम. जेथे जावे तेथे काही तरी सोय करून घेतली जाई. माझी अडचण मी सांगितली. भागवतजी म्हणाल, "सामान आम्ही नेऊ, त्यात विशेष अडचण नाही. परंतु आता फार उशीर झाला. पायी जायचे तर पहाटेच पाऊलवाट धरायला हवी होती."

क्रमशः लोक सुस्तावले, भाषा संपली, आमचे घरवाले निरोप घेऊन आपल्या तट्टावरून निघून गेले. दर पंधरा मिनिटांनी कोणी तरी रस्त्यावर जाऊन दूरवर न्याहाळून पाही, धुरळा उडतोय का? कोणी तरी कानोसा घेई, कुठे घर्र-घर्र येतेय का? पण सर्व शांत होते. आजूबाजूला उभी असलेली बाजरीची शेते मध्येच वाऱ्याच्या झुळुकीने सळसळत. क्वचित कुठे तरी जाणारे येणारे खेडुत दिसत.

अकरा झाले, साडेअकरा, पावणेबारा—माझ्या घड्याळाचे एकच ध्यास घेतलेले काटे पुढे सरकत होते. निरुद्योगी काळ उगीचच झरत होता. घड्याळाच्या काट्याप्रमाणे काम आखून चालणारे माझे मन विनाकारण संत्रस्त होत होते.

पावणेबाराला मात्र गुप्तेश्वरजी म्हणाले, "बस केव्हा येणार कोण जाणे! जाऊन स्नान तरी करावे."

दा. क्र. ९८३९७



मग एक शंका निघाली. एकच तर बस; ती मोडून पडली असती तर? मग स्नानादी कार्यक्रमाला जोर आला. सगळे परत निघाले. माझे मन परतायला तयार नव्हते. आज चार तासांची प्रतीक्षा झाली होती. उद्या हाच प्रसंग उद्भवण्याजोगा होता. शिवाय माझा एक दिवस फुकट (पुन्हा शहरी मनोरचना) जाणार होता. आज दुपारी एक-दीडपर्यंत महुआला पोचून तिथले काम संपवण्याची माझी आशा आता संपलीच होती हे खरे, पण जिद्द मात्र कायम होती. त्या जिद्दीमुळेच जणू हार मानून सव्वाबाराला बस आली. सडकेकडे पाठ फिरवून चालू लागलेल्या मंडळींना भागवतजींनी जोरात हाकारे केले. त्यानंतर पुढचे सतरा मैल पार करायला सारा तासभर लागला.

आम्ही अटेरला पोचलो तो दीड वाजला होता. हे गावही ओहोळांच्या पोटात वसलेले आहे. सगळीकडे उलटसुलट वाहिलेल्या प्रवाहांनी केलेले सखल-खोल, अरुंद-पसरट, अनंत प्रकारांचे ओहोळ आणि ओहोळांच्या सीमा ठरवणारे हजारो आकारांचे मातीचे ढिगारे दिसत होते. मला वाटते, विमानात बसून उंचीवरून हा भूप्रदेश पाहिल्यास पावसाने डबक्यात जमलेली मऊ माती उन्हाळ्यात वाळताना तिला जशा खपल्या-खवले पडलेले दिसतात तसाच हा प्रदेश दिसेल. तशाच असंख्य खपल्या-खवले, विमान खाली येताच विक्राळ स्वरूप धरून राक्षसांच्या राज्यातील डबक्याच्या सुकलेल्या तळाप्रमाणे दिसतील. त्या खपल्या-खवल्यांच्या सीमा दाखवणाऱ्या भेगांचा तळ बहुधा सपाट, समतल असतो. इथल्या भेगांचा तळ पाण्याने खोदल्यामुळे नेहमी उतार देणारा आढळतो एवढाच फरक.

अटेर हे तालुक्याचे गाव असल्यामुळे बरेच मोठे आहे. एके काळी ते राजधानीचे शहर होते. राजाच्या किल्ल्याची भिंत—तिची पडझड सुरू झालेली आहे—अजूनही सुस्थितीत आहे. समितीबद्दल सहानुभूती असणाऱ्या तेथील एका गृहस्थाकडे सामान ठेवून स्नान करावे, बाजारात पुरीभाजी खाऊन पुढे जावे, ह्या विचाराने त्यांच्याकडे गेलो. त्यांच्याकडे मुलाच्या 'मुंडना'चा (जावळ काढणे) समारंभ होता. तेव्हा जेवणासाठी स्नान करून येतो असे सांगून आम्ही बाहेर पडलो.

थोड्या अंतरावर असलेल्या जैन मंदिरातल्या विहिरीवर थंडगार पाण्याने स्नान करून कपडे पिळले. नंतर देवळाच्या पायऱ्या चढून मागच्या बाजूला गेलो. देऊळ पक्क्या बांधणीचे आहे. आत मात्र मी गेले नाही. मागच्या बाजूला एका मोठ्या टेकडीवर नवीन हायस्कूलची इमारत मला भागवतजींनी दाखविली. "इमारतीसाठी पाया खोदताना जुनी इमारतच सापडली. इथे पूर्वी तोफखाना होता म्हणतात." भोवतालच्या टेकड्यांबद्दलही अनेक आख्यायिका असल्याचे ते म्हणाले.

आम्ही परतलो. कपडे वाळत घातले. आता जेवण. मग कोणीसे म्हणाले, "इतक्यात काय घाई ! आता तर कणीक भिजली आहे. अंधाराच्या आत जेवणे

... संग्रहालय, ठाणे. स्थल...

होतात का?" माझा शहरी जीव वेळाच्या सत्यानाशाने पुन्हा उबला. स्नानाहून येताना पोरासाठी मी कपडा घेतला होता. ते पुडके हाती घेऊन मी बायकांच्या भागात पोचले. एक पांढरी चादर पसरुन तिच्याभोवती पुऱ्यांचा कारखाना चालू होता. चारपाच स्त्रिया कणीक तिंबीत होत्या, दोघीजणी लाट्या तोडीत होत्या व पाचसहा पोळपाटलाटणी घेऊन त्यांच्या पुऱ्या लाटीत होत्या. ह्या पुऱ्या त्या चादरीवर फेकल्या जात होत्या. त्या स्त्रियांशी बोलताना जेवणाला पुष्कळ अवधी असल्याचे मला आढळून आले. आता अडीच वाजले होते. मग मी आमच्या यजमानांशी बोलले, "आम्हाला साडेतीनपर्यंत जायला हवंय. जेवण आज राहू द्या. हातावर थोडी साखर घाला. पोराला आशीर्वाद दिलेच आहेत आम्ही." इत्यादी.

"आजची रात्र राहून उद्या जा तुम्ही. अशा उपाशी पोटी आमच्या घरातून आम्ही आज कसं बाहेर पडूं द्यावं तुम्हाला?"

बरीच चर्चा झाल्यावर चारला पुढे जाण्याचा निर्धार मी मालकांना सांगितला. ते बिचारे मोठे घोटाळ्यात पडले. ह्या बाईला कुठल्या कोर्टाची तारीख असेल असे त्यांना वाटले असावे. भागवतजीही अत्यंत संकोचले होते. "खेड्यात खेड्यासारखे वागायला पाहिजे" हे त्यांचे तत्त्व मला मान्य होते; तपशील अमान्य होता. अखेर ते गप्प बसले आणि आम्ही नदीच्या रस्त्याला लागलो ते बरोबर चार वाजता सुग्रास जेवून. यजमानांनी आम्हाला दिलेली चार रुपयांची दक्षिणा स्वीकारतांना भागवतजी जास्तच संकोचले. लखनवी 'हो–नको'मध्ये जाणारा वेळ वाचवण्यासाठी मी सुचवले, "पैसे ठेवून घ्या नी समितीची रिसीट पाठवा म्हणजे झाले."

आता आम्ही घाटाच्या दिशेने निघालो. आम्हाला अडीचतीन मैल अंतर जायचे होते. घरातून निघाल्यापासून एक पाऊलदेखील सपाट जमीन लागत नव्हती. सारेच लहान मोठे चढ-उतार. काही एक मजला चढल्यासारखे आठदहा फुटी तर काही चार-सहा मजल्यांचे. आणि चारी बाजूला, पायाखाली सर्वत्र बारीक माती; वाळू-दगडाचे नाव नाही. ह्या चढउतारातही उतार अधिक असल्याने नदीच्या पात्राकडे वाटचाल असल्याचे सहज ध्यानी येण्याजोगे होते.

हा सारा भूभाग आक्रमताना एका गोष्टीची मला खूप आठवण येत होती. हजारो घनफूट मातीची धूप होण्याबद्दल 'चंबल के बेहडों मे'मध्ये श्रीकृष्णदत्त भट्ट लिहितात,

"इस टेढी मेढी चंचल चंबल की धार बडी पैनी है, तीखी है. जिसके फलस्वरूप इसके किनारे बडा विकट कटाव हो गया है...यहां हर सेकण्ड मे २२ क्युबिक फूट जमीन बहती गई है."[१]

---

१. पृष्ठ ४

'अभिशप्त चंबळ'चे लेखक तरुणकुमार भादुडीही चंबळच्या भग्नतेचे गान, बेहड कापण्याचा स्वभाव ह्याबद्दल आपल्या पुस्तकात लिहितात. माझी नजर चंबळच्या तिखट धारेच्या खुणा चौफेर न्याहाळीत होती.

मला आठवण येत होती, एकदा नर्मदा तीरी सारे मार्बल रॉक्स मागे टाकून आम्ही 'धुवांधार'वर गेलो होतो त्याची! धबधब्यावर पोचण्यापूर्वी एक सुकलेले प्रचंड पात्र ओलांडावे लागले होते. माझ्या मित्रांनी मला सांगितले, "हाच पूर्वीचा नर्मदाप्रवाह. मागे मोठा पूर आला त्या वेळी हा भाग जलमय झाला होता, त्यानंतर नर्मदेच्या प्रवाहाने आपल्यासाठी नवा मार्ग दुसऱ्या बाजूने काढला आहे."

गेली अडीच तपे गंगेच्या खोऱ्यात गेल्यामुळे तेथील नद्यांचे पूर, बदलते प्रवाह आणि त्यांनी होणारी माणसाची हानी ही माझ्या परिचयाची आहेत. बिहारच्या 'अश्रुसरिता' कोसीबद्दल मी वाचलेले आठवू लागले. "ही नदी क्रमशः पूर्वेकडून पश्चिमेकडे आपल्या कुशीवर सरकत राहते. प्रथम पश्चिम किनाऱ्यावरील भूगर्भाखालच्या पाण्याची पातळी वाढत जाते. पातळीबरोबर त्या जमिनीचा कस नी तिची पिके वाढतात. हा क्रम चारसहा वर्षे चालून मग हिमालयाच्या थंडगार पाण्याचा पूर ह्या शेतातून भरतो. क्रमशः नदीच्या पूर्वेचा काठ कोरडा होतो, पण तो पिकांना निरुपयोगी, रेताड झालेला असतो."

गंगा हिमालयातून लाखो क्यूसेक माती वाहून आणते हे भूगोलाच्या विद्यार्थ्यांना चांगले पाठ झालेले आहे. चंबळ ही कुठल्या प्रकारची नदी आहे? गंगा, की नर्मदा, की कोसी? हा विचार पूर्ण होण्यापूर्वीच आम्ही चंबळवर येऊन पोचलो.

थंडीचे दिवस, उन्हे उतरली होती. घड्याळ म्हणत होते साडेचार. आम्ही चंबळच्या दक्षिण तिराला पोचलो होतो. शांत, रुंद पात्र. दक्षिणेला सुंदर वाळवंट. नदी उत्तर तीर कापून वाहत होती. त्यामुळे तिकडे मात्र चांगलाच चढ होता. नदीवर दूर, प्रवाहाविरुद्ध शीड उभारून जाणारी एक छोटीशी नौका हे सुंदर चित्र पूर्ण करीत होती. क्षणभर बुडत्या सूर्याकडे, त्याच्या लाल किरणांनी रक्तरंजित दिसणाऱ्या शांत पात्राकडे आणि त्या नौकेकडे पाहत मी उभी राहिले नी मग एकदम समोर नजर जाऊन म्हणाले, "हमारी नाव तो निकल गई भागवतजी."

आम्ही अजूनही उंचीवर होतो. द्रुतगतीने आम्ही खाली उतरून आलो तोवर नाव दूर गेली होती. पाण्यात आणि मऊ रेतीत खेळून लहान मूल होण्यापलीकडे गत्यंतर उरले नव्हते आणि मी लौकरच त्यात रंगूनही गेले. समोरून पुन्हा नवी नाव काठाला येऊन लागली. रंगी-बेरंगी कपडे घातलेले लोक खाली उतरले—मग बैल-जोड्या, मग उंट. "ह्या भागातली सुप्रसिद्ध जत्रा बटेश्वरला कार्तिक पौर्णिमेला असते. त्या जत्रेत केलेली ही खरेदी." भागवतजींनी मला माहिती पुरवली. ही नाव रिकामी झाली की आम्हाला ती 'नदीपल्याड' नेणार होती. मी लगलीच त्या नावेकडे

निघाले. पण—पण त्या नावेतून एक उंटाचे पिलू—असेल दोन-अडीच वर्षांचे म्हणे—निघायला साफ तयार होईना. नाव किनाऱ्याला लागली, तरी ती एक-दीड फूट पाण्यात होतीच की. बिचारा उंट. मरुस्थलीचा जीव तो! त्याला पाण्याचे दर्शन एवढ्या प्रमाणावर व्यायची वेळ कशाला येते आहे? त्यामुळे तो पाण्याला भलतासा घाबरतो. त्यातून हे छोटे पोर. मालकही त्याला अपरिचित! ते नावेतच हट्टून बसले होते. त्याला ढुंगणावर मारले की मागचे पाय उभे करी—नी मग पुढच्या पुट्ट्यावर रट्टे दिले की पुढचे पाय ताठ करून मागचे मुडपून घेई. वेसण ओढली की नुसतेच ओरडू लागे. त्याच्या करुण किंकाळ्यांनी सारा आसमंत भरून गेला. त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला. पण ते काही केल्या हलेना. अखेर त्याने मागचे पाय ताठ करताच त्याच्या पोटाखाली जाड बांबू देण्यात आला. तोच प्रयोग पुढच्या पायासाठीही केल्यावर पुन्हा लोकांचा ओरडा, पिलाचे केकाटणे, मागून रट्टे, पुढून वेसणीला जोर—अशा क्लृप्त्यांनी ते पोर वाळवंटात उतरले तो वाजले होते पाच. इतके शिणवल्यावर आता त्या पोराला सपाटून मार मिळणार असे मला भय वाटत होते. सुदैवाने माझे भय खोटे ठरले. त्याला शांतपणे थोडा वेळ उभे राहू देण्यात आले आणि आमची नाव निघाली तेव्हा त्याचा मालक त्याला खाऊ घालीत होता.

उत्तरेकडची दरड चढून आम्ही झपाझप पुढे निघालो. आता आम्ही उत्तर प्रदेशात आलो होतो. वर चढल्यावर पुन्हा सूर्याचे दर्शन झाले. पुन्हा तोच उतारचढ. मातीवर उगवलेली होती बोरी-बाभळींची आणि टेटींची झुडपे. सगळीच काटेरी नी रुक्ष. टेटींची फळे आगऱ्याच्या बाजूला लोणच्यात घालतात. त्याचा मोसम एप्रिलमध्ये असतो, असे भागवतजी म्हणाले. पण चालता-चालता एका झुडपावर हिरवी-शेंदरी करवंदाच्या जातीची फळे दिसताच मी पटकन वर चढून ती हस्तगत केलीही. ह्या दिवसात मला फळे मिळालेली पाहून भागवतजींना विस्मय वाटला. अर्थात् ती करवंदाप्रमाणे आंबट नसून, कडू असतात, हे कळल्यावर मला त्यांचा उपयोग नव्हता.

बरीचशी चढ-उतर केल्यावर आम्ही पुन्हा एका मोठ्या ओढ्याच्या पात्रात उतरलो. आता सूर्य मावळून चंद्र वर आला होता. पात्रातली वाळू थंडगार झाली होती. पात्राच्या दोन्ही बाजूंना पंचवीस फूट किंवा त्याहूनही उंच भिंती लागल्या होत्या. त्या भिंतीवरून उगवलेली झाडे चंद्रप्रकाशात विचित्र दिसत होती. भिंतीची पात्रात पडलेली छाया 'रोमँटिक' असली तरी दरवडेखोरांना तिचा केवढा उपयोग असेल ह्या कल्पनेने अंग शहारलेच. ही कुयरी नदी आहे—मला वाटते चरणजी म्हणाले असावेत. पण खात्रीने कोणीच सांगू शकले नाही. ह्या ओहोळाला इतर ओढे दोन्ही बाजूंनी मिळत होते. सर्वत्र खोल दऱ्या खोदून वाहणारे ओढे—कुठल्याही दरीत शिरले की निसर्गात मिसळून अदृश्य होता आले असते.

बराच वेळ जाता-जाता अखेर महुआ गाव आले. इथे पात्र सोडून आम्ही वर चढलो. ही बाजू उत्तर प्रदेशात मोडते. वर चढताच विहीर, एक शेड आणि विस्तृत अंगण लागले. ह्या अंगणाच्या उत्तरेला आणि पूर्वेला बांधलेला भाग दिसत होता. वर चढताच ललकारी कानी आली, "कोण आहे? कुठून आला आहात? कशासाठी?"

भागवतजींनी समोर होऊन ओळख दिली. आमचे सामान उतरून घेण्यात आले. आम्ही शेडमध्येच थोडा वेळ बसलो. मग हातपाय धुण्यासाठी पाणी आले. जेवण उशीरा—गोडाचे झालेले, तेव्हा दूध पिण्याचे ठरले.

आमचे सामान पूर्वेच्या बैठकीच्या खोलीत गेले. मी बाहेरच उभी होते. पुन्हा आमच्याच रस्त्याने आणखी मंडळी आली. पुन्हा तेच आव्हान, तेच प्रश्न. त्या ललकारीचे समाधान करून ती माणसे पुढे चालू लागली. ललकारणाराने 'रपोट' दिला, "सहा माणसे, वरच्या गावात—" इत्यादी.

निजताना भागवतजी म्हणाले, "येथे सहा माणसे मारली गेली. दोन मुलांना येथे समितीची मदत मिळते. आज मास्तरांच्या लतेला निरोप पाठवला आहे. उद्या जाऊ आपण तिकडे. लतेच्या भावालाही मदत मिळते." कनेरा-महुआ पंचवीस मैलांचे अंतर कापायला आम्ही फक्त दहा तासांचा अवधी घेतला होता. त्यातील सतरा मैल बसने, दोनअडीच फर्लांग बोटीने व बाकी पायी तोडले होते.

रात्री महुआ चांदण्यांत रंगून सुंदर दिसत होता—सुंदर पण भयानक. ज्या गोष्टींनी ह्या चांदण्याची शोभा वाढते त्या गोष्टी, झाडांच्या छाया इथे भीतिदायक वाटत होत्या.

सकाळच्या स्वच्छ प्रकाशात सारे भय पळून गेले. चंबळ ओहोळातून पडणारे डाके हे खरे डाके असतात. त्यांना रात्रीच्या अंधाराच्या कवचाची गरज नसते. असे उलट-सुलट विचार करीत, हातातला लोटा घट्ट पकडीत—कारण थंडीने बोटे अजूनही काकडत होती—मी पुढे पुढे चालले होते आडोशाच्या शोधार्थ.

मी परतले तेव्हा दुरून गाव बघताना माझ्या ध्यानी आले की नागराप्रमाणेच महुआच्या शरीरातही ह्या बेहड राक्षसाची बोटे घुसलेली आहेत आणि महुआ त्याच्या बेचकातून वर आलेल्या दोन-चार मातीच्या ढिगाऱ्यांतून बेहडांच्या अंतरंगापर्यंत पसरले आहे. अधिक विचार न करता मी एका वस्तीत चढून गेले आणि मग ध्यानी आले की ही बेचकेतून वर आलेली वस्ती आपली नव्हे. तरीही परत फिरून आपल्या निवासाला नेणारी पाऊलवाट शोधण्याची जरूर मला वाटली नाही. "एवढंसं तर गाव, इकडून सापडेल वाट." हा मनाचा भाव.

मी वर चढले ती वस्ती चांभारांची होती. त्यांच्या वस्तीतली घर ह्या शब्दाला लाज आणणारी घरे, कपड्यांची जागोजाग वाळणारी लक्तरे, शेणाची घाण,

प्रातर्विधीने निर्माण केलेला किळसवाणेपणा, ह्यामधून मी पार पडत होते व भोवताल्च्या लोकांना 'का कसं काय?' अशी सहज साद घालीत होते. माझ्या प्रत्ययाला आले की इथे माझ्याशी बोलायला कोणी तयार नव्हते. माझ्या कुठल्याच प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही. वाट कोणाच्या अंगणातून जाताना दिसली की मी म्हणे, "हम आपके आंगनसे गुजर जाय?" खेड्यातून जाताना कितीकदा ह्या प्रश्नाने खेडुतांची ओळख नी मग गप्पा मी जमवीत आले आहे. पण महुआचे चांभार जणू मुके होते. मी पुढे जाई—लोक गप्प बसत. जरा पुढे गेल्यावर चांभारवाडी संपली. पाऊलवाट उतरचढाची होती नी दोनचार चकरा तिच्या मार्गदर्शनाखाली मारल्यावर मला दिशाही उमगेनाशा झाल्या. परिचित राहिली केवळ पूर्व, कारण सूर्य वर येत होता.

मला वाटते, मी पंधरावीस मिनिटे तरी फिरत होते. आता शेतकरी वर्गाच्या भागातून पाऊलवाट जाऊ लागली होती, आणि उतार मोठ्या प्रमाणात खडा होता. जागोजाग शेतकरी धार काढण्यात, जनावरांचे दाणापाणी करण्यात गुंग होता. अखेर हार मानून मी एका घरात शिरले. "मला माझ्या ठिकाणाचा रस्ता दाखवाल का?" "कुठे उतरला आहात तुम्ही?" आली पंचाईत! मला कुठे आमच्या यजमानांचे नाव ठाऊक होते? मग केव्हा व कशी महुआला आले, येताना घर कुठे लागले, घर कसे आहे, माझ्याबरोबर कोण आले इत्यादी सारे वर्णन मी माझ्या हिंदीत केले—त्यांनी त्यांच्या हिंदीत ते समजावून घेतले. मग एका नागड्या, नाक वाहणाऱ्या पोराला बोलावून मला पोचवायला सांगितले, आणि दोन वळसे घेऊन शंभर पावलातच घराच्या मागच्या बाजूने येणाऱ्या पाऊलवाटेने मी बैठकीसमोरच्या अंगणात दाखल झाले. माझे सहकारी अंगणांत लोटे घेऊन खोळंबून बसले होते—माझा एकांत भंग होऊ नये म्हणून.

त्या अंगणातील शेडपलीकडे सिमेंटने तोंडी बांधलेली पक्की विहीर व विहिरीवर चाक बसवलेले होते. मी बाईमाणूस, मला ह्या भररस्त्यातल्या विहिरीवर स्नान करणे अवघड, म्हणून भागवतजी म्हणाले, "तुम्हाला घरात पाणी द्यायला सांगतो. स्नान करा तोवर लता येईलच." कपडे, साबण घेऊन मी मुख्य दरवाजाने राहत्या घरात गेले. खूप मोकळे अंगण (५०×४० फूट असावे) आणि त्याच्या चारी बाजूंना खोल्या व क्वचित पडव्या अशी व्यवस्था होती. त्यापैकी एक बाजू शेतीचे व धान्याचे कोठार म्हणून वेगळी ठेवून बाकी तीन बाजूंच्या खोल्यात तीन भावांची कुटुंबे राहत होती. मी आत जाताच मोठ्या भावाची पत्नी व सुना आल्या. एका पडवीच्या एका कोपऱ्याला दगड घालून न्हाणी बनवलेली होती. कपडे ठेवायला एका बाजूला बांधलेली दोरी सुनेने मोठ्या अभिमानाने दाखवली. एक बादली नी एक पोहरा पाणी ठेवलेले होते. विहिरीचे ताजे पाणी. मी कपडे ठेवून स्नानाची तयारी करू

लागले, तो शहरच्या बाईंचे स्नान पाहण्यासाठी घरातल्या स्त्रियांचे व मुलांचे कडे भोवती पडले. त्यांच्या कुतूहलपूर्ण नजरेपेक्षा बाहेरची विहीरच बरी पडली असती, असे मला वाटले. मग मनाचा हिय्या करीत मी त्यांना म्हणाले, "तुम्ही सर्व येथून जा. माझे स्नान झाल्यावर आपण गप्पा मारू."

स्नान करून आल्यावर अंगणात सावली करून उभा असलेला प्रचंड कडुनिंब मला अगदी कडू वाटला—कारण मला हुडहुडी भरली होती. मी तिथे थोडा वेळ उभी होते, पण तितक्याच वेळात घरातल्या सुनेने मला कुटुंबाची माहिती दिली. त्या तीन भावांपैकी एक डाकूंच्या गोळीला बळी पडला होता. त्याचे घर समोरच्या बाजूला होते. त्याच्या मुलाला समितीची मदत मिळते. आम्हाला जेवायला घालण्याची जबाबदारी त्या कुटुंबाची होती.

त्यानंतर त्या वधूने आपण लौकरच दिल्लीला जाणार असल्याचे सांगितले. तिचा नवरा लष्करात होता. तिच्याजवळ हातमशीन होते. ती कपडे घरीच शिवी. ती काही दिवस नवऱ्याजवळ लडकीला होती व प्रसूतीसाठी घरी आली होती. बाहेरच्या जगाची स्वतंत्र हवा चाखल्यावर इथली बंधने तिला त्रासदायक वाटत होती...इत्यादी.

मी कपाळी कुंकू टेकून, केसांना फणी लावीत होते—माझ्या वेड्या शहरी सवयी. इतक्यात लता आली. सडपातळ, सावळी, नेटकी, चुणचुणीत, हसतमुख पंधरा-सोळा वर्षांची लता. तिच्या नेसू नाजुक प्रिंटचे पातळ शहरी पद्धतीने नेसलेले होते. पेटीकोट ग्रामीण भागात मी प्रथम पाहिला. तिच्या हाताला मेंदी दिसली नी केस विंचरून व आवरून शहरवासियाप्रमाणे शेपटा सोडलेला होता. तिच्या अंगात लोकरीचा स्वेटर होता नी हातातही विणकाम.

तिचे लग्न यंदाच झाले होते. घर सुखवस्तू मिळाले होते. खर्चही हजारबाराशे रुपये आला होता. ती लवकरच सासरी जावयाची होती. तिचे वडील प्राथमिक शाळेचे मास्तर होते. त्यांच्याजवळ काही जमीन होती. महुआला झालेल्या सहा हत्यांपैकी एक तिच्या वडिलांची होती व तिच्या भावाला समितीची मदत मिळत होती. "हमारे पिताजी तो गलतफहमी (गैरसमजूत) से मारे गये. उनकी डाकुओंसे दुष्मनी थोडे ही थी. वो तो उनके दोस्त थे." लता मला सांगू लागली.

"ऐसे हुवा कि, डाकुओं के दुष्मन घर नही थे. वो तो सारे बच गये. उनके द्वारे उस दिन भैस बिमार थी. पिताजी कुछ जानकारी रखते थे. उनको बुलावा आया तो वे चले गये. घरवाले बाजार चले गये थे. और भैस को दवाई पिलाना जरुरी था. तो पिताजीने और आदमी बुलवाये. डाकू आये उन्हे क्या मालूम कोन है ? उन्होनें गोली चलाई, उसमें पिताजी का देहान्त हुवा."

आम्ही लतेकडे गेलो. ती सर्वांत वडील. तिला शिकविण्याची वडिलांची तीव्र मनीषा होती. तिलाही शिक्षणाची आवड. त्यांनी तिला लेखनवाचन शिकवलेही

होते. त्यानंतर समितीचे सेवक तिला पुस्तके देत अधूनमधून. पण गावात पोरींसाठी शाळा नाही. मुलांच्या शाळेत त्या जाऊ शकत नाहीत, कारण पडद्याची प्रथा अजून गळफास लावून बसलेली आहे. पोरीच्या लग्नासाठी हजारबाराशे रुपये खर्च करणारे घर अत्यंत दारिद्र्यात होते. घराची भिंत एका बाजूने कोसळली होती. खाण्यापिण्याचीही सोय बेताचीच होती. मास्तरांची पत्नी तिशीला असावी. तिला पडदा— तेव्हा माझे सोबती बाहेरच राहिले. ती लाजाळू, अबोल. दिसली. माझ्या प्रश्नांची उत्तरे लतेनेच दिली. बाई मुक्या राहिल्या.

परत येऊन आम्ही जेवायला बसलो. माझा पाट चुलीपाशी होता. गरम भाकरी, उडदाचे वरण, लोणी आणि ताक असा फर्मास बेत होता. गूळही आवडीप्रमाणे ज्यानेत्याने मागून खाल्ला. बाई आपल्या अडचणी समजावीत होत्या. त्यांची मुलगी लग्नाची होती. लग्नाला निदान हजारआठशे रुपये खर्च येणे अपरिहार्य होते. हे पैसे माझ्यासारख्या दयाळू लोकांनी दिल्यास, त्यांच्यावर जन्माचे उपकार झाले असते. त्यांनी माझ्याआडून हीच गोष्ट भागवतजींना ऐकवली. त्यांच्या मुलाला सारी साडेसोळा रुपयांची मदत मिळत होती. त्यांनी त्यांच्या गरिबीचा काय कात निघणार होता? इत्यादी.

आम्ही जेवून बाहेर पडताना पुनश्च बाईंनी आम्हाला बजावले. आम्ही सामान घेऊन पुढे निघालो. मार्गात आणखी दोन घरे घेण्याच्या तयारीने. भागवतजी म्हणत होते, "लताच्या परिवाराला खरी मदतीची जरूर आहे. ह्यांना काय कमी आहे? मदत दिली नसती तरी चालले असते." घरात झालेली भाषा मी त्यांना सांगितली. "तुम्ही मदत देता म्हणून आपल्या जेवणाचा भार त्या लोकांवर घालण्यात आला. 'सांभाळ ग बाई तुझे पाहुणे' मोठी जाऊ माझ्यादेखत म्हणाली."

असेच होत होते सगळीकडे! प्रथम शांतिसेवकांना आदराने सर्वच खेडे बोलावी. आताही कोणी उघडपणे त्यांना दूर टाकीत नव्हते. जुना गोडवा कायम होता, पण केवळ बोलात. त्यांच्यासाठी अंगाला झीज लागण्याची वेळ आली की त्यांचा भार मदत घेणारावर हळूच टाकला जाई. हा अनुभव इतरत्रही येत होता.

आम्ही राहत होतो ती खालची टोली. आम्ही चढ चढून वरच्या टोलीत गेलो. येथील वस्ती जास्त सधन असावी. उंचीवर असल्याने पाण्याचा मात्र त्रास दिसला. इथे एक सरकारी विहीरही लागली.

ही वस्ती ओलांडून आम्ही पुढे आलो. खड्या बेहडाच्या टोकाला ते घर उभे होते. आम्ही आत जाऊ शकलो नाही, कारण घर बंद होते. त्या घराच्या समोरच म्हैस बांधलेली जागा पाहिली. 'संध्याकाळची वेळ, अंधेर नुकताच झाला होता. हातात चुडीत घेऊन खालच्या बेहडातून भराभर डाकू वर चढून आले, तो कोपरा मी पुढे होऊन पाहिला. हरी नारायण आपट्यांच्या 'उषःकाल'मधील श्रीधरस्वामींना सोडवण्यासाठी सुलतानगडावर गेलेल्या मावळ्यांची आठवण झाली.

डाकू गोळ्या झाडीतच आले. म्हैस पहिल्या गोळीला बळी पडली. तिची काळजी घेणारे घरात पळाले आणि खोल्यांची दारे बंद करून बसले. डाकूंनी दरवाजे फोडून खोल्या खोल्यांनी जाऊन गोळ्या घातल्या आणि मग घराला आग लावून आल्या मार्गाने निघून गेले.

ह्या मारल्या गेलेल्या सहांपैकी एकाचे घर समोरच होते. तो जातीचा चांभार होता. त्याच्या मुलालाही समितीची मदत मिळते. मी त्याच्या घरी गेले तो चांभारीणबाई उन्हात बसली होती. घराचे वाडगे झालेले होते. थोडेसे हरबरे नी जव बाहेर वाळत होते. मोलमजुरी करून मिळेल ते खावे, मोलमजुरी नसेल तेव्हा उपास काढावे, हा तिचा कार्यक्रम. तिचा मोठा पोरगा यथातथाच निघाला आहे. धाकटा मात्र चुणचुणीत दिसला. "मदत आहे म्हणून शिकवते. ती थांबली की जाईल म्हशी राखायला. गरीब दुसरे काय करणार?" तिने विचारले.

झाल्या गोष्टीबद्दल तिने नशिबाला हात लावला. करम के सामने कौन दौड सकता है? नाहीतर हे दिवस का पाहावे लागते? हा प्रसंग का येता? "कपाळ फुटलं माझं, कोण काय करणार त्याला?" तिचा हा दैववाद, निराश माणसाचा दैववाद, मला विलक्षण बोचला. पण ती पुढे बोलतच राहिली. पोलिसची चौकी घटनास्थळापासून सारी शंभर पावलांवर होती. "डाकू येताच रडत—ऊर पिटीत मी चौकीवर गेले. पोलीस अधिकाऱ्याला विनवले. चला लौकर, डाकू माझ्या नवऱ्याला गोळी घालतील हो! त्यांनी मलाच धमकावले, 'बाई निकल यहांसे, हमको भी मरवायेगी वेहया?' रोती–पिटती मैं वापस आई." डाकू गेल्यावर पोलीस आले ते गोळ्या झाडत. त्यामुळे डाकूंनी पेटवून दिलेले घर विझवायलाही कोणी पुढे येऊ शकले नाही.[1]

तिची सारी कहाणी ऐकून खिन्न मनाने आम्ही बाहेर पडलो. त्यानंतर आणखी एका घराला भेट दिली, पण मी विमनस्क होते. मला एवढीच आठवण आहे की

१. ह्या संदर्भात खाली दिलेली वार्ता उद्बोधक आहे :

आग्रा : फेब्रुवारी १९:--अठरा डाकूंनी आग्रा जिल्ह्यातील इतमादपूर शहरात श्री० कैलाशचंद्र जैन ह्यांच्या घरावर हल्ला करून लूट केली. हे घर पोलिसठाण्यापासून फक्त २०० यार्डांवर आहे; येथे पाच पुरुष व एक स्त्री जखमी झाल्याचे समजते.

जनतेचे वित्त व जीवित ह्यांचे संरक्षण करण्यात पोलिसांनी केलेल्या हलगर्जीपणामुळे इतमादपूरच्या जनतेने हरताळ पाळला.

इतमादपूरच्या लोकांच्या म्हणण्याप्रमाणे डाका पहाटे तीनला सुरू होऊन चार तासपर्यंत चालू राहिला. डाकूंनी शहरातून बाहेर होणारी वाहतूक बंद केली होती, तरी देखील पोलीस आले नाहीत.

—हिंदुस्तान टाइम्स, २१-२-६४

तेथील बाईंनी घराच्या जवळ आणखी एक विहीर सरकारने खोदून द्यावी–त्यांना पाणी लांब पडते—असे म्हटले होते. त्यांचे घर वस्तीपासून दूर असल्याने ती शक्यता मात्र मला दिसत नव्हती.

मनाच्या त्याच अवस्थेत आम्ही खोहरीचा मार्ग पकडला. दुपारी साडेअकराचा सुमार असावा. वारा विलक्षण थंड व ऊन तसेच कडक. त्यामुळे उन्हात डोके भाजू लागे, छायेला हुडहुडी भरे. आम्ही भराभर पुढे जात होतो. मध्येच भागवतजी थांबले. मला म्हणाले, "ताई, इथून मानसिंगचे खेडा-राठोड जवळ आहे. जाऊ या का? त्याची पत्नी इथेच आहे म्हणतात."

राजा मानसिंगचे खेडा? अर्थात, जायचेच. सामान इतर सहकाऱ्यांच्या स्वाधीन करून आम्ही खेड्याकडे तोंड वळवले. मानसिंगचे खेडा, मध्ययुगीन कहाण्यांचा नायक मानसिंग याची राजधानी खेडा. माझ्या मनात कुतूहल होते, मानसिंगाच्या मृत्यूनंतर कसे दिसत असेल गाव हे? खेडाला पोचल्यावर कुतूहलाला कुठे स्थान दिसले नाही. तेच कळाहीन, मलीन गाव, तोच वेहडाचा भावभंगिमा, तीच घाण, तीच अव्यवस्था. वाकाटकांच्या राजधानीत, वत्सगुल्मात माझे बाल्य गेलेले. त्यांच्या राजधानीचे भग्नावशेष मी जवळून पाहिलेले आहेत. तीन शतकांच्या काळाच्या वाटचालीनेही वत्सगुल्माला इतकी अवकळा आली नव्हती.

आम्ही प्रथम मानसिंगच्या गढीकडे मोर्चा वळवला. गढी म्हणजे किल्ला—छोटा भुईकोट किल्ला. त्या छोट्याशा घराला कोणी गढी हे नाव का दिले असेल? त्याच्या भिंती पक्क्या विटांच्या आहेत. त्याचा दरवाजाही जुन्या दिंडीदरवाजासारखा, पण गढ्यांच्या दरवाजांच्या मानाने किरकोळ आहे. गढी उंचावर मात्र आहे आणि पलीकडे पन्नास पावलांवर तर वेहड. ज्या रस्त्याने आम्ही आलो तो मार्ग दोन वळणे घेऊन शेवटी थेट ओहोळावर जातो. आम्ही वर चढलो तो आमच्या उजव्या हाताला दिंडी–दरवाजा नी डाव्या हाताला सहा माणसे झोपू शकतील एवढी ठेंगणी झापरी होती. त्या झापरीत एक माणूस होता. त्याच्याशी भागवतजी बोलल्यानंतर त्याने दारवाजावर थाप मारली. कोणीसा दरवाजा उघडला. दारासमोरची पडदी आतला एकांत राखून होती. मी आत गेले, दार बंद झाले. मी पडदी ओलांडून बऱ्याच मोठ्या अंगणात आले. उजव्या बाजूला दगड घालून केलेल्या उघड्या न्हाणीत एक मध्यमवयीन स्त्री स्नान करीत होती. डाव्या बाजूला बांधलेल्या ओवरी-समोर एक वृद्धा खाटेवर बसून ऊन खात होती. बाबाची सेवक-मंडळी आल्याचे एका मुलाने त्या वृद्धेला सांगितले. मी तिच्याजवळ जाऊन खाली बसले व म्हणाले, "कैसी है आप?"

तिच्या जीर्णशीर्ण शरिरात आता चरबीचा लेशदेखील उरलेला नव्हता, त्यामुळे साऱ्या कातडीला सुरकुत्या पडलेल्या होत्या. डोळे तेजोहीन तर होतेच, पण ते उघडतांना पापण्या जड भासत होत्या. ती सावळी असली तरी एके काळी कोणीही

मागे वळून पाहण्याजोगी असावी, असे तिच्या रेखीव नाकावरून मला वाटले. उंचीने-अंगाने ती किरकोळच होती, पण एकदा पापण्या उचलून माझ्याकडे दृष्टिक्षेप केल्यावर ही शासकाची नजर आहे हे तेव्हाच ओळखण्याजोगे होते.

मग ती मला सांगू लागली, "एकदा माझा पोरगा तहसीलदारसिंग सुटून येऊ दे बाई, म्हणजे डोळे मिटीन समाधानानी. बाबांना सांग. त्यांनी केले तर का नाही होणार?" तिच्या शब्दात आजही आज्ञा होती. हातातल्या बांगड्या कोपरावेरी सरकत होत्या, स्तन निर्जीव होऊन छातीवर लोळले होते, पण त्या आवाजाची—फाटून गेलेल्या क्षीण आवाजाची—धार अजूनही कायम होती. मग ती बाबांनी तिच्यासाठी काही न केल्याचे मला सांगू लागली. आणि अखेर तिच्या निर्दोष पोराला जेलात सडावे लागते त्याचाही उश्रमा तिने माझ्याजवळ केला.

मी गप्प बसून ऐकत होते. शेजारच्या ओवरीत एक सुवासिनी खूपशा रोट्या भाजीत होती, नी त्या फुगून आल्यावर त्यांना तूप लावीत होती. मुले कुठेशी जत्रेला जाणार होती, त्याची तयारी होती ती. मी विमनस्क बसले होते. समोरच्या युवतीने पदर गोळा करून भिजवला नी पुनश्च तो ओला पदर अंगावर घेतला. तिच्या पाठीमागे एक दरवाजा दिसत होता, तो घरात जात असावा. सध्या तो बंद होता. वृद्धेचे बोलणे बराच वेळ मी ऐकत होते. इथे येताना मला भागवतजी म्हणाले होते, "काय करावे? ही बाई सारखी बाबांना उलटी-सीधी पत्रे लिहीत असते." अखेर निरुपायाने मी बाईंना म्हणाले, "बाबाजी से बनेगा सो तो वो करही रहे है मां."

"करते तो मेरा लडका कब का छुट जाता. उन्होने कोशीस ही नही की."

"ये बात गलत है आपकी. बाबाजी खूप कोशीस कर रहे है, परंतु उनका पुण्य आपके लडके का पाप धोने के लिये काफी नही है. बाबा की तपस्या अधूरी पडती है—बाबा उसके लिये क्या करें?"

इतका वेळ वरतून राखेसारखा वाटणारा अंगार एकदम फुलला. "पाप? क्या पाप किया मेरे लडकेने? लाइये कौन कहता है उसने पाप किया?" तिचे डोळे आकस्मिक तेजाने लकाकले. तिच्यासमोर तसें सांगणारी माणसे मी उभी केली असती तर तिने त्यांना खचित यमसदनाचा रस्ता दाखवला असता. तिचा आवेश आणि आविर्भाव, मला क्षणात केवढा तरी चित्रपट दाखवून गेले. ना खंत ना खेद अशा तिच्या स्वाभिमानी जीवनाबद्दल मला आदर वाटला. माझे डोळे क्षणभर दिपले. मग मी हसून म्हणाले,

"कौन कहता है की—क्या बात? आप छातीपर हाथ रखकर कहिये उसने कोई पाप नहीं किया, कोई बुरा काम नहीं किया. मै मान जाऊंगी."

तिच्या शरिरात क्षणैक संचारलेला आवेश निवाला. तिची वर गेलेली मान पुन्हा खाली वळली. तिचे डोळे पुनश्च पापण्याआड लपले. पलीकडे स्नान करून अंगावर कोरडे लुगडे घेणारी स्त्री मात्र पराजित भावनेने म्हणाली, "किये तो है. मना

कैसे करें." तिचा निःश्वास विलक्षण करुण, हतोत्साह होता. मला दोघींबद्दलही खेद वाटला. कुठे आहे ते वैभव? कुठे आहे तो मोठेपणा? त्यांनी लुटलेल्या लक्षावधी रुपयांचे काय झाले? आज समितीने मोठ्या मिनतवारीने त्यांची जमीन नांगराखाली आणली आहे, म्हणून पोरे ओलाकोरडा घास खाताहेत. रोज वेहडात उतरणाऱ्या नित्यनव्या डाकूंना हे दिसत नाही काय?

मानसिंगाच्या घरापलीकडच्या वेहडावर उभे राहून माझे मन हेच विचार करीत होते. सुंभ जळाले होते, पण पीळ बाकी होता.

मानसिंगाच्या दीनवाण्या घरामागेच वेहड. घराला प्रदक्षिणा घालून मी त्याच्या टोकावर पोचले. मातीच्या परळाच्या किंवा तसराळ्याच्या आकाराच्या त्या ओहळामध्ये, आम्ही तसराळ्याच्या काठी उभे होतो. ह्या तसराळ्याचा समोरचा काठ चारदोन मैल दूर असावा. सर्वत्र हिरवीगार वनस्पती वाढलेली होती. काठावर पडलेली शिशिराची छाया—शिशिराची पानझड, झाडावर आलेला पिवळेपणा आणि रुक्षपणा ह्यांचा स्पर्श आतील वनशोभेला झालेला नव्हता. ऋतु आणि काळ जणू तिने हद्पार केले होते. इतक्यावरून व दुरून सारी वनस्पती त्या तसराळ्याला सुंदर हिरवे अस्तर जडवल्याप्रमाणे एकसारखी दिसत होती. "एक पलटण लपली तर पत्तादेखील नाही लागणार," भागवतजी म्हणाले. मानसिंग गेला. त्याचा दरारा, त्याचे वैभव गेले. त्याचा वंशदेखील त्याच्या दुष्कृत्यांच्या आगीत होरपळून गेला. परंतु त्याला आव्हान नी आवाहन देणारी ओहोळांची वनशोभा चिरयौवन घेऊन उभी होती. अजूनही हिम्मतवाल्याला निमंत्रण देत, मानसिंगच्या केविलवाण्या घराला हसत. "ह्या तसराळ्यातून जागोजाग बाहेर जायला हवे तेवढे रस्ते आहेत." भागवतजी म्हणाले. मी आतापर्यंत पाहिलेले ओहोळ वनस्पतीहीन, रुक्ष होते. येथे त्या ओहोळांचे एक वेगळेच दर्शन मला घडले.

त्यानंतर आम्ही मानसिंगाच्या पुरोहिताकडे गेलो. येथेही एक वृद्धा भेटली. मानसिंगाच्या पत्नीप्रमाणेच थकलेली, दृष्टी अधू झालेली, हातापायाला सुरकुत्या पडलेली. हातापायांची जुडी करून, त्या ओल्सर अंगणात एक पोते टाकून ती बसलेली होती. घर अवगळलेले दिसले. बैठकीच्या घरात मी तिच्यापाशी बसले. एक मध्यम वयाचे त्याच कुटुंबातले गृहस्थ दुभाष्याचे काम करीत होते. बाबाच्या मिशनबद्दल इथे प्रथम भाषा होऊ शकली. "बाबांनी केलं ते ठीकच केलं. हे डाकू 'आत्मसमर्पण' न करते तर मारले नक्की जाते. पण त्यापूर्वी किती हत्या करते कोणी सांगावे? तेव्हा झाले ते ठीक झाले."

नंतर ते गृहस्थ मला म्हणाले, "ह्या मानसिंगाच्या घरात चोरीचा माल देण्याघेण्याचा व्यवहार होता. मानसिंग होताहि मोठा उद्दंड. आमच्या येथील एका ज्योतिषाशी भांडण होऊन त्याने त्याला गोळी घातली. मग आमच्या बापाला

म्हणाला, 'पोलिसला काही सांगू नको.' माझा बाप म्हणाला, 'मुद्दाम सांगायला जाणार नाही. पोलीस विचारतील तर खोटे बोलणार नाही.' ही भांडणाची सुरुवात. आमच्या घरातले बारा पुरुष मारले त्याने."

त्या वृद्धेने नंतर मला प्रश्न विचारला, "बाई, आमचं आयुष्य तर गेलं डोळयातून पाणी गाळींत. पण ज्या पोरी विधवा झाल्या त्यांचं काय?" दोघी जणी तेथेच होत्या. त्यांना तिने बोलावून घेतले. त्यांच्या पडदा-पद्धतीमुळे धाकटीचे दर्शन क्षणभरच झाले. मोठीने तोंडावरचा पदर काढलाच नाही. धाकटी पोरसवदा सोळा-सतरा वर्षांची दिसली. तिच्या दुःखाला वाचा फोडण्याची संधी मला नव्हती. पण वृद्धा म्हणत होती ते खरे होते. कोणाच्या जिवावर खायचे तिने आता जन्मभर? प्रश्न खरा होता, पण उत्तर कुठे होते त्याचे? जुन्या समाज-रूढी-परंपरेप्रमाणे मुली घराबाहेर जाव्या कशा? लोक म्हणतील, पोरगी जड झाली म्हणून दिली हाकलून.

खेडा सोडताना वाटेत पोलिस पोस्टमध्ये गेलो. इथे एक सबइन्स्पेक्टर आणि कॉन्स्टेबलची एक तुकडी नेहमी खडी असते. पोस्ट एका वैराण टेकडीच्या हलक्या उतारावर वसलेला आहे. वायरलेस सेटचा डायनामो तेव्हाही खरखरत होता. इथे तळहातावर प्राण घेऊन लढणारे, भोवतालच्या लोकांनी अवमानलेले आणि जनतेने निखंदलेले हे दहाएक लोक आपल्या कर्तव्याच्या भावनेने सदा सज्ज असतात. त्यांच्या कर्तव्यदक्षतेची बूज कोणालाच नसल्यामुळे ते पोटावारी नोकर होऊन त्यांचा स्वाभिमानही खुडला जातो. आपल्या सरकारने त्यांची केलेली अनास्था ठाण्यामध्ये शिरताच समजते. राहायला घरे नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. जे क्वार्टर्स बांधायला सुरुवात केली होती ते अर्धवट पडलेले आहेत. वरचे शाकारलेले गवत काही ठिकाणी सडून खाली पडत होते. पावसाळ्यात सगळीकडेच गळते, असे समजले. काही क्वार्टर्सच्या अभावामुळे व काही संरक्षणासाठी—सगळी मंडळी पोलिसपोस्टच्या दोन खोल्यात कशीबशी झोपतात. जीवनोपयोगी सामान वाहून आणावे लागते. माणसाला माणूस म्हणून जगायला लागणारी कुठलीच सोय येथे उपलब्ध नव्हती—करता येत नव्हती म्हणून नव्हे, तर आपल्या नोकरांबद्दल सहानुभूतीच्या दृष्टिकोनाचा अभाव राज्यकर्त्यांजवळ होता म्हणून.[1]

खोहरीच्या मार्गावर एका घरी थांबलो. इथे त्या लोकांनी आम्हाला ताक दिले. हे कुटुंब पूर्वी बेहडात होते, तेथून हलून ते खोहरीच्या आश्रमापासून दोन मैलांवर आले

---

१. १९६२ मध्ये खेडा-राठोडच्या वरील पोलिस-ठाण्याच्या भिंती व छत कोसळली व चार शिपाई घायाळ झाल्याने दवाखान्यात भरती करावे लागले, असे मला ५-९-६३ ला भिंड येथे समजले.

आहे. घरचे पुरुष दुहेरी हाडाचे, आणि जाट-रजपुतांप्रमाणे उद्दंड दिसले. जीवन जणू दुथडी भरून फो–फो करीत इथे वाहत होते. बायकाही बाहेर आल्या होत्या. ह्या परिवारावर ओहोळांची छाया आज तरी दिसत नव्हती. भागवतजी मात्र मला सांगत होते, "वेहडात फार त्रास व्हायला लागला. डाकू येत, आसरा मागत; पोलीस येत, त्यांची खबर मागत. खबरदार खबर द्याल तर, डाकू म्हणत; खबरदार खबर लपवाल तर, पोलीस म्हणत. आता इथं शांतीचं जीवन आहे.

आम्ही खोहरी आश्रमात पोचलो, तो दीड वाजला होता. तेथील इतर सेवकांशी परिचय होण्यापूर्वीच श्री० राजेंदर गर्ग पुढे आले. पंचविशीच्या आतला हा युवक, गांधी-पीस-फौंडेशनने ह्या भागात संशोधनासाठी पाठवला होता. राजेंदर लंडन युनिव्हर्सिटीत दोन वर्षे होता, पण काही कारणाने तेथून डिग्री न घेता त्याला परत यावे लागले होते. त्यानंतर दिल्ली युनिव्हर्सिटीची एम्० ए० करून आता संशोधनप्रबंधाला त्याने चंबळची समस्या निवडली होती.

मला पाहताच राजेंदरला खूपच बरे वाटले असावे. "आपण चहा पिऊ या का?" त्याने प्रश्न केला आणि माझे व राजेंदरचे मेतकुट जमले. कारण मलाही तो माझ्या जगातला आहे हे पटले.

संध्याकाळी शेजारचे खेडे गुमानसिंगपुरा येथे गेलो. पुरुषमंडळी बाहेरच अडकली—मी आत गेले. अंधार झाला होता. कंदिलाच्या अस्पष्ट प्रकाशात माझ्याभोवती तीनचार स्त्रिया आणि सातआठ पोरी एकत्र झाल्या. घर सुस्थितीतल्या माणसाचे होते—विटेबंदी आणि काळाच्या ओघात आपली ठाकुरकी ठेवून असलेले. इथे एका स्त्रीचा दीर गोळीला बळी पडला होता. त्याच्याबद्दल बोलणी सुरू होताच, आमच्याभोवती एक विचित्र गुदमरून टाकणारी स्तब्धता पसरली. आतापावेतो किलबिल करणाऱ्या पोरीही एकदम स्तब्ध झाल्या. मी विचारीत होते, "तुम्हाला डाकूचे भय नाही का वाटत?" मांडीवरच्या पोराला पदराखाली घेत, सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांची त्याची भावजय म्हणाली, "डर! क्यों नहीं लगता? डर लगता है और खूब लगता है. अखिर गोली का कुछ जबाब भी तो नही. न दवा न दारू. पानी पीने-पिलानेका अवसर तक नहीं." तिच्या स्वरात उद्वेग होता, भय होते, अशरणता होती. ह्या गावात आपसातली भांडणे मिटवायला श्री० विद्यावती ठाकोर एम्० एल्० ए० आल्या होत्या. त्यांनी चार तास पंचायत केली, लोकांच्यात समझौता करण्याचा प्रयत्न केला आणि त्या गाव सोडून गेल्यावर तीनचार तासातच चार चांभार नी एक ठाकूर गोळी घालून मारण्यात आले. हा मुकदमा कोर्टात चालू आहे असे ऐकले.

दुसऱ्या दिवशी मी खोहरीला गेले. येथे दोन 'आत्मसमर्पितां'ची घरे आहेत. त्यांपैकी एक वदनसिंग व दुसरा एक धनगर आहे. वदनसिंगची जमीन गाववाल्यांनी

पडीत केलेली आहे. एका घरी तीन पुरुष मारले गेले. तेथील वृद्धाही मानसिंगाच्या पत्नीसारखी उन्हात तापत बसली होती. हातापायावर सुरकुत्या, डोळे तेजोहीन, शरीर सुकून गेलेले, स्तन छातीवर रुळणारे. माझ्यासाठी बाज टाकल्यावर तिच्या सुनेने तिला उचलून माझ्यापाशी ठेवले—तिचे पाय गेले असल्याने तिला चालता येत नव्हते. ही वृद्धा माझ्या खांद्याला डोके टेकून रडू लागली. मला म्हणाली, "बाई, मेले ते गेले. जे आहेत त्यांचे काय करायचे सांग. ह्या पोरींनी जन्म कसा काढायचा? कोणाच्या तोंडाकडे पाहावे त्यांनी? नी आमचा समाज मोठा जुनाट. पोरी घरातच सडायच्या इथे." दोन विधवा सुनांपैकी मोठी मीरतची आहे. तिला वृद्धेने माहेरी काही हुन्नर शिकवण्यासाठी पाठवली आहे. तेथे ती शिवणकाम शिकते आहे.—वृद्धेने मला माहिती दिली. नंतर समोरच्या तरुणीकडे हात दाखवून ती म्हणाली, "पण बेटा, हिचं काय? हिचं माहेर बेहडातलंच आहे. हिला कुठे पाठवू? हिचा जन्म दिराजावांचे कष्ट उपसण्यात जायचा का ग? माझा जीव हिच्यासाठी तिळतिळ तुटतो, पण उपाय नाही सापडत काही. तुम्ही काही कराल तर पाहा आता." ही विधवा एकवीसबावीस वर्षांची, गोरी, हसरी नी खेळकर दिसली. आमचे बोलणे सुरू होताच मात्र ती मसाला वाटायला जाऊन बसली—नंतर तिचे दर्शन मला झाले नाही.

ह्या वृद्धेची आणखी एक समस्या मी नंतर ऐकली. घरात इतके मृत्यू झाल्यावर दोन बंदुकींचा परवाना मिळाला. त्या दोन बंदुकांपैकी एक त्या वेळी पोलीसठाण्यात जमा केली होती, कारण लायसेन्सवाल्या पुरुषाचा मृत्यू झाला होता. दुसरी बंदुक तिच्या धाकट्या मुलाजवळ होती. गळ्यात काडतुसांचा पट्टा नी खांद्यावर बंदूक घेऊन फिरताना हा तरुण आम्हाला भेटला. त्याचे वागणे उद्दामपणाचे वाटले. तो गावातल्या लोकांशी वाईट बोलतो, भांडणे करतो व विकत घेतो इत्यादी गोष्टी ऐकल्या. "एक दिवस कोणाला तरी गोळी घालील" हे मतही कानी आले. हा पोरगा बेहडात गेल्याचे कानी न येवो म्हणजे झाले.

मग शेजारच्या ब्राह्मणाघरी गेलो. येथे मृताची विधवा आपल्या चार पोरांसह राहते. तिच्या मुलाला 'समिती'ची मदत मिळते. घर बाईचे स्वतःचे नाही. तिचे दारिद्र्य अपरंपार आहे. देहावर लाज झाकायला पुरेसा कपडासुद्धा नव्हता. खाण्याचीही अशीच कहाणी आहे म्हणाली; पुन्हा हात नशिबाला लावण्याशिवाय ती काय करणार?

तिच्या शेजारचा परिवारही तेथेच होता. स्त्रिया फारसे बोलल्या नाहीत, पण गृहस्थ बोलले. त्यांच्या बोलण्याला विलक्षण धार होती. आत्मसमर्पणावर व हृदयपालटावर त्यांचा विश्वास दिसला नाही. ते थोडे हसले नी म्हणाले, "कसं का होईना, आत्मसमर्पण झालं ना? पाचपन्नास प्राण वाचले असंच म्हणतो मी."

"हे लोक सुटून आल्यावर काय होईल?"

"काय होईल? ते आपल्या घरी राहातील, आम्ही आपल्या घरी राहू. शांतिसुखाने नांदतील तर बरंच आहे—"

त्या 'आहे'वर त्यांनी तोडलेले वाक्य मला जास्त बोलके वाटले. मी विचारले,

"नाहीतर काय?"

ते गृहस्थ स्तब्ध राहिले.

काही वेळाने मी पुनश्च प्रश्न केला, "क्या उनसे कोई संबंध नहीं रखेंगे?"

"क्यों रखे? हमारा-उनका क्या संबंध?"

त्या प्रश्नात आव्हान होते. कित्येक सेकंद मी त्यांच्या आव्हानाचा अन्वयार्थ लावीत होते. नंतर मी म्हणाले, "उनके बच्चे इसी गलीमे खेलेंगे, आपके बच्चोंके साथ ही स्कूल जायेंगे. क्या उनसे भी कोई बातचीत नही की जायगी?"

माझ्या प्रश्नाला धार नव्हती, एक समस्या चित्ररूप करण्याचा प्रयत्न होता. ते गृहस्थ किंचित शांत होऊन म्हणाले, "देखा जायेगा." ज्याच्या अंगात चैतन्याचे, विरोधाचे वारे खेळते आहे, डाकूंच्या अन्यायाने, निष्ठुरतेने ज्यांचे अंतःकरण पिळवटलेले आहे—अशासारखी ही सारी उत्तरे होती.

येथून परतताना वाटेत चांभारवस्तीत शिरलो. येथे चार माणसांना गोळ्या घालण्यात आल्या. ज्या एका छोट्या घरात मी गेले त्याला पुढे छोटीशी पडवी होती. आत अंगण अगदी लहान– १०×६ फूट असावे. पुन्हा ६×४ फूट लांबरुंद अशी पडवी. ह्या पडवीवर गवताची शाकारणी केलेली होती घर सारवलेले असले तरी अंगणाच्या कोपऱ्याला साचणाऱ्या डबक्याची घाण होतीच. माझ्यासाठी बाजले टाकले, पण त्याच्यावर कोणी बसेना. सगळ्या स्त्रिया नी मुले मला वेढून उभी होती. त्यांच्या मते मला शिवण्याचा अधिकार त्यांना नव्हता. हे मत मी भारतात सर्वत्र ऐकते. परंतु बोलणाऱ्या स्त्रिया हसतात, थट्टा करितात, वृद्ध स्त्रिया धर्म बुडविण्याच्या कुप्रवृत्तीवर एखादे व्याख्यानही प्रसंगी झोडतात. पण इथे होती नीरवता आणि कसल्याशा दडपणाखाली चेपलेले चेहरे. मग मी हत्येबद्दल विचारले. एक बाई थोडी पुढे आली. "ह्या इथे समोर असे छपरावर उभे होते. उन्हाळ्याचे दिवस होते, म्हणून छपरावर निजायला चढले होते. गोळी छातीला लागली नी प्रेत होऊन छपरावरच कोसळले. रक्त तिथल्या गवतावर वाहून डाग पडला."

"का मारलं ग त्यांना?"

"आम्हाला काय ठाऊक बाई?"

ह्याच वस्तीत जळलेले घरही पाहिले. घराचा मालक त्याच्या सुदैवाने त्या वेळी घरी नव्हता—त्याला दिल्लीला नोकरी आहे. तिकडेच असतो तो. घरातली बायकापोरे बाहेर काढून दिली आग लावून.

अखेरपर्यंत मला विटाळ न व्हावा ह्याबद्दल बायकाच काय पण पोरेही सावध

राहिली. मी मनाला विचारीत होते, तेलंगणाच्या धुमाकुळात जातिसंस्था अशीच सांभाळली गेली असेल का?—'पालागन'चे महत्त्व आज तेलंगणात पूर्ववत् असेल?—आजही लोक बाजूला होऊन आपल्याला रस्ता देतील?...

गुमानसिंगपुराहून कमीत कमी पाच मैल शेताच्या बांधावरून व गाडवाटांनी चालत जाऊन बाहला आम्ही सामान टाकले व रात्री बसने बटेश्वर गाठले. तेथे ह्या वेळी जत्रा चालू होती. बटेश्वरपाशी यमुना एक वळण घेऊन, काठावरच्या एकशेआठ शिवलिंगांच्या पादप्रक्षालनानंतर, पलीकडे उभा असलेला भदोरिया राजांचा किल्ला आपल्या कुशीत घेऊन, त्याला प्रदक्षिणा करीत पुढे सरकते. "पूर्वी किल्ला नदीच्या उत्तरेला होता. पण मोंगलांपासून संरक्षण करण्यासाठी यमुनेचा प्रवाह येथे वळवून, भदोरिया राजांनी किल्ल्याला तिचा खंदक मिळवून दिला व तिच्या पात्रात बांधलेल्या बांधाचे संरक्षण सतत होत राहावे म्हणून ही मंदिरे बांधण्यात आली," अशी आख्यायिका भागवतजींनी सांगितली. ह्या एकशेआठ मंदिरांपैकी—मी ही मंदिरे मोजली नाहीत—महत्त्वाच्या मंदिरात आम्ही गेलो होतो. मंदिराच्या आवारात खूप जुनाट दिसणाऱ्या वृक्षावर लहानमोठ्या घंटा विविध लांबीच्या साखळ्यांनी टांगलेल्या होत्या. नवस फेडण्यासाठी ह्या घंटा वाहिल्या जातात, असे मला समजले. मानसिंग दरवर्षी घंटा टांगावयास येथे येत असे, असे म्हणतात. नदीच्या प्रवाहावर सोडलेल्या दीपांनी तिला विलक्षण शोभा आलेली होती. नदीचे पात्र येथे पन्नास-साठ यार्डांपेक्षा रुंद नाही. ग्रामीण जनतेसाठी भारतात सर्व ठिकाणी भरणाऱ्या जत्रांपैकीच बटेश्वरची जत्रा ही एक आहे व त्याच पद्धतीचा बाजार येथे दिसून येतो.

बटेश्वरहून बाह व बाहनंतर नदी ओलांडून भिंड हा माझ्या प्रवासाचा पुढचा टप्पा. ह्या टप्प्यात भागवतजींच्या आईचा परिचय झाला. त्यांना आपल्या मुलाचा वाटणारा अभिमान मला गेल्या पिढीत स्वार्थत्यागी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या घरात नेहमीच आढळून येत असे. येथे भागवतजींच्या प्रेरणेने काही मुली मला भेटल्या. शाळा नसल्याने त्या घरी बसल्या होत्या. त्यांची शिक्षणाची लालसा अपूर्ण राहिली होती.

भिंडला भेटले लल्लूसिंहजी. त्यांचा परिचय परिसंवादाच्या वेळी मला झालेला होता. ग्वाल्हेरमध्ये सोडलेले 'घडी-कंगी'चे जीवन मला येथे पुन्हा येऊन भेटले. अर्थात् माझी दस्युभूमीची यात्रा येथे संपली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी बसने ग्वाल्हेरला जाऊन मी माझ्या जगात सामील झाले.

अ. क्र.

## ३. दस्युभूमीने काय सांगितले?

दस्युभूमीत पाय टाकताच एखाद्या चेटकीच्या महालात आल्यासारखे भयभीत वाटत नाही. आपल्याला कुठे अपशकुन होत नाहीत, वा ही दस्युभूमी असल्याची साक्ष कुठे पटत नाही. नगराच्या परिसरातून हिंडताना, मागे म्हटल्याप्रमाणे, तीस-पस्तीस वर्षांपूर्वीच्या ग्रामीण विदर्भासारखीच खेड्यांची अवस्था वाटते. तीच अव्यवस्थित पद्धतीने वसलेली मातीची बहुसंख्य घरे, रस्त्यांचा अभाव, घाण व गलिच्छपणा आणि तोंडी न बांधलेल्या विहिरी, ह्या प्रदेशात सर्वत्र दिसून येतात. गेल्या पंचवीस वर्षांत ग्रामीण भारतात फिरलेला जागृतीचा, उत्साहाचा हात येथे प्रत्ययाला येत नाही. मध्ययुगीन जीवनाचे चित्र प्रत्यक्ष पाहावयाचे असेल तर ह्यांपैकी कुठल्याही खेड्यात येऊन काही काळ वसती करावी. इतरत्र न जाणवलेले भय मला येथे जाणवले हे खरे. परंतु भय वातावरणात होते का माझ्या मनात होते हे मी निश्चयाने सांगू शकणार नाही.

दस्युभूमीची खेडी व त्यांचे जीवन ही वेगवेगळी पाहिली असता, त्यांचा मागासलेपणा वा दारिद्र्य वा दहशत भारताच्या इतर ग्रामीण विभागातही आढळते; निदान पंचवीस वर्षांपूर्वी आढळत असे, हे खरे. परंतु ह्या प्रदेशाचे आर्थिक जीवन मात्र विदर्भाच्या ग्रामीण जीवनापेक्षा खूप मागे पडलेले आहे. मी हा भाग फिरले नोव्हेंबरच्या महिन्यात. पिके नुकती निघाली होती. कुठे-कुठे तर ती मळणीची वाट पाहत ती अजून शेतातच होती. सर्वत्र दूधदुभते भरपूर होते. अन्नधान्यही विपुल होते. परंतु ह्या दिवसात विदर्भाचे ग्रामीण रस्ते बैलगाड्यांनी भरलेले, व त्यांच्या बैलांच्या घुंगरांनी निनादत असतात. कापूस, भुइमूग, तीळ, ज्वारी, तूर अशी विविध पिके बाजाराची वाट चालत असतात. मोरेनाच्या एकुलत्या एक रस्त्यावरून मी प्रवास केला. दोन ठिकाणी बसची वाट पाहत काही तास रस्त्याच्या काठावर बसलेही. पण तिथे बैलगाडी मला क्वचितच दिसली. बैलगाड्या रात्रभर चालून दिवसा कुठे तरी एखाद्या राईला मुक्काम करितात, अशा रायाही ह्या विभागात आढळल्या नाहीत. व्यापार नाही म्हणजे बाजारपेठाही नाहीत. विदर्भ निदान गेल्या पिढीत शेतकीप्रधान प्रदेश होता. तरीदेखील कापसाच्या पिकामुळे जागोजाग लहानमोठी कॉटन-मार्केट्स व जिनिंग फॅक्टरीज त्या प्रदेशात आढळून येत. दस्युभूमीत रोख पैसा देणारे पीकच दिसत नाही, त्याला बाजारपेठांचा काय उपयोग? व्यापार नाही, म्हणजे दळणवळणाची साधने नाहीत. रस्ता एकच; ग्वाल्हेर ते मोरेना व पुढे मोरेना-अटेर. इतर रस्तेबांधणी आता चालू आहे. मोरेना-अटेर रस्ता सारा चौतीस

मैलांचा आहे. कुठली तरी सडक आपला मार्ग विसरून आल्याप्रमाणे इथे उपेक्षित पडलेली आहे. आमचा पुष्कळसा प्रवास पाऊलवाटांनी झाला. मोरेना ते ब्राह् ह्या प्रवासात बस चौतीस मैलांपुरती मिळाली तर जवळपास चाळीस मैल मी पायांनी चालले. मी शहरातील स्त्री होते. मला वाहन उपलब्ध असते तर इतके चालण्याची मेहनत मी कधीच केली नसती.

पोस्ट व तार ऑफिसेही येथे तुरळकच आढळतात. मध्यरेल्वेचा मुंबई-दिल्ली हा लोहमार्ग ह्या प्रदेशातील झाशी–दतिया–ग्वाल्हेर–मोरेना–धोलपूर ही स्टेशने घेत जातो. पण ती शहरे भौगोलिक कारणांनी ह्या रेल्वेवर पडलेली आहेत. ह्याखेरीज ग्वाल्हेर-भिंड व ग्वाल्हेर-शिवपुरी असे दोन लहान फाटे ह्या प्रदेशात बांधलेले आहेत. पण रेल्वेलाईन 'स्मॉल गेज' असल्याने त्या रेल्वेचे महत्त्वही थोडेच आहे.

येथे स्वतंत्र व जनसत्ताक अधिराज्याची पदचिन्हे—शिक्षण व वैद्यकीय मदत—ह्यांचें अस्तित्वही अभावानेच जाणवते. पोरसाला आपल्या पायावर उभे राहून प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरची माहिती येऊन गेलेली आहे. खडीत व कनेरा येथे नर्सेस होत्या. परंतु मैलोगणती पसरलेल्या ह्या वस्तीत त्यांना काम करण्याच्या सवलती मात्र उपलब्ध नाहीत.

प्राथमिक शाळा बऱ्याच जागी आहेत. पण त्यांच्या इमारती, अध्यापक, इत्यादी सर्वच बाबतीत त्या उपेक्षित आहेत. हायस्कूल फक्त जयगढला आढळले, तेही खाजगी प्रयत्नांचे फळ आहे. माझ्या वाटेवर कुठेही कॉलेज लागले नाही. शिक्षणाने माणसाच्या गुन्हेगारीच्या प्रवृत्ती बदलत नाहीत; तसे असते तर अमृतलाल, बालो ह्यांची नावे दरोडेखोरात सामील करण्याचा प्रसंग आला नसता. परंतु शिक्षणाने नोकऱ्या मिळविण्याची संधी वाढते व चांगली नोकरी असलेला संतुष्ट माणूस दरवडेखोरीला वळण्याचा संभव कमी होतो हेही खरे.

साऱ्या भारतभर जिल्हानिहाय सुरू करण्यात आलेल्या स्त्री-कल्याण-परियोजना मला येथे आढळल्या नाहीत. येथील स्त्रियांना अशा परियोजनांची विशेष आवश्यकता आहे. कारण येथील स्त्री सामाजिक दास्याच्या कर्दमात खोल रुतलेली आहे. आजही पुरुषांना न चालणारे कदन्न ती खाते. तिचा आवाज दोन पावलांपलीकडे ऐकू जाणे अनुचित समजले जाते. केस पिकून गाव-आई होईतो तिची ही गुलामगिरी अबाधित राहते. भारतात शारदा कायदा झाला, हे येथे कोणाला माहीतही नाही, तर हिंदू कायद्याचे अस्तित्व कसे ठाऊक असणार? अन्नसत्याग्रहाची धमकी दिल्यास 'मीच गोळी घालतो' ही स्त्रीकडे पाहण्याची वृत्ती इथे सर्वदूर आहे.

मागासलेल्या समाजाची प्रवृत्ती नेहमीच तुटक राहण्याची असते. येथील समाजही स्वयंपूर्ण होण्याच्या प्रयत्नात दिसतो. प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःपुरता लावलेला तंबाखू शेताच्या कोपऱ्यातून मला हेच सांगत असे. बाहेरून विकत आणण्याच्या वस्तू म्हणजे मीठ, कपडा, साखर अशा मोजक्या व परिमित दिसल्या. मागासलेले समाज तुटक राहतातच, पण त्यांची दृष्टीही तितकीच संकुचित असते.

त्यामुळे त्यांना आपल्या डोक्याशी सदैव उभा असणारा पोलिस बोचतो. त्याने संरक्षिलेल्यांना देखील त्याच्याबद्दल सहानुभूती वाटत नाही. बाहेरच्या जगाची नैतिक मूल्ये त्यांना मान्य नाहीत. घरचा माणूस बागी असल्याचे उघडपणे सांगण्यात येते त्याचे कारण हेच आहे.

मागासलेले समाज आपल्या छोट्या जगात संतुष्ट असले तरी बाहेरच्या विस्तृत समाजाला त्याचे ते निराळे राहणे पटत मात्र नाही. त्यांच्या संस्कृतीचे धागेदोरे क्रमशः मागासलेल्या समाजाच्या पोटांत सर्व बाजूंनी शिरतात व त्या समाजाचा विशिष्ट तोल नष्ट करून टाकतात. ही कहाणी दस्युभूमीतही आढळून येते. ह्या बाहेरच्या विस्तृत समाजाचे प्रतीक म्हणजे इथल्या रस्त्यावरून जाणारी बस म्हणता येईल. तिचे वजन लीलया झेलू न शकणारा रस्ता इथल्या समाजासारखा आहे. त्यांना न झेपणारी, न पटणारी अनेक परिवर्तने आपण येथे करीत होतो आणि करीत आहोतही. जनसत्ताकाच्या निवडणुकी त्यापैकी महत्त्वाच्या असाव्यात. बसप्रमाणेच अद्यावत् शस्त्रेही इथल्या समाजाचा समतोल मोडण्यास कारण होतात.

आपली जनसत्ताकाची भाषा इथल्या जनतेला समजत नाही. सरकारच्या प्रत्येक कृतीचा स्वतःला उपकारक अर्थ लावण्यात येतो. 'राजाने टोपी घेतली तर तो भिकारी आणि परत दिली तर तो भ्याला' ही उंदराची मनोभूमिका सर्वत्र आढळून येते. जनसत्ताकात जनतेने सरकारला प्रत्येक गोष्टीत सक्रिय सहयोग द्यावा लागतो, ह्याची जाणीव दस्युभूमीच्या जनतेला नाही. सरकारच्या पापांचा पाढा जागोजाग आपल्याला वाचून दाखवला जातो. पण आज शासनकर्ते आपणच आहोत हे त्यांना सांगूनही पटणे कठीण आहे.

स्त्रियांइतकेच हरिजनही येथे गुलामगिरीत असावेत. गुमानसिंग-का-पूरासारख्या ठिकाणी जेथे त्यांनी वर मस्तक उचलले तेथे त्यांनी गोळ्या खाल्या. मला ते लोक दबल्यासारखे वाटले. उपासमार झालेल्या माणसाला सकस अन्नही एकदम पचत नाही. कित्येक युगे दास्यात खितपत पडलेल्या ह्या दुर्बळ पण परिश्रमी जनतेच्या बेड्या, समानतेच्या पुस्तकी कायद्याने तुटण्याची लक्षणे आज तरी दिसत नाहीत.

माझ्या संपूर्ण प्रवासात डाकूंच्या अत्याचाराला बळी पडणारेही डाकूंबद्दल वाईट शब्द वापरताना मला आढळले नाहीत. "माझे काका चोर-डाकू नव्हते; बागी होते" —नागरा, "माझ्या वडलांचे डाकूंशी वैर नव्हते, त्यांना गैरसमजाने गोळी घालण्यात आली"—महुआ, "पोलिस मदतीला आले नाहीत."—महुआ, अशीच भाषा सर्वत्र कानी आली. नागराच्या वृद्ध स्त्रीने 'त्या मेल्या'ला शाप अवश्य दिले; पण 'तो मेला' सरकारच्या संरक्षणाखाली हिंडणारा, लाखनच्या सूडाला बळी पडलेला मनुष्य होता, हे मागून मला उमजले.

भारतात सर्वत्र दस्युवृत्ती असली तरी तिच्याबद्दल इतक्या उघडपणे अभिमान बाळगणारे लोक कुठेही आढळत नाहीत. त्या वृत्तीला इथे प्रतिष्ठा का असावी!

काल्पनिक वा खऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी मनगटाचा जोर व रक्तपात हे क्षात्रधर्माचे अवशेष दस्युवृत्तीचे रूप घेऊन येथेच दृढमूल का व्हावेत ?

ह्या प्रश्नाचे उत्तर दस्युभूमीजवळ मिळाले नाही. ती आज मागासलेली आहे परंतु तिची परिस्थिती भारताच्या इतर ग्रामीण विभागाप्रमाणे पुढच्या दहा-वीस वर्षांत बदलता येईल. पण तिची मनोवृत्ती? ती परिस्थितीबरोबर बदलेल का? ह्या प्रश्नाचे उत्तर ही मनोवृत्ती, दस्युवृत्तीची ही प्रतिष्ठा कुठे उगम पावते ह्या प्रश्नातच सामावलेले आहे. माझ्या प्रश्नाचे उत्तर कदाचित इतिहास देऊ शकेल ह्या आशेने मी इतिहासाच्या दिशेने आपली पावले वळवली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा
अ क्र. ........
क्रमांक ........ सी दि. ........

# इतिहासाचा मागोवा

चंबळच्या पाण्यातच गुन्हेगारी आहे, असा तेथील लोकांचा समज आढळून येतो. ज्या घटनांचे कार्यकारणसंबंध आपल्याला शोधून सापडत नाहीत त्या सर्व घटनांना हवा-पाणी जबाबदार आहे असे आपण धरून चालतो. चौकशीसमितीसमोरही ही गोष्ट मांडण्यात आली असावी. कारण चंबळच्या पाण्यात गुन्हेगारी निर्माण करणारे असे विशेष रासायनिक द्रावण आढळून न आल्याचा उल्लेख तिच्या अहवालात आहे.[1]

मागे म्हटल्याप्रमाणे चंबळ पुराणांतरीची चर्मवती खरी, पण तिला 'चामडेवाली' असे लोकविलक्षण नाव का देण्यात आले असावे, ह्याचे समाधानकारक उत्तर कोठे सापडत नाही. महाभारतात त्याबाबत एक गमतीची आख्यायिका आहे. त्या आख्यायिकेप्रमाणे संस्कृतिपुत्र राजा रन्तिदेवाने आपली राजधानी दशपूर येथे याचकांना तृप्त करण्यासाठी अन्नछत्रे उघडली होती. ह्या अन्नछत्रात रोज दोन हजार गायींची हिंसा होत असे. ह्या मृत पशूंच्या कातड्यातून ठिबकणाऱ्या रक्तापासून झालेली नदी, म्हणून तिला चर्मण्वती म्हणतात.

ही आख्यायिका केवळ कपोलकल्पना आहे हे उघड आहे. मृत पशूंचे कातडे उतरताना त्यातून रक्त गळत नसते हे आख्यायिका रचणाराला माहिती नव्हते. चंबळ-खोऱ्यात त्या काळी गोमांस खाण्यात येत असावे एवढाच त्याचा अर्थ असू शकेल.

चामडी कमावण्याची कला प्रथम चर्मण्वतीच्या खोऱ्यातील लोकांनी विकसित केली व त्यामुळे आर्यांनी त्या नदीला चर्मण्वती हे नाव दिले, असा उल्लेख डॉ० दिवेकर

---

१. भिंड मोरेना इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट : परिच्छेद १८

ह्यांनी बोलतांना केला. चंबळेच्या अरण्यांनी व्यापलेला प्रदेश व त्यात पारध करून उपजीविका करणाऱ्या वन्य जातींचे अस्तित्व ध्यानी घेता वरील स्पष्टीकरण खरे असण्याची शक्यता वाटते.

ह्या प्रदेशाचा जुना इतिहास मात्र अभावानेच वाचावा लागतो. महाभारत-काळात चर्मण्वतीच्या काठी राहणाऱ्या दाशार्णांना जिंकल्याचे उल्लेख आहेत. सम्राट अशोकाच्या काळातही येथे आदिवासी जमातींची, प्राथमिक स्वरूपाचा समाजवाद पाळणारी नगरराज्ये असावीत असे वाटते. कारण मेगॅस्थेनिस ह्या ग्रीक प्रवाशाने दिलेल्या माहितीवरून "सम्राट अशोकाच्या आधिपत्याखाली मर्यादित स्वरूपाची स्वायत्तता" ह्या प्रदेशात असल्याचे मत स्मिथने व्यक्त केलेले आहे.[1] पण इसवी सनापूर्वी सहाव्या शतकापासून चवथ्या शतकापर्यंत अशी जनसत्ताके भारतात सर्वदूरच होती.[2]

ह्या कालावधीत बौद्ध व जैन ह्या धर्मांचा भारतात मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. पण गहन अरण्ये व दुर्गम प्रदेश ह्यामुळे इथे भिक्षु-परिव्राजकांचा प्रवेश झालेला नसावा असे वाटते. कारण भारतात सर्वत्र विखुरलेली बुद्धस्मारके चंबळेच्या खोऱ्यात आढळत नाहीत. अशोकाच्या राज्यात नांदणारी शांतता, सुबत्ता व सुरक्षितता ध्यानी घेता, चंबळचा परिसरही शांत असावा, असे समजून चालता येईल.

इसवी सनाच्या चवथ्या शतकात ह्या प्रदेशाला समुद्रगुप्ताचे साम्राज्य भिडलेले होते. कविकुलगुरू कालिदास त्याच्याच पदरी होता. कालिदासाच्या मेघदूत ह्या रम्य काव्यात एका अभिशप्त यक्षाने आपल्या आम्रकूट (अमरकंटक) येथील निवासस्थानाहून, अलका नगरीत राहणाऱ्या आपल्या प्रियेला, वर्षेच्या पहिल्या मेघाबरोबर निरोप पाठवला आहे. आम्रकूटावरून निघालेल्या मेघाला सरळ उत्तरेला न पाठवता, रेवा (नर्मदा) नदीच्या काठाने जाऊन वेत्रवतीवर विदिशेला व नंतर 'वाकडी वाट' करून, निर्विंध्या व गंभीरा ओलांडून उज्जयनीला जाण्याबद्दल यक्ष सांगतो. उज्जयनीनंतर यक्षाचा मार्ग देवगिरी (देवगड) व दशपूर[3] (धोलपूर) ही स्थाने घेऊन ब्रह्मावर्ताकडे जातो.

कविकुलगुरूंनी ह्या प्रदेशाचे सुंदर वर्णन केलेले आहे. विदिशेच्या, वेत्रवतीच्या परिसराच्या व उज्जयनीच्या वैभवविलासाचे वर्णन करिताना त्यांच्या यक्षाने "हा प्रदेश असुरक्षित आहे, सांभाळून जा" अशी धोक्याची सूचना कोठेच दिलेली नाही.

समुद्रगुप्ताच्या वेळेलाच फाहियान या चिनी यात्रेकरूने एक तपपर्यंत भारताचा प्रवास केला. त्याला "मथुरेच्या दक्षिणेचा म्हणजे माळव्याचा प्रदेश विशेषकरून

---

१. एन्शंट हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ—पान १६३.
२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : आर० सी० मुजुमदार, एच० सी० रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त—पान ७१.
३. दशपूर—आजचे धोलपूर : आपटे ह्यांचा संस्कृत-मराठी शब्दकोश.

आकर्षक वाटला."[1] लुटारूंनी लुटले जाण्याचे प्रसंग फाहियानवर कधी आले नाहीत. त्याला भारत शांत व सुरक्षित दिसला; प्रजा नीतिमान वाटली. त्यावरून चंबळच्या प्रदेश ह्या नियमाला अपवाद मानण्याचे कारण दिसत नाही.

सातव्या शतकात ह्या प्रदेशांमध्ये हर्षवर्धनाचे स्वामित्व होते. हर्षकाळात गुप्तकाळाएवढी शांतता व सुरक्षितता उरली नव्हती. त्याच्या कारकीर्दीत आलेल्या यात्रेकरू ह्युएनत्संगवर एकापेक्षा अधिक वेळेला लुटले जाण्याचा प्रसंग आला होता.[2] पण ही अंदाधुंदी साऱ्या उत्तर भारतात माजलेली होती, चंबळखोऱ्याचे ते वैशिष्ट्य मानता येणार नाही.

इ० स० १०००च्या सीमेवर उभे राहून मागे नजर टाकली तर असे आढळून येते की बुद्धापासून इ० स० १०००पर्यंतच्या सोळा शतकांच्या अवधीत मौर्य, गुप्त, प्रतिहारी असे काही साम्राज्यसंस्थापक वंश आणि अशोक, समुद्रगुप्त, हर्ष, असे समर्थ शासक ह्या कालावधीत झाले, परंतु त्यानी इतिहासाचा फार थोडा अवधी व्यापलेला आहे. एवढा अवधी सोडता बाकी काळ, सर्वत्र इवलाली राज्ये, परस्पर युद्धे, रक्तपात, खंडण्या, यांच्यात व्यतीत होताना दिसतो. मात्र ह्या युद्धांपासून सामान्य जनतेला अलिप्त राहता येई.[3] शेतकरी व कारागीर आपल्या वृत्ती निर्वेधपणे चालवू शकत.[4] खेड्यांचा कारभार ग्रामपंचायतीकडे असे. "काही पंचायतीचे सदस्यत्व प्रत्येक जाणत्या माणसाला असे तर काही ठिकाणी विशिष्ट मतदानपद्धतीने पंचायती निवडल्या जात. तळी, मंदिरे, न्याय इत्यादी कार्ये विशेष समित्या नेमून पंचायत चालवी."[5] अशोकाच्या राज्यात आणि गुप्त कालातही नगर-परिषदांचा उल्लेख सापडतो.[6]

ही नगरराज्ये कालौघात नष्ट झाली व एकतंत्री राजसत्ता सर्वत्र स्थापन झाल्या, तरी पंचायती स्वतंत्र असल्याने राजाच्या कारभाराशी जनतेचा संबंध फार थोडा आला; व त्यामुळे राज्यकर्त्यांची निरंकुशता जनतेला जाणवली नाही. चंबळेच्या खोऱ्यात तर ही नगरराज्ये ही केवळ त्या खोऱ्याच्या काठावरच असावीत असे वाटते. खोऱ्यातला प्रदेश डोंगराळ, निबिड अरण्यांनी व्यापलेला, त्यामधून वाहणारे जलप्रवाह

---

१. एन्शंट हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान २९६
२. एन्शंट हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान २९८
३. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : आर० सी० मुजुमदार, एच० सी० रॉयचौधरी, कलीकिंकर दत्त; पान १३५
४. हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान १३२
५. ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : आर० सी० मुजुमदार, एच० सी० रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान १९५
६. ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : आर० सी० मुजुमदार, एच० सी० रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान १९५

खळखळाटाचे, प्रपातांचे; प्रवाहाला ओढही फार, त्यामुळे भूमार्ग व जलमार्ग हे त्या प्रदेशांत प्रवेश मिळविण्याचे मार्ग बंद असल्याने बाहेरच्या लोकांचा शिरकाव येथे लौकर झाला नाही. येथली वस्ती भटक्या, पारध करणाऱ्या भिल्ल, गोंड, भार ह्या आदिवासींची असून विरळ असावी. शक्तिशाली सम्राटांनी सत्ता गाजवली ती चंबळखोऱ्याच्या परिधीवर, आत प्रवेश कोणीच केला नाही.

हे सुप्त चंबळचे मानचित्र क्रमशः बदलू लागले. भारताच्या किनाऱ्यावर बाहेरून मानवी सागराच्या लाटा वारंवार येऊन आदळल्या. शबर, शक, हूण, यूची इत्यादी टोळ्यांचे लोक प्रथम सिंधूच्या खोऱ्यात उतरून स्थायी होत. पाठीमागून नवी लाट आली म्हणजे हे लोक पुढे ढकलले जात. ह्या रीतीने वरील नवसमाज क्रमशः चंबळखोऱ्यात उत्तरेकडून उतरले असे दिसते. तरवारीच्या जोरावर जगणारे हे लोक मुख्यतः पशुपालनावर उपजीविका करीत. ह्यांनी येथील अरण्यात पारध करीत फिरणाऱ्या पूर्वीच्या आदिवासी टोळ्यांना उत्तरेकडून दक्षिणेला ढकलले. विरळ वस्तीच्या चंबळ खोऱ्यामधली लोकसंख्या पुष्कळच वाढली. ह्या नव्या टोळ्यांनी आपली छोटीछोटी राज्ये सर्वत्र प्रस्थापित केली. संस्कृतीने (civilisation) भारतीय लोकांपेक्षा हीन असणारे हे नवसमाज येथील समाजात समाविष्ट झाले. चंबळखोऱ्याचे हे परिवर्तन आठव्या शतकापर्यंत चालू राहिले. आठव्या शतकात भारतामध्ये प्रचंड धार्मिक क्रांती झाली. तिचे स्थायी परिणाम चंबळच्या खोऱ्यातही झाले. 'प्रच्छन्न बौद्ध' म्हटले गेलेल्या शंकराचार्यांनी भारतात पसरलेल्या बौद्धधर्माचा नायनाट केला. त्यांना हिंदुधर्माचे चातुर्वर्ण्य पुनरुज्जीवित करावे लागले. पण बौद्ध कालखंडात एकट्या ब्राह्मणांची परंपरा अखंड राहिली होती.[१] वाणिज्य करणारा वर्ग बहुतांशी जैन होता व तो तसाच कायम राहिला. आजही वैश्य मोठ्या प्रमाणात जैन आढळून येतात.

क्षत्रियांची नष्ट झालेली परंपरा पुनरुज्जीवित करणे जितके आवश्यक तितकेच दुष्कर होते. चंबळेच्या खोऱ्यात तो घाट आठव्या शतकाच्या सुरुवातीला घडताना आढळतो. इतिहासकारांच्या मते राजपुतांचा उदय भारतावर आक्रमण करणाऱ्या शक, हूण ह्या परकीय जमातीपासून झाला असावा.[२] ह्या राजपुतांतही स्मिथ उत्तरेचे व दक्षिणेचे असे भेद करितो[३] आणि दक्षिणेतील राजपूत हे भारतीय आदिवासी, गोंड, भिल्ल, भार ह्या जमातींमधील लढाऊ जातींना मान्यता मिळून झालेले नवक्षत्रिय असावेत असा आपला तर्क सांगतो.

१. हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान ४०८
२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : आर० सी० मुजुमदार, एच० सी० रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान १९५.
३. हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान ४१४

हिंदुधर्मांचे पुनरुज्जीवन करताना, भारतीय मनावर बौद्धधर्माचा बसलेला पगडा शंकराचार्यांना नष्ट करता आला नाही. यज्ञयागांना तेज चढले नाही. पूजेच्या मूर्तींची नावे बदलली, पण मूर्तिपूजा चालू राहिली. अहिंसेचे अनन्य महत्त्व हिंदुधर्मात ठाण मांडून बसले. बौद्धधर्मातील संन्यास 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्' ह्या सूत्ररूपाने साऱ्या जीवनावर सावट घालून बसला. बौद्धधर्मात वरील गोष्टींना तर्कशुद्ध स्थान होते. पुनरुज्जीवित हिंदूंनी त्यांना निरुपाय म्हणून मान्यता दिली; त्यामुळे वरील तत्त्वे ही लोकांच्या आचारनिष्ठेच्या व कर्मकांडाच्या आधारावर उभी करावी लागली. स्वतंत्र आचार ह्या नवधर्माला भयावह म्हणून त्याज्य ठरला.

ह्याच वेळी क्षत्रियांच्या नवनिर्मित वर्णात समाविष्ट झालेले रजपूत छोट्या राज्यांचे अधिकारी होत होते. त्यांना सत्ता गाजवताना हिंदुधर्माचा पाठिंबा मिळत होता. हे रजपूत शूर होते हे खरे, पण त्यांचा स्वभाव तापट होता. त्यांच्यात विद्वत्ता नव्हती, एवढेच नव्हे तर विद्वत्ता व व्यासंग यांचे महत्त्वही त्यांना समजलेले नव्हते. गणित, वैद्यक, ज्योतिष, रसायन ही शास्त्रे भारताकडून घेऊन ह्याच वेळेला अरब त्यांचा प्रसार युरोपात करीत होते. भारतात मात्र विद्या व कला पोरक्या व झाल्या होत्या; व मरणाची वाट चालत होत्या. ह्या काळांत तक्षशिला वा नालंदासारखे कुठलेही विश्वविद्यालय अस्तित्वात आले नाही. ज्ञानपीठ म्हणून वाखाणलेले भारत आणि विद्यार्जनासाठी येथे सतत वाहत येणारा परकी विद्यार्थ्यांचा प्रवाह ही या दोन्ही काळात नष्ट झाली. उरले फक्त भाट व त्यांची राजाच्या स्तुतीची स्तोत्रे.

अर्थशास्त्र, राजकारण ह्यांचा अभ्यास थांबला. राजांना कर्तव्ये शिकवण्याची प्रथा नष्ट झाली. राजा हा आता सर्वार्थाने निरंकुश झाला. तो शिक्षणाने अडाणी, स्वभावाने तापट, परंपरेने दंश धरून सूड उगवणारा होताच. त्याला महत्त्वाकांक्षा होत्या पण भविष्यकाळात डोकावणारी कवीची प्रतिभा मात्र नव्हती. ह्या परिस्थितीत त्याचे स्वभावगुण वाढीला लागले. पिढीजात वैरे, रक्तपात, अफू व मदिरासेवन ह्यांमध्ये त्याचा काल व्यतीत होऊ लागला. दक्षिणेकडील आदिवासी रजपुतांनी ह्याच कित्ता गिरवला. आपसातील विवाहसंबंधामुळे (Inbreading) कालौघात हे दुर्गुण तीव्रतर मात्र झाले.

अशा तऱ्हेने परिवर्तनकाळात चंबळखोऱ्यात दारू ठासली जात होती, तरी ठिणगी मात्र पडली नाही. ह्या रजपूत राजात काही जास्त शूर निघत, आणि आपल्या राज्यांचा विस्तार वाढवून प्रजेला स्वास्थ्य व सुख देत. जेजाकभुक्तीचे चंदेलांचे राज्य त्यापैकीच एक होते. गंगेच्या दक्षिण किनाऱ्याला चंबळ व शोण ह्या नद्यांच्या मध्ये पसरलेल्या प्रदेशाला जेजाकभुक्ती म्हणत. हे राज्य नवव्या शतकाच्या मध्यावर स्थापन झाले; व तीन-साडेतीन शतके भरभराटीत राहिले. गोपगिरीचा (ग्वाल्हेरचा) किल्ला चंदेलांनी बांधला. ह्या किल्ल्यावरची सास-बहू (सहस्रबाहु) मंदिरे व सूर्यकुंड आजही चंदेलांच्या वैभवाला व कलेला साक्ष आहेत. यमुना नदीवरचे प्रसिद्ध बटेश्वर

मंदिर तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात परमार्दिदेवाच्या कारकीर्दीत त्याच्या मंत्र्याने बांधल्याचा पुरावा उपलब्ध आहे.[१] वटेश्वर मंदिराची वास्तु पुराणी नसली तरी त्यातील शिवलिंग मात्र प्रचंड असून ते चंदेला-कालीन दिसते असे अभ्यासकांचे मत आहे.

चंदेलांच्या अमदानीत चंबळ खोऱ्यात विशेष अंदाधुंदी होती असे दिसत नाही. चंदेला राजानी आपल्या राज्याला कुलवधूची उपमा दिलेली आहे व अभिमानाने "कुलवधूमिव वसुंधराम् प्रतिपालयन् अविकलः" व 'निराकुलम्' असे त्यावेळच्या शिलालेखात नमूद केलेले आहे.[२]

जेजाकभुक्तीसारखीच राज्ये त्या काळात कनोज, दिल्ली, उज्जयनी इत्यादी ठिकाणी आढळतात. त्यांचे वास्तुशिल्प फारच अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. जे उपलब्ध आहे ते अजिंठा, वेरूळ वगैरेच्या तुलनेने यत्किंचित आहे.

या वेळी हिंदुधर्माची घडी नीट बसलेली नव्हती. जे ज्ञान उरले होते, ते ब्राह्मण-वर्ग उराशी घट्ट धरून बसला होता. सामान्य जनता अज्ञान व अंधश्रद्ध झाली होती. परिश्रमी वर्ग शूद्रात समाविष्ट होऊन ओझ्याचें गाढव झाला होता. अतिशूद्र व दास ह्यांना वर मान उचलण्याची संधी उरली नव्हती. राजपूत वैरे व युद्धे धुमसत होती. महत्त्वाकांक्षी संग किंवा समर्थ शासक शिवाजी ह्यांना अद्याप कित्येक शतकांचा अवकाश होता. सरसरी दोन शतकांची शांतता लाभूनही समाजाची वाढ व विकास खुंटला होता. दारू ठासलेली होती, ठिणगी नसल्याने सर्वत्र निरामय वाटत होते.

ही कोंडी केव्हा, कोणी व कशी फोडली असती हे गुपित काळाच्या पोटात लपलेले राहणार आहे. प्रत्यक्षात ह्या दारूच्या कोठारावर अकराव्या शतकात मुसल्मान आक्रमणाने ठिणगी पडली. ह्या नव्या आक्रमणाला उत्तरेतले नवक्षत्रिय पराजित करू शकले नाहीत—ह्यापूर्वीच्या आक्रमणालाही आळा घालण्यात, चंद्रगुप्त मौर्याचा अपवाद सोडता, भारत कधीच यशस्वी झाला नव्हता. पण ह्यापूर्वीच्या आक्रमकांना बौद्ध धर्माने आत्मसात केले होते; हेही सामर्थ्य हातात कुराण-शरीफ घेऊन आलेल्या मुसल्मानांना हिंदुत्व दाखवू शकले नाही.

मुसल्मानही हिंदुधर्म नामशेष करू शकले नाहीत. पण त्याला कारण हिंदुधर्माची शक्ती होती की मुसलमान आक्रमकाचा उणेपणा होता हे सांगणे कठीण आहे. भारतात प्रथम तलवारी घेऊन आलेले लोक असंस्कृत तुर्कवंशीय होते. त्यांच्या जागी भारतीय विद्यांबद्दल आदर बाळगणारे व्यासंगी अरब भारतात येते तर इतिहासाचा प्रवाह कदाचित वेगळ्याच दिशेने वाहिला असता.

येथे आलेले तुर्क तलवारीच्या जोरावर यशस्वी झाले, तरी त्यांच्या बुद्धिमत्तेचा प्रभावही हिंदू समाजावर पडू शकला नाही. भारतात पोचेपर्यंत धर्मप्रसाराची

१. अर्ली रुलर्स ऑफ खजुराहो : शिशिरकुमार सिंह; पान १५६

२. अर्ली रुलर्स ऑफ खजुराहो : शिशिरकुमार सिंह; पान १४९

मुसलमानांची धुंदी जवळपास उतरली होती. त्यांना संपत्तीचा मोह मात्र उरला होता. त्यामुळे पुढील दोन शतकांपर्यंत त्यांनी भारताची संपत्ती धुवून नेली. बाराव्या शतकाच्या अखेर त्यांनी राज्ये स्थापली, वित्त व वैभव मिळवले आणि कालांतराने हिंदू प्रजाजनांच्या सहकार्याने राज्यकारभार करावयास सुरुवात केली.

आपल्या दुर्बलतेची जाणीव झालेला हिंदुधर्म अकराव्या शतकानंतर जास्त जुनाट, कट्टर, माघार घेणारा होत गेला.[1] भारतभर बौद्धांना हिंदू करून घेणाऱ्या ह्या धर्माला ह्यापुढे धर्मांतरांचे वावडे झाले. हिंदूंनी मुसलमानांना मुली दिल्या त्या निरुपाय होऊन. पण सेल्युकसची यवनकन्या वरणाऱ्या चंद्रगुप्ताच्या देशात मुसलमानकन्या वरणे अशक्य झाले. मस्तानीसाठी पहिल्या बाजीरावाने सोसलेला छळ व मनस्ताप मराठ्यांच्या इतिहासाला परिचित आहेच.

चातुर्वर्ण्य पुरेना म्हणून जातिभेद आले ह्या भिंती लौकरच आकाशाइतक्या उंचावल्या. धार्मिक कठोरता वाढली. मुसलमानांच्या अत्याचाराने चिडून, त्यांचा निःपात करण्यासाठी क्षत्रियांनी कंबर कसली, तरी मुळातच दुबळा असणारा हा धर्म वारंवार पछाड खाऊन खाली आपटला.

समोरासमोर युद्धात पराजित होत गेलेल्या पण जीव धरून राहिलेल्या क्षत्रियांनी व नंतर सर्व हिंदूंनी मुसलमानांशी अखंड संघर्ष केला. रजपुतांचा कडवा स्वभाव व चंबळेचा दुर्गम प्रदेश ह्यामुळे येथे धर्मांच्या झटापटी अविरत चालत राहिल्या. ह्या संघर्षाचा एक पैलू प्रथम बंडखोरीच्या व नंतर दरवडेखोरीच्या स्वरूपात चिरस्थायी कसा झाला हे मेवांच्या इतिहासात स्पष्ट वाचता येते.

मेवातचा प्रदेश दिल्लीपासून शेसव्वाशे मैलांच्या अंतरात चंबळखोऱ्याच्या उत्तर सीमेवर आहे. मथुरा व गुरगाव हे जिल्हे, आणि जुनी अल्वर व भरतपूर संस्थाने ह्यामध्ये मेवात विभागलेला अहे. भरतपूर-मेवातचा डोंगराळ मुलूख अत्यंत दुर्गम आहे. "ह्या टेकड्या अतिशय खडकाळ असून त्या पार करून जाणे पादचाऱ्यांनाही कठीण जाते."

येथील रजपूत रहिवासी इतिहासाला मेव ह्या नावाने परिचित आहेत. मेवांना इतिहासाने नेहमीच बंडखोर मानलेले आहे. टॉडच्या मताप्रमाणे हे एका जुन्या रजपूत जातीचे पुढे मुसलमान झालेले वंशज आहेत. पृथ्वीराज चौहानच्या वेळी मेवाती राजा दिल्लीचा मांडलिक असे. बल्बनच्या वेळी मेवातबद्दल जास्त स्पष्ट उल्लेख येतात. इ० स० १२६० मध्ये बल्बनने मेवांना जिंकून कठोर शासन केले आणि नंतर इस्लामला विजय मिळवून दिल्याबद्दल अल्लाहची प्रार्थना केली.[2] त्यावरूनही येथील लोक हिंदू असावेत हे सिद्ध होते. दिल्लीच्या मुसलमान बादशहांना त्यांचा उपसर्ग

१. ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री : जवाहरलाल नेहरू; पान २५७
२. ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान २२८

नेहमी पोचत असे. क्रूर शासनानंतरही ते थोड्याच काळात उभे राहून पुनश्च दंगल माजवीत. पुनश्च कठोर शासन झाल्यावर कांही काळ गप्प बसत.

बल्बनच्या वेळीं हिंदू असणारे मेव पुढे मुसलमान झाले, पण त्यांचा स्वभाव बदलला नाही. राजसत्ता दुर्बल होताच मेव तिला कावळ्याप्रमाणे टोचू लागत. मग ती सत्ता हिंदूंची, मुसलमानांची, वा इंग्रजांची असो. बल्बननंतर दिल्लीची सत्ता उघडी पडल्यावर मेव वारंवार दिल्लीवर झडप घालून कोणाचीही लुटालूट करीत. त्यामुळे दिल्लीचे पश्चिमेकडील दरवाजे दुपारी नमाजाच्या वेळीं बंद ठेवावे लागत. ह्या काळापर्यंत ते मुसलमान झालेले होते, आणि धार्मिक भेद नष्ट झाल्यावरही त्यांचा लुटारूपणा कायम राहिला हे उघड आहे.

दिल्लीच्या बादशहांनी मेवांना शासनाखाली आणण्याचे प्रयत्न सतत केले. दिल्लीची स्वारी आली म्हणजे मेव आपली घरेदारे उध्वस्त करून तिजाराच्या जंगलात पळून जात. त्यांच्या खेड्याची जाळपोळ करण्यात येई. हाती लागलेल्या लोकांची कत्तल केली जाई. मग काही काळ गप्प बसून मेव पुन्हा लुटारूपणा करू लागत. सोळाव्या शतकात अकबराचे पराक्रमी शासन प्रस्थापित झाल्यानंतर मेवांचा हा क्रम बंद पडला, तो सरासरी दीडशे वर्षेपर्यंत.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मेव पुन्हा मूळपदावर आले. १७७५ मध्ये मेवात मराठ्यांच्या हाती आला. त्यांनाही मेवांनी खूप त्रास दिला. "मराठ्यांच्या फौजा दक्षिणेकडे गेल्या की ते दंगल करीत. मराठी घोड्यांच्या टापा ऐकू येताच ते गरीब गाय होत."[१] हा क्रम अनेक वर्षे चालू राहिला.

ह्या त्यांच्या दंगलींचा उपसर्ग स्वतंत्र भारतालाही १९४७ साली झाला होता. त्यांनी त्या वेळीं पुन्हा बंड उभारले. ह्या बंडात त्यांनी बंदुका, ग्रेनेडस यांसारख्या आधुनिक शस्त्रांचा वापर केला होता. हे बंड मोडण्याचे शासनाचे प्रयत्न दुबळे ठरले. समाजाचा कुठलाही थर राज्यसत्तेविरुद्ध उठल्यास ती दुबळी पडणे अपरिहार्य असते, हे इतिहासाने पुनश्च आपल्याला शिकवले.

१९४७ सालच्या भयानक बंडाचा अंत विरोधी हिंदुजनतेने एकजुटीने उठाव केल्यावरच होऊ शकला. हिंदूंनी मेवांप्रमाणेच धाडी उभारल्या व मेवांवर प्रतिहल्ले केले. त्यांची गावे जाळली. प्राणहानी दोन्ही पक्षी भरपूर झाली. ह्या प्रतिहल्ल्याने मेव घाबरले आणि पूर्वापार पद्धतीप्रमाणे आपली गावे जाळून भोवतालच्या जिल्ह्यातून पळून गेले. बरेच मेव धर्मांतर करून हिंदू झाले. आज मेवात शांत आहे.

ध्यानात ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे की गेल्या आठ शतकांच्या इतिहासात मेवांनी सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न एकदाही केला नाही. ते सदैव बंडखोर किंवा

---

१. मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विकास : एम० पी० जोशी; पान ५६

बागीच राहिले. लुटालूट करण्याची त्यांना एकदा जी सवय लागली ती त्यांच्या रक्तात कायमची भिनली. चंबळच्या डाकूंचा इतिहासही असाच आहे.[1]

लुटारूपणा सोडून मुसलमान दिल्लीला तख्तनशीन झाले, तरी त्यांच्या सत्तेला स्थैर्य लाभेना. एक जमात राज्य स्थापून स्थिरस्थावर होईतो दुसरी जमात आक्रमण करून येई. मध्य आशियाच्या कठोर जीवनसंघर्षात काटक झालेली ही नवी जमात, दिल्लीला सुखात राहून आळसावलेल्या आधीच्या जमातीला जिंकून बाजूला सारी. घोरी, गुलाम, खिलजी, तघलख, लोदी, ह्या जमाती तीन-साडेतीन शतकात लकाकून गेल्या. त्यांची सत्ता अल्पकाळपर्यंत भारताची पूर्व आणि दक्षिण टोके व्यापून जाई; त्यानंतर पुनश्च स्थानिक राजे स्वतंत्र होत.

ह्या अस्थिर परधर्मी सत्तेला सतत विरोध राजस्तानच्या राजपुतांकडून आणि विशेषतः मेवाडच्या सिसोदिया वंशाकडून झाला. मेवाडमध्ये समर, हमीर, कुंभ, संग अशा शूर राजांची परंपरा सत्ता गाजवीत होती. मुसलमान उपरे आहेत, परधर्मी आहेत, त्यांना आपण पराजित करून भारतातून घालवून द्यावे, ही महत्त्वाकांक्षा ह्या राजांना होती. त्यामुळे रजपुतांनी मुसलमानांशी सतत संग्राम केला. त्यांना ह्या संग्रामात यश आले नाही. ही उणीव त्यांच्या शौर्याची नव्हती, तर विचाराचा व आचाराचा कर्मठपणा निर्माण झालेल्या त्यांच्या धर्माची होती.

दोन्ही पक्षी युद्धाचा डाव कुजत पडल्यावर दिल्लीचे मैदान आणि राजपुतान्याचा दुर्गम प्रदेश ह्यांच्या परिघावर सदैव लहानमोठी युद्धे व चकमकी चालू राहणे अपरिहार्य होते. ही स्थिती अकबर गादीवर येईतो कायम राहिली. मुसलमान सत्तेमध्ये भारतीयता आणण्याचे काम अकबराने केले. त्याने हिंदूंना समान हक्क दिले; त्यांना दरबारात बरोबरीचे स्थान दिले; त्यांच्या धार्मिक आचाराला पूर्ण स्वातंत्र्य दिले.

क्रमशः भारतात सर्वदूर मोगल बादशहाची एकछत्री सत्ता स्थापन झाली. मुसलमानांच्या साहचर्याचा हिंदूंवर परिणाम होऊ लागला. "इस्लामच्या काही लोकानुवर्ती (democratic) कल्पनांचा प्रवेश हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक पद्धतीतून झाला; आणि त्यामधून काही संत-प्रचारकांच्या रूपाने उदार चळवळींना जन्म मिळाला. परमेश्वराचे अद्वैत, सर्व धर्मांची समता, तसेच मनुष्याची प्रतिष्ठा जन्मावर नव्हे तर कर्मावर अवलंबून आहे, असे भक्तिसंप्रदायाने प्रतिपादन केले. कर्मकांडाचे आधिक्य, त्याचप्रमाणे धर्माचा कर्मठपणा, पुजाऱ्यांचे अवास्तव महत्त्व ह्याविरुद्ध त्यांनी क्रांतीचा झेंडा उभारला. भक्तीवर जोर देऊन, श्रद्धेने सर्वांना मोक्ष मिळू शकतो ह्यावर त्यांनी भर दिला."[2]

---

१. हा भाग लिहिताना डॉ० ना० भा० खरे यांचे चरित्र, भाग दुसरा, पान २४२ वरील पुरवणीचा उपयोग केला आहे.

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ४०३

हिंदुधर्माला भक्तिमार्ग नवीन नव्हता. पण येथून पुढे दोन-तीन शतके भारताची बुद्धिमत्ता व मानवता पुन्हा उमलण्यास त्याने मदत केली. हिंदुधर्माला पुनश्च काही प्रमाणात लवचीकपणा आला. भक्तिमार्गाने जातिभेदाच्या वेड्या तोडल्या नाहीत, धर्मांतरावरची बंदी उठवली नाही, तरी शूद्रातिशूद्र सर्वांना सरसकट भगवद्‌भक्तीचे मार्ग उघडून दिले. दक्षिणेत रामानंद हा ह्या मार्गाचा पहिला संत. कबीर हाही रामानंदाचाच शिष्य होता. चक्रधर, ज्ञानदेव, वल्लभाचार्य, तुलसीदास, चैतन्यदेव हे सर्व भक्तिमार्गी होते. नामदेव, मीरा, चोखामेळा यांना व पूर्वी मोक्षाच्या अधिकार नसणाऱ्या अशाच लोकांना भक्तिमार्गाने विकासाचा मार्ग मोकळा करून दिला. अशा रीतीने हिंदुधर्मावरचे आंतरिक दुर्बलतेने आलेले प्राणसंकट टळून त्याला एक लवचीकपणा येत गेला, तो एक नवीन चैतन्य गाठी बांधीत राहिला, ही त्याच्या जिवंतपणाची साक्ष होती.

सतराव्या शतकात औरंगजेब हा विद्वान, दीर्घोद्योगी, निर्व्यसनी पण धर्मवेडा सम्राट गादीवर आला. मोगलांचे धर्मसहिष्णुतेचे धोरण त्याने बदलले. देवळे जमीनदोस्त करून मशिदींचा पाया अनेक ठिकाणी पडू लागला. जिझिया कर सर्व हिंदूंवर बसला. ह्या अपमानाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य हिंदूधर्मानेही आतापावेतो मिळवले होते. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या उपऱ्या आक्रमकांना चार शतकापूर्वी पराजित करू न शकणाऱ्या हिंदूंनी दृढमूल झालेल्या मोगल सत्तेला समर्थ प्रतिकार केला. जागोजाग विद्रोहाचे झेंडे फडकले. बुंदेलखंडाचे बुंदेला, मथुरेचे जाट, नारनोल व मेवातचे सत्नामी, पंजाबचे शीख, रजपुतान्याचे रजपूत व दक्षिणचे मराठे ह्यांच्या बंडांना तोंड देण्यात औरंगजेबाची दीर्घ व कंटाळवाणी कारकीर्द आणि मोगल सत्तेचे अफाट सामर्थ्य खर्ची पडले. ह्या बंडखोरांमध्ये बुंदेलखंड व राजपुताना येथील बंडे सोडल्यास जाट, सत्नामी, शीख, मराठे हे सर्वत्र हिंदुधर्माच्या खाती शूद्रात जमा होते. वरील बंडांमधून पुढे सत्नामी सोडून बाकी चार राजसत्ता स्थापन झाल्या. वरील सर्व बंडखोरांना इतिहासकार वेळीअवेळी 'लुटारू' हे विशेषण लावताना आढळून येतात; परंतु त्यांची लुटालूट मेवातींच्या लुटारूपणापेक्षा वेगळी होती हे उघड आहे.

इ० स० १६६९ मध्ये जाटांनी औरंगजेबाच्या सत्तेवर पहिला प्रहार केला.[१] त्यांचे पारिपत्य शहानशहाने अत्यंत कठोरतेने केले. ह्या बंडाच्या नेत्याला ठार करून त्याचे कुटुंब बाटवण्यात आले. जाट ह्या पारिपत्याने नामोहरम मात्र झाले नाहीत. एक-दीड तपात त्यांनी पुन्हा उठावणी केली, आणि ह्या वेळी अकबराचे थडगे लुटून त्याची हाडे यांनी अग्नये स्वाहा केली.[२] जाटांची बंडे, लुटालूट, त्यांचे कठोर पारिपत्य हा क्रम बराच काळ चालू राहिला. अखेर अठराव्या शतकाच्या मध्यावर भरतपूर येथे जाटांचे राज्य स्थापन झाले.

१. अॅडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ४९७
२. ऑक्सफोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान ४२८

मथुरेच्या जाटांप्रमाणेच बुंदेले रजपूतही बंड करून उठले. सत्ताधीश बादशहाच्या गादीच्या वारसाहक्काबाबत सदैव होणाऱ्या कलहसंग्रामात बुंदेल्यांना सत्ता व प्रतिष्ठा लाभलेली होती. अकबराचा मित्र व आवडता सेवक अबूल फजल ह्याचा खून सलीमने बुंदेल्यांकडूनच करवला होता.[१] जहांगीरच्या कारकीर्दीत त्यांनी मथुरेला केशवदेवाचे भव्य मंदिर बांधले; पण बापाचा मित्र तो आपला शत्रू ह्या विचित्र मोगल रिवाजामुळे शहाजहानचे त्यांच्याशी वितुष्ट आले. कडव्या औरंगजेबाने त्यांचे मंदिर पाडून तेथे मशिदीचा पाया घातल्यावर बुंदेल्यांनी बंडाला सुरुवात केली. छत्रसाल ह्या बुंदेल्यांचाच वंशज होता.

दिल्लीच्या परिसरातले तिसरे बंड सत्नामींचे होते. सत्नामींमध्ये अतिशूद्रांचाही भरणा होता.[२] ते अत्यंत सरळमार्गी होते, पण अन्याय त्यांना सहन होत नसे. एका सत्नामीचा मोगल शिपायाने खून केल्यामुळे हे बंड उभे राहिले. मात्र ह्या लोकांना युद्धशिक्षण नसल्याने ह्यांचे बंड तेव्हाच मोडून काढण्यात आले.

ह्या बंडांना जनतेची अपार सहानुभूती असावी. केवळ प्राणच नव्हे तर जातिबहिष्काराचा धोका पत्करूनही मथुरेच्या एका पंड्याने संभाजीबरोबर दहीपोहे खाल्ले ते ह्याच सहानुभूतीने. जसवंतसिंगाचा खून करून त्याच्या तान्ह्या पोराच्या जिवावर उठलेल्या बादशहाला मुठभर रजपुतांनी चणे चारले ते ह्याच जनतेच्या सहानुभूतीच्या जोरावर.

औरंगजेबाची कारकीर्द ह्या बंडांनी व्यापलेली आहे. सत्नामी सोडता, बाकी कुठलेही उठाव बादशहाला मोडून काढता आले नाहीत. बंडांचे प्रदेश मुख्यतः दिल्ली परिसरात राजस्तानच्या परिसीमेवर होते. ह्या बंडांना काही समान असेल तर राजसत्तेच्या जुल्माचा विद्वेष, ह्या अन्यायांना तोंड देणे जरूर आहे ही लोकांना झालेली जाणीव, भक्तिमार्गाने शूद्रातिशूद्रांना मोकळा केलेला युद्धाचा मार्ग, आणि सत्याचा वाली परमेश्वर आहे ही जनतेची प्रगाढ श्रद्धा. ह्या विद्रोहाचे स्वरूप मुख्यतः लुटालुटीचे असे. शिवाजीला विदेशी इतिहासकारांनी लुटारू म्हटले. जाटांबद्दल सर यदुनाथ तेच म्हणतात. "अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जाट राज्य (state) नव्हते... होता फक्त एक लुटारू नेता व लुटीमुळे त्याच्याकडे आकर्षित झालेले सामाजिक प्रतिष्ठेतले त्याचे समानधर्मी."[३] लुटारू म्हणवले गेलेल्या बुंदेल्यांनीही राज्यस्थापना केल्याचे आपण पाहिले आहे. हे विद्रोह औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत चालू राहिले.

औरंगजेबाच्या मृत्यूमुळे त्याच्या हिंदू प्रजाजनांना हायसे वाटले असल्यास नवल नाही. तथापि दुबळ्या मोगल सत्तेपेक्षाही हिंदू विद्रोही जास्त दुर्बल होते.

---

१. ऑक्स्फोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान ३६४

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी आफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ४९८

३. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४२

त्यांच्यात एकी नव्हती. त्यांच्या विद्रोहाचे ध्येय प्रतिकाराचे व निषेधात्मक होते, स्वराज्यस्थापनेचे व विधायक नव्हते. त्यामुळे उत्तरेत अस्वस्थता व दंगधोपे चालू राहिले. रजपुतांच्या स्वभावविशेषामुळे त्यांची अंतर्गत यादवीही चालू राहिली. अशा ह्या अराजकात मराठ्यांनी १७३० च्या सुमारास पाऊल टाकले, ते दिल्लीच्या रोखाने. त्यांचा मार्ग चंबळेच्या परिसरातून, माळवा व मध्य-भारतातून होता.

मराठ्यांपासून इतिहासाने मोठ्या अपेक्षा कराव्या हे स्वाभाविक होते. मराठ्यांचा विद्रोह विधायक, ध्येयवादी विद्रोह होता. स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या शिवाजीने स्वतंत्र राज्य स्थापून महाराष्ट्रात जीव ओतला होता. ह्या शाश्वत व चिरंतन मूल्याची प्रतिष्ठापना करताना शिवाजीला कठीण परिस्थितीशी सामना करावा लागला व यशस्वी होण्यासाठी सामान्यांची सहानुभूती व साहाय्य मिळवावे लागले. 'मराठा तितुका मेळवावा' ह्या सूत्राऽला मराठा सामान्य जन आहे. किल्ल्याच्या 'पाळी' नीट न बांधण्याबद्दल शिवबावर ठपका ठेवणाऱ्या शेतकरी स्त्रीचे कौतुक ह्याच परिपाटीत झाले. शिवाजीच्या वेळीं जनतंत्राची (democracy) कल्पना कोणालाच नव्हती; तथापि शिवाजीचे मित्रमंडळ व राज्यस्थापनेनंतर अष्टप्रधानमंडळ ही दोन्ही त्याची सत्ता लोकानुवर्ती करीत असत. सर्व जातींना राज्यकारभारात शिवाजीने योग्य तो भाग देऊन त्यांच्यात आपल्या राज्याबद्दल आपुलकी निर्माण केली होती. लोकानुवर्ती सत्तेचा तेथील प्रजेला अभिमान असतो. त्यातूनच नवीनवी प्रज्ञावंत माणसे निर्माण होतात; आणि समाजाचे नेतृत्व चिरतरुण राहते. ह्या असल्या अभिमानातूनच "महाराज गडावर पोचले. आता मी सुखाने प्राण सोडीन!" असे म्हणणारा बाजी प्रभू, "आधी लगीन कोंडाण्याचे, मग रायबाचे" म्हणणारा तानाजी व त्यांच्या जातीची शेकडो माणसे महाराष्ट्रात जन्माला आली. ह्याच ध्येयवादातून महाराष्ट्राचे स्वतंत्र प्रज्ञेचे नवे नेतृत्व राजाराम, संताजी, धनाजी व असल्या शेकडो व्यक्तींच्या रूपाने निर्माण झाले.

शिवाजीच्या राज्यकारभाराची ही घडी लोकानुवर्ती होती. त्याची सेनाही राष्ट्रीय स्वरूपाची होती. त्या सैन्यात मुख्य भरणा मावळे व हेटकरी लोकांचा असे. हे लोक शेतकरी असत. त्यांना आपल्या सैनिक सेवेचे भूषण वाटे. मराठा सैन्याची पद्धत गनिमी काव्याची होती, व त्यात मुख्यतः घोडदळाचा उपयोग होई. हे घोडेही त्यांचे स्वतःचे असत. ते युद्धाला बाहेर पडत स्वराज्यासाठी. ध्येयासाठी सर्वस्वत्याग करण्याची त्यांची तयारी असे. तरीही सैनिकी पेशा त्यांच्या उपजीविकेचे साधन मात्र नव्हता.

मराठ्यांचा राजा औरंगजेबाने छळ करून ठार केल्यावरही दरिद्री मराठी फौजांनी औरंगजेबाच्या सर्व सरंजामाने युक्त अशा प्रचंड फौजांना पंचवीस वर्षे यशस्वितेने तोंड देऊन त्याला जेरीस आणले व आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचा प्रत्यय आणून दिला. त्यामुळे मरत्या मोगल साम्राज्याचे वारस मराठे होतील अशी अपेक्षा कोणालाही असणे स्वाभाविक होते.

ह्या अपेक्षा नंतर घडलेल्या घटनांनी फोल ठरविल्या. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांमध्ये कलह निर्माण करण्याच्या हेतूने शाही कैदेतून शाहूची मुक्तता करण्यात आली. ही मराठ्यांची अग्निपरीक्षा होती. संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे धैर्य व प्रज्ञा अप्रतिहत राहिल्यामुळे मराठेशाहीने आपल्या संरक्षणार्थ अनेक परंपरा व त्या कार्यवाहीत आणणारी अनेक माणसे निर्माण केली होती. आता ती प्रज्ञा जागृत असती तर मराठेशाहीतील गृहकलह टळला असता. दुर्दैवाने राजारामाची पत्नी ताराबाई व शाहू ह्यांच्यात गृहकलह झाला व शाहूची सरशी झाली. मोगलांच्या कैदेत बालपण व्यतीत केलेल्या ह्या नव्या राजाला महाराष्ट्राच्या दोन पिढ्यांच्या स्वातंत्र्यपरंपरांचा वारसा मिळालेला नव्हता. त्याला अधिकाराने चार शब्द सांगू शकणारी एकच व्यक्ती मराठेशाहीत होती : मराठेशाहीच्या प्राणासाठी दोन तपे पतीच्या खांद्याला खांदा लावून लढणारी त्याची काकी ताराबाई! पण ती पराजित होऊन शाहूला दुरावली होती. जुने कार्यकर्ते कालवश झाले होते वा ताराबाईच्या पक्षाला मिळाले होते. शाहूने नवीन नेमलेला बाळाजी विश्वनाथ बुद्धिमान होता, पण स्वातंत्र्याच्या ध्येयाशी तोही अपरिचित होता. त्यामुळे पुढे योग्य दिशेने पाऊल उचलण्यास लागणारी अंतर्दृष्टी मराठ्यांना राहिली नाही. "साम्राज्य स्थापण्याचा दृढनिश्चय औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्यांना करता आला नाही."[१] त्यांनी स्वातंत्र्याला तिलांजली देऊन १७१४मध्ये बादशहाशी तह केला. मराठ्यांच्या परंपरांशी त्या तहाचा मूलभूत विरोध होता हे त्याची कलमे विशद करितात.[२]

१. मोगलांनी जिंकलेला शिवाजीचा सर्व मुलूख, त्याशिवाय खानदेश, गोंडवन व वऱ्हाडचे सुभे त्यांना मिळावेत. मराठ्यांनी जिंकलेले कर्नाटक व हैद्राबाद त्यांच्याकडे राहावेत.

२. दक्षिणच्या सहाही सुभ्यात चौथाईचे व सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांना असावेत. त्याच्या मोबदल्यात मराठ्यांनी एक लाखाचा करभार बादशहाला द्यावा, आणि दक्षिणेत शांतता व सुव्यवस्था राखावी.

३. १५,००० घोडदळानिशी बादशहाच्या सेवेत हजर राहावे.

शिवाजीनेसुद्धा पंचहजारी मनसब घेतली होती; पण तेव्हा त्याला शक्तिशाली मोगल साम्राज्याशी सामदामदंडभेदादी सर्व उपायांनी लढणे भाग होते. उलट शाहूच्या वेळी भारत पादाक्रांत करण्याची कुवत असूनही मराठ्यांनी तशी भाषा केली नाही.[3] ह्या तहानंतर मराठे दिल्लीला गेले, "नृपकर्त्यांचे (king-maker) सहकारी व साहाय्यक म्हणून व आपणही एक दिवस नृपकर्ते होऊ ही आशा मनी बाळगून."[४]

---

१. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४३

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४४

३. मराठे आणि इंग्रज : न० चिं० केळकर; पान १०३

४. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४४

ह्यानंतर मराठ्यांची मान लुटूपटीच्या दिल्लीश्वरांना लीलेने कुर्निसात करावयास शिकली. बादशाहीला संरक्षण देऊन सर्वत्र चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार त्यांनी मागितले; व ह्या आधिकारांच्या वसुलीसाठी मराठी फौजा सर्व भारतभर हाहाकार पसरीत फिरल्या. आजहि बंगाल, ओरिसा, राजस्तान, पंजाब अशा विविध समाजांना महाराष्ट्राबद्दल उपेक्षा आहे. आजही बंगालमध्ये मराठा डिच अस्तित्वात आहे. 'बोर्गी एलो' किंवा 'हौ-हौ आया'[1] असे भय घालण्याचे शब्दप्रयोग चालू आहेत.

स्वातंत्र्याचे ध्येय नष्ट झाले तरी पहिल्या बाजीरावाच्या वेळी हिंदूपद्पादशाहीचे स्वप्न कायम होते. ह्या ध्येयामुळे मराठा सेनानींना बहुसंख्य हिंदू प्रजेबद्दल आपुलकी वाटत होती व प्रजेला त्यांच्याबद्दल प्रेम होते. ह्या सूत्रामध्येही सारा भारत मराठ्यांना गुंफता आला असता व एक बलाढ्य हिंदू राज्य स्थापिता आले असते. बाजीरावाने इ० स० १७३३ मध्ये माळवा पादाक्रांत केला, तेव्हा "जीवित व वित्त ह्याची प्रचंड हानी सोसूनही स्थानिक हिंदू जमीनदारांनी त्याला खूप मदत दिली."[2] हेही स्वप्न त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ह्याने पायदळी तुडवले. त्यानंतर मराठे सर्वदूर स्वाऱ्या करीत फिरले, त्यांच्या हातात ताकत होती म्हणून; पण त्यांनी पराजित प्रजा आपली मानली नाही, प्रजेला त्यांचा अभिमान वाटला नाही.

अशा ह्या मराठी राज्याला लोकाभिमुख राहण्याची जरूर वाटेना. शिवाजीने बांधून दिलेल्या शासनपद्धतीत क्रमशः परिवर्तन झाले. प्रथम मंत्रिमंडळ जाऊन सत्ता एकट्या पेशव्याच्या हाती एकवटली. शाहूच्या मृत्यूनंतर तर सातारचे राजे पेशव्यांच्या हातचे बाहुले बनले.

मराठ्यांच्या सैन्याचेही स्वरूप नानासाहेबाने बदलले. मराठी गनिमी काव्याची पद्धत संरक्षक स्वरूपाची होती. नवीन आक्रमक धोरणासाटी तोफखान्याची आवश्यकता पेशव्यांना वाटली. तोफखान्याच्या उपयोगासाठी पायदळाची आवश्यकता असते. पायदळामध्ये मराठा सैनिकांना स्थान मिळाले नाही. पायदळात मराठेतर शिद्दी, हबशी, अरब, पठाण, गोसावी, पुरभय्ये—अशा विविध जातींच्या पोटार्थींचा भरणा करण्यात आला. "सैन्याची राष्ट्रीयता नष्ट झाल्यावर ही विविध परकी तत्त्वे योग्य त्या अनुशासनाखाली ठेवण्याचे कार्य सुलभ राहिले नाही."[3] हे सैनिक आपल्या धन्याशी अत्यंत एकनिष्ठ असत. राणी लक्ष्मीबाईला अखेरपर्यंत साथ देणारे सैनिक

---

१. बोर्गी एलो (बंगाली)—बारगीर आला.
हौ हो आया (पंजाबी)—भाऊ (सदाशिवराव) आला.
[नीज न येणाऱ्या मुलाला भय घालतांना वरील शब्द वापरण्यांत येतात.]

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४५

३. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५४७

अस्त्र होते.[1] मात्र पगार देणाऱ्या सेनापतीखेरीज इतर कोणाचाही हुकूम त्यांना मान्य नसल्याने सैन्याची एकता नष्ट झाली व राष्ट्राच्या संरक्षणाऐवजी अखेरीला त्याचा उपयोग यादवी युद्धात मात्र झाला.

स्वातंत्र्याच्या, धर्मसंरक्षणाच्या कल्पना मराठ्यांना इतक्या परकी झालेल्या होत्या की सारा उत्तर भारत पादाक्रांत करताना निझामच्या राज्यात राहिलेली पैठण-परळीसारखी तीर्थक्षेत्रे त्यांनी घेतली नाहीत. त्यांच्या फौजा अटकेवर झेंडे लावून आल्या; पण पादाक्रांत प्रदेशात स्वस्थता, धार्मिक स्वातंत्र्य, सुबत्ता ह्यांची प्रस्थापना करण्याचे त्यांना सुचलेही नाही. नानासाहेब तुर्काइतकाच असंस्कृत ठरला. मराठ्यांच्या दरबारी विद्याव्यासंगाला उत्तेजन मिळाले नाही. गणित, राज्यशास्त्र यासारख्या शास्त्रांचे राहो, पण नव्याने अनुकरण केलेल्या लष्करी तंत्राचा आमूलाग्र अभ्यासही पेशव्यांनी केला वा करवला नाही.

बंदुका विदेशातून खरीदल्या जात. तोफा ओतणारे कारागीर विदेशी व विधर्मी असत. दारूगोळ्यासाठी लागणारा सोरा भारतातून निर्यात होई.[2] पण महाराष्ट्रात त्याचे कारखाने उघडण्याचे विशेष प्रयत्न झाले नाहीत. जी हत्यारे घडता आली नाहीत, त्यांच्यात सुधारणा करण्याची अक्कल सुचणार कोणाला? ज्या तोफखान्याच्या नावावर सैन्याची राष्ट्रीयता गमावण्यात आली, त्याच्या दारूगोळ्यात काटकसर करीत राहिल्याने त्याचाही योग्य उपयोग झाला नाही.[3] तोफखान्याला तंत्र असते हेच ज्यांना उमजले नाही, ते ते आत्मसात काय करणार?

उत्तरेत अटकेपर्यंत जाताना मराठा सरदारांनी मार्गावर ठिकठिकाणी सत्ता प्रस्थापित केल्या. शिंद्यांचे संस्थान ह्या मार्गावर होते. महादजी शिंदे शूर व कर्तृत्ववान होता; पण त्यालाही विद्येचा गंध नव्हता, विचारांची जोड नव्हती, प्रज्ञेचा पाठिंबा नव्हता. त्यामुळे वाटेत आलेले छोटे राजे जिंकावेत, त्यांच्याकडून खंडणी घ्यावी, सैन्याकडून लुटालूट करवावी व त्या राजालाच मांडलीक म्हणून राज्य परत करून पुढे जावे असा प्रकार अथपासून इतीपर्यंत चालत राहिला. लुटालुटीचे काम करावयास नंतर स्वतंत्रपणे पेंढारी उपयोगात आणले, इतके मराठ्यांना लुटीचे महत्त्व वाटले असावे.

मराठ्यांचे झेंडे अटकेला लागले. पण त्यांच्या ध्येयहीन धोरणामुळे तिथे टिकले मात्र नाहीत. अहमदशहा अब्दालीशी झालेल्या पानिपतच्या संग्रामात मुसलमानांची एकी झाली. हिंदू मात्र मराठ्यांपासून अलिप्त राहिले, आणि मराठा फौजा जबर मार खाऊन परतल्या. मराठ्यांच्या आधिपत्याखाली वैभवशाली हिंदू राज्य स्थापण्याची संधी मराठ्यांना साधता आली नाही.

---

१. राणी ऑफ झाशी : डी० व्ही० ताम्हणकर.

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ५७३

३. मराठे व इंग्रज—उपोद्घात : न० चिं० केळकर; पान ६

परत आलेले हे सैन्य मोठ्या प्रमाणात शिंद्यांच्या राज्यात, आजच्या ग्वाल्हेरच्या भागात स्थायी झाले. मराठी फौजा मूळच्या अनुशासनहीन, त्यात आता पराजित होऊन, अनेक कष्ट सोसून आलेल्या सैन्याने ग्वाल्हेरसभोवार लुटालूट करणे स्वाभाविक होते. त्यातूनही हाडाचा माणूस असलेला मराठा 'बरहुकुम वेधडक'[1] तलवार चालवायला नालायक ठरून त्याच्या जागी 'तापट, तल्लख, कडवा व अविचारी' हिंदुस्थानी शिपाई भरती झाला होता. ह्या शिपायाने जनतेवर मराठ्यांच्या नावावर भरपूर अत्याचार केले. आजही उत्तरेची राज्ये महाराष्ट्राला ह्या अत्याचारांबद्दल जबाबदार धरतात.

ज्यांनी संरक्षण द्यावे, त्यांनीच अशा तऱ्हेने प्रजेला नागवले; हा आघात चंबळेच्या परिसीमेवरील प्रदेशात त्याच्या भौगोलिक स्थानामुळे विशेषत्वाने झाला. मराठ्यांना प्रतिकार करण्यासारख्या शक्ती त्या वेळी उत्तरेत उरल्या नव्हत्या. मोगल राजसत्ता कोसळली होती. त्यांचे नबाब बहुतेक नालायक निघाले. सतारिये, सारंगिये, नाचे पोरे, नृत्यांगना, जनानखाना ह्याच्यात त्यांचा वेळ जाई. राज्यकारभाराच्या आज्ञा जनानखान्यातल्या दासींकडून बाहेर पोचवल्या जात. ह्या नबाबांना आपल्या नातलगांचेच काय पण पोरांचेही भय वाटे: "कोणी सांगावे, जिवावर उठतील एखादेवेळी." कुठल्याही कारभारात लक्ष घालणे त्यांच्या जिवावर येई.[2] सतारिये, सारंगिये, नृत्यांगना ह्यांचे नबाबांवर खूप वजन असे. गुन्हेगार ह्या लोकांना पैसे चारून आपल्या मुठीत ठेवीत आणि प्रजेवर पाहिजे तो जुलूम करायला मोकळे होत.

नबाबांच्याशिवाय बाकीच्या मुसलमानांची स्थिती फार वाईट होती. त्यांच्यापैकी बहुतेकांचा चरितार्थ सरकारी नोकऱ्यांवर चालत आला होता. सरकारी नोकऱ्या अंदाधुंदीमुळे संपुष्टात आल्यावर ते हतबद्ध झाले व व्यसनाच्या गर्तेत अधिकाधिक फसत गेले. मराठ्यांनी निदान सुरुवातीला मोगल बादशाहीला चुचकारून घेतले व नंतरच्या एका पिढीत मोगल संपूर्णतः नादान बनले.

रजपुत राजांच्याही शौर्याच्या परंपरा निमाल्या होत्या. आपले अकराही पुत्र रणकुंडात बळी देणारा भीम राजपुतान्याला आता परिचित नव्हता. ह्या लढवैय्या क्षत्रिय राजांच्या फौजेतही सिंधी, पठाण, अरब, गोसावी ह्यांचा भरणा झाला होता. अंगमेहनत त्यांनी कधीच केली नव्हती, आता युद्धकलाही त्यांना पारखी झाली. त्यांचे अफूचे व्यसन अतिरेकाला गेले. परस्पर वैरे, लुटालूट ह्यांना ऊत आला. पद्मिनी, कर्णावती, यशोमती अशा कर्तृत्वशाली स्त्रियांची परंपरा नष्ट झाली होती. ह्या अधःपाताने कोणती सीमा गाठली होती हे कृष्णाकुमारीला तिच्या पित्याने युद्ध व रक्तपात टाळण्यासाठी विष घालून मारली ह्यावरून समजते. त्याचवेळी मूसामदतसारखी[3]

---

१. मराठे आणि इंग्रज—उत्तरार्ध : न० चिं० केळकर; पान ५०

२. ओरिजिन ऑफ पेंडारीज : ॲन ऑफिसर ऑफ द कंपनी; पान १३३

३. ॲनल्स ऑफ राजस्थान—भाग २ : जेम्स टॉड; पान ४२४

भाड्याने मिळणारी पथके पूर्व भारतात सर्वत्र असत. त्यांचा उपयोग रजपुत राजांनी परचक्राला तोंड देण्यासाठी नव्हे तर आपल्या सरदारांना भरडून काढण्यासाठी केला.

रजपूत राजे हे युद्धकलेत आणि युद्धप्रसंगी क्षात्रवृत्ती रजपुतांचे नेते होते. थोडी शेती करावी, पण चरितार्थ मुख्यतः सैनिकवृत्तीवर चालवावा ह्या त्यांच्या परंपरा होत्या. रजपूत राजे आपल्या कर्तव्यापासून च्युत झाल्यावर रजपुतांची परंपरागत सैनिकवृत्ती प्रायः नष्ट झाली, आणि प्राणाची पर्वा न करणारा, युद्धकलेत निष्णात आणि शूर असा रजपूत उपजीविकेच्या साधनाविना बेकार होऊन त्याची उपासमार होऊ लागली. त्याचे नेतृत्वही नष्ट झालेच होते; शिवाय त्याला कोणी अडपता-दडपताही राहिला नव्हता. अनुशासनमुक्त झालेल्या मांसपेशी अखेर कॅन्सरच्या रूपाने शरीराच्या नाशाला कारणीभूत होतात. अमृततुल्य दूध नासले तर विष होते. तोच प्रकार रजपुतांचाही झाला. समाजाला सतत संरक्षण व शांतता देणाऱ्या रजपुतांनी स्वतंत्रपणे मुलूखगिरी करण्यास सुरुवात केली. छोटे-छोटे जमीनदार, त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यास सिद्ध झाले. सूड म्हणजे समोरासमोर युद्ध करून शत्रूला पराजित करणे नव्हे; तर सूड म्हणजे शत्रूच्या मुलुखात जाळपोळ, लुटालूट करून त्याला जेरीस आणणे, त्याच्या पाठीवर वार करणे.

ह्या तऱ्हेचा सूड घेण्यात सूड घेणाराचे तिहेरी फायदे असत. त्याला स्वतःला रसद व पैसा मिळे. शत्रूच्या मुलुखात दंगल माजून त्याला करभार मिळणे कठीण होई व तो दुर्बळ होई. प्रजासंरक्षणास तो अपात्र ठरल्याने प्रजेचा त्याच्यावरचा विश्वास उडून जाई. दंगल करणाराची कारवाई यशस्वी झाल्यास त्याच्या निशाणाखाली जास्त लोक जमत, त्याच्या दंगलीचे प्रमाण वाढत जाई.

'सूड घेण्याची भाषा' आपल्याला मोठी तर्कशुद्ध व न्याय्य वाटते. अन्याया-विरुद्ध विद्रोह करणारांबद्दल आपल्याला अत्यंत आदर असतो. ह्या विद्रोहाच्या—बगावतीच्या—कहाण्या इतिहासाच्या पानोपानी विखुरल्या आहेत.

अवधचा एक तरुण लुटारू, भारताचा आवडता खेळ 'भूमियावत' मस्तीत खेळत होता. त्याच्या कल्पनेप्रमाणे त्याच्या मालकीची असलेली पण आता इतरांनी कब्जा केलेली जमीन ही त्याला कारण असे. तो राहून-राहून त्या जमिनीसाठी दंगल माजवी. त्या जमिनीत कोणी नांगर घातल्यास त्याला प्राणास मुकावे लागे. नांगर घालणाराचे खेडे व तेथील पिके तो उद्ध्वस्त करी. तेथील जनावरे तो हाकून घेऊन जाई. हा उपद्रव करण्याचा उद्देश "सरकारला न्याय देण्यास भाग पाडण्याचा होता." [१]

राजपुतान्यात शेतकरी कुळांनी रखवाली ठेवण्यास सुरुवात केली. हातांत भाला, मांडीखाली घोडा एवढ्या सरंजामावर एखाद्या शूर रजपुताभोवती कुळांचा

---

१. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान ३०

गराडा पडे. पुढे ह्या रखवालींचीच एक नवी जमात उभी राहिली. तेच कुळांचे मालक होऊन बसले. त्यांच्या टापूतून एक गाढव सामान न्यावयाचे तरी ते जकात मागत. ह्या रखवालींनी जागोजाग आपल्या गढ्या—भुइकोट किल्ले—बांधल्या. त्यांची आपसात वैरे-वैमनस्ये चालत. त्यांना इतर रखवाली घराण्यांची नावेही शत्रुवत वाटत. ते परस्परांच्या गाव-गढ्यावर हल्ले करीत. ज्याचा पराजय होईल त्याच्या प्रदेशात रक्तपात व लुटालूट होई. ह्या कत्तलीतून बायकापोरेही सुटत नसत.[1]

ज्यांच्या जहागिरी युद्धानंतर जप्त होत, तेही ह्या अन्यायाचे परिमार्जन करण्याच्या उद्देशाने दंगल व लूट करीत राहत. त्यातलाच एक अटोवाचा सरदार डुंगरसिंग होता. मराठ्यांनी त्याची जहागीर हस्तगत केल्यावर तो दूरपर्यंतचा प्रदेश लुटीसाठी पायतळी तुडवीत असला तरी त्याच्या मुख्य गरजा मराठा मुलखातून भागत. 'डुंगरसिंग आया' ह्या शब्दांनी भयभीत होऊन लोक पळून जात. आपल्या शौर्याची बढाई त्याने मारली नाही. पण आपण काही लाजिरवाणे कृत्य करतो असेही त्याला वाटले नाही. ह्या दंगलीने संत्रस्त होऊन होळकरांनी प्रथम त्याची चार खेडी परत केली. पण दीड तपाने पुन्हा हा पट्टा रद्द झाला, तेव्हा आपला परिवार इतरत्र सुरक्षितपणासाठी पाठवून डुंगर व त्याचा बाप सूड घेण्यासाठी सिद्ध झाले. त्यांच्याभोवती लढाऊ लोकांचा जमाव जमला. हे लोक मराठ्यांच्या मुलुखात दूरदूर जाऊन लूट आणीत. इतिहासकार म्हणतो, "मेवाडचा प्रत्येक प्रमुख डुंगरप्रमाणे वागता तर मराठ्यांच्या टापांखाली पुष्कळच कमी प्रदेश तुडवला जाता."[2]

'भैसारोरचा विजयसिंग' हा एकोणिसाव्या शतकातला असाच एक शक्तिशाली लुटारू. त्याच्याबद्दल टॉड म्हणतो, "मला गतेतिहासाचे सखोल ज्ञान नसते तर त्याच्याबद्दल माझे मन कलुषित झाले असते. कारण मला मिळणाऱ्या माहितीप्रमाणे तो एक लुटारू असून त्याला लुटारूंना योग्य अशीच शिक्षा देणे योग्य ठरेल...मराठ्यांनी चारी बाजूंनी वेढलेला असूनही आपल्या गढीतून आपल्या तीक्ष्ण भाल्याच्या जोरावर तो ठोशाला ठोसा देत आहे."[3]

ही परंपरा इंग्रजांच्या कालखंडातही कायम राहिली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात गंभीरसिंग नावाच्या डाकूने ग्वाल्हेर संस्थानाला फार उपद्रव दिला. त्याबद्दल सरकारी अहवालात पुढील माहिती आढळते :[4]

"ह्या (ग्वाल्हेरच्या) प्रदेशात आपला विशेष अधिकार असावा अशी त्याची

---

१. ॲनल्स ऑफ राजस्थान—भाग १ : जेम्स टॉड; पान ३७८

२. ॲनल्स ऑफ राजस्थान—भाग २ : जेम्स टॉड; पान ५१४

३. ॲनल्स ऑफ राजस्थान—भाग २ : जेम्स टॉड; पान ५२५

४. स्टॅटिस्टिक्स ऑफ क्राइम ऑफ डेकॉयटिज इन् ब्रिटिश टेरिटोरिज ॲंड डिपेंडंट स्टेट्स, अपेंडिसेस, पान २१

समजून दिसते. तो स्वतःला साधारण गुन्हेगार नव्हे तर आपल्या हक्कासाठी लढणारा योद्धा समजतो."

ब्रिटिश सत्तेबद्दल हमीरपूर जिल्ह्यातील डाकू देशपत व नन्हे दिवाण ह्यांची भूमिका हीच होती. गंभीरसिंगाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा प्रतापसिंग ह्याने बापाचे कार्य चालू ठेवले. हे 'सूड घेण्याचे' कार्य आजही चंबळ घाटीत चालू आहे. म्हणूनच "आम्हाला डाकू म्हणू नका. बागी—विद्रोही—म्हणा." असा 'आत्मसमर्पितां'चा आग्रह आहे.

ह्या परिस्थितीत दुष्ट अनैतिक पायंडे एकदा पडू दिल्यावर काळाबरोबर ते वाढत मात्र गेले. मराठ्यांच्या सेनांबरोबर लूट करण्याची परवानगी देऊन बाळगलेल्या पेंढाराचा हाच प्रकार झाला. सेना व युद्ध दोन्ही नसतानाही पेंढारी लुटालूट व अत्याचार करू लागले व त्यांची दखल कोणीच घेतली नाही.

पेंढार शब्दाच्या बहुविध व्युत्पत्ती असल्यामुळे हा शब्द अनिश्चित उपपत्तीचा आहे, हेच एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचे म्हणणे खरे वाटते. पेंढाऱ्यांनी इतिहासात केव्हा पाय ठेवला सांगता येत नाही. "पेशव्यांच्या नियमित सैन्याबरोबर परवानगी दिलेल्या लुटारूंची झुंड असे, तिला पेंढारी म्हणत." असे न्यायमूर्ती रानडे म्हणतात. "पेंढारी हे घोडेस्वार असत, अडपझडप लुटीवरच ते आपला चरितार्थ चालवीत. त्यांच्या लुटीचा ठराविक हिस्सा त्यांना सरकारात भरावा लागे."[1] अठराव्या शतकाच्या अखेर नर्मदेच्या उत्तरेला शिंद्यांनी त्यांना जहागिरी दिल्या. महादजीसारखा कर्तृत्ववान शूर सेनानी मेल्यानंतर दुबळ्या दौलतरावाचा पेंढाऱ्यांवर वचक राहिला नाही. स्वकीय, परकीय, असा भेदभाव न करता त्यांनी भारतभर नंगा नाच घातला.

पेंढारी काटक व चपळ असत. त्यांची घोड्यावरची मांड उत्तम असून ते रोजची पन्नाससाठ मैलांची दौड करीत. जरूर तेव्हा स्वार व घोडा दोघेही अफू खात. त्यांची भूक चण्याचुरमुऱ्यावर भागू शके. हल्ला झाल्यास तोंड देण्याचा त्यांचा रिवाज नव्हता. पाहता-पाहता त्यांची टोळी वितळून जाई व इतरत्र पुन्हा गोळा होई.[2]

सर्व पेंढारी मुसलमान होते. त्यांची परिभाषा दर्री लहबर ही उर्दूच आहे. ते अत्यंत निर्दय असत. मोहिमेवर निघताना त्यांच्या टोळ्या कधी शेकड्याने तर कधी हजाराने मोजता येत. त्यांची लुटीची योजना पद्धतशीर असे. लुटीचे स्थळ आधी निवडून दोन-तीन हजार पेंढार, रोज चाळीसपन्नास मैलांची वाटचाल करून इष्ट प्रदेशात झंझावाताप्रमाणे पोचे. तेथे लहान-लहान टोळ्या बनवून ते पंख्याच्या आकारात सर्वत्र पोचत व ग्रस्त प्रदेश धुवून काढून, उरलेले सर्व जाळून उध्वस्त करीत. "मागे टाकलेल्या पेटवलेल्या खेड्यांच्या धुरावरून त्यांचा प्रवासमार्ग ओळखता येई आणि

---

१. मराठे आणि इंग्रज—उत्तरार्ध : न० चिं० केळकर; पान ४८

२. ऑरिजिन ऑफ दी पेंढारीज : ॲन ऑफिसर ऑफ दी कंपनी, पान १२२

पुरुषांच्या विव्हळण्याने व स्त्रियांच्या क्रंदनाने तो निनादत राही."[1] "अमानुष निर्दयतेने ते पतीच्या व पित्याच्या देखत स्त्रियांना व मुलांना भ्रष्ट करीत वा मारून टाकीत."[2] लुटीसाठी पेंढारी दूरदूर जात. मच्छलीपट्टणच्या एका धाडीत त्यांनी "३३९ खेडी लुटली, ६८२ माणसे मारली वा घायाळ केली. ३६०० लोकांवर अत्याचार केला व अमाप संपत्ती लुटून नेली.[3] लुटून आणलेला माल उज्जैन, इंदूर येथील व्यापाऱ्यांना विकला जाई, पेंढाऱ्यांच्या छावणीत माल उघडपणे विक्रीला ठेवण्यात येई."[4]

महाराष्ट्रही पेंढाऱ्यांच्या अत्याचारातून सुटला नाही. "नागपूरहून जवळच कुह (कुही) म्हणून गाव आहे. येथून बातमी आली की चारपांच हजार पेंढार येऊन तमाम गाव लुटले व चिनोर म्हणून गाव आहे तेथे ५–७ बायकांनी जीव दिल्हे व दोन-तीन बायका धरून मुक्कामावर नेल्या. नंतर आनखी मारीत जाऊन उमरेडची पेठ लुटली"[5] पेंढाऱ्यांच्या हातून मंदिरेही सुटली नाहीत. पेंढाऱ्यांना नमवण्याचे सामर्थ्य मराठेशाहीत कोणालाच नव्हते. उलट दौलतराव शिंद्यांना, इंग्रजांविरुद्ध पेंढारी आपल्या उपयोगी पडतील अशी आशा वाटे.

ह्या काळात पठाणांनीही पश्चिम भारतात खूप दंगल माजवली. पठाणात व पेंढारात फरक एवढाच होता की "पठाणांची संघटना, शासनसंस्था व राजे रजवाडे ह्यांच्यावर चरण्यासाठी होती"[6] त्यांच्याजवळ आवश्यक ते सैन्य व शस्त्रसामग्री असे. त्याच्या जोरावर राजांना जरब बसवून ते खंडणी वसूल करीत. त्यांच्या शक्तीचा अंदाज खालील आकड्यांवरून लागेल :[7]

पायदळ : ११,७७०
घोडदळ : ६,०००
तोफखान्याची माणसे : ५५०
तोफखाना—हावित्झर्स : ६
मॉर्टर्स : ६
१० पौंडी तोफा : ६१ (७ लोखंडी, ९ पितळी)
८ पौंडी : ९
लहान लोखंडी : ४०
छोट्या पितळी : डी ३/४ : ४०

---

१. ऑरिजिन ऑफ दी पेंढारीज : ॲन ऑफिसर ऑफ द कंपनी; पान १२१
२. ऑक्स्फोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया : व्ही० ए० स्मिथ; पान, ६२७
३. एनसायक्लोपीडिया ब्रिटॅनिका.
४. इंग्लिश रेकॉर्ड्स् ऑफ मराठा हिस्टरी–१८०९-१८१८ : सं० जदुनाथ सरकार; पान १९४
५. सिलेक्शन ऑफ् पेशवा दफ्तर : संपादक गो० स० सरदेसाई; पान १३०
६. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ् इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त, पान ७२५
७. इंग्लिश रेकॉर्ड्स् ऑफ मराठा हिस्टरी : १८०९-१८१९ : सं० जदुनाथ सरकार; पान ४८

त्यांच्यापैकी अमीरखानाचे वकील अनेकांच्या दरबारी असत. त्याने अमीरसिक्का नावाचे नाणेही पाडले होते. पठाणांनी राज्य स्थापण्याचे प्रयत्न केले नाहीत; त्यांना तेवढी खटपट नको होती. सर्वांच्या राज्यात हस्तक्षेप करावा, खंडणी घ्यावी, इतमामाने राहावे, एवढाच त्यांचा कार्यक्रम. कृष्णाकुमारीचा वध करण्याचा सल्ला देणारा पठाण अमीरखान हाच होता.

शिंद्यांपेक्षाही ह्या पठाण-पेंढारांचे अराजक वठणीवर आणणे इंग्रजांना जास्त कठीण गेले; तरी त्यांनी एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांचा निःपात केला. पेंढारी-पठाणांच्या जहागिरी मात्र १९४७ पर्यंत जिवंत राहून त्यांच्या "शौर्याची साक्ष" मध्यभारताला देत राहिल्या.

समाजात केव्हाही अराजक माजले म्हणजे त्या समाजाची मर्मस्थाने उघडी पडतात. त्याच्या गुणांचा ऱ्हास होतो; दोष विस्तारतात. सतराव्या शतकात निर्माण झालेल्या अराजकात हिंदू समाजाची हीन स्थिती झाली. हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करताना हिंदू धर्माने औदार्याने सर्वांना आपल्या पंखाखाली जागा दिली होती, त्यामुळे सर्वमान्य नीतिमूल्ये ह्या समाजाच्या पदरी पडली नाहीत. भ्रूणहत्या, नरबली अशा प्रथांनाही ह्या धर्माचे आधार देता येत. प्रत्येक समाजखंडाचा आचार वेगळा चालू राहिला. कुठलाही अनाचार "ज्याची त्याची चाल" ह्या तत्त्वाने चालू राहिला. त्यामुळे समाज विस्कळीत राहिला; माणसाला माणसाची पातळी लाभणे दुष्कर होऊन बसले. समता, न्याय, माणुसकी, स्नेह ह्यांच्यावर बेड्या पडल्या. अराजकात सर्वत्र धर्माचे लोक समभावाने तुडवले गेल्याने, धर्माच्या आधारावरही नवे नेतृत्व निर्माण झाले नाही. विरोधाला एकजुटीची धार आली नाही. प्रज्ञेला धुमारे फुटले नाहीत. ह्या काळात संत ज्ञानेश्वर झाले नाहीत, तुलसीदास नाहीत, चैतन्यदेव नाहीत. कलाविज्ञानाचा नाश पूर्वीच झाला होता. राजकीय अराजकाच्या जोडीला धार्मिक अराजक निर्माण होऊन समाज भांबावला व कपाळाला हात लावून स्वस्थ बसला.

हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करताना शंकराचार्यांनी संन्यासमार्गाचा प्रचार केला. बौद्ध धर्मात स्त्री-पुरुषाला कोणत्याही क्षणी भिक्षुवृत्ती धरून बौद्ध विहारात जाता येई; पण विरक्ती संपल्यावर लौकिक जीवनात परत येण्याची मोकळीक त्यांना असे. शंकराचार्यांचा संन्यासमार्ग जास्त पद्धतशीर पण कठोर होता. एकदा संन्यास घेतलेला माणूस आजन्म भगव्या वस्त्रात अडकून पडे. ज्या चक्रातून मुक्तता नव्हती त्या चक्रात कोणी शिरावे ह्याला मात्र काहीच धरबंध नव्हता.

शंकराचार्यांनी भारताच्या चार टोकांना चार आश्रम स्थापन करून दशपंथी संन्याशांची रचना केली. त्यापैकी गिरी पंथाचा दौलतगिरी तोतया महाराष्ट्राच्या परिचयाचा आहे. हे संन्यासी भिक्षापात्रावर अवलंबून राहत. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा फार असे. क्रमशः ह्या सुखी व आळशी जीवनाकडे अनेक लोक आकृष्ट झाले. संन्याशांचा सर्वत्र सुळसुळाट झाला. शंकराचार्यांच्या शैव संन्याशाचे

अनुकरण म्हणून वैष्णव वैरागी आले. अखेर त्यांच्या अनुकरणाने मुसलमान फकीरही तयार झाले.

ह्या विरक्त संन्याशांनी शस्त्रे केव्हा व कशासाठी धारण केली, हे निश्चित सांगता येत नाही. पण त्यांच्यात वैमनस्ये भरपूर असत. त्यांच्यात युद्धेही होत. पुरी व गिरी पंथीयांचे युद्ध कुरुक्षेत्रावर अकबरकाली झाले होते. इ० स० १७४० मध्ये संन्यासी व मुंडी (वैरागी) ह्यांच्यात युद्ध होऊन वैराग्यांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली. नागा म्हणजे नग्न साधूंचा एक विभाग प्रत्येक पंथात असे. फकिरात बुन्हाना (नग्न) फकीर असत. नागा त्यातल्या त्यात कडवे समजले जात. नागा साधू 'मदारी' व 'जलाली' पंथाच्या फकिरांची युद्धे नेहमीच चालत असत. इ० स० १७६० मध्ये शैव नागा व वैष्णव वैरागी हरद्वारला लढले. ह्या युद्धात वैराग्यांची कत्तल झाल्यावर ब्रिटिश राज्य स्थापन होईतो वैरागी हरद्वारला जाऊ धजले नाहीत.

हे संन्यासी-फकीर आपसातच लढते तर समाजाला त्यांची झळ पोचली नसती. पण पुढे लष्करात भरती होणे ही त्यांची वृत्ती झाली. प्रत्येक राजाच्या पदरी साधुसंन्याशांची पथके ठेवण्यात आली. शेतसारा गोळा करण्यासाठी विसाव्या शतकातही राजस्तानच्या संस्थानात नागा नेमले जात.

विरक्तांना शस्त्र हाती घेता येते, रक्त सांडता येते, मग जीवनाची इतर अंगे त्यांना निषिद्ध का असावीत ? त्यांची उपजीविका भिक्षापात्रावर असे. त्याच्या जोडीला वैभवशाली मठ व मोठाली वर्षासने असत. त्यांच्यापैकी काही व्यापार आणि सावकारी करीत. काही पंथात विवाहही करता येई. वर्षभर यात्रा करीत फिरणारे पुष्कळ असत. त्यांची तीर्थक्षेत्रे भारतभर पसरलेली आहेत. आसामात कामाख्यादेवी, बंगालमध्ये गंगासागर, ओरिसात जगन्नाथपुरी, बिहारमध्ये वैद्यनाथधाम, व गया, उत्तर प्रदेशात काशी, प्रयाग, बद्रीकेदार, मथुरा, हरद्वार, मध्यप्रदेश-राजस्तानमध्ये पुष्कर व उज्जयनी, गुजराथेत द्वारका, महाराष्ट्रात नासिक इत्यादी. ह्या सर्व तीर्थस्थानांच्या स्नानाचे दिवस एकापाठोपाठ एक असे ठेवलेले असत की संन्याशांचे तांडे सर्व स्थानी स्नानाला पोचू शकत. त्यांच्या कानात सुवर्णकुंडले व गळ्यात गोफ असत. त्या गोफात कधी रत्ने तर कधी पोवळी गुंफिलेली असत. मठामधून ह्यांना आश्रय मिळेच; शिवाय भोवतालच्या लोकांमध्ये भिक्षेच्या निमित्ताने फिरून कुठे लग्गा लागेल ह्याचा अंदाज घेण्यात येई आणि हे संन्यासी डाके घालून लुटालूटही करीत. आपला पंथ चालू राहावा म्हणून मुलांच्या चोऱ्याही करण्यात येत.

फकीर-संन्याशांना सरकारी सनदा असत. त्यांच्या विरुद्ध कारवाई करावयास राजेरजवाडे नाखूश असत. नेपाळच्या राजाने एकदा म्हटले, "हे लोक दुष्ट आहेत हे खरे, पण धर्मशास्त्र त्यांना शिक्षा द्यावयास संमती देत नाही त्याला काय करावे ?"

ह्या फकीर-संन्याशांची समाजाला विलक्षण दहशत होती. आजही ग्रामीण व अज्ञ समाज ह्या भयापासून मुक्त झालेला नाही.

भारतीय समाजाचे दुसरे मर्मस्थानही ह्या वेळी उघडे पडले. ठग व शाक्त हे दोन्ही पंथ देवीचे उपासक. देवीला नरबली लागतात हा त्यांचा प्रामाणिक समज होता. ठगांची स्वतंत्र भाषा होती, तिला रामासी म्हणत. ते गळ्याला रुमालाचा फास देऊन, माणसाच्या पायाला झटका देऊन, त्याची मान मोडून त्याला मारीत. खड्डे खोदून प्रेते त्यात पुरण्याचा त्यांचा रिवाज होता.

हे लोक फार हुशार होते. ते टोळ्या करून यात्रेकरूंच्या रूपाने नि:शस्त्र हिंडत. सावज हेरल्यावर त्याच्याशी मैत्री करीत. त्याच्या घरापासून दीड-दोनशे मैलांच्या परिसरात त्याला हात लावीत नसत. पावसाळ्याखेरीज बाकीचे आठ महिने ते 'कामगिरी'वर जात. शकुनावर त्यांचा फार विश्वास असे. आपण देवीचे भक्त, देवी आपले संरक्षण करते, अशी त्यांची श्रद्धा होती. बलिदानाचा विशिष्ट प्रकार आपल्याला कालीमातेने शिकवला असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या रुमालाला प्राचीन काळी नागपाश म्हणत व नागपाश कसा घालावा ह्याची चित्रे देवीने वेरूळच्या लेण्यात खोदलेली आहेत असे ते म्हणत. त्यांना जागोजाग जमीनदारांचा पाठिंबा असे. त्यांच्या उत्पन्नाचा काही भाग जमीनदार घेत. आपण ह्या शुभकार्यात कामी आलो तर स्वर्गात जातो असे त्यांना वाटे.

शाक्तही नरबली देत. इ० स० १९५७ साली कालीला बली दिलेले एक दहा महिन्यांचे बालक लेखिकेच्या स्मरणात आहे. धर्माच्या नावावर होणारे हे व असले अत्याचार यांचे निर्मूलन करणे म्हणजे दुष्कर कार्य असते. कारण आपण करीत असलेल्या कृत्याला इष्ट देवतेचा आशीर्वाद आहे असा त्या व्यक्तींचा समज असतो.

अशा रीतीने राजकीय अराजक फोफावून त्याने जीवनाच्या सर्व अंगात प्रवेश केला होता. कोणाचेही जीवित सुरक्षित नव्हते; श्रमाची प्रतिष्ठा नव्हती की मानवी जीवनाला मूल्य उरले नव्हते.

ब्रिटिश सत्ता थोडी स्थिर होताच त्यांना कुठली गोष्ट विशेष जाणवली असेल तर बेचिराख झालेला सारा मुलूख. राजपुताना, दिल्लीच्या आसपासचा प्रदेश, मध्यभारत, महाराष्ट्र सर्वत्र एकच कहाणी होती. झालेले नुकसान भरून काढण्याचा, तलाव-कालव्यांची डागडुजी करण्याचा विचारही कोणाला सुचत नव्हता. रात्रीच्या वेळी प्रवास करणे अशक्य झाले होते. "पेरलेल्या धान्याची कापणी करण्याची संधी शेतकऱ्याला क्वचितच मिळते. त्याच्या शेताची नासाडी व झोपडीची राखरांगोळी झाल्यावर, एखाद्या बंडखोर टोळीत सामील होण्याशिवाय त्याला गत्यंतर उरत नाही."[1] "शेतकऱ्यांना पीक हाती येण्याची आणि कारागिराला मजुरीची शाश्वती नसे. व्यापाऱ्यांना लुटीची अतिशय भीती वाटे. जनता परागंदा झाली होती. शेते

१ ऑरिजिन ऑफ पेंढारीज : ॲन ऑफिसर ऑफ द कंपनी; पान १२६

पडीक आणि खाणी ओस पडल्या होत्या. सबंध देशाला कापड पुरवणारे कोष्टी आपले माग सोडून देशांतराला गेले."[१]

युद्ध होतात्र "युद्ध करणाऱ्या सरदाराच्या टापूवर हल्ला करणे, त्याची जनावरे हाकून नेणे, त्याला खंडणीसाठी अटक करणे किंवा हद्दपारी देणे" ह्या नित्याच्या घटना होत्या. खंडणीसाठी लोक पकडून नेणे व खंडणी न मिळाल्यास त्यांना तडफडून मरू देणे ह्यातही नावीन्य उरले नव्हते. प्रजेस हळूहळू सैन्य व डाकूंच्या टोळ्या ह्यात भेद दिसेनासा झाला होता. "दोघेही देवाला कौल लावून बाहेर पडत. एकाची नजर राजधानीवर, तर दुसऱ्याची खेड्यांवर व व्यापारी कोठारांवर. दुसऱ्यावर चढाई करताना न्याय-अन्यायाचा विचार डाकू वा सैनिक दोघांनाही आवश्यक वाटत नसे. राजधानीत विजयी सेनेचे भव्य स्वागत होई. तिने आणलेल्या लुटीने नागरिकांचा ऊर अभिमानाने भरून येई. ग्रामीण जनतेलाही लुटारूंच्या आगमनाने तसाच आनंद होई. दोघेही धाडसाने व कौशल्याने लुटलेली संपत्ती मुक्तहस्ताने स्वजनात खर्च करीत."[२]

शत्रुसेनेची, डाकूंची, संन्यासी-फकीरांची प्रजेमध्ये विलक्षण दहशत होती. ह्या यातनांना अंत नव्हता. आपली बायकापोरे, शेतीवाडी यांचे संरक्षण करण्यास लागणारे सामर्थ्य कोणाला उरले नव्हते. दुर्बलांना जगण्याचा अधिकार नव्हताच; आणि जगता आले तरी कोणाच्या तरी आधाराने लाचारीचे जीवन जगणे भाग होते. जीवनरक्षणाला तलवारीचे पाते किंवा भाल्याचा फाळ यांची तीक्ष्णता व आपल्या मनगटातले बळ एवढीच काय ती उपयोगी असत. अधिक ताकदीचा माणूस कमी शक्तीच्या माणसाला शह देई. त्याच्यापुढे लाचारीने मान झुकवून कमी शक्तीचा माणूस आपल्यापेक्षा दुर्बल असलेल्यांचा छळ करी. मोगल साम्राज्याच्या वैभवकालात करवसुलीचे मक्तेदार असलेले लोक आता जमिनीचे मालक होऊन बसले होते. फुकटचे खाणारांना माज तेव्हाच येतो. हे मक्तेदार—त्यांना तालुकदार म्हणत—आपल्या सहकाऱ्यांशी आणि प्रचलित राजवटीशी सदैव भांडणे भांडत राहत; आणि ह्या भांडणात कुठलेही तारतम्य न ठेवता दोन्ही पक्षी लूटमार व रक्तपात ह्याची धमाल उडे.

ह्या तालुकदारांचा कित्ता छोटे जमीनदार गिरवीत. कुणा बलिष्ठाचा एखाद्या भागीदाराशी मतभेद झाला, कोणाच्या इस्टेटीवर डोळा गेला, की त्याचे घर उध्वस्त केले जाई, त्याच्या परिवाराची कत्तल होई. त्यानंतर सभोवतालचे गुंड एकत्र करून, त्यांना लूटमारीच्या धंद्याला लावून तो बलिष्ठ माणूस चैन करायला मोकळा होई. कुठलाही रस्ता, शहर किंवा खेडे ह्या बलिष्ठांच्या नजरेतून सुटत नसे. नुसत्या लुटीनेही

---

१. ॲनल्स ऑफ राजस्थान भाग १ : जेम्स टॉड; पान ३५३

२. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान २६
ह्याशिवाय 'संन्यासी ॲंड फकीर', 'रेडर्स ऑफ बेंगाल' व 'यलो स्कार्फ' ह्या पुस्तकांचा धार्मिक अराजकाबद्दल लिहिताना उपयोग केला आहे.

त्यांचे मन संतुष्ट होत नसे. एखाद्या माणसाला पत असली किंवा त्याच्याजवळ गुप्त धन आहे अशी शंका आली तर त्या माणसाचे हाल करून त्याला मारण्यात येई.[१] हातपाय तोडणे, हाडे मोडणे, डोळे काढणे, डाग देणे, उलटे टांगून मारणे—ह्या प्रकारच्या यमयातनांना त्याला तोंड द्यावे लागे. नाक व कान कापणे हाही अपमान करण्याचा एक रूढ प्रकार होता.

"इ. स. १७६० मध्ये पृथ्वीनारायणाने नेपाळमधील कीर्तिपूर घेतले. ज्यांना बासरी वाजवता येत नव्हती त्या सर्वांची नाके व ओठ कापून वजन करण्यात आले."[२]

ह्या अपार जुलमाला जनतेजवळ उत्तर नव्हते. कुजत पडलेले धर्म व मरून गेलेली सरंजामशाही लोकांना मार्गदर्शन करण्यास असमर्थ होती. अन्यायाचे निराकरण झालेच तर तेही 'मोठी मासोळी छोटीला गिळंकृत' करण्याने होई तेवढेच.

हा अधःपतित समाज कुठल्या दिशेने जात होता कोण जाणे. कदाचित इजिप्त, खाल्डिया, असीरिया येथील समाजाप्रमाणे भारतीय समाजही मरून गेला असता. पण युरोपीयन राजकारणामुळे भारतात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यांनी ह्या प्रकाराला आळा घातला. त्या वेळी स्वराज्यात वाढलेल्या महाराष्ट्रात देखील "कोणा मराठ्याने इंग्रजाविरुद्ध हात उचलला नाही. ही राष्ट्रास घातक राज्यक्रांती झाली असे न वाटता आपण अनन्वित कृत्ये करणाऱ्या एका नराधमाच्या तावडीतून सुटलो असेच वाटले."[३]

सत्तारूढ होताच इंग्रजांनी सरंजामशाहीचे अवशेष नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ह्या कालखंडात फ्रेंच राज्यक्रांतीतील कल्पनांनी भारलेले तत्त्वज्ञ इंग्लंडमध्ये नेतृत्व करीत होते. इंग्लंडची यांत्रिक क्रांती बहरून येत होती. त्याचा परिणाम भारतीय शासनावर होणे अपरिहार्य होते. इंग्रजांनी पहिले शस्त्र इनामदार, जहागीरदार वर्गावर धरले. एकट्या मुंबईच्या इनाम कमिशनने पाच वर्षांत वीस हजार इनामे खालसा केली.[४] पुष्कळशी संस्थानेही खालसा करण्यात आली. मानवी समतेच्या विचारांना चालना मिळाली. अस्पृश्यांना सैन्यप्रवेश आणि सती व भ्रूणहत्या बंदी या व असल्या सुधारणांनी तर सरंजामशाहीचे अवशेष संतापून उठले. त्यांनी नवजीवन मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण "ज्या क्रांतीला ध्येय नव्हते"[५] ती ही प्रतिक्रांती[६] सन १८५७ च्या स्वतःच सुरू केलेल्या वणव्यात जळून भस्मसात झाली.

---

१. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान १६४
२. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर—पान १६७
३. मराठे आणि इंग्रज : उत्तरार्ध, न० चिं० केळकर—पान १३६
४. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉय चौधरी, कालीकिंकर दत्त, पान ७७३
५. इंडियन वॉर ऑफ इंडिपेन्डन्स-व्ही० डी० सावरकर—कन्क्लूजन
६. ग्लिम्पसीस ऑफ वर्ल्ड हिस्टरी; जवाहरलाल नेहरू—पान ४१४

इंग्रजी राजवटीत प्रतिष्ठित जीवनाच्या कल्पना क्रमशः बदलत गेल्या; पण संस्थानांमधून जुन्या परंपरा तशाच जिवंत राहिल्या. आपल्या शत्रूला लुटणे वा त्याची हत्या करणे ही तेथे प्रतिष्ठेचीच बाब राहिली. सरंजामशाहीचे जुनाट व निष्क्रिय अवशेष असणारे निरंकुश संस्थानिक, बहुतेक संस्थानांमधून हाच धडा प्रजेला देत होते. राजापुढे नमणे व प्रजेला लुटणे ह्यात काही अनैतिक आहे असे कोणालाच वाटत नव्हते.

इ० स० १९४७ पर्यंत, संस्थानी प्रजा असणाऱ्या चंबळच्या दस्युभूमीत डाकूंना प्रतिष्ठा लाभण्याचे कारण हे आहे. हा प्रदेश स्वतंत्र भारतात सामील झाल्याला अवधी फार थोडा झाला आहे. गेल्या शतकात बाकीचा भारत बदलला; दस्युभूमी बदलेल अशी आशा करावयास किती जागा आहे? भारताच्या एका शतकाच्या इतिहासाचा अभ्यास ह्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकेल तर पाहू या.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
स. क्र. .................. विभाग ..............
क्रमांक .................. नों दि. ..............

# अर्वाचीन डाकू आणि डाकूगिरी

## १. बंडानंतरचे कवित्व

सरंजामशाहीची प्रतिक्रांती कोलमडल्यावर, तीतून मुक्त झालेला भारतीय समाज राणीच्या एकछत्री सत्तेखाली नव्या ईर्षेने विकसित व्हावयास पाहिजे होता. इंग्रजांनाही आपल्या साम्राज्याचे वैभव उपभोगण्यासाठी शांततेची अत्यंत आवश्यकता होती; परंतु त्यांना अशांतीचा उपशम मात्र करता आला नाही. त्यांच्या सत्तेविरुद्ध लहानमोठे प्रतिकार होतच राहिले. ह्या प्रतिकारांना तोंड देण्याच्या उद्देशाने त्यांना 'ठगी व डकैतीची गळचेपी' करणारे 'खाते' चाळीसपंचेचाळीस वर्षे चालवावे लागले.

मूठभर लोकांकडे जनतेच्या संरक्षणाचा मक्ता गेल्याने तिला येणारी परावलंबिता व शासनसंस्थेची अनिर्बंध सत्ता ह्या दोन गोष्टीत भारताच्या अशांतीचे व सामान्य जनतेच्या यातनांचे मूळ असल्याचे आपण पाहिलेले आहे. इंग्रजी सत्ता ह्या दोन्ही अवगुणांपासून मुक्त नव्हती. इंग्रजांनी भारत कायद्याने निःशस्त्र केला होता व त्यांच्या कारभारावर नियमन होते ते इंग्लंडच्या पार्लमेंटचे. त्या देशाच्या कल्याणासाठी भारतीय शासक त्यांनी राबवणे अपरिहार्य होते. अशा रीतीने भारतातील इंग्रजी शासन आपला इतिहास व उद्दिष्टे ह्यांनी बांधले गेलेले होते. त्याच्या या मर्यादांकडे एक दृष्टिक्षेप करणे ह्या जागी योग्य होईल.

भारत हा पुरातन काळापासून औद्योगिक आघाडीवरचा देश होता. मोगल अमदानीत इथला माल बाहेर निर्यात करण्यासाठी जे अनेक विदेशीय येथे आले त्यापैकी इंग्रज हे एक असून, ते येथे व्यापारात नफा मिळवून श्रीमंत होण्याच्या इच्छेने आले. सतराव्या शतकाच्या शेवटी भारतात पसरत गेलेल्या अशांतीमुळे त्यांनी स्वसंरक्षणार्थ फौज ठेवली. त्यांचा व्यापार अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत मोठ्या

भरभराटीने चालला होता. इ० स० १७४४ मध्ये मात्र युरोपमध्ये फ्रेंचांचे व इंग्रजांचे युद्ध जुंपून त्याचे पडसाद भारतात उठले, आणि पुढील दहा वर्षांत व्यापाराच्या जोडीला प्रदेश व राजकारण ह्या गोष्टी इंग्रजांनी मद्रासमध्ये आपल्या गाठी बांधल्या, आणि मुलुखगिरीची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात उदय पावली. त्यांनी बंगालच्या राजकारणात भरपूर ढवळाढवळ केली व इ० स० १७५६ मध्ये प्लासीच्या युद्धाने तर बंगालची बहुतेक सत्ता इंग्रजांच्या हाती गेली.

व्यापारी इंग्रज सत्ताधारी झाले, तरी त्यांचे नफ्याचे येळकोट कसे जावे? अलीवर्दीखानाच्या मृत्यूनंतर वारसाहक्कासाठी झालेल्या कलहात त्यांनी कोट्यवधी रुपये मिळवले. प्लासीनंतर तर त्याच्या हाती असलेल्या दिवाणीच्या सनदेच्या आधारावर त्यांनी बंगाल धुवून नेला. इ० स० १७५७ ते १७८० ह्या तेवीस वर्षांच्या काळात इंग्रजांनी बंगालमधून अडतीस कोटी[1] पाउंड्सची संपत्ती इंग्लंडला नेली असे म्हणतात. त्या काळची स्वस्ताई ध्यानी घेता, ही रक्कम निदान पन्नास पट मोठी करता येईल. येवढी प्रचंड संपत्ती सहजतेने गोळा होत नाही; त्यासाठी लोकांची अपरंपार पिळवणूक करावी लागते. इंग्रजांनी मराठ्यांसारखी लूट केली नाही, पण व्यापारी बनियाची लूट तेही करीत होते. "चार रुपयांची वस्तू" कंपनीचे अधिकारी रयतेकडून "जबरीने एक रुपयाला घेतात व एक रुपयाची वस्तू पाच रुपयांना रयतेच्या माथी मारतात." कारागिरांना वायदेबंदीने काम देऊन त्यांचा माल अतिशय स्वस्त दरात खरीदण्याचेही त्यांचे तंत्र होते. कित्येकदा तर वस्तूंच्या कच्च्या मालाची किंमतही कारागिराच्या अंगावर पडे; त्यामुळे अनेक कारागीर परागंदा झाले. इंग्लंडच्या कापडधंद्याला संरक्षण दिल्यामुळेही भारतीय कापडधंद्याची गळचेपी झाली; कारण व्यापार सारा इंग्रजांच्या हातात होता आणि त्यांचे अमेरिका व त्यामुळे युरोपशी युद्ध सुरू झाल्यावर बंगालच्या कापडाचा उठाव होईनासा झाला. त्यानंतर इंग्लंडमध्ये यंत्रयुग सुरू झाले व भारतीय उद्योग कायमचा नष्ट झाला.

इंग्रजांना मिळालेल्या दिवाणी सनदेचा उपयोगही त्यांनी शेतकऱ्याला पिळून काढण्यासाठी केला. स्वतःच्या हाताखाली त्यांनी सारा गोळा करण्यासाठी मक्तेदार नेमले; त्यांनी पैसा न भरल्यास त्यांची मक्तेदारी जाई, म्हणून ते सक्तीने पैसा वसूल करीत.

पूर्व भारतात पडलेले प्रचंड दुष्काळ ह्या पिळवणुकीतून निर्माण झाले. प्लासीनंतर एका तपातच बंगाल विहारमध्ये इ० स० १७७० त पडलेल्या दुष्काळात लोकसंख्येचा तिसरा हिस्सा[2] बळी पडून कोट्यवधी लोक मरण पावले आणि तरीही कंपनीचा शेतसारा पुरा वसूल झाला.[3]

---

१. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ८०७

२. ॲडव्हान्स्ड हिस्टरी ऑफ इंडिया : मुजुमदार, रॉयचौधरी, कालीकिंकर दत्त; पान ८६९

३. ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी : जवाहरलाल नेहरू; पान ४२५

इंग्लंडने भारताचे उद्योगधंदे उपासमारीने मारले. भारतातले कारागीर पोटाला अन्नपाणी शोधीत वणवण करीत हिंडले व एका इंग्रज लेखकाने म्हटल्याप्रमाणे "त्यांच्या अस्थी भारताच्या मैदानात सर्वत्र वारा-धूळ खात पडल्या."[१]

इ० स० १८५७ पर्यंत इंग्लंडची यांत्रिक क्रांती संपूर्ण झाली होती. आता इंग्लंडला कच्च्या मालाचा पुरवठा व पक्क्या मालाला बाजारपेठा पाहिजे होत्या. भारतातील त्यांच्या कारभाराचे धोरण ह्या ताण्यावर विणले जाणार होते.

इंग्लंडमध्येही हस्तव्यवसाय नष्ट झाले व नफेबाजीच्या धुंदीत मोटमोठ्या उद्योगपतींनी तेथील जनतेची विलक्षण धूळधाण केली. अल्पवयी मुलांवर झालेल्या अत्याचाराला तर पेंढाऱ्यांच्या दुष्टपणाचीच उपमा द्यावी लागेल. पण क्रमशः इंग्लिश समाज नव्या पायावर उभा राहिला. तेथे मोठाले कारखाने उभे राहिले, व त्या कारखान्यांभोवती शहरे उभी राहिली. उलट भारताचे हस्तव्यवसाय बसले; पण त्याची शहरातली जनता परतून खेड्याकडे वळली. येथील शेतकऱ्यांचेही कताईसारखे जोडधंदे नष्ट झाले. कर मात्र वाढत गेले. त्यामुळे खेड्यात कर्ज व उपासमार वाढली.

ह्याशिवाय भारतात कच्च्या मालाचे हवे ते उत्पादन करण्यासाठी नीळ, चहा, कॉफी ह्यांचे मळेवाले निर्माण झाले. त्यांनीही मजुरांवर व शेतकऱ्यांवर अनन्वित जुलूम केला. त्याची चक्षुर्वै सत्यं माहिती सांगणारे वृद्ध आजही सापडतात. इतरांच्या अनुकरणाने जपानप्रमाणे भारतात यांत्रिक कारखाने येऊ नयेत म्हणूनही इंग्रजांनी यंत्रे आयात करण्यावर कर बसवले. येवढ्या अडचणीतूनही कारखाने काढण्यात आले तेव्हा लंकेशायरच्या कापड-गिरण्या व इंग्लंडचे व्यापारी धोरण दोन्हीचाही सतत विरोध त्यांना झेलावा लागला.

ह्या विचित्र परिस्थितीत नव्या राज्यकर्त्यांना सरंजामशाहीची हरळी निर्मूल करणे घातक वाटले. त्यांचे प्रगतीचे धोरण इ० स० १८५७ नंतर परागतीकडे वळले, हे स्वाभाविक होते. एका बाजूला त्यांनी नवी समाजरचना अडवून धरली होती; तरीही त्यांच्या विरोधाला न जुमानता नवी घडी बसत होती. दुसऱ्या बाजूने, त्यांनी बंगाल, बिहार व उत्तरप्रदेशाचा पूर्वभाग येथे आपला नवा जमीनदार वर्ग निर्माण केला, त्याचप्रमाणे उर्वरित संस्थानेही तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपून ठेवली. परंतु सरंजामशाहीची सामाजिक मुळे जळून गेल्यावर, पररक्षणावर पोसलेली ही बांडगुळे लौकरच विकृतीच्या मार्गाने जाणे अपरिहार्य झाले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एखाद्या तोंड बांधून ठेवलेल्या वासरासारखी भारताची दुर्दशा होती. त्यामुळे सारा समाज अस्वस्थ होता. एकीकडे सरकारी जुलूम, दुसरीकडे शेतीवर वाढलेला लोकांचा दाब. त्याच्या जोडीला सावकारी, आणि

---

१. ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी : जवाहरलाल नेहरू; पान ४९९

ग्रं. क्र. ९७.५२.४

बदलती वर्णव्यवस्था. इ० स० १८४४ मध्ये इंग्रजी नोकरीत अस्पृश्यांना जागा देण्याचे ठरले. मुंबईला तर महार इंग्रजांच्या पलटणीत फार पूर्वीपासून असत. इ० स० १८७० नंतर शूद्रातिशूद्रांच्या उद्धारासाठी प्रयत्न करणारे अनेक समाजसेवक हिंदूधर्मातच जन्माला आले. पूर्वी मानवाची समानता शिकवण्याचा प्रयत्न भक्तिपंथाने केला होता, पण तेथे अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न झाला नव्हता. पंढरपूरच्या देवळात देवाच्या पायांपर्यंत सर्व वर्ण पोचत असतानाही, चोखामेळा, कान्होपात्रा यांना देवळाच्या पायरीवरच अडून पडावे लागले होते. आता जो 'सबगोलंकार' होऊ घातला होता त्याचा अन्वयार्थ भारताच्या शेतकीप्रधान जनतेला लावता येईना. कारण विषमता मुळातच खुडणारे यांत्रिकीकरण भारतात झाले नाही. त्यातून इंग्रजांच्या अमदानीत भारतात सर्वत्र जे मोठाले दुष्काळ पडत राहिले, त्यांचे पाप अज्ञ जनतेने भ्रष्टाकाराच्या माथीच फोडले. अशा परिस्थितीत अनिर्बंध सत्तेच्या जाचक अन्यायांना उत्तर म्हणून भारतातली अशांती कायम राहिली. त्यातले काही अन्याय खरे तर काही काल्पनिक होते; परंतु ही वस्तुस्थिती शांततेचा भंग करणारांना आकलन झाली नाही.

सरकारच्या 'डकैती व ठगीचा बीमोड' या खात्याचे रिपोर्ट पाहता वरील गोष्टी नजरेत भरतात. पुष्कळसे डाके उपजीविका नष्ट झाल्याने किंवा पिळवणुकीमुळे घातले जात होते. ह्या डकैतीचे स्वरूप अनेकदा जुने खानदानी दिसते. तोंडावर बुरखे, हाती पलिते, सकारण वा अकारण छळ किंवा हत्या! मात्र आपण करितो ते गैर आहे असे डाकूंना केव्हाही वाटलेले नाही. कर्नल स्लीमनला एक डाकू म्हणाला होता, "हुजूर, आम्ही खून करितो? छीः छीः खुदा बचाए. असे आहे की कोणी आड आला तर कापून काढतो. पण तुम्हीसुद्धा हेच करता ना? तुमचे सैन्य सध्या उत्तरेच्या मोहिमेवर जाते आहे म्हणतात. त्या मोहिमेत आड येईल त्याची कत्तल कराल ना? तो काय खून होईल?"[1]

आकड्यांच्या तक्त्यावरून मद्रासमध्ये व बंगालमध्ये डाक्यांचे प्रमाण सर्वात मोठे असल्याचे दिसून येते. हेच प्रदेश प्रथम ब्रिटिश अमलाखाली गेले. कंपनीराज्यात एक शतकपर्यंत ह्या प्रदेशांची विलक्षण पिळवणूक झाली. मद्रासमध्ये जिवावर उदार झालेल्या शेतकऱ्यांचे दंगे वारंवार होत राहिले.[2] त्यावेळी दंग्यांना जोड म्हणून तेथेच डाकेही पडत राहिले.[3]

डाकूंना जमीनदारांचा पाठिंबा असल्याचे उल्लेखही वारंवार सापडतात:

"हे लोक—गोरखपूरचे मूर—मुख्यतः गुन्ह्यांवर जगतात. ते खेड्यातून तरलेले

---

१. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान १०२

२. ग्लिम्प्सेस् ऑफ् वर्ल्ड हिस्टरी : जवाहरलाल नेहरू; पान ४२६

३. तक्ता पान १०६ वर पाहा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ०२७९८ दि. ......

असून बहुशः जमीनदारांच्या संरक्षणाखाली राहतात व पुष्कळ वेळा जमीनदारांची लुटीत भागीदारीही असते."[१]

बंगालमध्ये "जमीनदार डकैतीला आळा घालण्यास पुरेशी मदत देत नाहीत. उलट त्यांच्यापैकी पुष्कळजण इलाख्यात डाकूंना आश्रय देतात, लूट विकत घेतात व जरूर तर जामीन द्यायला तयार असतात."[२]

"डाकूंना आळा घालण्यात, पहिला अडथळा म्हणजे त्यांना मिळणाऱ्या जमीनदारांची मदत" हे उद्गार बरेली, मुरादाबाद, बदायून, रामपूर संस्थान इत्यादींविषयी काढलेले आहेत. "हे वाटमारे ग्वाल्हेरच्या उग्र राजाने गुरांच्या चोऱ्या करावयास नोकरीला ठेवलेले दिसतात."[३]

"मद्रासमध्ये स्थानिक संघटना व गुन्ह्याला मिळणारी लोकांची सहानुभूती ह्या सर्वांत मोठ्या अडचणी आडव्या येतात."[४] असे मद्रासचा पोलिसचा इन्स्पेक्टर जनरल म्हणतो.

सरकारी रिपोर्टांमधून असे वाटेल तेवढे उतारे गोळा करता येतात. हे रिपोर्ट वाचताना, डाकूगिरीमध्ये जमीनदारांचा मुख्य उठाव असतो आणि इतर लोक त्यांच्या आज्ञेने हे काम करितात असे दिसून येते.

डाक्यांचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे नवरचनेत पोटाच्या न्याय्य वृत्तीचा होणारा उच्छेद हे असल्याचे दिसून येते. इ० स० १८७५ चा रिपोर्ट दिल्लीच्या गुजर लोकांबद्दल असे म्हणतो की "बंडाच्या वेळी ह्यांनी आपल्याविरुद्ध मदत केल्याने त्यांच्या जमिनी जप्त झाल्या. त्यांना श्रम होत नाहीत. यांचे आवडते काम चौकीदारीचे—आणि त्याचा अर्थ कामाच्या ठिकाणी झोप घ्यावयाची. जे लोक चौकीदार ठेवणार नाहीत, त्यांच्या घरात सर्वांनी चोऱ्या करावयाच्या."[५]

हाच रिपोर्ट मीनांबद्दल लिहितो, "मीनात निश्चय, धैर्य आणि सहनशक्ती असून ते अलवर संस्थानात सैन्यात भरती होतात."[५] गुरगाव जिल्ह्यात मात्र त्यांना गुन्हेगार

---

१. स्टॅटिस्टिक्स ऑफ द क्राइम ऑफ डेकॉयटीज इन ब्रिटिश टेरिटरीज अँड डिपेंडंट स्टेट्स, १८६७,६८,६९, अपेंडिक्स सी; पान १
२. ॲन्युअल रिपोर्ट रिलेटिंग टु सप्रेशन ऑफ डेकॉयटी इन बंगॉल, १८६०, परिच्छेद २०
३. स्टॅटिस्टिक्स ऑफ द क्राइम ऑफ डेकॉयटी इन ब्रिटिश टेरिटरीज अँड डिपेंडंट स्टेट्स १८७५, पान २६
४. स्टॅटिस्टिक्स ऑफ् द क्राइम ऑफ डेकॉयटी इन् ब्रिटिश टेरिटरीज अँड डिपेंडंट स्टेटस १८६७, ६८, ६९ : पान २१
५. स्टॅटिस्टिक्स ऑफ द क्राइम ऑफ डेकॉयटी, ब्रिटिश टेरिटरीज अँड डिपेंडंट स्टेट्स १८७५, पाने २५, २६

जात म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव करून रिपोर्ट म्हणतो, "कोणाही माणसाला उपाशी ठेवून प्रामाणिक बनवता येत नाही."

एकाच रिपोर्टाने अहिरांबद्दल असे म्हटले आहे की, "ह्यांचा स्वभाव स्थाना-बरोबर बदलतो. तराईजवळच्या जिल्ह्यात ते विश्वासू व निर्भय आहेत, तर यमुनेच्या ओहळातून चोर व डाकू आहेत."[१]

एकेकाळी भारतात काबूलपासून मद्रासपर्यंत तांडे घेऊन व्यापार करणारे बंजारी रेल्वेचा प्रसार झाल्यानंतर गुन्हेगार म्हणून घोषित करावे लागले. भारत स्वतंत्र होईतो गावठाणात वसती करावयास त्यांना मनाई असे.

खानदेशचे भिल्ल तर पेशवाई राज्यातही गडबड करीत होते. त्यांच्याबद्दल एका 'अत्यंत कार्यक्षम' पोलीस अधिकाऱ्याने असे मत नमूद केलेले आहे की "खानदेशच्या सीमेवरील सातपुड्याच्या व इतर जंगलातील लाकूड तोडण्यावर झालेल्या बंदीमुळे विशेषकरून सुलतानपुर व थालनेर तालुक्यातील भिल्लांची मोठी अडचण झाली आहे......त्यांची उपजीविका त्यावरच चालत असे. माझ्या फिरतीत माझ्याकडे ह्याबाबत शेकडो अर्ज येतात. येथे घडणाऱ्या बहुसंख्य गुन्ह्यांना ह्या भागातील भिल्लांची दुःस्थितीच कारण आहे, अशी मला खात्री आहे."[१] पुढे ह्या रिपोर्टात पटेल व सावकार यांच्या भीषण जुलमाचे व लोकांच्या उपासमारीचे तपशीलवार वर्णन दिलेले आहे.

ह्या साऱ्या अडचणीतूनही हळूहळू समाजाची नवी आर्थिक घडी बसत गेली. रेल्वे, तारायंत्रे, रस्ते ह्यामुळे दळणवळणाची साधने वाढून सरकारी वचक वाढला. कापूस, गहू, गळिताची धान्ये ह्या व्यापारी मालाचे उत्पादन, जगाची बाजारपेठ मोकळी होताच, भराभर वाढले. ह्या व्यापारासाठी एक सधन व्यापारी वर्ग निर्माण झाला. जगाच्या बाजारपेठांशी संबंध आल्याने त्याची दृष्टी फाकलेली होती. इंग्रज शासनसंस्था चालवण्यासाठी पगारदार मध्यम वर्ग निर्माण झाला. त्याचप्रमाणे वकिली, डॉक्टरी असे प्रतिष्ठित पेशे करणारा वर्गही अस्तित्वात आला. उत्पादन वाढल्यावर मोठाले दुष्काळ थांबले. इ० स० १८९९नंतर इ० स० १९४२पर्यंत मोठा दुष्काळ पडला नाही. जुने रजपूत-ठाकूर हे वर्ग मागे पडून नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाची दृष्टी भूतकाळावरून निघून भविष्याची स्वप्ने पाहण्यात रंगली. त्यामुळे इ० स० १९०२–०३मध्ये 'ठगी डकैती गळचेपी' खाते सरकार बंद करू शकले.

भारत त्या वेळी किती शांत व स्वस्थ होता, ह्याची कल्पना खालील वर्णनावरून करिता येते. "सुप्रसिद्ध दहशतवादी बारींद्र घोष इ०स० १९०२ मध्ये बंगालमध्ये आले. इथे त्यांनी क्रांतिकारी कार्यात भाग घेऊन विदेशी शासनाचे जू खांद्यावरून काढून

१. स्टॅटिस्टिक्स ऑफ द क्राइम ऑफ् डेकॉयटी इन ब्रिटिश टेरिटरी अँड डिपेंडंट स्टेट्स १८६७,६८,६९ : पाने १९,९

टाकण्यासाठी लोकांना आवाहन केले. परंतु बंगाल ह्या वेळी बारिंद्रांचा संदेश ऐकावयास तयार नव्हता. चैनी बंगाली युवक, त्यावेळी राजकारणाच्या गोष्टी ऐकतही नसत. त्यांना कुंभकर्णी झोपेतून जागे करावयास एखादा मोठा धक्का लावण्याची जरूर होती "[१]

महाराष्ट्रात त्या वेळी दहशतवादी चळवळीचा जोर होता. रँडचा खून होऊन त्याच्या खटल्याचे सत्र चालू होते. परंतु महाराष्ट्राने किंवा त्यांच्याशी संबंधित ग्वाल्हेरच्या 'नवभारत' व 'अभिनव भारत' ह्या संघटनांनी डाके घालून पैसा पैदा केला नाही किंवा 'काळी नोकरशाही वा तिच्या हस्तकां'वर शस्त्र धरिले नाही.

बंगालच्या फाळणीनंतर तेथे अत्याचारी चळवळ फोफावली. बंगालच्या आंदोलनावर धर्माची गहिरी छाया होती. त्यांना कालीमातेची शपथ वगैरे विधी करावे लागत.[२] तरी त्यांची स्फूर्ती बाहेरून, विशेषतः रशियन चळवळीतून, आलेली होती.[३] ह्या आंदोलनाचे सूत्रसंचालक तरुण व अपरिपक्व होते. ते शूर असले तरी ह्या चळवळीतील नियोजनाचा अभाव व त्यामुळे होणाऱ्या चुका ह्या वारंवार खड्यासारख्या टोचतात. एकसारख्या दोन गाड्या असल्याने, भलत्या गाडीत बॉम्ब टाकून अभिप्रेत नसलेल्या माणसाचा झालेला मृत्यू, मुजफ्फरपूरला केनेडी मातापुत्रीचा चुकीने घडलेला खून, खुनानंतर पिस्तुल जवळ बाळगणारे तरुण, अशी त्या अपरिपक्वतेची उदाहरणे इतिहासात जागोजाग विखुरलेली आहेत.

ह्या चळवळीला 'धन व जन' ह्या दोहोंचीही उणीव पडली. कारण जनतेच्या गरजांशी तिचा संबंध नव्हता. मग डाकूगिरीचा मार्ग निवडण्यात आला; पण आपली निवड चुकली ही रुखरुख त्या तरुणांना होती. मग त्यांनी स्वतःचीच समजूत घालून घेतली की, "देशकार्यासाठी काही व्यक्तींचे धन जबरदस्तीनेही घेण्यात आले, तरी ते स्वराज्य मिळाल्यावर परत करिता येईल." आणि डाके घालणारांना सक्त सूचना देण्यात आल्या की "डाके घालताना स्त्रियांना हात लावू नका वा हत्या करू नका." हे डाकेही खास भारतीय पद्धतीने 'नकाब व मशाली' च्या साहाय्याने घातले जात. खून न करण्याचा नियम मात्र लौकरच मोडला. कारण "आडवे आलेले कापावेच लागले." एका डाक्यात तर एका स्त्रीची व मुलाचीही हत्या झाली.

डाक्यांचा हेतू धनार्जन हा होता. हे धन सरकारला दहशत घालण्यासाठी उपयोगात आणावयाचे होते. पण ही चळवळ लौकरच अवनत झाली. डाके घालणे, त्या पैशाने खटले लढवणे, खटल्यातील साक्षीदारांची हत्या करणे व पोलिसांना मारून टाकणे हाच तिचा अंती कार्यक्रम उरला. बंगालची चळवळ इ० स० १९१८च्या

१. आतंकवाद का इतिहास : शास्त्री, आचार्य चंद्रशेखर; पान ३५
२. सिडिशन कमिटी रिपोर्ट–प्रकरण ८
३. आतंकवाद का इतिहास : शास्त्री, आचार्य चंद्रशेखर; पान ७८,४७,७९

रौलेट रिपोर्टनंतर सरकारने दडपून टाकली व बंगालमध्ये राजकीय डाके हा प्रकार विराम पावला.

पहिल्या महायुद्धाच्या वेळी डाक्याचे एक छोटेसे पर्व गदर चळवळीत उद्‌भवले. चळवळीचा खर्च प्रथम विदेशातून परतलेल्या पंजाबी लोकांनी आपल्या संपत्तीतून केला. पुढे खर्च बेमुमार वाढून 'दान की रकम से' काम चालेना. मग डकैतीचा उपाय सुचवण्यात आला. "डाके का नाम सुनतेहि विद्रोही वीर सन्न रह गये"[1] बहुधा निरुपाय होऊन हा मार्ग नंतर मान्य झाला, आणि पंजाबचे डाके सुरू झाले. येथेही अधूनमधून हत्या झाल्या. स्त्रीपोरांना इजा झाली. स्त्रियांचे दागिने अंगावरून उतरवले गेले. "लुटणारांनी स्पष्ट सांगितले, 'ह्या लुटीच्या मालाचा उपयोग इंग्रजाना भारतातून हाकलून देण्यासाठी करण्यात येईल.' देशद्रोहींना दंड म्हणून संपत्ति घेऊन नाक-कान कापून सोडून देण्यात येई."[2]

इ० स० १९१९ च्या रौलेट कायद्यानंतर डाक्यांची संख्या कमी होऊन प्रजेला न लुटता सरकारी संपत्ती लुटण्याचे प्रयत्न होताना दिसतात. 'काकोरी ट्रेन डकैति' हा त्यापैकी गाजलेला खटला. इ० स० १९३० नंतर दहशतवाद अनेक समाजिक कारणांनी भारतातून विराम पावला.

ह्या दहशतवादाच्या इतिहासात आग्रा-ग्वाल्हेर येथून पं० गेंदालाल दीक्षितचे नाव मात्र डकैतीसाठी कानी येते. पण गेंदालाल हा दहशतवादी नव्हता, तर दहशतवादाने निर्माण केलेला 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्' असा माणूस होता, असे त्याचे चरित्र वाचून म्हणता येते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात डाकूगिरीचे पुनरुज्जीवन झाले, येवढेच नव्हे तर अनियंत्रित सत्तेच्या जुलमाला विरोध करण्यासाठी म्हणून ते झाले. पण तिचे आंतरिक नाते आपल्या परंपरागत डाकूगिरीशी नव्हते. तिच्या स्फूर्तीचे झरे मॅझिनी व मॅक्स्विनी ह्यांच्या चरित्रात असल्याने, डाकूगिरी दहशतवाद्यांना निषिद्ध वाटत राहिली, आणि विवेकाला न पटणाऱ्या गोष्टींना येणारे स्वाभाविक मरण यथासमय ह्या वृत्तीलाही आले.

ग्वाल्हेर व त्याच्या परिसरात मात्र ह्या अपराधाचे जुने स्वरूप व त्याच्या सर्व जीर्ण परंपरा कायम राहिल्या. तेथे नकाब-मशालीची जरूर नव्हती. जनतेची सहानुभूतीच नव्हे तर कौतुकही ह्या डाकूंना पूर्वपरंपरेप्रमाणे मिळत राहिले. आजही आपल्याला चंबळेच्या ओहोळात भयभीत करतो तो मागील कित्येक शतकांचा वारसा आहे. त्याचा विसाव्या शताकाशी संबंध आहे तो अद्यावत हत्यारांपुरताच.

---

१. आतंकवाद का इतिहास : शास्त्री, आचार्य चंद्रशेखर; पान १७२

२. आतंकवाद का इतिहास : शास्त्री, आचार्य चंद्रशेखर; पान २५१

## विवरणपत्र[1]

ब्रिटिश प्रदेशातील दरवड्यांचे इ० स० १८६५ ते १८७५ ह्या ११ वर्षांचे तुलनात्मक विवरण

| ठिकाणे | १८६५ | १८६६ | १८६७ | १८६८ | १८६९ | १८७० | १८७१ | १८७२ | १८७३ | १८७४ | १८७५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. ब्रिटिश ब्रह्मदेश | — | — | — | — | — | १३३ | १८८ | ६५ | ३४ | २४ | ४५ | ४८९ |
| २. आसाम | — | — | — | — | — | — | — | — | — | १२ | ९ | २१ |
| ३. बंगाल | ४९५ | १६५९ | ४९९ | ४९६ | ४५६ | ३४६ | ३५७ | ३०० | ३२२ | ६०१ | ३३८ | ५८६९ |
| ४. वायव्य सरहद्द प्रांत. हल्लीचा उत्तर प्रदेश | ७४ | ५५ | ५२ | ७१ | ९६ | ७१ | ५४ | ६३ | ८९ | १२६ | ४१ | ७९२ |
| ५. अवध | २५ | २२ | १३ | १६ | १६ | ७ | १६ | ३८ | २६ | ४५ | २४ | ३४८ |
| ६. पंजाब | २५ | १६ | ५ | ११ | २० | २० | ४४ | ३२ | ३४ | ५५ | ४२ | ३०४ |
| ७. मध्यप्रदेश | २५ | ३२ | २२ | २८ | १४ | १३ | ९ | १७ | १० | ११ | ७ | १२८ |
| ८. मद्रास | ५६८ | ११२१ | ५३३ | ४८६ | ४०० | ३०० | ३५८ | ३२० | २४५ | २६६ | २३२ | ४८९२ |
| ९. मुंबई (इत्यादी) | १४१ | १३२ | १२१ | ११६ | १३२ | १५५ | १६४ | २३१ | १३० | १६५ | १०५ | १५९२ |
| १०. म्हैसूर व कूर्ग | ६९ | १४७ | ९४ | ८१ | ६२ | ७६ | ७३ | ८४ | ३५ | ३७ | ६३ | ८२१ |
| ११. हैद्राबाद | ३५ | २३ | ३८ | ४७ | १७ | १४ | ३२ | १९ | १२ | ९ | १२ | २५८ |
| एकूण | १४५७ | ३२०७ | १३७७ | १३५२ | १२१३ | ११३५ | १२२५ | ११६९ | ९३७ | १३५१ | ९१८ | १५३४१ |

१ ब्रिटिश प्रदेशात इ० स० १८६५ ते १८७५ ह्या ११ वर्षात पडलेल्या दरवड्यांची आकडेवारी—तक्ता क्रमांक १४

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ क ...... विभाग ......
क्रमांक ...... नों दि. ......

## २. डबक्याचे पाणी

क्रमशः सगळ्या भारतात शांती पसरली. भारताची आर्थिक घडी नव्याने बसत गेली. काही जागी तर "राणीच्या राज्यात काठीच्या टोकाला सोने बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत खुशाल जावे," ह्याचा अभिमान आढळू लागला. नंतर भारताच्या राजकीय पडद्यावरचे हे चित्रही बदलले. "स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही" अशा घोषणा भारताने केल्या. त्याला आपल्या राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव झाली. प्रथम दहशतवादी, हिंसक व नंतर शांततामय जन-आंदोलन निर्माण झाले. ह्या संक्रमणामध्ये राजस्तान, मध्यभारत, बुंदेलखंड हा भाग मात्र पारोसा राहिला. इतरत्र भारतातील संस्थाने विखुरलेली होती. येथे मात्र त्यांनी एखाद्या तलावाचे रूप धारण केले होते. येथील विविध राजसत्ता अनियंत्रित होत्या. त्यातून ब्रिटिश राजसत्तेच्या संरक्षणाचे अभेद्य कवच मिळाल्यावर तर त्या बेलगाम, बेशरम झाल्या. त्यांचे अन्याय अनंतपटीने वाढले. ह्या जुलुमाला उत्तर देण्याचे मार्गही वरील परिस्थितीत प्राचीन राहणे अपरिहार्य होते. त्यातही शिंद्यांचे संस्थान नेहमीच अधिक अस्वस्थ, अशांत राहिलेले आपल्याला आढळून येते. कारण मागे पाहिल्याप्रमाणे मराठ्यांची सत्ता येथे कधीच दृढमूल झाली नाही. (महादजीचे मुख्य ठाणे अलीगढला असे. ग्वाल्हेरला प्रथम दौलतराव स्थायिक झाले.) पण ती दृढमूल झाली तरी कुठे? केंद्रसत्ता ढिली पडताच साऱ्या मराठेशाहीत अनावर दंगे सुरू झाले, त्याला शिंद्यांचे राज्यही अपवाद नव्हते.[१]

तक्ता

(ठगी व डकैती खात्याचे अहवालः १८९० ते १९०२)

| ठिकाणे | १८९० | —९१ | —९५ | —९६ | —९७ | —९९ |
|---|---|---|---|---|---|---|
| कोटा | १२ | ७ | १० | २० | | |
| बिकानेर | ७ | १५ | — | ९ | | |
| मेवाड | २९ | ३८ | २६ | ३५ | | |
| इंदूर | २६ | १५ | २९ | — | — | २४ |
| ग्वाल्हेर | १०९ | ५८ | ५५ | १२० | — | ८० |

* '—' आकडे उपलब्ध नाहीत.

१. मराठे आणि इंग्रज, न० चिं० केळकर–उपोद्घात, पान १३

महादजीच्या हयातीतही संस्थानात धुमाकूळ माजतच असे. दौलतरावाच्या कारकीर्दीत ही स्थिती कळसाला पोचली. त्याला उत्तम उदाहरण राघोगडचे. हा किल्ला ग्वाल्हेरपासून शंभरसव्वाशे मैलांच्या अंतरावर आहे. तेथील छोटेसे राज्य महादजीने पादाक्रांत केले. राज्य गेल्याने तेथील राजाने नर्मदेच्या उत्तरेतील शिंदेशाहीत छापे घालणे, लूट करणे इत्यादींचा धुमाकूळ उडवला, तेव्हा महादजीने मांडलिक म्हणून राजाला त्याचे राज्य परत दिले, व त्यानंतर राजा शांत झाला.

अशा तऱ्हेने कुशीत सोडलेला हा काटा, इ० स० १७९५ मध्ये गादीवर येताच, दौलतरावने सहज हलवला—राघोगड अंबाजी इंगळेला दिला, व शिंदे-दरबारी स्त्रियांचे गृहकलह माजेपर्यंत तो त्याच्याकडे राहिला. राघोगडचा राजाही परिवारासह किल्ल्यावरच राहत असे. दरबारात तट पडल्यावर लकवादादा नावाच्या सेनापतीने किल्ला घेऊन, राजाला सपरिवार गडाबाहेर हाकलून दिला. राजाने नंतर जवळच किचिवारीला नवीन राज्यस्थापना केली.

दरबारी कलहात राजाने लकवादादाचा पक्ष धरल्याने, त्याचा मुलगा जयसिंग ह्याच्या स्वाधीन राघोगड करण्यात आला. ही गोष्ट इ० स० १८९८-९९ ची असावी. जयसिंगाने शिंद्यांना कधीही खंडणी दिली नाही. 'पैसा पुरत नाही' असे सांगून, केंद्रसरकारकडे वसूल भरणा करण्याची चालढकल मराठा सरदार करीत.[१] त्यामुळे त्यांचे पैशाच्या कमतरतेचे कारण शिंद्यांना खरे वाटे. लष्करी चाकरी बजावण्याच्या तोंडदेखल्या गोष्टी तो करी, पण तीही चाकरी त्याने कधी बजावली नाही, आणि त्याला लष्करात घेण्याइतका त्याचा विश्वासही कोणाला वाटत नव्हता.

शिंद्यांचा सेनापती जॉन बॅप्टिस्टे ह्याने इ० स० १८१६ च्या मध्यावर राघोगडला वेढा दिला तेव्हा राघोगडला परिवार सोडून जयसिंग जवळच्या चकोवरा नावाच्या किल्ल्यावर निघून गेला. चकोवरा पडल्यावर, त्याने राघोगडभोवतालच्या किर्र जंगलाचा आश्रय केला. तेथून त्याने एक युक्ती योजली. राघोगडहून शंभर मैलावर शिवपूरच्या किल्ल्यात बॅप्टिस्टेचा परिवार व खजिना असून तो किल्ला रसद व दारुगोळा ह्यांनी सुसज्ज होता. जयसिंगने अचानक शिवपूरच्या किल्ल्यावर हल्ला केला व आतील काही सैन्य फितवून किल्ला घेतला. बॅप्टस्टेचा मुलगा ओलीस ठेवून बाकीचा परिवार, चंबळेपरच्या सबलगढ ह्या किल्ल्यात जाऊ दिला.

बॅप्टिस्टेच्या व पर्यायाने शिंद्यांच्या इभ्रतीला हा भयंकर धक्का होता. शिंद्यांनी शिवपूरच्या किल्ल्याकडे काही फौज पाठविलीही, पण हुकूम मोडून ती फौज अजमीरला बापू शिंदेकडे निघून गेली. जयसिंग शिवपूरच्या किल्ल्याची डागडुजी करीत व शिबंदी मजबूत करीत बसला. राघोगडच्या किल्ल्याचा वेढा उठवल्यास तो शिवपूरचा किल्ला परत करण्यास राजी होता, परंतु इभ्रतीच्या खोट्या कल्पनेला

---

१. मराठे व इंग्रज; उत्तरार्ध : न० चिं० केळकर—पान ७८

वळी पडून तह करण्याचे ब्रॅप्टिस्टेने नाकारले. तथापि राघोगड किल्ल्यात रसद पुरेशी नव्हती, आणि जयसिंग राघोगडाभोवती घिरट्या घालीत राहिला, तरी ब्रॅप्टिस्टेच्या तळावर हल्ला करण्याचे सामर्थ्य त्याला नव्हते. तेव्हा बॅप्टिस्टेला गनिमी काव्याने जेर करण्यासाठी माणसे ठेवून जयसिंग मागे हटला.

राघोगडच्या जमीनदारांना ही सुवर्णसंधी लाभली. त्यांनी ब्रॅप्टिस्टेला वसूल तर नाकारलाच, पण त्यांच्या टोळ्या लुटालूट करावयास सर्वत्र जाऊ लागल्या. त्या लुटारूंचे पारिपत्य करण्याइतकी फुरसत कोणालाच नव्हती. बॅप्टिस्टे आता पैशांच्या अडचणीत आल्यामुळे त्याने शिंद्यांकडे मदतीसाठी पत्रे लिहिली; दरबारकडून त्याला मिष्ठास उत्तरे येत, पण पैसा किंवा इतर मदत मात्र आली नाही. अखेर 'मुलाच्या सुटकेसाठी जयसिंगाशी तह' करण्याची धमकी देऊन त्याप्रमाणे बॅप्टिस्टेने कोट्याच्या जालीमसिंगच्या मध्यस्थीने वाटाघाटी सुरू केल्या. त्याच्या सुदैवाने, किल्ल्यातील धान्यदुष्काळाला जयसिंगची राणी कंटाळलेली असल्याने, सपरिवार सुखरूप बाहेर जाऊ देण्याच्या अटीवर तिने किल्ला कोट्याचा राजा जालीमसिंग ह्याच्या स्वाधीन केला, त्यानंतर राघोगड घेऊन जयसिंगाने शिवपूरचा किल्ला व बॅप्टिस्टेचा मुलगा सोडावा ह्या अटीवर वाटाघाटी सुरू झाल्या.

वाटाघाटी रेंगाळू लागल्याने ऑक्टोबरमध्ये जालीमच्या सैन्याने राघोगड बॅप्टिस्टेच्या स्वाधीन केला. सुरक्षिततेसाठी जयसिंगाने आपला परिवार जयपूरला आपल्या आप्तांकडे पाठवून, ब्रॅप्टिस्टेवर दडपण आणण्यासाठी भिलसाच्या आसमंतात लुटालूट आरंभिली. शिंद्यांची काही फौजही त्याला सामील असावी. वाटाघाटी-बद्दल आता जयसिंग उत्सुक नव्हता, कारण जयसिंगचा परिवार सुरक्षित होता व बॅप्टिस्टेला मुलगा परत मिळताच तो तहाच्या अटी मोडील अशी त्याला शंका वाटत होती.

जयसिंगाचे उदाहरण पाहून, इतर मांडलिकांनी दंगे करणे स्वाभाविक होते राघोगड व चंचोवरा हातून गेल्यावर जयसिंगाने मुख्यतः बॅप्टिस्टेच्याच जहागिरीत लुटालूट केली. तो पुढे वेटवा नदीवर लुटालूट करू लागला तेव्हा, त्याला तोंड न देता, तेथे असलेला पेंढारा सरदार दोस्त महंमद भिलसाला हलला.

सहा महिन्यांच्या वेढ्यानंतर शिवपूरचा किल्ला पडला. बॅप्टिस्टेचा मुलगा त्याला सुखरूप मिळाला हा जयसिंगाचा मोठेपणा. जयसिंग त्यानंतर कधी इथे तर कधी तिथे लूटमार करीत राहिला, आणि भोपाळजवळचा राहतगढ तो हस्तगत करील असे भय शिंद्यांना वाटू लागले. तेथील किल्लेदार अप्पा कुंदरा मागेच बंड करून स्वतंत्र झाला होता व त्याचा मुलगाही शिंद्यांची तमा बाळगीत नव्हता.

ही बंडाळी क्रमशः चरत जाऊ लागली. प्रथम काही आदिवासींच्या टोळ्या व नंतर लहानमोठे राजे जयसिंगाच्या निशाणाखाली एकत्र झाले. पाठीवर बॅप्टिस्टे व अण्णा बक्षी ह्याच्या फौजा असूनही जयसिंग नर्मदा उतरून गेला व खांडव्याच्या

भागात त्याने खंडणीवसूल सुरू केला. तेथील अमीलाने (Executive officer) त्याला तोंड देण्याचा केलेला प्रयत्न व्यर्थ जाऊन, जयसिंगाची खंडणीची भूक मात्र खूपच वाढली. ह्या वेळीं पेंढारा सरदार इंग्रजांच्या पेंढारी युद्धाच्या तयारीने भयभीत होते. त्यांच्याकडे बॅप्टिस्टेने मदत मागितली असता, त्यांचा सरदार चीतू याने उत्तर पाठविले की "आमच्या परिवाराच्या संरक्षणाची सोय करा. युद्धात जाया होणारी घोडी भरून देण्याचे वचन द्या. मग आम्ही आमची शिरे उतरून तुमच्यापुढे हजर करू." शिंद्यांच्या छावणीपासून पंधरा मैलांच्या आत छापे घालण्याइतके जयसिंगाचे सामर्थ्य व धैर्य पुढे वाढले होते. येथे बॅप्टिस्टे हा शिंद्यांच्या अद्यावत् सेनेचा सेनानायक होता हे ध्यानी ठेवणे उद्‌बोधक होईल.

जी कथा जयसिंगाची ती इतर अनेक मांडलिक राजांची, सरदारदरकदारांची. एकट्या इ० स० १८१०मध्ये शिंद्यांनी बहादुरगड, गढाकोटा, चंदेरी व शिवपूर हे किल्ले घेतले आणि नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे तेथील राजांना मांडलिक म्हणून परत दिले. 'पाळी बांधायचे काम' राहून गेले. त्यात शिंद्यांचा दोष फारसा नव्हता. शत्रूचा बीमोड करण्याइतकी, ओसंडून वाहणारी लोकसंख्या महाराष्ट्रात नव्हतीच. आणि जिंकलेल्या लोकांना आपलेसे करण्याची एकुलती एक गुरुकिल्ली— हिंदुपदपादशाही—मराठ्यांनी कधीच फेकून दिली होती. त्यामुळे अलेक्झांडरने पोरसला त्याचे राज्य पुनश्च बहाल केले, तोच उपाय मराठे अवलंबीत.

दौलतरावाच्या मृत्यूनंतर ही स्थिती कायम राहिली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा दत्तकपुत्र अल्पवयी जनकोजी गादीवर आला व त्याचे पालक म्हणून मामासाहेब कदम राज्यकारभार चालवू लागले. इ० स० १८४३ मध्ये जनकोजी मेल्यावर आठ वर्षांचा जयाजीराव गादीवर बसला. जनकोजीच्या वेळीही ग्वाल्हेरमध्ये शांतता नव्हती. सैन्यात बेदिली व अधिकाऱ्यांत कामचुकारपणा होता आणि त्यामुळे 'जिसकी लाठी उसकी भैंस' हा कायदा लागू होता. "लश्कर व त्याचा आसमंत गडप झाला तर देवाची कृपा होईल" असे इ० स० १८३५ मध्ये स्लीमनने म्हटले होते.[1] जयसिंगाच्या मार्गाने जाणाऱ्याला आता इंग्रजांनी नवीन संज्ञा दिली होती—डाकू. आणि त्याच्या फौजेला नाव दिले—टोळी.

इ० स० १८३५चा डाकू गजराज ह्याला आजच्या मानसिंगाप्रमाणेच ग्वाल्हेरचा रॉबिनहुड म्हटलेले आहे. गजराजाचा निःपात करण्यासाठी एक मोहीम उघडावी लागली होती. चंबळचे वेहड, अलवर, करौली व ग्वाल्हेर संस्थान ह्यामधून गजराजच्या मागावर फौज पाठवण्यात आली. सुरुवातीलाच एका सामन्यात त्याचा उजवा हात असलेला त्याचा मुलगा बेलासा हा मृत्यू पावला. बेलासा धूर्त व हुशार होता. त्याच्या मृत्यूनंतर गजराजाच्या टोळीचे दोन भाग झाले. गजराज पुढे व ब्रिटिश फौजा मागे

१. द यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान १०१

असा पाठलाग सुरू झाला. तो कित्येक आठवडे चालल्यावर, थकलेला गजराज ग्वाल्हेर-सैन्याला शरण गेला. मामासाहेबांनी त्याला बचावण्याचे केलेले प्रयत्न विफल जाऊन अखेर गजराजाला इंग्रजांच्या हवाली करण्यात आले. त्याच्यावर खटला चालून त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली.

इ० स० १८५० च्या सुमाराला दिनकरराव राजवाडे दिवाण नेमले गेले. तेव्हाची ग्वाल्हेर राज्याची स्थिती "प्रांतात बेबंदशाही होती. चोराचिलटाचे भय मनस्वी होते. बंदोबस्त मुळीच नव्हता. मक्त्याच्या मामलती असत. त्यामुळे कुळांना पिळून अनेक तऱ्हांनी पैसा काढीत" अशी होती. ब्रिटिश एजंटचा सल्ला दहा किंवा पाच वर्षे पट्टे देण्याचा होता, तो दरबारी मंडळीस रुचेना. "का की त्यातले पुष्कळ लोक जमीनदार होते. ते आपल्या ताब्यातल्या कुळांकडून अशाच रीतीने पाहिजे तितका पैसा पिळून काढीत असत"..."इतके असूनही खजिन्यात पैशांची तंगीच असे, का की मामलेदार लोकांवर दरबारचा तितका दाब नसल्याने त्यांच्याकडून रकमेची भरपाई वेळच्यावेळी होत नसे."[१] रिकाम्या खजिन्यातून सरकारी अधिकाऱ्यांना वेतन मिळणे कठीण होते, त्यामुळे अस्वस्थता वाढे. फौजेचा पगार थकवण्यातही पुष्कळांचा फायदा होई तो वेगळा. फौज कमी करण्याचीही अडचण पडे, कारण समर्थ सत्तेला तोंड देणार कोण? "शेवटी त्या अडून बसलेल्या फौजेवर तोफांचा मारा चालवला. तेव्हा त्यातील मुख्यांपैकी दोनतृतीयांश असामी पडल्यानंतर त्यांचा एकोपा मोडला."[२]

इ० स० १८६७ मध्ये गंभीरसिंगाच्या धुमाकुळाचे वर्णन मागे एका प्रकरणात आलेच आहे. डलहौसीच्या कारकीर्दीत ग्वाल्हेर खालसा झाले नाही, हे एकोणिसाव्या शतकातील एक आश्चर्यच होय. इ० स० १८५७ मध्ये मात्र इंग्रजांशी एकनिष्ठ राहिल्याने तेथील गादी थोडी स्थिरावली. पण त्याच्या कारभारात इंग्रज सरकार वेळीअवेळी व सकारणअकारण हस्तक्षेप करीत राहिले. त्यामुळे प्रजेला दरबारचा वचक वाटलाच नाही. कधी राजा अल्पवयी तर कधी सत्तेचा अभाव, ह्या कारणांनी संस्थानातील जमीनदार आपल्याला इंग्रजांचे प्रजाजन समजत. अशी द्विदल राज्यव्यवस्था हानीकारक ठरून, अखेर शासनयंत्र मोडून पडते, असा आपला अनुभव आहे. माधवराव शिंद्यांसारखा कर्तृत्वशाली शासकही ह्या अवस्थेला पायबंद लावण्यास पहिल्या महायुद्धानंतरच धजावला. जवळजवळ एका शतकानंतर इ० स० १९२४ मध्ये, संस्थानच्या वतनदार जमीनदारांची एक कॉन्फरन्स बोलावून, ब्रिटिश सरकारच्या अनुमतीने, त्यांनी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या एका शतकाच्या अवधीत अनेक नवे हितसंबंध निर्माण झाले होते. ह्या प्रक्रियेत त्यापैकी निराधार हितसंबंधांना धोका पोचणे क्रमप्राप्त होते. आणि ज्यांच्या हितसंबंधांना

---

१. राजे दिनकरराव राजवाडे यांचे चरित्र, व्ही० के० ओक; पान ५२

२. राजे दिनकरराव राजवाडे यांचे चरित्र, व्ही० के० ओक; पान ९२

नुकसान पोचले त्यांना तो अन्याय वाटणे स्वाभाविक होते. त्यांचे त्या अन्यायाला एकच उत्तर होते—बगावत; व ते उत्तर ते सर्वदा देतच होते.

ग्वाल्हेरच्या सीमेवर पुष्कळशी किरकोळ संस्थाने होती. एका संस्थानात गुन्हे करून, सीमा ओलांडताच अपराधी निश्चिंत होई. ह्याचा अनुभव ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही वेळोवेळी येत होताच. ब्रिटिश भारतात झालेली सामाजिक क्रांती संस्थानी भारतात होण्याला संधी होतीच कुठे? त्या प्रदेशात शिक्षण, औद्योगीकरण ही प्रगतीची साधने अभावानेच जाणवली. येथे नवा मध्यम वर्ग निर्माण झाला नाही; रजपुतांचे महत्त्व कमी झाले नाही. आजही मध्यभारत त्यामुळे मागासलेला आहे. येथे वास्तविक वा काल्पनिक अन्यायाला बगावत करून उत्तर देणे हा क्षात्रधर्म समजला गेला व समजला जात राहिला.

भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात अन्यायाला ह्या बागींच्या कोशात नवा अर्थ प्राप्त झाला; आणि म्हणून त्यांच्या बगावतीला नवा आशय निर्माण झाला. इ० स० १९५२ नंतर दस्युभूमीत भडका उडाला त्याचे कारण हा नवा आशय होता. सामाजिक समता स्थापन करण्याचे आपले प्रयत्न हा 'बागीं'च्या हिशेबी अन्याय असल्याने, त्यांची 'बगावत' मोडून काढणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. प्रश्न आहे साधनांचा. आपले साधन काय असावे? दया की दांडके, क्षमा की शिक्षा, सजा की सुधारणा?

## ३. डाकू आणि त्याचे पाठीराखे

दस्युभूमीच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक व भौगोलिक संदर्भात तेथील दस्यू बराच वेगळा दिसू लागतो. चंबळचा हा अनभिषिक्त राजा रुधिरप्रिय आहे; कारण रक्ताच्या मुसळधार वर्षावात तो जन्माला आला, पोसला व त्याने आपला पुरुषार्थ गाजवला. गेल्या दोनतीन शतकांत परिस्थितीशी सतत संगर करताना, जो दयार्द्र झाला तो नष्ट झाला. जो धैर्याने झगडत राहिला त्याला बाहेरच्या जगात तीव्र गतीने झालेले परिवर्तन जाणवले नाही. मुलुखगिरीची कल्पना गतकाळाच्या पोटात गडप झाली हे त्याला आजही आकलन होत नाही. तो अजूनही जुनी वैरे चालवतो. एखादा राजा मानसिंग प्रदेश 'जिंकतो', दरबार भरवून मुजरे, नजराणे घेतो, कज्जे ऐकतो, निवाडे करतो, शिक्षांची अंमलबजावणी करतो.

युद्ध करणे हा त्याचा क्षात्रधर्म आहे. त्यात तो मेला तर त्या मरणाचे त्याला भय नाही. त्याच्या आप्तस्वकीयांना दुःख नाही. त्याच्या जातीला उणेपणा नाही. उलट त्याच्या विधवा पत्नीला आपल्या वैधव्याचे भूषण आहे, त्याच्या मातापुत्रांना

त्याचा अभिमान आहे. क्षत्रियाचे रणभूमीवर पतन वीरोचित आहे असे तो समजतो. स्वतः भगवंतानी त्याला संदेश दिलेला आहे, 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्.'

आपण त्याला डाकू म्हणतो, पण तो तोंड झाकीत नाही की तोंडाला रंग फासीत नाही. तो आपल्याला अज्ञात नसतो. त्याचे व्यक्तिवैशिष्ट्य (identity), त्याचा ठिकाणापत्ता, त्याची मालमत्ता, परिवार, नातलग सर्वांची संपूर्ण माहिती पोलिसांना सहजी मिळते. त्याचे छायाचित्र किंवा अंगठ्याचे ठसे त्यांच्याजवळ नसतात, कारण खेड्यात छायाचित्रे फारशी घेतली जात नाहीत. पहिला गुन्हा करून 'वेहड पकडणारां'चे ठसे घेण्याची संधी पोलिसांना मिळणे शक्य नसते. आपण त्याला डाकू म्हणतो ते आपल्या सोयीसाठी; पण तो स्वतःला 'बागी' (बंडखोर) म्हणवतो. इंग्रज साम्राज्याच्या इ० स० १९४२ सालच्या बागींनी त्याचा आश्रय घेऊन त्याचे हे नामकरण मान्यही केलेले आहे. त्याचे गोत्र राघोगडच्या जयसिंगाचे आहे. दीड शतकापूर्वी त्याने शिंद्यांना सळो का पळो करून जहागीर मिळवली असती आणि पाऊणशे वर्षांपूर्वी त्याला पोटगी मिळाली असती.

त्याचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार आहे. रुंद हाडापेराचा, पिळदार स्नायूंचा, पुऱ्या उंचीचा हा उमदा मनुष्य खांद्यात वाकत नाही. त्याची मान सर्वदा ताठ राहते. त्याच्या झुबकेदार मिशात एखादा रुपेरी केस डोकावताना क्वचित दिसतो. त्याचे डोळे पाणीदार व सावध आहेत. त्याच्या खांद्यावरची बंदूक अद्ययावत आहे, तो तिला दिवसाचा एक क्षणही विसंबत नाही. ती बंदूक नेहमीच स्वच्छ व वंगण दिलेली असते. काडतुसेही सदा हाताशी असतात व नेत्याबद्दलची त्याची निष्ठा आपल्यालाही अनुकरणीय वाटणारी आहे. त्याचा नेम किती अचूक आहे[1] व त्याची योजकता (strategy) किती चतुर असू शकते ह्याचा कडू अनुभव आपण अनेकदा चाखला आहे. घोड्यावर त्याची मांड चांगली आहे. अंगमेहनत त्याला आवडत नसली तरी तो काटक आहे. तो लांब मजला मारू शकतो. त्याला दूध व तूप ह्यांचे प्रेम आहे.

तो क्रूर आहे. त्याच्या डोळ्यातही क्रूरतेच्या छटा आहेत, पण तो माणसातून उठलेला नाही. त्याच्या मनाला विकृती जडलेली नाही. तो नाके कापतो, नरबली देतो, प्रसंगी छळही करतो; पण ह्यादेखील परंपरेने त्याच्याकडे आलेल्या गोष्टी आहेत. त्याला संताप येतो, तसा स्नेहही वाटतो. आपल्या परिवारावर, जमीनजुमल्यावर, घरादारावर, जातीवर, खेड्यावर त्याचे गाढ प्रेम आहे. त्याच्यासाठी तो त्यागही करू शकतो. त्याला मुक्या जनावराचेही प्रेम आहे.

तो धार्मिक आहे. तुलसीरामायणाचा आदर्श मर्यादापुरुषोत्तम राम त्याला वंद्य आणि अनुकरणीय आहे. तो बहुशः नियमित पूजापाठ करतो, शकुन पाहतो, आणि संकटात 'भगवंताच्या मर्जी'वर अवलंबून राहतो. त्याच्या समाजात त्याला फार

---

१. मानसिंग शब्दवेधी होता—पांढरे केस, हिरवी मने, विठ्ठलराव घाटे

मान्यता आहे. लग्नकार्यादी समारंभ ह्याच्यावाचून सुने राहतात. तो आला म्हणजे त्याला खडी ताजीम मिळते. जुन्या भाट-चारणांप्रमाणे आजचे जानपद कवी त्याच्यावर आल्हा रचून गातात. चंबळचा भाट आल्हा गातो,

'जिनके वैरी सुखसे सोवे, उस जीवन को धिक्कार.'

तो दिलदार आहे. कर्नल स्लीमनने म्हटल्याप्रमाणे प्रचंड प्रमाणावर लूट आणल्यावर पेंढारी मुक्त हस्ताने खर्च करीत, तशी तोही करतो. शत्रूंना तो कर्दनकाळ पण मित्रांना शीतल चंद्र आहे—त्यांचा पाठिराखा आहे. तो लूटमार करतो? छेः! ते संपत्तिहरण. त्याचा तो क्षात्रधर्म आहे. गोग्रहणाचे दाखले तर महाभारतातसुद्धा सापडतात ना? 'जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' हा त्याच्या शौर्याला करभार आहे. आणि धर्मशास्त्रांनीच असे लिहून ठेवलेले आहे 'असन्तुष्टा द्विजा नष्टाः, सन्तुष्टाः क्षत्रियाधमाः'; आणि वैभव मिळवण्याचा जवळचा मार्ग लोकांच्या संपत्तिहरणातून आहे हे यालाच काय पण भारताच्या आधुनिक उद्योगपतींनाही विदित आहे.

त्याच्या वैभवाच्या कल्पना मध्ययुगीन आहेत. त्याचे वाडे जुन्या पद्धतीचे, राहाणी जुनी व त्याचे आतिथ्यही जुन्या वळणाचे, भरघोस आहे. त्याच्या 'संपत्ति-हरणा'तून त्याचा, त्याच्या परिवाराचा योगक्षेम सुखाने चालतो. 'देवाची दया!'

विनोबांच्या भूमिकेवर आपण असंतुष्ट आहोत. 'पाय लावावा नी नमस्कार करावा की झाले काम' अशातला हा प्रकार होतो, असे आपल्याला वाटते. स्वतः डाकूला आचार्यांच्या प्रयत्नांची बूज आहे का हा प्रश्न आहे. कारण त्यांच्यापैकी अनेक विनोबांच्या सव्यापसव्यावर रुष्ट होते. ज्यांनी आत्मसमर्पण केले, त्यांनी ते दयेसाठी केलेले दिसत नाही. विनोबांच्या शब्दात "कर्मफल ह्याच जन्मात भोगून मुक्त होण्यासाठी" ते स्वाधीन झाले. तहसीलदारसिंगाला फाशीच्या फळीवरून वाचवण्यासाठी ते स्वाधीन झाले असेही सुचवण्यात येते. ते खरे असल्यास, विनोबांच्या प्रयत्नांचे मूल्य कमी होईल, पण आत्मसमर्पितांची एकनिष्ठा पाहून मनाला आश्चर्य व आदर वाटल्यावाचून राहणार नाही.

विसाव्या शतकातल्या ह्या डॉन क्विक्झोटला स्वतःच्या प्राणांची पर्वा नाही, आणि इतरांच्या प्राणांची त्याला किंमत नाही. आपल्या त्याच्याविरुद्धच्या मोहिमा म्हणजे त्याच्या मुलुखगिरीचेच प्रतिबिंब त्याला वाटते. पण आपल्या सात्त्विक संतापाचा अर्थ त्याला कळत नाही. "आपल्याला खेळाचे नियम कळत नाहीत" असे त्याला वारंवार वाटते. जहागीर राहो, पण पोटीस्त द्यायला काय हरकत आहे?—हे त्याला समजत नाही आणि त्याची अडचण आपल्याला अनाकलनीय असते.

आपण एखाद्या सायंकाळी त्याच्या घरी गेलो, तर आदराने तो आपल्याला बसवून घेईल, आपली माहिती विचारील, पण केव्हा? त्याचा संशय फिटल्यावर. तोवर तो अत्यंत सावध असेल. परका मनुष्य कोण असेल कोणी सांगावे? तो

पोलिसाचा मुखबीर असेल किंवा त्याच्या शत्रूनेही टेहळ्या पाठवलेला असेल. खांद्यावरच्या नातवंडाचे नाक धोतराच्या सोग्याला पुसत तो आपल्याकडे तिरके कटाक्ष फेकील. त्याची ती साशंक नजर—ही चंबळच्या वातावरणाची पहिली निशाणी. आपल्या वागण्याचा परवल त्याला पटला, आपण शहरचे भोळेभावडे लोक, आपल्या वेडाप्रमाणे त्याला प्रश्न विचारायला आलो आहोत ह्याचा त्याला विश्वास वाटला, म्हणजे मग भारताच्या इतर ग्रामीण भागापेक्षा येथे काही वेगळे वाटत नाही. महाराष्ट्रातील जिज्ञासूला येथे दुधाची रेलचेल दिसते, आणि रोज रात्री झोपण्याच्या वेळी अर्ध्या शेराचा ग्लास गरम दुधाने भरून पुढे आला म्हणजे विचार पडतो, "पचेल का एवढे दूध?"

त्याला मुली आवडत नाहीत. एके काळी पोरीच्या गळ्याला जन्मताच नख लावण्याची चाल भारताच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशात होती, त्याला चंबळ-घाटी अपवाद नव्हती[1]. आज काय स्थिती आहे कोण जाणे; पण पोरींची लग्ने उत्तम स्थळे शोधून, खूप हुंडे देऊन केली जातात, हे मात्र खरे.

त्याच्या सहवासात राहताना आपलेही मन शंकाकुल व भयाकुल असते. आपल्याबद्दल कोणाला संशय आला तर तो गोळी घालणार नाही, अशी खात्री वाटत नाही. आपले भय व्यर्थ असले, तरी ते आपली पाठ सोडीत नाही. आपला शहरी पाखंडीपणा, समतेवरची श्रद्धा, परिश्रमाच्या प्रतिष्ठेवरचा विश्वास आणि अशा अनेक गोष्टी आपल्या मनाच्या तळाला खोल जाऊन लपतात, त्या शेवटपर्यंत.

भारताच्या अनेक भागात मी खेड्यातून हिंडले आहे. सर्वत्र गुंडांचे राज्य मला आढळून आले, तथापि सरकारी सत्तेबद्दलही लोकांच्या मनात दहशत आढळते. येथे मात्र सत्ता व जनता ह्यांचे नाते अहिनकुलाचे असल्याचा भास मला झाला.

असा आहे हा मध्ययुगीन दस्यू. त्याच्या भावविश्वाशी आपण कुठेही संपर्क स्थापन करू शकत नाही. त्याच्या अनुभवजगाशी आपल्या अनुभवाचे सांधे कुठेही जुळत नाहीत. त्याला शिक्षेने वठणीवर आणण्याची आपली इच्छा विफल होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण आपली भाषा परस्परांना समजत नाही हे आहे. आपण फाशी ही महत्तम शिक्षा समजतो. "जीवनाचा मोह प्राणिमात्राला असतो" ह्या आपल्या विश्वासावर तो समज आधारलेला आहे. डाकूचे म्हणणे पडते, "एका हत्येची शिक्षा फाशी, शंभर वा हजार हत्यांसाठीही एकच फाशी." मग नवा दस्यू भरती करताना मागणी करण्यात येते, "कोणाचा तरी खून करून मग टोळीत दाखल व्हायला ये." खडीतचा सीताराम लच्छीच्या गोळीला असाच बळी पडला. सैन्यभरतीच्या वेळी आपण पोलिसांचा रिपोर्ट मागवतो; टोळीत प्रवेश मिळवायला हत्या करावी लागते. पोलिसांच्या किंवा सेनेच्या गोळीला किंवा वाघाच्या भुकेला बळी पडणे

---

१. राजे दिनकरराव राजवाडे यांचे चरित्र, व्ही० के० ओक; पान १०९

दोन्ही गोष्टी केवळ दैवयोगाच्या समजल्या जातात; फार तर बलवान पक्षाने केलेल्या अन्यायाच्या. अन्यायाने वा दैवयोगाने कष्ट काढावे लागले तर दंडिताचा स्वभाव बदलत नाही ह्याची प्रचीती गेल्या महायुद्धात जर्मनीच्या टाचेखाली गेलेल्या समाजांनी आपल्याला दिलेली आहे.

दस्युजीवनाचे पुस्तक उघडून वाचल्यावर त्याचा एकच कोपरा आपल्याला गूढ राहतो. तो दरवर्षी लक्षावधी रुपयांची उलाढाल करितो. त्याच्या 'मिळकती'त येणाऱ्या रोख रकमेची व्यवस्था तर सहजी लागते. पण सोनेचांदी, हाकून आणलेली जनावरे, किंवा लुटलेला कपडा, धान्य किंवा जवाहीर ह्या वस्तूंची विल्हेवाट कशी होते? पेंढारी लुटीचा माल उघड बाजार भरवून विकीत; पण भारतात एकछत्री सत्ता निर्माण झाल्यावर त्या विक्रीचा मार्ग कायमचा बंद झाला. डाकूंच्या संचित धनाचे काय होते? गुन्हेगार जाहीर झाल्यावर त्याची मालमत्ता सरकारच्या जप्तीत जाते. तेव्हा कायदेशीर मार्गांनी वा राजरोसपणे ह्या संपत्तीचा विनियोग होत नाही, हे उघड आहे. ज्या शस्त्रसामग्रीच्या जोरावर दस्यूंनी चंबळघाटी व नंतर राजस्तानची पश्चिम सीमा गाजवली आहे ती शस्त्रास्त्रे कुठून येतात? ह्या यक्षप्रश्नाबद्दल आपण गाढ अंधकारात आहोत. चंबळघाटीत हिंडताना तस्कर-व्यापारी किंवा चोरीच्या मालाचे व्यापारी म्हणून काही लोकांकडे अधूनमधून अंगुलीनिर्देश करण्यात येतो, पण सारे अगदी हळू, गुपचूप. सरकारला ह्याबद्दल काहीच माहीत नसेल का! चौकशी कमिटीने[1] शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. त्याचे पुढे काय झाले?

डाकूगिरीचा आपल्याला दिसणारा लुटालुटीचा भाग हे आपल्या सत्तेला आव्हान आहे हे पटून त्याविरुद्ध प्रतिकाराची जोराची मागणी होते. पण डाकूगिरीचे जीवन *सर्वस्वी शस्त्रास्त्रांवर व काही प्रमाणात मालाच्या विल्हेवाटीवर अवलंबून आहे.* 'अभिशप्त चंबळ'मध्ये डाकूंना फौजेतून शस्त्रे व काडतुसे पुरवणाऱ्या लालसिंगाची माहिती आलेली आहे. सरकारी वार्तापत्रे बहुधा ह्या विषयावर मुग्धता स्वीकारतात. पोलिसांना मिळालेल्या शस्त्रांची ही लहानशी यादी परिस्थितीवर थोडा प्रकाश पाडते व आपले मन चिंताग्रस्त करिते.

आग्रा रेंजच्या डी० आय्० जी० चे निवेदन पाहा. त्यांच्या हाताखालील प्रदेशात दीडशे डाकू आधुनिक शस्त्रांनी सज्ज असल्याचे सांगून ते म्हणतात, "ह्या टोळयांजवळ कारबाइन्स, ·३०३ रायफल्स व टेलिस्कोपिक साईट असणारी एक गन आहे...इ० स० १९५८ मध्ये आर्सेनेलमध्ये बनवलेल्या गोळ्या डाकू वापरतात असे पोलिसांना आढळून आले आहे."[2]

---

१. भिंड मोरेना इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ४०

२. हिंदुस्तान टाईम्स : तारीख ९-४-१९६३

राजस्तानचे एक वार्तापत्र म्हणते, "पोलिसांना अनेकांपैकी खालील शस्त्रेही मिळाली आहेत. टी० एम्० जी०, ·३०३ रायफल्स, १२ बोअर शॉटगन्स, रिवॉल्वर्स व शेकडो जिवंत काडतुसे."[१]

मध्यप्रदेशाची वार्तापत्रे सहसा शस्त्रे व लूट ह्यांबद्दल बोलत नाहीत. पण राजस्तान व संयुक्त प्रदेशातून आलेली एकटी-दुकटी वार्ता वाचणारा शितावरून भाताची परीक्षा करू शकेल.

जयपूरच्या दिनांक ३-२-६३ च्या वार्तापत्राप्रमाणे "जेसलमीर, बिकानेर, गंगासागर, जोधपूर व बारमेर येथून एक लाख वीस हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीची मालमत्ता नेण्यात आली. ह्याशिवाय डाकूंनी नव्वद उंट व दोनशेत्रेसष्ट शेळ्यामेंढ्या नेल्या. त्यापैकी तेहतीस उंट व तेवीस हजारांवर रुपये परत मिळवण्यात आले."[२] हे निवेदन राजस्तानचे गृहमंत्री श्री० माथूर ह्यांचे आहे.

राजस्तानच्या सीमेवरून चोरटा व्यापार मोठ्या तेजीत चालत असावा. एक वृत्त म्हणते, "सोन्याऐवजी, लवंगा, कापूर, केशर, जायफळ, सफेदा, झिप-चेन्स व पाकिस्तानमध्ये सुलभतेने मिळणाऱ्या इतर चैनीच्या वस्तू आयात होतात आणि रेशमी कपडा, सुती कपडे, वॉइल, बिडी-पत्ता ह्या वस्तू निर्यात होतात."[३]

ह्या गूढात गुरफटलेल्या प्रकरणाचा आणखी एक पैलू लक्ष वेधून घेणारा आहे. ह्या डाकूंना राजकीय पक्षांची मदत असल्याचे वारंवार कानी येते. 'अभिशप्त चंबळ'मध्ये एका एम्० एल्० ए०चे पत्र उद्धृत केलेले आहे. मध्यप्रदेश असेंब्लीत झालेल्या चर्चेत श्री० अर्जुनसिंग व श्री० राजारामसिंग ह्या काँग्रेस सभासदांनी डाकूंच्या मागे 'राजकीय व सामाजिक वजन' असल्याचे सांगितले. श्री० राजारामसिंग ह्यांनी त्यांची निवडणूक होताच त्यांच्या मतदारसंघात एकाएकी खूप दरवडे पडल्याचेही विदित केले. ह्या चर्चेत अद्ययावत शस्त्रे पोलिसांकडून मिळतात अशी तक्रार प्रजासमाजवादी पक्षाचे सदस्य श्री० तिवारी यांनी केली.[४]

शिवपुरीचा प्रसिद्ध डाकू अमृतलाल ह्याने खंडणीचे लक्षावधी रुपये मिळवले, आणि ते आपल्या मित्रांकडे जमा केले. त्याचा मृत्यू होताच ते त्या मित्रांनी गडप केले. त्याचा मुलगा बालो ह्याला विलक्षण धक्का बसला. त्याची कार व ट्रक बापाच्या इटाव्याच्या मित्राने घेतली, कारण ती त्याच्या नावाने रजिस्टर झालेली होती. दिल्लीच्या एका पेढीकडून कर्ज घेऊन बालोने आणखी एका माणसाच्या भागीदारीत नवी ट्रक घेतली, सरकारने त्याला परमिटही दिली. पण ट्रकवरचे हप्तेच काय पण व्याजही भरता

१. अमृतबझार पत्रिका : तारीख ३०-४-१९६३
२. हिंदुस्तान टाईम्स : तारीख ५-२-१९६३
३. अमृतबझार पत्रिका : तारीख ३०-४-१९६३
४. हिंदुस्तान टाईम्स : तारीख ५-४-६३

न आल्याने ट्रक भागीदाराने घेतली. "त्यानंतर तो आपल्या 'काका'कडे पैसे मागावयास गेला. ह्या काकाने—चंद्रभान किरारने दोन–मोठाली घरे बांधली होती, व तो श्रीमान होता. बालोने बापाने ठेव म्हणून ठेवलेला पैसा त्याच्याजवळ मागितला. ठेव आपल्याजवळ असल्याचे चंद्रभानने नाकारले आणि आपल्या पंचायतीवर वजन आणून बालो गुन्हेगार असल्याच्या सबबीवर त्याच्यावर बहिष्कार घातला."[1] ह्या अन्यायाने चिडलेला बालो लौकरच खुनी व डाकू झाला; आणि जवळपास दहा महिने भरपूर धुमाकूळ घातल्यावर जुलैमध्ये मारला गेला. त्याच्याजवळ रायफल व ५० राऊंड्स् ॲम्युनिशन मिळाली.[2] डाकू हिंस्रपणा, हत्या, छळ करतो, माणसे पळवून नेऊन खंडणी घेतो, हे आपल्या पाहण्यांत आलेले आहे. तथापि वरील थोड्या माहितीवरूनही आपल्याला हे स्पष्ट दिसून येते की ह्या डाकू टोळ्यांमागे एक बराच मोठा वर्ग उभा आहे. कारण डाकूगिरीमुळे त्या वर्गाचा आर्थिक लाभ मोठ्या प्रमाणावर होतो, आणि अभ्यासक म्हणतात त्याप्रमाणे "गुन्हेगारी लाभदायक होते."

असा आहे आपला डाकू, व त्याच्या मागे दडून वरची साय खाणारा वर्ग. चांभारांवर होणाऱ्या अन्यायाचा तर कुठे थांगपत्ताच लागत नाही. ही माहिती अंधारात ठेवणारा वर्ग त्याहूनही मोठा आहे, एवढे आपण लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

---

१. स्टेट्स्मन . ८-२-१९६३

२. स्टेट्स्मन : १५-७-१९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ............ विभाग ..............
क्रमांक ............ नों. दि. ..............

# उपाययोजना आणि त्यांचे यशापयश

## १. राजाची दया आणि दंड

जेव्हा एखादा समाजखंड, अन्यायाला तोंड देण्याच्या विचाराने, प्रस्थापित सत्तेला विरोध करू लागतो तेव्हा तो समाजखंड नुसत्या दंडाने किंवा जुलमाने वठणीवर येत नाही. एकीकडून त्याला चेपीत, तर दुसरीकडून चुचकारीत व आपला दृष्टिकोन त्यांना पटवून देत, त्या समाजखंडाला बृहत्समाजाशी मिळवून घ्यावा लागतो. ह्या गोष्टीची जाणीव शासनाला अधुंकपणे सतत असे.

पेंढाऱ्यांविरुद्ध प्रचंड मोहीम उभारताना ब्रिटिश शासनाने पठाण नेता अमीरखान ह्याला टोकची जहागीर देऊन प्रथमच त्यांची फळी फोडली. पुढे त्याचा जावई गफर ह्यालाही जहागीर दिली. करीमखानाला जहागीर देण्यात आली. इतरही पेंढाऱ्यांच्या लहानमोठ्या जहागिरी ग्वाल्हेर संस्थानात सर्वत्र होत्या, व त्या सगळ्या मध्यभारतात पसरलेल्या असण्याचा संभव आहे. पेंढारातील लोकांना घोडदळ-तोफखान्यात नोकऱ्या व शेती देऊन, दांडक्याने चोपलेल्या त्या लोकांना पोटाशी धरूनच शांत करण्यात आले.

ठगांना प्रचंड शिक्षा झाल्या तरी त्यांच्या मुलांना प्रामाणिकपणे पोट भरण्याचा धंदा शिकवण्याच्या हेतूने स्लीमनने जबलपूर व सागर येथे औद्योगिक शिक्षणाच्या शाळा काढल्या. प्रथम पालक मुलांना तेथे पाठवण्याच्या विरुद्ध असत. पण मुलांनी तयार केलेल्या मालाची विक्री होऊन पैसे मिळू लागताच हा विरोध थांबला व इतरही ह्या शाळेत प्रवेश मागू लागले. येथे विटा भाजणे, इमारती काम, लाखेचे रंग व सील करण्याची लाख करणे, विणकाम, कांबळी व दऱ्या विणणे वगैरे कामे

शिकवण्यात येत. व्हिक्टोरिया महाराणीने येथून एक मोठी सतरंजी करवून घेतली होती असे म्हणतात.[1]

ठगांप्रमाणेच बधक डाकू उत्तर प्रदेशात धुमाकूळ घालून होते. त्यांचा निःपात केल्यावर त्यांच्या पोटाला प्रामाणिक साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने गोरखपूर जिल्ह्यांत एक 'बधक वसाहत' स्थापन करण्यात आली होती दुर्दैवाने ती यशस्वी झाली नसली तरी जुने पायंडे नव्या संस्कारांनीच मोडावे लागतील ह्याची जाणीव अधिकाऱ्यांना झालेली होती हा त्याचा अर्थ होतो.

बावरीया ह्या लोकांबद्दल इ० स० १८६८ च्या रिपोर्टमध्ये खालील उतारा सापडतो. "युरोपीयन, पोलिस व न्यायखात्याच्या अधिकाऱ्याने शक्य तेव्हा ह्या लोकांमध्ये जावे. मुलांना शाळेत पाठविण्यासाठी पैसेसुद्धा द्यावेत. मी पैसे देईन आणि मुलांना प्रामाणिक बनण्याची सवय लावीन." संस्कारांचे महत्त्व सांगताना ह्या रिपोर्टमध्ये खालील मनोरंजक गोष्ट दिली आहे.

राजे दिनकरराव राजवाडे ग्वाल्हेरचे दिवाण असताना त्यांनी एका प्रसिद्ध 'राज-चोराला' सांगितले, "तुला घर देतो, चांगला पगार देतो, तू चोरी करता नाही कामाची." त्याने सहा महिन्यांसाठी अट कबूल केली. "तेवढ्यात मी कंटाळलो नाही तर मुदत लांबवू" असा करार केला. सहा महिने पूर्ण होण्यापूर्वीच तो राजचोर राजवाड्यांकडे येऊन म्हणाला, "मला परत जाऊ द्या. बसून कंटाळा आला आहे." राजवाड्यांनी कराराप्रमाणे त्याला जाण्याची—म्हणजे चोराच्या जीवनात—परवानगी दिली. ह्या व असल्याच अनेक अनुभवांनी प्रेरित होऊन इ० स० १८८८-मध्ये एक प्रयोग ह्या क्षेत्रात करण्यात आला. त्याची माहिती त्या वर्षीच्या रिपोर्टात दिलेली आहे.

"ग्वाल्हेरचे रेसिडेंट कर्नल बार ह्यांच्या साहाय्याने इन्स्पेक्टर जनरलच्या इच्छापूर्तीसाठी मी पन्नास सशर्त 'परवाने' देण्याचा हुकूम दिला. ह्या परवान्यावर, ब्रिटिश हद्दीत वा इतर संस्थानी प्रदेशात झालेले गुन्हे, त्याचप्रमाणे हत्या वा खून ह्या गुन्ह्यांना क्षमा मिळू नये अशी अट होती. तीन महिन्यांच्या मुदतीत शरण येणाऱ्या जाहीर गुन्हेगारांना हे परवाने देण्याची आज्ञा श्री० उमरैत ह्यांना दिलेली असून, त्यानंतर उरलेले परवाने रीजन्सी कौन्सिलला परत द्यावयाचे होते."[2]

हे परवाने देऊन फायदा झाला, असे ह्या रिपोर्टात नमूद केलेले आहे. "ह्या धोरणाने इसागढ जिल्ह्यात शांतता झाली व क्रूर कृत्यांना आळा बसला."

हा रिपोर्ट पुढे असे नमूद करितो की "हिरजी व महिपसिंग ह्यांनी मागितलेली माफी त्यांना दिनांक १-४-१८८९ रोजी देण्यात आली. सागर जिल्ह्याच्या

१. दी यलो स्कार्फ : सर फ्रान्सिस टकर; पान ९१

२. ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट ऑफ ग्वालेर स्टेट १८८८–९२; पान ३

ललितपुरमधून आतबाहेर करणाऱ्या डाकूंना अडवण्याचे त्याचप्रमाणे त्या भागात गुन्हे घडू न देण्याचे कामही एका कराराने ह्या दोघांवर सोपवण्यात आले. त्याचप्रमाणे कोठेतरी स्थायिक होण्यापूर्वी वेटवा नदीचे ओहोळ राखण्याचे कामही त्यांच्यावर सोपवण्यात आले."

ह्या कामाचा मुशाहिरा (Stipend) म्हणून हिरूला दरमहा शंभर रुपये व पंचमनगर हे गाव जहागीर मिळाले. महिपतसिंगला गोधन गावाचा तिसरा हिस्सा देण्यात आला. ह्या 'प्रेम-अभियाना'ने कुठली वळणे व कशी घेतली, हा मनोरंजक संशोधनाचा विषय होईल. पण उथळ पायावर उभारलेली ही इमारत तेव्हाच खचली. ग्वाल्हेरचा रेसिडेंट दिनांक ८-४-१८९९ ला लिहितो,

"नियमित भत्ता व जमीन देऊन डाकूंना स्थायिक (settle) करण्याच्या जुन्या पद्धतीने डाकूंची नवी पिढी किती शिरजोर झाली, हे दिसून येईल. दरबारच्या बिनतोड धोरणानेच जुनी राजवट गेल्याची त्यांना जाणीव झाली, आणि कोणत्याही तऱ्हेची दया किंवा समजूतदारपणा दाखवण्यापूर्वी डाकूंचा समूळ नाश करणे आवश्यक आहे हेही स्पष्ट झाले. आमच्या नव्या धोरणाने डाकूंना शिधा व साहाय्य मिळणे दुरापास्त झाले असून, त्यांना सुलभ आश्रय मिळेनासा झाला."[1]

ह्याच रिपोर्टात, इ० स० १८८८ मध्ये शांत झालेल्या इसागढ प्रांताच्या सरसुभ्याने दिनांक २८-३-९९ ला ग्वाल्हेरला दिलेल्या अहवालाचा काही भाग खाली दिलेला आहे.

"मी नियुक्त होऊन आलो (१८-१-१८९८) तेव्हा चंदेरी, पिछोर, करेरा परगण्यात डकैत फार होते. लोकांना जिवाचे भय वाटे...भल्या घरच्या स्त्रिया घरी न झोपता गरिबांकडे जाऊन निजत...मी माझे हेडक्वार्टर्स पिछोरला नेले, कारण जुन्या अनुभवावरून पिछोरजवळची काही खेडी डकैतीची माहेरघरे होती व इतर काही खेडी त्यांना आसरा व अन्न देण्यात साहाय्यक होती."[2]

परिच्छेद ४ मध्ये हाच अधिकारी इ० स० १८८८ मध्ये देण्यात आलेली माफी, पोटगी (stipend) वगैरेंचा उल्लेख करून म्हणतो, "माझ्या अपेक्षेपेक्षा डाकूंनी जास्त ताणून धरले त्याचे कारण असे होते की, आपल्याला पुन्हा क्षमा मिळून आपल्या राहण्याची सोय केली जाईल असा डाकूंना पूर्ण विश्वास होता. ह्या हेतुपूर्तीसाठी ते जास्त क्रूरपणे डाके घालीत राहिले."

काही मोठ्या टोळ्या नष्ट झाल्यावर, इतर टोळ्यांचे लोक समझोता होऊन माफी मिळावी म्हणून ह्या अधिकाऱ्याकडे माणसे पाठवू लागले. "पण ह्या गोष्टीला

---

१. सप्रेशन ऑफ ठगी अँड डेकॉयटी डिपार्टमेंटल रिपोर्ट, १८९९–अपेंडिक्स ए; पान ५

२. सप्रेशन ऑफ ठगी अँड डेकॉयटी डिपार्टमेंटल रिपोर्ट, १८९९ : परिच्छेद २, १५, १७, १८.

स्वच्छ नकार देण्यात आला. मी त्यांना स्पष्ट सांगितले की अशा वायफळ गोष्टी मी ऐकूनही घेणार नाही. तथापि डाकू बिनशर्त स्वाधीन झाले तर त्यांचा विचार करता येईल. मात्र त्यांना न्यायालयात उभे राहावेच लागेल. काही ठाकूर इतके चिडले की, त्या टोळ्यांना माफी न मिळाल्यास इ० स० १८८८ मध्ये माफी मिळालेले त्यांचे नातलगही पुन्हा डाकूटोळ्यांना जाऊन मिळतील असा धाक त्यांनी मला दिला."

"जातीयतेमुळे व लुटीच्या विक्रीने होणाऱ्या भरपूर लाभामुळे डाकूगिरी बंद व्हावी असे पुष्कळ ठाकुरांना वाटत नाही," हे कारण ह्या रिपोर्टात नमूद केलेले आहे. डाकूंना मदत पोचवण्यासाठी शूद्र-अतिशूद्रांचा व आदिवासींचा उपयोग केला जातो, हेही ह्या रिपोर्टात नमूद करून, डाकूंची आश्रयस्थाने सांगण्यासाठी त्यांना माफीचे आश्वासन देऊन त्यांची मदत मिळवल्याचे उल्लेख आहेत. ठाकुरांची मदत थांबवण्यासाठी त्यांना पकडून त्यांच्या घरावर पहारेही बसवण्यात आले.[1]

येवढे कडक शासन झाल्यावर ह्या प्रदेशात सर्वत्र आबादीआबाद झाली. इ० स० १९०२ मध्ये जनावरांची चोरी थांबवण्यासाठी त्यांना डागण्याचे हुकूम शिंद्यांनी सोडले, येवढेच ह्या स्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर सांगावयाचे.[2]

त्यानंतर डाकूगिरीला त्रासून, महाराज माधवराव शिंदे ह्यांनी इ० स० १९२० ला त्याच 'शांत करेरा'ला जमीनदारांची सभा बोलावली.[3] डाकूंच्या उच्छादाबद्दल चर्चा करून डाकू हे जमीनदारांचे नातलग व त्यांच्या मदतीने जगणारे आहेत हे त्यांनी अत्यंत स्पष्ट सांगितले. त्यांना आसरा देण्याबद्दल जमीनदारांची निंदा करून शिंदे म्हणाले, "मर्दांनो, विचार तर करा. तुमच्या पडदानशीन बायकांशी ह्यांनी निर्दयपणे वागावे, पुरुषांच्या नाजूक भागी दगड बांधून त्यांना यमयातना द्याव्यात, हा केवढा अधर्म आहे! तुमची आपापल्या धर्मावर श्रद्धा आहे. परमेश्वराचे भय बाळगा..." "तुमचे नातलग व डाकू नी बदमाशांच्या सहकार्याने डाके घालतात त्यात तुमची अब्रू जात नाही का?" शिंद्यांनी रजपुतांच्या शौर्याभिमानालाही आव्हान दिले. "तुम्ही सर्व लोक खानदानी आहात. हे काय शौर्याचे, नाव कमावण्याचे काम आहे? तुम्हाला शौर्यच दाखवायचे असेल तर फौजेत का नाही जात? तेथे डोकी उडवण्याची, रक्त सांडण्याची उत्तम संधी असते." ते पुढे असेहि म्हणाले की पोटासाठी हा धंदा पत्करला असाल तर दोन वर्षांपूर्वी पोटित्त देण्याचे मी जाहीर वचन दिले होते, "पण ह्यावेळी मी नोकऱ्यांचे आश्वासन देणार नाही. कारण कदाचित तुम्हाला वाटेल, मी भीतीने नोकऱ्या देत आहे."

---

१. सप्रेशन ऑफ ठगी अँड डेकॉयटी डिपार्टमेंटल रिपोर्ट, १८९९ : परिच्छेद १५, १७, १८

२. रिपोर्ट ऑन द वर्किंग ऑफ ठगी अँड डेकॉयटी डिपार्टमेंट, १९०२; पान २

३. जनरल पॉलिसी दरबार रियासत ग्वाल्हेर जिल्हा नं० १ परिशिष्ट नं० २०; पान ५९८–६९३

डाकूंना हजर करण्यासाठी एक महिन्याचा अवधी देण्यात आला व जमीनदारांनी त्या अवधीत ते काम पूर्ण न केल्यास कडक उपाययोजना करण्याचाही निश्चय त्यांनी जाहीर केला. कडक उपाययोजनेने लोकांना त्रास होईल; पण "मात्र माझ्या व्यवस्थेने जर कोणाला त्रास झाला तर मी कोणाचे ऐकून घेणार नाही." ही धोक्याची सूचनाही दिली.

शिंदे सभेतून गेल्यावर जमीनदारजहागीरदारांनी सभेतच विचारविनिमय केला, डाकूंना हजर करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि डाकूगिरी थांबवण्यासाठी काही उपाययोजनाही सुचवण्यात आली. स्वाधीन केलेल्या डाकूंना शिक्षा देण्याचे कार्य महाराजांवर सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सर्वांना धन्यवाद देऊन शिंदे म्हणाले, "कमाऊ पूत तुम ही हो—" डाकूंच्या शौर्याबद्दल ते म्हणाले, "डाकूंना आपल्या शौर्याचा, लढाऊ वृत्तीचा अभिमान असला तरी आम्ही त्यांना शूर म्हणू शकत नाही. झोपलेल्यांना मारणे, विचाऱ्या स्त्रियांना छळणे, हे शौर्य नव्हे. शिकारीचा वेश घालून, खड्डयात बसून, जनावरांची शिकार आम्हीदेखील करतो. पण त्याला शिकार म्हणतात, शौर्य म्हणत नाहीत. शूर लोक दंड ठोकून मैदानात उतरतात आणि शत्रूला सामना देतात. जर डाकूंना शौर्याची चाड असेल तर त्यांनी आमच्यासमोर येऊन विडा उचलावा, आमच्या डोळ्याला डोळा द्यावा; मग जंगलात जाऊन आम्ही त्यांच्याशी सामना देण्यास तयार आहोत. शौर्याचा सामना चोरट्यांना करता येणार नाही. चोरांना चोर आणि शूरांनाच शूर म्हणावे लागेल. माफ करा, मी म्हणतो की 'अशा शौर्याला धिक्कार असो!' रजपूत होणे ही काय थट्टा आहे? अरेरे! रजपूताने चोरी करावी व आपण शूर असल्याचा दावा करावा, ही केवढी शरमेची गोष्ट आहे!"

ह्या सभेनंतर, एक नोटिफिकेशन काढून जहागीरदार व जमीनदार ह्यांनी सुचवलेली योजना अंमलात आणण्यात आली. डाके-वाटमारीचा प्रदेश प्रक्षुब्ध (disturbed) प्रदेश म्हणून जाहीर करण्याचा अधिकार संस्थानाला मिळाला.

प्रक्षुब्ध प्रदेशांबाबत पोलीसचे इन्स्पेक्टर जनरल ह्यांना पुढील अधिकार मिळाले :

१. कोणी माणूस एखाद्या डाकूला वा त्याच्या टोळीतील माणसाला अन्न किंवा इतर मदत किंवा आसरा देतो असा वहीम आल्यास,

२. तो डाकूंच्या टोळीत सामील आहे किंवा इतरांसमवेत डाका घालून तो फरारी आहे असा संशय आल्यास,

त्या माणसाची स्थावर व जंगम इस्टेट जप्त करण्यात यावी.

महिनाअखेर झालेल्या सभेत, सत्त्याण्णव डाकू हजर केलेले होते, त्यापैकी त्र्याऐंशी जमीनदारांमुळे तर चौदा स्वेच्छेने स्वाधीन झाले होते. शिंद्यांचा शिक्षा देण्याचा अधिकार त्यांनी वापरला नाही. त्यांनी जमीनदारांची एक कमिटी ह्या

कार्यांसाठी नेमली. सरकारी अधिकाऱ्याने प्रत्येक डाकूचे अपराध कमिटीला सुनावले व कमिटीने शिक्षेबद्दल तत्काळ निर्णय घेतला. कमिटीने सुनवलेल्या शिक्षा थोड्या कमी करून महाराजांनी कायम ठेवल्या. डाकूंकडून मारल्या गेलेल्यांच्या विधवा व आश्रित यांचे भार दरबारने संभाळण्याचे जाहीर केले. डाकूंचे माहेरघर कानीबहेडी गाव ह्यावर नांगर फिरवून तो इतरत्र वसवण्याचे हुकूम दिले.

डाकूंना आश्रय देणाऱ्या अडतीस ठाकुरांपैकी बहुतेकांच्या जमिनी जप्त झाल्या. काहींना दंड तर एका स्त्रीला बंदीवासही झाला. डाकूंना 'सक्त सजा', 'फटके', 'दंड', 'संपत्तीची जप्ती' ह्या शिक्षा कमीअधिक प्रमाणात झाल्या; कोणी फाशी दिला गेला नाही. मात्र ह्या कैद्यांना चांगल्या वर्तणुकीसाठी सजेत सूट मिळू नये व आनंदप्रसंगी त्यांना सोडण्याची शिफारस करू नये, अशी आज्ञा देण्यात आली. दिनांक ३१ जानेवारीला सुरू झालेले हे पर्व दिनांक ३ मार्चला संपलेही होते. ह्याच समितीने दिनांक ८ एप्रिलला आणखी चौसष्ट केसेस पुऱ्या केल्या होत्या.

शिंदे लवकरच मृत्यू पावल्याने त्यांच्या या प्रयत्नाचे फळ काय मिळाले ते समजत नाही. बहुधा काही काळ सर्वत्र शांतता झाली असेल; पण हे कुत्र्याचे शेपूट नळीतून निघताच पुन्हा वाकडे झाले. इ० स० १९२५–२६च्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टमध्ये पुन्हा नवीन डाकूंची नावे आढळतात. ह्या वेळीं प्रदेश मात्र मंदसोर-भिल्साचा दिसतो. ह्याच वर्षी उत्तर प्रदेशाने यंग नावाच्या अधिकाऱ्याला 'स्पेशल ऑफिसर' नेमला होता. धोलपूर, ग्वाल्हेर व संयुक्त प्रांत ह्यांची संयुक्त बैठक होऊन गुन्हेगार परतीच्या (extradiction) अटी सुलभ करण्याचे ठरले.[1] पुढच्या वर्षी डाकूंचे क्षेत्र उज्जैनला हललेले दिसते, व विविध राज्यातील परस्परसंबंधाबद्दल टीपा दिसू लागतात.

"संयुक्त प्रांत, मध्यप्रदेश व ग्वाल्हेरच्या पोलिसदलांशी धोलपूरचे संबंध सुधारले असले तरी अजून सुधारणेला जागा आहे. झालावर, झाबुआ, प्रतापगढ संस्थानांकडून सहकार्य मिळाले नाही." मला इ० स० १९३२–३३पर्यंतचे रिपोर्ट पाहावयास मिळाले, पण सर्व रिपोर्टांची कथा तीच आहे. जाहीर केलेले गुन्हेगार मारले जातात, नवे निर्माण होतात. सैन्य व पोलिस या दोघांनाही सर्वत्र काम पडते, इत्यादी. ग्वाल्हेरच्या सीमेवर कितीतरी संस्थाने असावीत. त्यापैकी अर्धा डझन गुन्हेगारी दडपण्याला मदत देतात, दुसरी अर्धा डझन सहकार्य न देणारात सामील असतात. यंदा चांगल्या गटात असणारी संस्थाने पुढच्या वर्षी वाईट गटात जाण्याची शक्यता असते.

ह्यानंतर इ० स० १९३९ पासून मानसिंगाचा काळ सुरू होतो. मानसिंग, रूपा, पुतळी ही इ० स० १९५५पर्यंतची मोठी नावे. मानसिंग 'राजा मानसिंग' झाला. मानसिंगाचें उदाहरण ह्या क्षेत्राच्या विशिष्ट समस्येचे प्रतिनिधित्व करते. त्याला

---

१. ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट ऑफ् ग्वालियर स्टेट १९२६–२७

कुठलेही व्यसन नाही, असे म्हणतात. लोक कौतुकाने त्याच्या कहाण्या सांगतात की तो सत्कार्याला मदत करतो; पाठलाग केला तरच पोलिस आणि मुखबिरांची हत्या करतो, ज्यांच्याजवळ धन साठले आहे, अशी निवडक माणसे उचलतो; ब्राह्मणांना मान देतो व ते त्याला आशीर्वाद देतात; शाळेच्या इमारतीसारख्या सत्कार्याला देणगी देण्यासाठी, एखाद्या वेळीं, एखाद्या जमीनदारावर सक्तीही करतो. त्याचे भक्त अनेकदा म्हणतात की उच्च कोटीच्या डकैतीचा मानसिंग हा आदर्श आहे. जकात, सारावसुली व शिक्षण ह्या खात्याच्या अधिकाऱ्यांना त्याच्याकडून काहीच भय नाही. शेकडो लोकांच्या लग्नाच्या मिरवणुकीत तो दाखल होऊ शकतो.[१]

ह्या मानसिंगाच्या मृत्यूनंतर सरकारी चित्रगुप्ताने लिहिलेला हिशेब खालीलप्रमाणे आहे. "गुन्हेगार जगातील स्कार्लेट पिंपर्नेलची अखेर. मानसिंगच्या रेकॉर्डचे वजन एक टन भरले. सरकारी कारवायांचा खर्च एक कोटी रुपये आला. वीस वर्षांच्या दस्युजीवनात त्याने एकशेपंचाऐंशी हत्या केल्या, एकहजार एकशेबारा डाके घातले. अपहरण करून त्याला पाच लाखांवर खंडणी मिळाली. लूट करून कित्येक लाख रुपये मिळाले. इ० स० १९५४ नंतर पोलिसांबरोबर ऐंशी सामने झाले त्यात पोलिसांचे बत्तीस लोक मारले गेले व मानसिंगाचे केवळ पंधरा."[२]

इ० स० १९५३ मध्ये चौकशी समितीने तयार केलेला रिपोर्ट डाकूंना क्षमा (amnesty) देण्याच्या विरुद्ध होता. त्या प्रश्नाची तात्पुरती तड लावण्यासाठी त्यांनी अनेक उपाय सुचवले होते. त्याबरोबरच ह्या प्रदेशातील लोकांच्या कर्मठपणाचा आढावा घेऊन, हा प्रश्न केवळ कायद्याच्या जोरावर सुटणार नाही, हेही नमूद केले होते. "सामाजिक मूल्यांमध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे. 'बेहडमे चला गया' ही समाजमान्य प्रवृत्ती राहता कामा नये. स्त्रीपुरुष, सर्व जाती ह्यांच्यात श्रमप्रतिष्ठेच्या महत्त्वाची प्रतिष्ठापना पुनश्च करावी लागेल...लोकांच्या मनाचा कल पाहून लोकसत्ताक स्वातंत्र्याच्या वातावरणात जनतेचे स्वेच्छेचे सहकार्य मिळवायसाठी हरिजनांविरुद्ध होणारे अत्याचार व इतर गुन्हेगारी ह्यांच्याबद्दल त्यांच्या मनोभूमिकेत खूप फरक घडविला पाहिजे हे उघड दिसून येते."[३]

इ० स० १९६० मध्ये आचार्य विनोबा भाव्यांचा 'प्रेम-अभियाना'चा अयशस्वी प्रयोग झाला. आचार्यांच्या प्रवचनांमध्ये झालेल्या विषयांतरावर जनतेचे लक्ष केंद्रित होऊन आचार्यांच्या विरुद्ध वादळ उठले. तथापि गैरसमज व विरोध न होता पूर्ववत त्यांना सहकार्य मिळते आणि सर्व साधने उपलब्ध असती तरी त्यांचे प्रयत्न यशस्वी होण्याचा संभव अजिबात नव्हता.

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद १३

२. अभिशप्त चंबळ—तरुणकुमार भादुडी; पान ३२

३. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ५१

आज तर चंबळमध्ये दोन्ही बाजूंनी धुमाकूळ चालू आहे. डाकूंच्या टोळ्या रोज पकडल्या जातात किंवा मारल्या जातात, तरी डाकू अजून नमलेले नाहीत. जुलैमध्ये[१] उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व राजस्थान ह्यांच्यात झालेल्या संयुक्त हालचालींच्या ठरावाप्रमाणे आग्रा पोलिसांनी डाकूंविरुद्ध मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू केली, तर तीन सप्ताहांनंतर सशस्त्र पोलिसांच्या पाच कंपन्या चंबळच्या डाकूंविरुद्ध मोहिमेत गुंतल्या,[२] आणि इतकी धडपड करूनही जुलैमध्ये 'यमुना-चंबळ घाटी आतंक निष्कृती समिती'ने आपल्या मेमोरँडममध्ये, पंचवीस हजार माणसे संरक्षणार्थ नेमूनही डाकूग्रस्त अकरा जिल्ह्यात दहशत वाढत असल्याचा निर्वाळा दिला आहे.[१३] ही मोहीम संपून शांतता नक्की येईल. पण ती शांतता किती काळ टिकेल ह्याचा अंदाज कोण देऊ शकेल? आणि आज प्रेम-अभियानावर आपण संतप्त असलो तरी दहापाच वर्षांनंतर तो मार्ग आपल्याला पुन्हा अनुसरावा लागणार नाही ह्याचा निर्वाळा तरी कोणी द्यावा?

## २. लोकसत्तेचा पराभव

चंबळघाटीच्या समस्येचे समग्र समीक्षण करताना एक गोष्ट तीव्रतेने मनाला जाणवते. चंबळपरिसरात आज चालू असलेली दंगल निदान तीन शतकांइतकी पुराणी आहे. स्वतंत्र भारताने संस्थानांचे विलीनीकरण केले त्या वेळी जुन्या शासनसंस्थांचे हे जुनाट वंशपरंपरागत दुखणे त्याच्या वाट्याला आले आहे. आचार्य धर्माधिकाऱ्यांनी वारंवार टॉडने वर्णन केलेल्या राजस्तानच्या परंपरा उल्लेखिल्या त्या ह्याच कारणाने. 'अभिशप्त चंबळ'च्या युगायुगांच्या 'भग्नतेच्या गाण्याचा' अर्थही कसा लावायचा? 'चंबळके बेहडों में'च्या लेखकाने जुना इतिहास सांगण्यात काही पाने खर्ची घातली आहेत. आणि प्रस्तुत लेखिकेलाही तोच मार्ग अनुसरावा लागला आहे. चंबळघाटीची दंगल बाह्यांगांनी संपूर्णतः होती तशीच राहिली असली तरी स्वातंत्र्योत्तर भारतात तिचा आत्मा मात्र संपूर्णतः बदलला आहे, आणि त्या आत्म्याचे स्वरूप, तिच्या बाह्य दर्शनावरून आकलन न झाल्याने आपली दिशाभूल होत आहे.

चंबळघाटीत होणारी दंगल ही केवळ डाकूगिरी नव्हती; मुलुखगिरी किंवा बंडाळी असेच तिचे स्वरूप असल्याचे ह्यापूर्वी वारंवार निदर्शनाला आलेले आहे. मध्ययुगीन

१. द टाइम्स ऑफ इंडिया : २०-७-१९६३
२. द स्टेटस्मन : ११-८-१९६३
३. द टाइम्स ऑफ इंडिया : २०-७-१९६३

किंवा संस्थानी भारतात चालणाऱ्या बंडाळीची मुळे शासनसंस्थेच्या अनियंत्रित सत्तेमध्ये होती, आणि रजपुतांची त्या अनियंत्रित सत्तेच्या जुलुमाविरुद्ध होणारी प्रतिक्रिया बंडाळीचे रूप घेत होती. तरीदेखील 'बार्गी'चे ह्या सत्तेशी मूलभूत मतभेद नव्हते. ह्यामुळे कुठलीही 'बगावत' यशस्वी झाल्यास जुने एखादे संस्थान नष्ट होऊन नवे निर्माण होई. भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन होऊन, संस्थानिकांनी तिचे संरक्षण स्वीकारल्यावर नवी संस्थाने स्थापन करण्याचे मार्ग खुंटले तरी जहागिरी, जमीनदारी, किंवा राखणावळ ह्या स्वरूपात काही लाभ मिळवण्याची आकांक्षा ह्या बार्गींना असे. अनियंत्रित सत्ता हीच अयोग्य किंवा दुष्ट आहे असे कोणालाच वाटत नव्हते. 'बगावत' होई ती विशिष्ट शासकाविरूद्ध होई किंवा आपणही अशा अनियंत्रित सत्तेचे अधिष्ठान व्हावे ह्या हेतूने होई.

स्वतंत्र भारताने आपल्या घटनेने अजाणता येथील संग्रामात सामाजिक क्रांतीचा आशय भरला. भारताच्या राज्यघटनेने हरिजन आणि स्त्रिया सामाजिक गुलामगिरीतून संपूर्णतः मुक्त झाले. स्वातंत्र्य राबवण्याच्या हेतूने ह्या दोघांना मताधिकारही देण्यात आला. ह्या मताधिकाराचा स्वतंत्रपणे आपल्या कल्याणासाठी उपयोग करण्याइतकी जाणीव भारताच्या मागासलेल्या भागात अजूनही आढळत नाही, पण ती क्रमशः निर्माण होते आहे आणि त्या जाणीवेने वरचे वर्ग अस्वस्थ बनल्याचे भारताच्या सर्व ग्रामीण विभागात स्पष्ट प्रत्ययाला येते. जमीनदारी विभागात तर अतिशूद्र व स्त्रियाच नव्हेत तर शूद्रांचे स्वातंत्र्यही आपल्याला बोचते. "फार माजले आहेत आजकाल!" हा शब्दप्रयोग आपल्या तोंडी वारंवार येतो, हे त्याचेच द्योतक आहे.

चंबळ-परिसरांत इ० स० १९५२ च्या निवडणुकीत हरिजनांनी आपल्या नवस्वातंत्र्याचा, नवीन जाणिवेचा उपयोग करून काँग्रेसला बहुमत मिळवूनही दिले,[१] आणि एका अनपेक्षित, अवांच्छित सामाजिक प्रक्रियेला सुरुवात झाली. सामाजिक क्रांती येते ती नेहमीच कालीच्या तांडवनृत्याच्या स्वरूपात येते. साधारणतः समाजाच्या एखाद्या अंगाने तिच्या स्वागताची, संरक्षणाची तयारी करून तिला आवाहन केलेले असते. दबलेला व दाबणारा ह्या दोन वर्गात काही कालपर्यंत रक्तरंजित कलह चालून शेवटी क्रांतीचा विजय होतो आणि समाजात नव्या पातळीवर शांतता प्रस्थापित होते. चंबळघाटीत मात्र ह्या क्रांतीला कोणी आवाहन केले नव्हते. निवडणुकीच्या धुंदीत, मते मिळवण्यासाठी, परिस्थितीने क्रांतिकारक बनलेल्या काँग्रेसच्या उमेदवारांनी प्रथम समतेच्या क्रांतिकारक तत्त्वांचा प्रचार केला. ह्या तत्त्वांन्वये मिळालेले अधिकार वापरण्यास हरिजनांना स्वातंत्र्य आहे, हेही त्यांनी समजावले. तो अधिकार हरिजनांनी वापरला; पण स्वातंत्र्य हे तरवारीच्या तेजस्वी धारेप्रमाणे किंवा अग्नीच्या लालनिळ्या ज्वालेप्रमाणे संरक्षिता न आले तर आपल्यालाच

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ४५

हानीकारक होते. बिचाऱ्या, सहस्रावधी वर्षे दलित असणाऱ्या, अशिक्षित हरिजनांना ह्याची जाणीव कुठून असणार? कोणी तरी एखादा बाँब खेळणे म्हणून द्यावा व तो त्या पोराच्या हातात फुटावा अशी त्यांची दयाजनक अवस्था झाली. त्यांच्यावर झालेल्या जुलमाची दाद वेशीवर टांगायला जाण्याची हिंमतदेखील त्यांच्याजवळ नव्हती.[1] ते रजपुतांना गुपचूप चंदा देतात आणि शांतता—कसेतरी जगण्याचा व शांततेने मरण्याचा अधिकार—विकत घेतात. "आमचा वध करा." असे रंतिदेवाच्या पाकशाळेत येऊन विनवणाऱ्या पशूंची ही नवी मानवी आवृत्ती. इ० स० १८५७ सालच्या 'स्वातंत्र्ययुद्धा'तील वाऱ्यावर उडून जाऊन अज्ञात स्थळी शिल्लक राहिलेली ही 'क्रांतिबीजे' आज चंबळपरिसरात आपले खरे स्वरूप दाखवीत आहेत.

रजपुतांच्या दृष्टीने भारताची स्वतंत्र जनतंत्र सत्ताही अनियंत्रितच आहे. हरिजनांना समान अधिकार देताना त्यांचे मत कोणी विचारले नव्हते. त्यांच्या मनात नाना विचार येतात, "हरिजनांना जागोजाग विशेष सवलती देऊन त्यांना 'डोक्यावर चढवण्याचा मूर्खपणा' करणारे सत्ताधारी काय न्याय वाटीत होते? आज हरिजन वंशपरंपरागत करीत असलेली कामे व व्यवसाय—उदाहरणार्थ, वेठविगार किंवा खेड्यात कोणाच्याही घरात मेलेले जनावर ओढून नेणे, इत्यादि—त्यांनी नाकारल्यावर ही जनावरे कोणी ओढायची? उच्चवर्णीयांनी? जे कधी झाले नाही, ते करायला सांगणारे हे काँग्रेस सरकार जुन्या अनियंत्रित सत्तापेक्षाही अन्यायमूलक नाही काय! आम्ही लोक मूठभर, आमची मते मूठभर; आणखी एका पिढीत हे चांभारडे आम्हाला मोजणार नाहीत. निवडणुकीत आमचा एक प्रतिनिधी येऊ शकणार नाही. आजच ह्यांना ठोकून ठीक ठेवले पाहिजे." आपल्याला प्रतिक्रांतिकारक वाटणारे हे विचार, त्यांच्या दृष्टीने सहज व स्वाभाविक आहेत, हे आपल्यालाही मान्य करावे लागेल.

त्यामुळे स्वतःला 'बागी' म्हणवणाऱ्या डाकूंना स्वतंत्र भारताबद्दल कसलीही सहानुभूती नाही. त्यांना स्वतःच्या भविष्याबद्दल कुठलीही आशा नाही.[2] त्यामुळे नागालॅंड, पंजाबी सुबा, द्रवीड कळघमच्या मागण्या चिनी आक्रमणाबरोबर मागे घेण्यात आल्या, पण चंबळचे डाकू मात्र पलीकडच्या राजस्तानच्या सीमेवरून पाकिस्तानच्या प्रदेशाचा आधार घेऊन दंगल तेवढी वाढवीत राहिले. नागांना, पंजाब्यांना, द्रविडांना काही साधावयाचे आहे व ते भारताच्या स्वातंत्र्यातून साधावयाचे आहे. डाकूंचे स्वप्न मात्र इ० स० १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाप्रमाणेच ध्येयहीन असून त्यांना जाचक वाटणारी सत्ता नष्ट करण्याचे मात्र आहे.

जी सामाजिक जाणीव चंबळ-परिसरात नाही, तिचा अभाव मध्यप्रदेशाच्या राजकीय नेतृत्वात असणे अपरिहार्य आहे. त्यामुळे इतरत्र दृढमूल वाटणारी सत्ता

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद १२

२. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ४५

येथे सदैव चालपडत चालत आलेली आहे. राजनीतिशास्त्रावरची एखादी प्रवेशिकाही घेतली तरी तिच्यात अंतर्बाह्य शांती व प्रजेच्या वित्तजीविताचे संरक्षण ही सार्वभौम शासनाची मूलभूत कर्तव्ये मानलेली आढळतात. आणि शासनसत्तेचे पार्थिव अंग ह्या नात्याने वरील कर्तव्ये सरकारची जबाबदारी होऊन बसतात. मध्यप्रदेशात—तेव्हाच्या मध्यभारतात—सत्तारूढ झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळाच्या राजवटीत सत्ता मांबावलेली होती. चौकशी समितीने अहवालात म्हटले आहे की, "आम्हाला अखेर असे नमूद करणे भाग आहे की ह्या क्षेत्रात कायद्याने प्रस्थापित केलेले व जनतेच्या इच्छेने अधिकारारूढ झालेले सरकार, ह्या अधिकारातून निष्पन्न होणाऱ्या आपल्या प्रतिष्ठेसाठी डाकूंशी स्पर्धा करण्याच्या किळसवाण्या पायरीला पोचलेले आहे."[१] ही परिस्थिती "आमच्या मते असह्य असून तिचा अंत जल्द होणे आवश्यक आहे." आज दहा वर्षे सरकार ती 'किळसवाणी स्पर्धा' सोसून आहे. समितीपुढील बऱ्याच साक्षीदारांनी "विवक्षित मुदतीत स्वाधीन होणाऱ्यांना सरसहा क्षमा करण्याची घोषणा"[२] करण्याचा मार्ग सुचवला असावा. कारण समितीने म्हटले आहे की "काही साक्षीदारांनी ह्या सूचनेला घोर विरोध केला, व मतांचा आढावा ह्या शरणागतीच्या विरुद्ध दिसला."

ह्या प्रतिक्रांतीच्या चढाईविरुद्ध, पोलिसांच्या गोळ्यांशिवाय दुसरी कुठलीही उपाययोजना अजून करण्यात आलेली नाही. ग्रामरक्षा समितीची संघटना निर्माण करण्यात आली, पण ह्या ग्रामरक्षा समित्याही रजपुतांच्याच बनल्या, आणि त्यांच्याच बंदुकांवर चालल्या व चालत आहेत. "ग्रामरक्षा समितीचा सभासद कोणीही होऊ शकतो. पण आजवर लढत आलेलेच लोक तिचे सभासद होणार ना!" असे एक गृहस्थ मला म्हणाले. सामाजिक क्रांतीचा आशय ह्या ग्रामरक्षा समितीजवळही नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्याप्रमाणे अनियंत्रित सत्तेला कोणाचा तत्त्वतः विरोध नव्हता, विरोध जुलमी सत्ताधाऱ्यांना—विशिष्ट व्यक्तींना—होता त्याप्रमाणे आजच्या ग्रामरक्षा समित्यांचा विशिष्ट व्यक्तींना विरोध आहे. त्यांचा समतेला पाठिंबा नाही, वा सामाजिक अन्यायाला विरोध नाही. म्हणून 'डाकू नष्ट झाले तरी डाकूगिरी नष्ट करावयास' ही संघटना विफल ठरलेली आहे.

ग्रामरक्षा समितीच्या निर्मितीखेरीज कुठलेही प्रगतीचे पाऊल सरकारने टाकले नाही. हरिजनांवर होणाऱ्या अन्यायाचे स्वरूप व विस्तार या दोन्हींची तपशीलवार माहिती गोळा करणे जरूर होते. पण त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणारा व घटनेतील समतेच्या तत्त्वावर विश्वास ठेवणारा अधिकारीवर्गही सरकारपाशी नव्हता,[३] आणि

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ५२

२. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ७०

३. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३ : परिच्छेद ४७

तसा अधिकारीवर्ग भरती करण्याचे प्रयत्नही सरकारने केलेले नाहीत. त्यामुळे इ० स० १९५८ पर्यंत सोळापैकी साडेतेरा टोळ्या गोळ्यांनी नामशेष केल्यावरही चिरस्थायी शांतीची आशा सरकारला नव्हती. सरकारच्या मानाने 'बागीं'ची शक्ती यःकश्चित, त्यांच्यात एकीचे बळ नव्हते की पुरेसा पैसा नव्हता. तथापि ह्या डाकूंच्या शक्तीचे स्रोत सामाजिक प्रतिक्रांतीत आहेत हे आकलन न झाल्याने डाकूगिरी नामशेष करण्याचे रामबाण सरकारच्या भात्यात नव्हते. त्यातूनच विनोबाजींच्या पदयात्रेचे निमंत्रण उद्भवले.

विनोबांची पदयात्रा जनतंत्राच्या मूलभूत तत्त्वांशी कुठेही विसंगत नव्हती. मागासलेल्या समाजावर अंधश्रद्धेचा नेहमीच विलक्षण पगडा असतो. त्या अंधश्रद्धेतूनही समता, न्याय, ही तत्त्वे प्रसृत होऊ शकतात. मुसलमानी अमलात मानवी समतेचा पुरस्कार संतवाङ्मयाने केला आणि हिंदूंना नवजीवन दिले. जनतेला धर्माची भाषा सहज समजत असेल तर तिचा उपयोग त्यांच्या प्रगतीसाठी करण्यास जनतंत्रात कुठेही आडकाठी नाही. माणसाच्या जुन्या अनुभवावर नवा अनुभव व ज्ञान अधिष्ठित असावे लागते, हा शिक्षणशास्त्राचा मूलसिद्धांतही हेच सांगतो. पण आचार्यांना चंबळ-ओहोळात पाचारण करताना, बुद्धिमान, विद्वान, तापस, कुशल व चतुर संघटक, सामाजिक समतेचे उपासक ह्या त्यांच्या गुणसमुच्चयाचा विचार कोणी केला नव्हता. त्यांना येथे चमत्कार करून दाखवणाऱ्या साधूची भूमिका सजवावयाची होती. तेलंगणात चिघळून संत्रस्त करणारा डाकूगिरीचा, हिंसेचा प्रश्न आचार्यांच्या पुनीत स्पर्शाने चुटकीसरशी विरळून गेल्याचे आपल्या राज्यकर्त्यांना स्मरण होते. राजनीतीमध्ये चमत्काराला किंवा जादूला स्थान दिल्यामुळे राज्यसत्ता यापुढे काही आठवडे अतिशय विचित्र वागली.

आचार्य तेलंगणात गेले, कारण भारताच्या नागरिकाला ह्या देशात भ्रमण-स्वातंत्र्य आहे. त्यांनी तेथे केलेला प्रचारही आपल्या भाषणस्वातंत्र्यावर उभा होता. चंबळच्या पादयात्रेचा साराच घाट वेगळा होता. येथे शासनसंस्थेने पहिल्यापासून सत्तासंन्यासाचा पवित्रा घेतलेला आढळतो. उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री श्री० संपूर्णानंद, व मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉक्टर काटजू, केंद्रीय उपगृहमंत्री श्री० दातार ह्यांनी पदयात्रेपूर्वी ह्या समस्येची आचार्यांशी चर्चा केली व त्यांना सहकार्याची आश्वासने दिली.[1] दुसऱ्याच दिवशी गृहमंत्री श्री० गोविंद वल्लभपंत भेटीला आले. "परिसाच्या स्पर्शाने लोहाचे कांचन होते. आपल्या पदस्पर्शाने डाकूभूमि निवळेलही."[2] ह्या पंतांच्या उद्गाराचे मर्म तेच होते. आचार्यांच्या भेटीसाठी व्ही० आय्० पीं० मध्ये स्पर्धा चालू होती. श्रीकृष्णदत्त पालीवाल, श्रीमन्नारायण, नरसिंहराव दीक्षित, मूलचंद

१. हिंदुस्तान : ७-५-१९६०
२. आचार्यांची भेट (लेखिकेशी)—२९-५-१९६३

देशलहरा, डॉ० सुशीला नायर—ही यादी मारुतीच्या शेपटाइतकी लांबू शकेल. लोकनियुक्त मान्यवर मंत्रिगणांनी भावभक्तीने ह्या चमत्कार करणाऱ्या बाबाची पूजा केल्यावर सरकारी अधिकारी मागे येणे अपरिहार्य होते. पोलिसांच्या संमेलनात आचार्यांनी भाषण केले आणि पोलीसदलाला विनंतीरूप आज्ञा केली, "एकतर मी जाईन तिथे माझ्यामागे येऊ नका."[१] अशा तऱ्हेने आचार्यांच्या पदयात्रेवर सरकारी शिक्कामोर्तब झाले, आणि ही पदयात्रा सरकारी मोहिमांचा एक भाग ठरली.

जनतंत्राच्या कायद्याच्या समोर सर्व व्यक्ती समान असतात, हे मूलभूत तत्त्वही काही काळ गोठवण्यात आले. जाहीर केलेले गुन्हेगार, डोक्यावर प्रचंड बक्षिसे लागलेले गुन्हेगार उजळ माथ्याने आचार्यांच्या पदयात्रेत सामील झाले, आणि हस्तांदोलनासाठी पोलिस अधिकाऱ्यांनी हात पुढे केला.[२]

पायावाचून उभारली जाणारी ही इमारत पदयात्रेच्या अवधीतच कोसळू लागली. प्रथम 'आत्मसमर्पित'—की हृदयपरिवर्तित ?—बागींनी पोलिसांचा अपमान केल्याने वातावरण गढूळले.[३] डाकूंचे फोटो छापण्यास मध्यप्रदेशच्या डी० आय्० जीं० नी मनाई केली. "कोर्टात खटले गेल्यावर ओळखपरेड करता येणार नाही" हे कारण देण्यात आले. आग्रा डिव्हिजनच्या पोलिस डी० आय्० जीं० नी "डाकूगिरीचा अंत करण्यासाठी प्रेमअभियानापेक्षा पोलिसकारवाईच पसंत असल्याचे" निवेदन केले.[४] आणि जणू ह्या निवेदनाचा इन्कार खुद्द राष्ट्रपतींनी आचार्यांना अभिनंदनाची तार पाठवून केला.[५]

ह्या पदयात्रेचा लौकरच चुथडा झाला. आचार्यांना शरण आली होती केवळ अर्धी टोळी. "तुम्हाला न्याय मिळेल" येवढाच विश्वास त्यांना देण्यात आला होता; पण बाबांच्या सरकारदप्तरी असलेल्या वजनावर डाकूंची अपरंपार श्रद्धा होती व आपल्याला ते क्षमा देववतील अशी त्यांची खात्री होती, असे काही शासकांचे म्हणणे होते. बाकी तीन टोळ्या एका वर्षात पोलिसदलाने आपल्या शौर्याने व गोळ्यांनी नष्ट केल्या.

डाकूंच्या टोळ्या नष्ट झाल्या. चंबळघाटीत शांतता प्रस्थापित झाली. इ० स० १९६१ अखेर मी चंबळघाटीत चक्कर मारली तेव्हा सर्वत्र शांतता होती. ह्या शांततेचा उपयोग समाजाची पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने करण्यात आला नाही. डाकूगिरीचा अजगर मरगळ येऊन पडला होता, तर आपण आचार्यांच्या विरुद्ध निघणारी निवेदने वाचण्यात गर्क होतो. हा अजगर आज पुन्हा भुकेला झाला आहे. त्याच्या

१. चंबळ के बेहडों में : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान १४०
२. द टाईम्स ऑफ इंडिया : २०-५-१९६०
३. द स्टेट्स्मन : २१-५-१९६०
४. द स्टेट्स्मन : २०-५-१९६०
५. चंबळ के बेहडो में : श्रीकृष्णदत्त भट्ट; पान २३७

लवलवणाऱ्या जिव्हांना शेकडो लोक बळी पडत आहेत. आजही परिस्थितीचे विश्लेषण करण्याचा सरळ मार्ग सोडून आपण सात्त्विक संतापाने आचार्यांना दोष देत आहोत. दिल्लीची 'सरिता', मुंबईचा 'महाराष्ट्र टाइम्स', कलकत्त्याचा 'स्टेटरमन' ह्या तीन कोपऱ्यातील तीन भाषांतील वृत्तपत्रांनी एकच प्रश्न विचारला होता, "शांतीचे प्रचारक आचार्य आता कुठे आहेत?" त्यांचा हा प्रश्नही आपण अजून चाचपडत असल्याचेच लक्षण आहे.

चंबळच्या डाकूवृत्तीचा सामाजिक अन्वयार्थ न लागल्याने आपल्या उपाययोजना निष्फळ व्हाव्यात हे अपरिहार्य आहे. सामाजिक क्रांतीच्या किंवा प्रतिक्रांतीच्या प्रसंगी देशाच्या दंडसंहितांचे शब्द अर्थशून्य होत असतात. प्रतिक्रांतीशी संग्राम कोणत्या शस्त्रांनी दिला जातो, ह्याचे धडे फ्रेंच व रशियन राज्यक्रांत्यांनी आपल्याला दिलेले आहेत. हे रक्तरंजित धडेही आपण गिरविले असते तर दंडसंहितेच्या सामाजिक क्रांतीच्या संदर्भात अपुऱ्या ठरणाऱ्या कलमांचा शाब्दिक कीस काढण्याचे सोडून दिले असते. आपल्याला परिचित असलेल्या वागीच्या मर्मांचा उपयोग करून घेतला असता. डाकूंवर साध्या कोर्टात खटले भरून, साक्षीपुरावे, जामीन, तारखा हा घोळ पडणे मग बंद झाले असते. लुटून आणलेल्या संपत्तीचा उपभोग डाकूंचे परिवार कायद्याच्या संरक्षणाखाली सुखाने घेऊ शकले नसते. गुन्हेगाराच्या परिवारांचा उपयोग, त्यांना वठणीवर आणण्यासाठी करण्याची चौकशीसमितीच्या एका सदस्याने भीतभीत सूचना केलेली होती. "डाकूंना प्रिय असणारे व त्यांच्यावर वजन असणारे त्यांचे नातेवाईक डाकूंच्या पाठलागावर असणाऱ्या तुकडीबरोबर असावेत. जरूर तर हा उद्देश साधण्यासाठी कायदा करण्यात यावा."[1] तसे अनेक उपाय अंमलात आणले गेले असते. पण आपण सर्वस्वी अंधारात राहिल्याने यशस्वी उपाय योजू शकलो नाही.

इतिहासाचा दाखला असा आहे की जेव्हा दोन समाजांच्या संस्कृतींमध्ये अंतर पडते, तेव्हा सुधारणेमध्ये कमी प्रतीचे असलेले समाज, अधिक लढाऊ वृत्तीचे असतात. ह्या दोन समाजांच्या संग्रामात जास्त सुसंस्कृत जमाती पराजय पावून सत्ता गमावतात. किंवा सुसंस्कृत समाज विकसित विज्ञानाच्या बळावर युद्धाचे श्रेष्ठ तंत्र निर्माण करून, युद्धयमान जमातींना जिंकतात. आज चंबळघाटीच्या रणभूमीवर विकसित व शांतताप्रिय भारतीय समाज आणि चंबळघाटीचे मध्ययुगीन, युद्धप्रिय रजपूत ह्यांचा संग्राम चालू आहे. पण ह्या संग्रामात आपण कुठेही श्रेष्ठ तंत्र वापरताना दिसत नाही. आपली सैन्य-संघटना, तिला मिळणाऱ्या सुखसोयी, आपली शस्त्रे, दळणवळणाची साधने —ह्यात वाहने, तारा, पत्रे, बिनतारी ह्यांचाही समावेश करणे जरूर आहे—आपले

---

१. भिंड मोरेना क्राइम इन्कायरी कमिटीचा रिपोर्ट, १९५३, ॲडिशनल रेकमेन्डेशन टू, प्यारा ५२ (३४)

मुखबीर, सर्वच डाकूंच्या तत्सम शाखांपेक्षा कमी प्रतीचे आहेत. ह्याला कारण आपल्या समाजाची, तळहातावर शिर घेऊन लढणारांबद्दल असलेली उपेक्षावृत्ती एवढे एकच आहे. खेडाच्या पोलिस-पोस्टची कहाणी मागे आलेली आहे, नेफाच्या सैनिकांची दुर्दशा आपणाला आता पूर्ण परिचित आहे. जी कथा संघटनेची, अवजारांची, शस्त्रांची, तीच त्यांच्या अन्नवस्त्राची, त्यांच्या परिवारांची. त्याबद्दलही भरपूर माहिती चौकशीसमितीने[1] दिलेली आहे. आपल्या कुटुंबाच्या बाजूने निश्चित झाल्यावाचून माणूस हिरीरीने लढू शकत नाही, हा युद्धाचा साधा नियमही चंबळघाटीत लाथाडला गेला आहे. दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेश, मलाया ह्या देशात आपल्या सैनिकांनाही जंगल-युद्धाचे शिक्षण देण्यात आले होते. विदेशाची भाषा न जाणणारांनाही आपल्या तळाशी संबंध तोडून काही आठवडे सहज जगता येईल. तसे ट्रेनिंग देण्याचे प्रयत्नही चंबळघाटीत दिसत नाहीत

ह्या सर्व अनवधानाचे कारण, आपण परिस्थितीचे निदान करण्यास असमर्थ ठरलो एवढेच आहे. ती परिस्थिती जोखल्यावाचून वापरलेले समाजशिक्षणाचे तंत्र निकामी राहणार आहे. कारण "अस्पृश्यांना समानतेचा अधिकार नाही व त्यांना आपली जागा दाखवण्याचा आपल्याला अधिकार आहे", ही डाकूंची श्रद्धा चार अक्षरे वाचून वा लिहून बदलणारी नाही. मर्यादापुरुषोत्तम रामाने पापाचा क्षय करण्यासाठी शंबुकाचा वध केला, हेच डाकू रोज वाचणार. आजही ज्याप्रमाणे रामचंद्राचे अनुकरण करून रजपुतांनी अधर्माचा नाश करावा हे त्यांना उचित, नीतिग्राह्य वाटते, तसेच ते उद्याही वाटणार आहे. हनुमानसिंग-का-पुरा येथे चांभार असेच मारले गेले. शंबुकाच्या आत्म्याने दिव्य रूप धारण करून आपल्याला शापमुक्त केल्याबद्दल रामचंद्रांना धन्यवाद दिल्याची कथा आहे. चंबळघाटीतील अंत्यजांनी असे दिव्य रूप धारण केले असल्यास समजले नाही.

अज्ञानाचे धुके वितळल्यावर आपल्याला डाकूचे यथार्थ दर्शन होईल; त्याच्या कवचकुंडलांचा जुनाट कुजकेपणा दिसून येईल; आणि एका समर्थ व संपन्न शासनाशी झुंज घेण्याच्या दृष्टीने त्याची तयारी किती अपुरी व कुचकामी आहे ह्याची कल्पना येईल.

एक स्वतंत्र राष्ट्र ह्या नात्याने भारताच्या भोवताली इतर राष्ट्रांच्या हेरांची जाळी सदैव विणली जात असतात व आपले शासन ह्या हेरांबद्दल संतत जागरूक असते. हेरांच्या बहुविध कलांना डाकू सर्वतोपरी अपरिचित आहे. विविध भाषांशी परिचय, अनेकींवर प्रभुत्व, अनेक विषयांचा खोल अभ्यास, संभाषणाचे चातुर्य, प्रसंगावधान, प्रभावी व्यक्तिमत्त्व, बुद्धीची कुशाग्रता, साहस ह्यांचा डाकूपाशी अभाव आहे. त्याला वेशांतर करिता येत नाही; चेहेरेपट्टी बदलण्याची कल्पनाही त्याला माहीत

१. भिंड मोरेना क्राइम इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट १९५३, अपेंडिक्स 'जी'

नाही; त्याला अनामिक राहता येत नाही; आणि पाण्यासारखा वाहवता येईल इतका पैसाही त्याच्याजवळ नाही. त्याच्या हातातले हत्यार अद्ययावत आहे, पण ते एकाकी आहे. कारण त्याची मनोवृत्ती, त्याची समाजरचना ही सर्व दहाबारा शतकांची जीर्ण आहेत. त्यामुळे तो टेलिस्कोपिक साइटची गन वापरतो, पण त्याच्याजवळ ट्रान्समिटर आढळत नाही. त्याची पाठ थोपटणारा त्याचा समाज मतभेदांनी ठिकऱ्या झालेला आहे व त्यामुळे त्याच्या हातातील शस्त्राइतकाच तोही एकाकी आहे.

हेरगिरी करणाऱ्या हेरांची गुणवत्ता—आपल्या सुदैवाने—डाकूजवळ नसावी ह्यात आश्चर्य नाही. पण दिल्ली, मुंबई, कलकत्ता ह्या बकाल शहरांमधून आढळणाऱ्या गुन्हेगारांची हुशारीही त्याच्या अंगात क्वचितच आढळते. शहरातला गुन्हेगार चपळ, चतुर, धाडसी, प्रसंगावधानी, हजरजबाबी असतो. एकापेक्षा अधिक भाषा त्याला सरावाने बोलता येतात. तो चिंध्या घालूनही राहू शकतो. खोटे बोलण्यात पटाईत असतो. त्याचा आगापिछा सापडणे कठीण असल्याने त्याला इतिहास नसतो, आणि मानवी ओलाव्याला मुकल्यामुळे तो माणुसकीतूनही मुक्त असतो. गुन्हेगार जीवनात माणुसकी ही गुन्हेगाराच्या पायात बेडीसारखी जखडून पडण्याचा संभव असतो.

भारतात झपाट्याने औद्योगीकरण होत असल्यामुळे अनेक बकाल शहरे सर्वत्र निर्माण होत आहेत. आणि ह्या बकाल शहरांमधून गुन्हेगारीवर पोसला जाणारा एक नवीन गुन्हेगार वर्गही अस्तित्वात येत आहे. समाजाचे जीवन निर्वेधपणे चालण्याच्या दृष्टीने ह्या गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. ह्या गुन्हेगारांचे चापल्य, चातुरी, लबाडी डाकूजवळ नाही.

डाकूचे हे चित्र आपल्याला स्पष्ट होताच आपली आजवरची आंधळी कोशिंबीर संपेल. मग ह्या समस्येचा अथपासूनचा अभ्यास शास्त्रीय रीतीने व पद्धतशीरपणाने करावयास आपण आरंभ करू, आणि त्याच वेळी ह्या क्रूर समस्या-नाटकाचा शेवटचा अंक सुरू होईल.

## ३. लोकशिक्षणाची हार

दस्युसमस्येचा सामाजिक आशय समजून आल्यावरही तिच्यावर योजिलेली उपाययोजना जालीम असावी, की हा प्रश्न लोकांचे विचारपरिवर्तन करून—हृदयपरिवर्तन करून नव्हे—एकदोन पिढ्यात सोडवण्यात यावा, याचा निर्णय जनतेने घ्यावयाचा आहे. बलाचा उपयोग करून होणारा प्रचंड रक्तपात करण्याची आपल्या सत्ताधाऱ्यांची वा आपली आज तयारी नाही. आपल्या हेतुपूर्तीसाठी साधनांच्या

शुचितेचा विचार वेडसर समजणारा दुसरा एखादा आततायी पक्ष ह्या प्रदेशात अस्तित्वात नाही, ही गोष्टही ध्यानी बाळगणे आवश्यक आहे. शिवाय आधी म्हटल्याप्रमाणे लोकशाहीची मूलभूत श्रद्धा प्रचारावर आहे—शस्त्रावर नाही. भारतीय जनतेचा हुकूमशाहीलाही तीव्र विरोध आहे. तेव्हा लोकांना आपले विचार पटवण्याचे, आपल्या विचारांना अनुकूल असे लोकशिक्षणाचे प्रयत्न का व्यर्थ झाले, ह्याचे विश्लेषण आपल्याला मार्गदर्शन करील तर पाहू या.

अशा तऱ्हेचे दोन प्रयत्न सर्व तपशिलांसह आपल्या डोळ्यांसमोर आहेत. एक इ० स० १९२४चा माधवराव शिंद्यांचा व दुसरा इ० स० १९६० मधला आचार्य विनोबा भाव्यांचा. शिंद्यांच्यासमोर कुठलीही सामाजिक समस्या नव्हती, तरी त्यांच्या प्रयोगातील कामाचा वेग, लोकांच्या अंगावर जबाबदारी टाकण्याची पद्धत व शासनाच्या उणीवा प्रांजलपणे मान्य करण्याची तयारी ह्या गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत. लष्करी कायदा ह्या क्षेत्रात पुकारला गेल्यास वरील अनुभवांचा फायदा लष्करी अधिकाऱ्यास निश्चित उपयोगी पडेल. कारण डाकूग्रस्त क्षेत्रात लष्करी कायदा पुकारला गेला तरी त्याचे उद्दिष्ट किमान वेळात आपले श्रेय गाठण्याचेच राहील.

'राजाची दया आणि दंड' यांवरील विवेचनांत उल्लेखिलेली जमीनदार-जहागीरदार कॉन्फरन्स प्रथम दिनांक ३० जानेवारी १९२०ला भरली व दिनांक ८ एप्रिल १९२०ला १६३ डाकू चलनातून बाहेर फेकले गेले. दंडसंहितेचे सारे नियम बाजूला सारून हे काम साधण्यात आले. शिंद्यांच्या प्रयोगापासून आणखी एक गोष्ट उघड झाली, ती ही की चंबळच्या दंगलीला रजपूतच कारण आहेत आणि ते दिसतात तेवढे निर्भय नाहीत, वीर नाहीत. शिंद्यांच्या प्रयोगात गर्भित धमकीचा उपयोग केलेला होता. "तुम्ही ही डाकूगिरी न आवराल तर मी माझे प्रयत्न करावयास मोकळा होईन. मग जे अन्याय होतील—कारण सर्वांना 'श्वानं, युवानं, मघवानम्' म्हणून एकाच मापाने मोजण्यात येईल—त्याबद्दल मी काही ऐकून घेणार नाही." असे त्यांनी बजावले होते. डाकूग्रस्त परिवारांना दिलेल्या साहाय्याची माहितीही त्याच प्रकरणात आलेली आहे. सरकारी साहाय्यकांचा व शूर शिपाई-अधिकाऱ्यांचा त्यांनी केलेला गौरवही ध्यानी ठेवणे योग्य होईल. शिंद्यांच्या प्रयोगाची मोठी उणीव त्यातील सातत्याच्या अभावाची होती. ज्यांनी 'बेहड धरला' त्यांना समाजातून उठवणे, बंदी करणे, हा डाकूसमस्येचा एक पैलू मात्र आहे. नवीन दस्युनिर्मिती थांबविण्यासाठी त्यांच्या प्रयोगात काहीच योजना नव्हती. नागरमोथा निर्मूल करावयाचा तर त्याच्या गाठीसकट तो उपटून काढावा लागतो, नाहीतर थोड्याच दिवसात सारे शेत नव्या जोमदार कोंबानी झाकून जाते; तोच प्रकार शिंद्यांच्या प्रयत्नाचा झाला. सत्तेच्या दडपणाने चंबळघाटीत शांतता स्थापन करणारांना सातत्याचे महत्त्व निरंतर नजरेसमोर राखावे लागेल.

इ० स० १९६० मधल्या विनोबाजींच्या पदयात्रेवर भरपूर चर्चा व काही कडक टीकाही झालेली आहे. त्यानंतर त्यांना सतत झालेला विरोध व सध्या दस्युभूमीत

सुरू असलेला रक्तपात, ह्यामुळे पिढ्यानुपिढ्या शेंदूर थापल्यामुळे शेंदुराच्या पापुद्र्यांनी झाकलेल्या मारुतीसारखा त्यांचा प्रयोग ओबडधोबड दिसतो. ही वरची खोळ काढून टाकून मूर्ती न्याहाळल्यावर तिचे स्वरूप ध्यानात येऊ शकेल.

विनोबांना या डाकूग्रस्त क्षेत्रात येण्यासाठी डाकू, समाजसेवक, मंत्रीवृंद, सरकारी अधिकारी या सर्वांनी एकमुखाने आमंत्रण दिले होते. थोडी साशंकता मुख्य मंत्री डॉ० काटजू व गृहमंत्री नरसिंहराव दीक्षित ह्यांना असावी, कारण त्यांनी आचार्यांच्या पदयात्रेच्या कार्यकारणाचा सांधा जुळवण्याचा प्रयत्न केलेला असावा. आचार्यांची तेलंगणातील मोहीम व तेथील पदयात्रेचे यश हे ह्या सर्वांगीण स्वागताचे कारण होते. स्वतंत्र भारताच्या एका तपाच्या इतिहासात, फाळणीचा प्रचंड रक्तपात वजा करता अशा यादवीचा तेलंगणाचा एकच प्रसंग भारताने अनुभवला होता. तेथला प्रश्न बऱ्याच गुंतागुंतीचा असूनही, तेथे आचार्यांच्या पदयात्रेने शांति प्रस्थापित झाली होती. तेव्हा तेलंगण व चंबळघाटी ह्यांची तुलना करण्याची सार्वत्रिक प्रवृत्ती होणे स्वाभाविक होते. तेलंगणांत आधुनिक बंदुकांचा उपयोग भरपूर झाला; रक्तपात, जाळपोळ, अपहरण ह्या घटनाही घडल्या. जनता दोन्ही पक्षांकडून भरडली गेली. सरकारी अधिकारी, जमीनदार, सावकार बंडखोरांच्या गोळ्यांचे निशाण झाले. तेथे जंगलात लपून बसावयास भरपूर अवसर होता. त्याचप्रमाणे दोन राज्यांच्या सीमाप्रदेशाचाही बंडखोर फायदा घेत होते. तेथील पोलिसदल संस्थानी परंपरेचे म्हणून अक्षम व भ्रष्ट होते. बाहेरून येणाऱ्या पोलीसदलाला भूप्रदेश परका असल्याने ते गोंधळून अगतिक होई, व ह्याचा फायदा बंडखोर घेत.[1] दस्युभूमीचे तेलंगणाशी ह्या बाबतीत सर्वतोपरी साम्य होते. जो काही भेद होता तो दस्युभूमीचे कार्य सुलभ वाटावे असा होता. तेलंगणाची तेलगू भाषा इतरांना शिकणे दुष्कर आहे, उलट दस्युभूमी हिंदीची उपभाषा बोलते व हिंदी बहुतेक सर्वांना येते. दुसरा ह्याहूनही महत्त्वाचा पण साधारणतः ध्यानी न येणारा भेद होता. ज्यांना तो उमजला, त्यांची तेलंगणाच्या समस्येहून दस्युभूमीचा प्रश्न फारच सोपा आहे ही दिशाभूल झाली.

तेलंगणामध्ये गाठ साम्यवाद्यांशी, नव्हे, त्यांच्या साम्यवादाशी होती. ह्या नव्या जोमाच्या नव्या विचारप्रणालीला तत्त्वज्ञानाची तर्कशुद्ध, बरीवाईट बैठक लाभलेली होती. ह्या विचारसरणीने जगातील साऱ्या दलित व दरिद्री जनतेला मोहित केले होते. ह्या विचारसरणीचा पाईक असलेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष ही शिस्तबद्ध, आततायी व आंतरराष्ट्रीय स्वरूपाची संघटना होती. तेलंगणात हातोडा-कोयता यशस्वी करून नंतर सारा भारत क्रमशः लाल रंगात बुचकळण्याची त्या पक्षाची महत्त्वाकांक्षा होती, आणि त्या दृष्टीने त्यांच्या हालचाली सूत्रबद्ध व सुव्यवस्थित होत्या.

दस्युभूमीत डझनावारी टोळकी धांगडधिंगा घालीत होती. त्यांना शिस्त नव्हती.

---

१. रिपोर्टिंग इंडिया : ताया झिंकिन; पान ६२

ध्येय नव्हते, कार्यक्रम नव्हता. त्यांना फक्त पैसा पाहिजे होता, आणि त्यासाठी ते नृशंसतेने वागत होते. त्यांच्यात आपसात एकी नव्हतीच, पण वेळप्रसंगी ते एकमेकांच्या छातीवरही बसत होते. त्यांना पक्ष नव्हता, राजकारण नव्हते, उद्याची स्वप्ने नव्हती, आशा नव्हत्या.

तेलंगणाचे नेतृत्व बुद्धिमान, विद्वान, विवादक्षम होते : त्यांच्यापैकी एक डॉक्टरही असावा असे वाटते. धर्मावर, देवावर त्यांची श्रद्धा नव्हती. टोळ्यांची स्थिती ह्या उलट होती. मॅट्रिकपर्यंत शिकलेला एखादा माणूस एकाद्या टोळीत गवसे, पण जेमतेम लिहतावाचता आले तरी पुष्कळ झाले अशीच बहुतेकांची स्थिती होती. ते वृत्तीने धार्मिक, तुलसीरामायणाशी बहुतेकांचा निकट परिचय. त्यांची जीवनमूल्येही 'तुलसी'-मधून आलेली. मातापितरांविषयी आदर, कुटुंबाबद्दल वात्सल्य, शकुनापशकुनावर विश्वास. विनोबा तर ग्रामीण भारतात कधीच संतपदवीला पोचले होते. ते स्वतः विलक्षण धार्मिक व निर्भय वृत्तीचे. त्यांच्या उपदेशाने दस्युभूमीत चमत्कार करण्याची कल्पना अंधविश्वासाने प्रथम मांडली.

पाश्चात्य देशांमध्ये ह्या प्रयोगाबद्दल कमाल कुतूहल निर्माण झाले. "काही सेन्सेशनल पाहिजे" म्हणून नव्हे, तर युरोपअमेरिकेतील अपराधशास्त्राचे उपासक "अपराधाची वृत्ती दांडक्याने चिरडता येत नाही." ह्या निर्णयाला येऊन पोचले होते म्हणून. हे उपासक सध्या सामूहिक अपराधांचा विविध पैलूंनी अभ्यास करीत आहेत. त्यामुळे विनोबाजींच्या अभिनव प्रयोगाबद्दल त्यांना जिज्ञासा होती, कौतुक होते. भारतावर ह्या कौतुकाचा परिणाम उलटा झाला, ही गोष्ट अलाहिदा.

विनोबा दिनांक २१ एप्रिल १९६०पासून चार आठवडे ह्या प्रदेशात फिरले. त्यांच्या पदयात्रेबद्दल पुढे मोठा वाद निर्माण झाला. आचार्यांनी तोंडात मिठाची गुळणी धरली नसती, तर त्याने विकृत स्वरूप धारण केले असते. मागूनही त्या प्रयोगाचे यशापयश अजमावण्याजोगे वातावरण त्याला लाभले नाही. कारण सगळ्या प्रकाराने भलतेच वळण घेतले. तथापि सर्व बाजूंनी संपूर्ण सहकार्य व सदिच्छा लाभूनही हे अभियान यशस्वी होण्याचा संभव फार थोडा होता, हे विरोधकांना न उमगून त्यांनी उतावीळ केली.

ह्या अपयशाचे बीज चंबळघाटी व तेलंगण ह्यामधील चळवळीच्या भेदात होते. तेलंगणाचा प्रश्न दलितांचा होता. मनुष्य ह्या नात्याने जगण्याचे अधिकार दलितांना पाहिजे होते. त्यांना ह्या माणुसकीपासून वंचित ठेवणारांचे पारिपत्य करण्यासाठी आचार्यांनी कंबर कसलेली होती. तेलंगणाचे अत्याचार हे माणुसकीसाठी हट्टाला पेटलेल्या दलितांचे होते. त्या दलितांना धीर व आधार देणारी संघटना कम्युनिस्टांची होती. ह्या संघटनेचे विपुल वाङ्मय सुलभतेने मिळवता येते. विनोबा विद्येचे उपासक आहेत. त्यांनी ह्या वाङ्मयाचा, दलितांच्या स्थितीचा, कम्युनिस्ट चळवळीच्या तंत्राचा अभ्यास केला होता. रक्ताचा थेंबही न सांडता, दलितांच्या बेड्या तोडण्याची

तळमळ पूर्ण करण्यासाठी भूदानाचा जन्म झाला. जनतेच्या मागण्या रक्तपातावाचूनही पूर्ण होण्याचा मार्ग सापडताच तेलंगणाचे यज्ञकुंड आपोआप विझले.

चंबळघाटीच्या समस्येवर पुरेसे वाङ्मय नाही. (ह्या ग्रंथाचा पसारा घालण्याचे प्रयोजन त्यातूनच उद्भवले.) त्यामुळे ह्या समस्येशी आचार्यांची तोंडओळखही झाली नाही. चौकशीकमिट्यांचे अहवाल किंवा इतर सरकारी माहिती त्यांना देण्यात आली नाही. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर "मला कोणी काही वाचावयास दिले नाही. तहसीलदारसिंगचे पत्र आले. वेगवेगळे लोक भेटावयाला आले, त्यावरून मला जे समजले, त्याच्या आधाराने मी बोललो."

चंबळमधील समस्येचा अन्वयार्थ तोवर कोणालाच लागलेला नव्हता; तेव्हा त्यांना वाचायला देण्याचे कोणाला कसे सुचावे? त्यामुळे अर्थातच आचार्यांचे पाय चंबळघाटीत कधी जमिनीला लागले नाहीत. ज्या अस्पृश्यांसाठी त्यांनी आपल्या जीवनाची बारा वर्षे तपश्चर्या केली, त्या अस्पृश्यांचा ओझरता स्पर्शही ह्या यात्रेत त्यांना झाला नाही. दहशत निर्माण करून ह्या दलितांकडून 'चंदा' ह्या साळसूद नावाखाली रजपुतांनी उकळलेली खंडणी किंवा त्यांची केलेली पिळवणूक ह्याविरुद्ध आचार्य आपल्या प्रवचनातून शब्दही बोलले नाहीत. त्यांना त्या सामाजिक समस्येचे अस्तित्व माहीत नव्हते हा त्यांचा दोष खचित नव्हता. पण ह्या विशिष्ट परिस्थितीत त्यांचा संदेश आशयहीन होणे क्रमप्राप्त होते. आचार्य प्रतिक्रांतीला साहाय्यक असे काही बोलले नाहीत ह्याचे कारण त्यांच्या रक्तात क्रांती भरलेली आहे; ते स्वभावतःच क्रांतिकारक आहेत. चंबळघाटीत त्यांना पतनापासून वाचवले त्यांच्या ह्या प्रवृत्तीने. पण इतरत्र अन्यायाला वाचा फोडणारा, अन्यायाचे हिरीरीने निर्मूलन करणारा त्यांचा आत्माच इथे प्रत्ययाला येत नाही. तेलंगणात व इतरत्रही भूदान मागताना आचार्य म्हणत, "मला भूमी द्या, ही काळाची मागणी आहे. आज संतोषाने न द्याल तर उद्या हिसकावून घेतले जाईल. एकट्याने खाऊ नका. माणूसमात्र तुमचा भाऊ आहे. त्याला उपाशी ठेवून खाल तर पापाचे वाटेकरी व्हाल." चंबळघाटीत हा दडपून टाकलेला भाऊ त्यांना दिसला नाही. तो बिचारा प्राणभयाने आपल्याच कोपऱ्यात उभा राहिला. तक्रार करण्याइतकेही धैर्य त्याला उरलेले नव्हते. आणि ह्याबाबतच्या आव्हानाला 'बागी'चे उत्तर तयार होते, "या तर पुढे. आम्ही मेलेल्या आईचे दूध प्यालो नाही."

आंदोलनाचे पात्र आशयाने रिकामे पडल्यावर उरले केवळ निनाद. हृदयपरिवर्तन, कर्मभोग आणि काव्याकूट—पाप काय, पुण्य काय? त्यामुळेच पोलिस दलाच्या जुलमाचा वादही उभा व्हावयास अवसर सापडला. रामायणाचा मोहर्रम झाला. गणपती करताना वानर झाला.

आचार्यांना समस्या पूर्ण अवगत झाली असती, तरी त्यांना चार आठवड्यांच्या अल्पावधीत तिची उकल करता आली नसती. पण "रामाने रावण मारला, तोही

ब्राह्मणच होता" असली गुन्हेगारीवरची धर्माची आवरणे त्यांनी स्नेहाने दूर करतानां पाहाणे हे मनोरंजक व उद्बोधकही ठरले असते. कारण जुन्या रूढीच्या संरक्षणासाठी नव्या विज्ञानाचे आधार सतत शोधले जातात. हे नव्या आधाराचे विळखे सोडवण्याचे काही नवीन उपाय समाजकार्य करणारांना कदाचित उपलब्ध झाले असते.

सामाजिक क्रांतीच्या संदर्भात आचार्यांची चंबळमधील पदयात्रा फुकट गेली. तथापि अनुभवी कार्यकर्ता व चतुर संघटक ह्या नात्याने प्रयत्नांच्या सातत्याचे महत्त्व ते केव्हाही विसरत नाहीत. परिस्थितीचे प्रत्यक्ष ज्ञान नाही, तिचे आकलन झालेला कोणी निकटवर्ती नाही, प्रयोगातील चुका दाखवणारा स्वतंत्र प्रज्ञेचा मित्र वा शिष्य नाही; ह्या अंधारातूनही त्यांच्या तीक्ष्ण दृष्टीला समस्या "डाकूंची नाही, डाकूगिरीची आहे." हा प्रत्यय आला. डाकूगिरी नष्ट करण्यासाठी प्रयत्नांचे सातत्य असावे लागेल; क्षेत्रात निर्माण होणारे प्रश्न व्यवहाराच्या पातळीवरून रोजच्या रोज सोडवावे लागतील; ह्याची जाणीव त्यांना पूर्णपणे होती. ह्या हेतूने त्यांनी चंबळघाटी-शांतिसमितीची[1] स्थापना स्वहस्ते केली. ह्या समितीच्या दोन शाखा आज आग्रा व भिंड येथे असून त्याही आज चाचपडत मार्गक्रमण करीत आहेत.

ह्या समस्येचा अन्वयार्थ आपल्याला लागलेला नाही, ह्याची जाणीव आचार्यांच्या अंतर्मनात दडलेली असावी. सर्वोदयमंडळाची सहचरी संस्था म्हणजे गांधी पीस फाउंडेशन. त्याच्या वतीने समाजशास्त्रावर प्रबंध लिहू इच्छिणारा एक विद्यार्थी या क्षेत्रात आला होता. परंतु आज सर्वोदयाविरुद्ध चंबळक्षेत्रात निर्माण झालेल्या वातावरणात त्याला आवश्यक ते सहकार्य सरकारी यंत्रणेतून मिळू शकले नाही.

चंबळभूमीत चमत्कार करवण्याची वेडी आशा फोल झाली—ती तशी होणे अटळच होते—तरीदेखील जनतंत्राचा लोकशिक्षणावर अमर्याद विश्वास आहे. त्या दृष्टीने विदेशात प्रगाढ व्यासंग व प्रयोग सुरू आहेत. त्या अभ्यासाची परिभाषा आपल्याला समजणारी असल्याने त्या प्रयोगाचा धावता परिचय करून घेऊ या.

## ४. पाश्चात्य अनुभव व प्रयोग

एकोणिसावे शतक भारतातच नव्हे तर युरोपअमेरिकेतही रक्तलांछित होते. निग्रो गुलामांचा व्यापार, यांत्रिकीकरणाच्या आरंभी बालकांची झालेली पिळवणूक, वेश्याव्यापार (White Slave Traffic) ह्या घटना क्रूर, कराल काळाची पावले

---

१. चंबळघाटी शांतिसमिती हेड ऑफिस—भिंड.

नीट दाखवू शकतात. क्रमशः हे नरयज्ञ विध्वंसून थंड करण्यात आले. विसाव्या शतकामध्ये दोन महायुद्धांनी इतिहासाची पाने लालीलाल केली आहेतच; पण युद्धसमाप्तीनंतर गुन्हेगारीच्या येणाऱ्या लाटांचा अनुभव विदेशांनी घेतला आणि त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्याच वेळीं त्यांनी सांघिक गुन्हेगारीचा अभ्यासही सुरू केला.

क्रिमिनालॉजी ह्या शब्दाला योग्य प्रतिशब्द भारतीय भाषांत अजून निर्माण झालेला नाही. अपराध-विज्ञान असा बोजड शब्द वापरता येईल. ह्या शास्त्राचा विदेशियांचा अभ्यास दोनतीन शतकांइतका जुना आहे. ह्या शास्त्राचे क्षेत्र "अपराधाचे सामाजिक पैलू, त्याची कारणे व समाजाची गुन्हेगारीविरुद्ध योजना"[१] हे आहे. विविध अंगांनी गुन्ह्याचे विश्लेषण करताना प्राणिशास्त्रात प्रथम मान्यता पावलेल्या Ecology चा (प्राणि-परिस्थिती शास्त्राचा) मूल सिद्धांत या शास्त्राने उपयोगात आणून पाहिला व "प्रत्येक जीव प्रादेशिक परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करितो" ह्या सिद्धांताच्या अनुषंगाने त्यांनी काही महत्त्वाचे संशोधन केले.

शिकागो शहरात शॉ नावाच्या अभ्यासकाने एका विशिष्ट पद्धतीने संशोधनाला सुरुवात केली. त्यावेळीं (इ० स० १९२० ते ३०) शिकागो शहरात गुन्हेगारीची लाट आलेली होती. शॉने शिक्षा होणाऱ्या हजारो गुन्हेगारांचे पत्ते मिळवून ते शिकागो शहराच्या नकाशावर बिंदूनी दाखवले असता त्याला असे आढळून आले की हे बिंदू शहरात सर्वत्र सारख्याच प्रमाणात पसरलेले नसून काही विशेष विभागात ते दाटीवाटीने बसतात. ह्या विशेष विभागांच्या सीमा नकाशाच्या मदतीने निश्चित करून तेथील वसतीचा शॉने नंतर अभ्यास केला. ह्या अभ्यासातून त्याने काढलेल्या निष्कर्षांपैकी काही खाली उद्धृत केलेले आहेत.

ह्या वसतींच्या विशिष्ट, सामाजिक व भौतिक अवस्थेत गुन्हेगारीची एक परंपरा—समाजमान्य अपराधमूल्ये—निर्माण होतात. त्यामुळे गुन्हेगार हा विचित्र प्रकृतीचा किंवा स्वतःशी वा समाजाशी विसंवादी व्यक्ती असण्याचे कारण उरत नाही. "काही एका मर्यादेत, तो त्याच्या समाजात चपखल बसलेला व मान्यता पावलेला माणूसही असू शकतो."[२]

ब्रिटनमध्येही त्याच धर्तीवर ह्या विषयाचा अभ्यास झाला आहे. येथील समाजकार्यकर्त्यांनी (Social-worker) 'दोन काळे' व 'दोन पांढरे' रस्ते अभ्यासासाठी निवडून त्याच्यावरच्या वसतींचा सर्व पैलूंनी अभ्यास केला. 'श्वेत'वसतीपेक्षा 'काळ्या'—म्हणजे अधिक गुन्हेगारीच्या; ह्या शब्दाचा संबंध वर्णभेदाच्या समस्येशी नाही—वस्तीत परस्परसंबंधाची सुलभता, सहकार्य व निष्ठा हे

१. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान १
२. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान ७७

गुण अधिक प्रमाणात आढळले. पण बालगुन्हेगारीला कारणीभूत होणारी वैशिष्ट्येही येथे अधिक प्रमाणांत दिसून आली, ती अशी :

१. कायदा किंवा प्रामाणिकपणा ह्याच्याबाबत सैल विचारसरणी; २. पोरांना मन मानेल तसे वागू देण्याची प्रवृत्ती; ३. उद्याच्या लाभाची परवा न करता, आज पडेल ते पदरात पाडून घेण्याची पद्धत; ४. जुगाराची आवड आणि प्रथा; व ५. कुठलाही वादग्रस्त प्रश्न मनगटाच्या जोरावर सोडवण्याला त्या समाजाची असलेली मान्यता.[१]

'काळ्या' वसतीतली घरे लहान, अपुरी, मोडकळीला आलेली व सर्व तऱ्हेने गैरसोईची असल्याने हे दुर्गुण उद्भवतात अशी त्या वेळी कार्यकर्त्यांची समजूत होती. पुढे घाणेरड्या वस्तीचे निर्मूलन करण्याच्या योजनेअन्वये येथील जनतेला नवीन सोइस्कर वसाहतीत हलवण्यात आले, परंतु गुन्हेगारीचे प्रमाण मात्र स्थिर राहिले. "नासलेल्या वस्तीत पडलेले दुष्ट सामाजिक पायंडे त्याच्या भौतिक परिस्थितीपेक्षा महत्त्वपूर्ण होते" हाच याचा अर्थ होतो.[२]

त्यानंतर जी संशोधने करण्यात आली, त्यातून सर्वमान्य असा एकच निष्कर्ष निघाला. "कुठल्याही संस्कृतीत (culture) इतर संस्कृतींचे लहान गट असतात. ह्या गटांचे रीतिरिवाज व नीतिमूल्ये मुख्य समाजाचे रीतिरिवाज व नीतिमूल्ये यांपेक्षा विभिन्न असण्याचा संभव असतो."[३]

मुलांच्या टोळ्यांचे अभ्यास करताना असे आढळून आले की समूहजीवन अनेक अर्थांनी मुलांना उपकारक असते. तरीही "चारचौघांसारखे वागण्यासाठी मुलांवर विलक्षण दडपण आणण्यात येत असते व टोळी गुन्हेगारी करू लागल्यास एरव्ही सरळमार्गी मूलही वाईट मार्गाकडे वळते.[४]

मोठ्या प्रमाणावर झालेल्या या अभ्यासाने सामूहिक अपराध अपवादस्वरूप नाहीत येवढे निश्चित सिद्ध झालेले आहे, आणि "सामान्यतः प्रामाणिक व्यक्तींकडून विशेषतः त्यांच्या मालकाकडे (employer) मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या भुरट्या चोऱ्या ही आजची अपराध-विज्ञानाची कठीण समस्या आहे."[५]

हार्ट शॉर्न व मे ह्यांनी ८ ते १६ वयाच्या विद्यार्थ्यांविषयी केलेल्या संशोधनात त्यांना असे आढळून आले की "मुलांवर आपल्या वर्गामधील विद्यार्थ्यांचे विलक्षण वजन असते आणि त्यापुढे शाळेचे शिक्षण किंवा घरचे वातावरण ही दुय्यम पडतात."[६]

---

१. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान ७८
२. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान ७९
३. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान ८१
४. क्राइम अँड पिनल कोड : जेम्स हार्वर्ड; पान ८२
५. ग्रुप प्रॉब्लेम्स इन क्राइम अँड पनिशमेंट : मॅन्हीम, हरमन; पान १९
६. ग्रुप प्रॉब्लेम्स इन क्राइम अँड पनिशमेंट : मॅन्हीम, हरमन; पान १९

वरील उदाहरणावरून गुन्हेगारीचे अस्तित्व मुले किंवा मजूर ह्यांच्यापुरतेच मर्यादित आहे, अशी समजूत झाल्यास ती गोष्ट मात्र खरी नाही. मध्यम व श्रीमान वर्गातील पांढरपेशा (white-collared) गुन्हेगारीचा अभ्यास संडरलंड नावाच्या अभ्यासकाने केला. मुले व मजूर ह्यांच्यापेक्षा वय, राहणी, प्रतिष्ठा, शिक्षण यांमध्ये वरील वर्ग सर्वतोपरी भिन्न असूनही त्यांच्यामध्ये त्याला पुढील साम्य दिसून आले.

"साधारणतः आपल्या वर्तुळाबाहेर कुठलाही गुन्हा करण्याचा संभव नसणाऱ्या व्यक्ती, आपल्या समाजाच्या मान्यतेने, लबाडीचे व्यवहार करीत असतात. देशाचे कायदे मोडल्याने त्यांची पत जात नाही, कारण त्या व्यक्ती स्वतःला गुन्हेगार समजत नाहीत; पण व्यापारी जगात मान्य असलेली आचारसंहिता मोडल्याने मात्र त्यांची पत जाते."[१]

दोन महायुद्धांच्या दरम्यान ब्रिटनमधील गुन्हेगारीचा आढावा घेताना, कोळशाच्या खाणींच्या प्रदेशात "कोळसा चोरणे हा गुन्हा समजला जातच नाही" ह्याची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. "आईवडील म्हणतात, सगळे करतात तेच माझ्या मुलाने केले. कोळसा नेणे ह्याला कोणी चोरी म्हणत नाही."[२] भारतीय कोळशाच्या खाणींच्या क्षेत्रातही आज हाच अनुभव येत आहे.

इ०स० १९४१–४२ च्या हिवाळ्यात इंग्लंडमध्ये लूट व चोऱ्या ह्यांना ऊत आला. एकट्या लंडनमध्ये ४,५०० वर खटले कोर्टात आले. वस्तुस्थिती अशी होती की इंग्लंडवर मोठ्या प्रमाणावर बॉम्बफेक होत होती. आगी लागत होत्या, घरे कोसळत होती, माणसे मरत होती, वस्तू इतस्ततः फेकल्या जात होत्या. "अशा वेळी सापडलेली वस्तू घेणे गुन्हा आहे हेच बहुतेकांच्या मनात येत नसे."[३] आपल्याला तर हा अनुभव रोजच येत असतो.

टेरेन्स मॉरिसने आणखी एक अभ्यास उद्धृत केलेला आहे, तो अडयू लिंडचा, हवाई बेटावरील समाजाचा. ह्या बेटाची राजधानी होनोलुलू. तेथील कायदा गोऱ्या अमेरिकेचा असला तरी "येथील वस्ती मुख्यतः पॉलिनेशियन लोकांची. त्यांच्या वागणुकीचे कित्ते—विशेषतः स्त्रीपुरुषसंबंधीच्या नीतीचे—ह्या कायद्याहून अगदी भिन्न असत. शिवाय ह्या ठिकाणी श्वेत अमेरिकन स्वतःच बाहेरून आलेले उपरे होते. येथील लोकसंख्येत जपानी, चिनी, फिलीपिनो व पोर्तुगीझ ह्या लोकांचेही बरेच मिश्रण होते. अशा भिन्न भिन्न संस्कृतीचे मोठाले गट येथील समाजात असल्याने, प्रत्येक गट आपली सामाजिक व नैतिक पातळी काटेकोरपणे आदर्श ठेवण्याचा प्रयत्न करी. पण अमेरिकेप्रमाणे, कायद्याने लादलेले नैतिक आदर्श सर्वसामान्यता पावण्याऐवजी,

---

१. ग्रुप प्रॉब्लेम्स इन क्राइम अँड पनिशमेंट : मॅन्हीम, हरमन; पान २२

२. सोशल आस्पेक्टस् ऑफ क्राइम इन इंग्लंड बिटवीन वॉर्स : मॅन्हीम, हरमन; पान २९९

३. ग्रूप प्रॉब्लेम्स इन क्राइम अँड पनिशमेंट : मॅन्हीम, हरमन; पान १०३

त्यांचे स्थान 'नीतिनियमांचा एक संच' एवढेच राहिले. त्यामुळे कायद्याने गुन्हेगार ठरवून कोर्टापुढे उभे केलेल्या अनेक आरोपींना त्यांचा समाज अपराधी समजतच नसे. जुगार व कोंबडे लढवणे ही फिलिपिनोंची प्रतिष्ठा पावलेली करमणूक, तर कुमार-वयाच्या लिंगसंबंधांना पॉलिनेशियन लोकांची मान्यता. हाराकिरी हा जपानी समाजाने एक सन्मान्य सामाजिक विधी मानल्यामुळे आत्महत्यांच्या संख्येचे नाते सामाजिक विघटनाशी जुळवणे चूक ठरे.

"अशा परिस्थितीत समाजाच्या दडपणाने व्यक्तीच्या नैतिक वागण्यात गोंधळ न होताही, ती व्यक्ती कायदा मोडण्यासाठी न्यायालयासमोर उभी करण्यात येते."[1]

परकीय सरकारचा कायदा मोडण्याचा अधिकार आपण परतंत्र भारतात उघड घोषित केला होता. पण स्वतंत्र भारतातही विशिष्ट वर्तुळात मान्य असलेली गुन्हेगारीची कृत्ये घडताना आपण प्रत्यही पाहतो. दारुबंदीच्या कायद्याचा जागोजाग झालेला चुथडा व त्या कायद्याची युक्तायुक्तता ह्यांच्याबद्दल चालू असलेली चर्चा आपल्याला पूर्ण परिचित आहे. दारुबंदीइतकाच समाजविघातक कायदेभंग व्यापाराच्या क्षेत्रातही चालू आहे. अन्नात व त्याहीपेक्षा औषधात होणारी प्राणघातक भेसळ हा आपल्या नित्यचर्चेचा विषय आहे. शुद्ध (distilled) पाण्याऐवजी दूषित पाणी नळीमध्ये सापडल्याने काही महिन्यांपूर्वी समाजात प्रचंड प्रक्षोभ झाला होता.

काही परिस्थितीत समाज खूनही क्षम्य समजतो. त्याचे एक उदाहरण ग्रीसबद्दलचे आहे. तिथे बहिणीला फसवून त्याची भरपाई लग्नाने करण्यास नकार देणाऱ्या तिच्या प्रियकराचा वध करणे हे तिच्या वडील भावाचे पवित्र कर्तव्य समजण्यात येते व त्याला 'भावाची प्रतिष्ठा' किंवा 'honour of brother' म्हणतात.[2] भारतात पत्नीच्या प्रियकराला व एकनिष्ठ न राहिलेल्या पत्नीला पतीने मारल्याचे अनेक खटले न्यायालयात चालू असतात.

ह्याच दिशेने अपराधित्वाचे प्रादेशिक (Ecological) संशोधन पुढचा मार्ग चालत आहे. अपराधाकडे व्यक्तिगत जीवनातील एक प्रसंग ह्या दृष्टीने न पाहता, त्या प्रसंगाची सामाजिक किंवा सामूहिक घटना म्हणून विचक्षणा केली जात आहे. त्याबद्दल अधिक चर्चा करण्याचे हे स्थान नव्हे, त्याचप्रमाणे लेखिकेचा तो अधिकारही नव्हे. तथापि टेरेन्स मॉरिसचा आणखी एक निष्कर्ष येथे उद्धृत करणे उद्बोधक ठरेल.

"राज्याचे (State) कर्तृत्व वाढते त्या प्रमाणात शासनाचे प्रभुत्वही वाढते;

---

१. ए स्टडी इन सोशल इकॉलॉजी : मॉरिस टेरेन्स; पान ९२

२. द इन्स्टिट्यूशन्स ऑफ ॲडव्हान्स्ड सोसायटीज : एडिटेड बाय अर्नोल्ड एम्० रोझ्; पान ३५६

आणि त्यामुळे जे अनेक नवीन कायदे केले जातात त्यांना समाजमान्यतेचे अधिष्ठान प्राप्त असतेच असे नाही." [१]

चंबळच्या परिस्थितीला वरील विधान बरेच लागू पडणारे आहे. 'मुलुखगिरी' हा क्षत्रियांना धर्माने, समाजाने, परंपरेने दिलेला अधिकार आहे. तो भारतीय घटनेने अचानक का नष्ट व्हावा, ही त्यांची समस्या आहे. आजही चंबळ पूर्ववत वाहते; आजही तीच व तशीच शेती करून येथील समाज जगतो; कपडा, मीठ, साखर, चहा अशा मोजक्या वस्तूच आजही विकत घेतल्या जातात; आजही अस्पृश्यांच्या, स्त्रियांच्या परिश्रमांची शेतीला गरज आहे. मग दोन लग्नांना विरोध का असावा? अस्पृश्यांनी हरिजन होऊन काम टाकून का जावे? हा सावकार आमच्या डोक्यावर चढला तो तरी कोणत्या अधिकाराने?

चंबळच्या समस्येचे समाधान करावयाचे तर तेथील दस्यूंच्या वरील प्रश्नांना त्यांना पटतील अशी उत्तरे शोधून काढणे अवश्य आहे; तसेच ती उत्तरे त्यांना पटवली तरच त्यांच्या समाजविघातक वृत्तींना आळा बसेल व दस्युवृत्ती शांत होईल.

हे परिवर्तन कसे घडवून आणावयाचे हा प्रश्न आहे. "ह्या सामाजिक समस्येचे उत्तर सहज सापडणार नाही; असे बदल कालावधीने होतात" असे आपल्याला वाटते. ते आपल्या अनुभवाशीही सुसंगत असल्याने विनोबांच्या हृदयपरिवर्तन या शब्दाने आपल्या मनात काहूर माजणे स्वाभाविक होते. तथापि 'हृदयपरिवर्तना'ची कल्पना आचार्यांखेरीज इतरांच्याही मनात येताना दिसते. 'मुझे जीने दो' ह्या चित्रपटात त्याचा नायक डाकू जर्नलसिंग याचेही हृदयपरिवर्तन झालेले आहे. त्याचे कारण मात्र अधिक अव्यवहार्य आणि रोमँटिक आहे. जर्नेलसिंग चमेलीजान नावाची नृत्यांगना पळवून आणतो. नंतर तिच्यावरच्या प्रेमामुळे व तिच्या आग्रहाने हत्या करणे सोडून देतो, अशी ती कहाणी आहे. ज्या समाजाला स्त्री ही उपभोग्य पदार्थ मात्र वाटते, पत्नीचे म्हणणे ऐकणे ही स्त्रैणपणाची व म्हणून पुरुषार्थाला उणेपणा आणणारी गोष्ट समजली जाते, तेथे अशा हृदयपरिवर्तनाचा संभव शून्यवत आहे हे उघड आहे. वरील चित्रपट मध्यप्रदेश पोलिसांच्या देखरेखीखाली व त्यांच्या सहकार्याने निघाला, येवढेच नव्हे, तर तो चित्रपट पाहाण्याबद्दल श्री० रुस्तुमजी ह्यांनी मला दिनांक ९-९-६३ रोजी आग्रहाने सांगितले, तेव्हा स्त्रीप्रेमासाठी हृदयपरिवर्तन ही कल्पना त्यांना शक्यतेच्या कोटीतली वाटत असावी हे उघड आहे. स्त्रीप्रेमासाठी हृदयपरिवर्तन ह्या प्रदेशात शक्य होईल का? ह्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले तरी ते एक व्यक्तिगत परिवर्तन होईल आणि ते अंगुलीमाल, वाल्मिकी ह्यांच्या परिवर्तनाच्या माळेला जाईल ही गोष्ट अलाहिदा.

विनोबाजींचा प्रयोग संपूर्णतः फसला. त्यामुळे 'हृदयपरिवर्तन'—त्यातूनही विनोबा

---

१. ए स्टडी इन सोशल इकॉलॉजी : मॉरिस टेरेन्स; पान ३०

साधू पाहत असलेले 'सामूहिक हृदयपरिवर्तन'—शक्यतेच्या कोटीतले नव्हते हे आपले मत सिद्ध झाल्याप्रमाणे आपल्याला वाटते. आचार्यांचा पराजय झाला; त्या पराजयाची मीमांसाही आपण मागच्या एका प्रकरणी केली; पण त्या पराजयाची जात मात्र आपण ठरवलेली नाही.

कोणताही प्रयोग करताना, आपल्या जुन्या अनुभवांच्या आधारावर काही परिकल्पना (hypothesis) करून ती परिकल्पना बरोबर आहे हे सिद्ध करण्यासाठी तो केलेला असतो. तेव्हा मूलभूत परिकल्पना, व ती सिद्ध करणाऱ्या प्रयोगाचे तंत्र, असे दोन वेगवेगळे भाग प्रयोगाच्या यशस्वितेसाठी बरोबर साधावे लागतात.

मूलभूत परिकल्पना चूक असेल, तर कुठलाही प्रयोग यश पावू शकत नाही. एके काळी 'उष्णता' (heat) हा एक प्रवाही पदार्थ आहे असे शास्त्रज्ञांचे मत होते. त्या अनुषंगाने उष्णतेचे पदार्थ ह्या नात्याने गुणधर्मः जसे वजन, घनता इत्यादि मापण्यासाठी केलेले प्रयोग कुठलेही तंत्र वापरून यशस्वी होणे शक्य नव्हते; कारण मुळातच उष्णता ही एक पदार्थ नव्हती. उलट जगदीशचंद्र बोस ह्यांनी वनस्पती जिवंत असतात ही परिकल्पना पडताळण्यासाठी केलेले प्रयोग सुरुवातीला निष्फळ झाले तरी सतत प्रयत्नाने त्यांचा एक प्रयोग त्यांच्या परिकल्पनेचे सत्यस्वरूप सिद्ध करून गेला.

विनोबाजींच्या—नव्हे लोकतंत्राच्या—शिक्षणाची हार झाली, ह्याचे कारण परिस्थितीबद्दल अज्ञान व त्यामुळे तंत्राची केलेली चूक हे त्या प्रकरणातील विवेचनावरून उघड आहे. जेव्हा प्रयोगाचे तंत्र चुकलेले असते, तेव्हा मूलभूत परिकल्पना चुकीची होती, असा निष्कर्ष काढता येत नाही, आणि हीच गोष्ट 'सामुदायिक परिवर्तना'च्या निष्कर्षालाही लागू आहे.

'समूहाचे हृदयपरिवर्तन होऊ शकते का?' हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. त्याबद्दल आपल्याला येवढेच म्हणता येईल की चंबळच्या सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात अजून जनमतावर धर्माचा प्रगाढ पगडा आहे. तेव्हा 'सामूहिक हृदयपरिवर्तन' येथे करण्याची शक्ती कोणाला असली तर ती एकऱ्या धार्मिक विचारालाच आहे. अशी दोन प्रचंड परिवर्तने मानवी इतिहासात बुद्ध व जीझस ह्यांनी करून दाखविलेलीही आहेत. भक्तिसंप्रदायानेही तेराव्या शतकात घडवून आणलेले परिवर्तन आपल्याला ज्ञात आहे. तसेच पैगंबर व आद्य शंकराचार्य ह्यांचे प्रयत्नही यशस्वी झालेले आपण जाणतो. तेव्हा योग्य व्यक्ती येथील परिसराला लाभली आणि तिने दस्युसमस्या हे आपले जीवनध्येय ठरवून प्रयत्न केला, तरच 'सामूहिक हृदयपरिवर्तना'च्या प्रयोगाला योग्य तंत्र लाभून मूळ परिकल्पना पडताळून पाहता येईल. असे प्रयोग करण्यासारखे अधिकारी पुरुष समाजाला हुकुमी निर्माण करिता येत नाहीत, हेही तितकेच खरे!



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपा . शाखा.
अ क्र ... विभाग ........

# डाकूग्रस्त जीवन : एक स्थान व एक तंत्र

## १. गुमानसिंग का पूरा : एक स्थान

मागच्या प्रकरणात आचार्यांच्या असफलतेचे विश्लेषण करताना अंत्यजांवर होणाऱ्या अत्याचारांच्या पैलूवर प्रकाशकिरण जास्त तीव्र पडलेले आहेत. तथापि चंबळ-घाटीतील डाकूग्रस्त जनतेच्या जीवनात ओसंडून वाहणारे भय, तेथील गटबाजी, वैमनस्ये, कामिनी-कांचनासाठी होणारे संघर्ष, जीवित व वित्त ह्यांची असुरक्षितता हे त्यात प्रतिबिंबित होऊ शकलेले नाहीत. त्याचप्रमाणे तेथे शांती टिकवण्यासाठी नेमलेले, सत्ताधाऱ्यांनी उपेक्षिलेले, पण आपल्या क्षेत्रात सर्वसत्ताधारी असलेले पोलिस व त्यांचे मुखबीर ह्यांच्या कारवाया, वरील दोन शक्तींचे संघर्ष व ज्या कायद्याची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी एवढा खटाटोप करावयाचा त्या कायद्यातील दोष व उणीवा यांमुळे प्रयत्नांना काही अंशी येणारी विफलता ह्यांचेही दर्शन झालेले नाही. ह्या विविध पैलूंनी रंगलेले जनजीवन समजण्यासाठी एखाद्या खेड्याचे समग्र जीवन साकार करणे अवश्य आहे असे मला वाटत होते. प्रसिद्ध डाकू लाखनसिंगाचे नागार किंवा मानसिंगाचे खेडा-राठोड ह्या दृष्टीने आदर्श ठरले असते. परंतु ह्या दोनही खेड्यांबद्दल पुरेशी माहिती उपलब्ध न झाल्याने, माझ्या परिभ्रमणाच्या अंती उल्लेखिलेले 'खेडे गुमानसिंग का पूरा' मी निवडले आहे.

आग्रा जिल्ह्याच्या बाह तालुक्यात असणाऱ्या खोहरी ह्या गावाचे सुमारे १५० वर्षांपूर्वी अकरा तुकडे झाले; त्यापैकी गुमानसिंग का पूरा हा सर्वांत मोठा. ह्याची वसती १३४ उंबरठ्यांची व लोकसंख्या ८४७ आहे. येथे वसणाऱ्या अकरा जातींचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| चांभार (जातव) | २८८ | म्हणजे | ३४·५० टक्के |
| ब्राह्मण + ठाकूर | २२८ | म्हणजे | २८·०० टक्के |
| इतर | ३११ | म्हणजे | ३६·०० टक्के |
| मेहेतर | २० | म्हणजे | १·५० टक्के |

ह्या १३४ घरांपैकी १३१ घरे मुख्यतः शेतीवर अवलंबून आहेत, तर शहरात काम करावयासाठी केवळ पंधरा कुटुंबातील माणसे गेलेली आहेत. मजुरीवर पोट भरणाऱ्या ३७ कुटुंबांपैकी १८ चांभारांची आहेत. मजुरीमध्ये शेतमजुरी व माल वाहणे ही कामे मुख्यत्वे दिसतात.

जमिनीचे हक्क भूमधारी व सिरीधारी असे दोन प्रकारचे असून, भूमधारी आपली जमीन विकणे, दान देणे, गहाण टाकणे वगैरे गोष्टी सरकारला न विचारता करू शकतो. सिरीधारीला ह्याच गोष्टींसाठी सरकारी परवानगी लागते. सिरीधारी हक्क असणारा मनुष्य शेतसाऱ्याच्या दसपट किंमत भरून सिरीधारी हक्क भूमधारी हक्कात परावर्तित करू शकतो. ह्याबद्दल पुढील तक्त्यावरून योग्य अंदाज येईल.

आकडे एकरात आहेत

| | परिवार संख्या | भूमधारी | सिरधारी | एकंदर | दर परिवारामागे एकंदर | दर परिवारामागे भूमधारी |
|---|---|---|---|---|---|---|
| चांभार | ३२ | ३४·८ | ७७·०० | १११·३ | ३·५ | १·०० |
| मल्लाह | २१ | ५·६ | १११·०३ | ११६-९ | ५·५ | ·२५ |
| ठाकूर | २० | २१·३ | १३८·०२ | १५९·५ | ८·० | १·०० |
| ब्राह्मण | १० | ३९·८ | ७८·०७ | ११८·५ | ११·८ | ४·०० |

वरील तक्त्यावरून चांभाराची धडपड भूमधारी हक्क मिळवण्याची असून ते ठाकुरांच्या जवळ पोचले आहेत असे दिसून येते.

गुमानसिंग का पूराला समाजसंचालनाच्या तीन संस्था दिसून येतात.

अ. १. गाव-मुखिया (Headman) : तीस वर्षे वयाची कोणीही व्यक्ती निवडणूक लढू शकते. मुखियाची निवडणूक दर पाच वर्षांनी होते व एकच माणूस पुन्हा पुन्हा निवडणूक लढवू शकतो. सध्याचा मुखिया इ० स० १९४९पासून इ० स० १९६० पर्यंत बिनविरोध निवडून आला. इ० स० १९६० मध्ये दोन ब्राह्मण उभे राहिले, पण त्यांनी ओलीसुकी करून 'आपसात' केल्याने निवडणूक झाली नाही. निवडणूक गुप्त-मतदानपद्धतीने होते.

२. उप-प्रधान : वय निदान एकवीस असावे लागते. मुदत एक वर्षाची. निवडणूक हात वर उचलून होते.

३. चौकीदार : हा मेहेतर असतो. पंचायतीची लहानमोठी कामे करितो. त्याचा पगार तुटपुंजा, त्यामुळे त्याचे कामाकडे लक्ष नाही.

ब. ग्रामपंचायत : एकवीस वर्षांची कोणीही व्यक्ती उभी राहू शकते. मुदत पाच वर्षे. निवडणूक गुप्तमतदानपद्धतीने होत नाही. पुन्हा पुन्हा उभे राहता येते. निवडणूक फी सहा रुपये. पंचायत महिन्यातून निदान एकदा भरावी असा नियम आहे. ग्रामसफाई, कल्याणकार्य, वैमनस्ये थांबविणे, डाकूंपासून संरक्षण, इत्यादी ग्रामपंचायतीची कामे आहेत.

क. अदालती पंचायत : ह्याला उभे राहण्यासाठी ग्रामपंचायतीचे सदस्यत्व, न अडखळता देवनागरी लेखनवाचन व ग्रामपंचायतीकडून एकमुखाने नाव येणे जरूर असते. वय तिसाच्या वर असावे लागते.

१. सरपंच
२. साहाय्यक सरपंच } दोघांनाही अदालती पंचायत बहुमताने निवडते. पंचासाठी मतदान गुप्त पद्धतीने तर साहाय्यक सरसरपंचास उघड असते. दर पाच वर्षांनी नवी निवडणूक होते. अनुसूचित जातींना ग्रामपंचायतीत चार जागा राखीव आहेत. अदालती पंचायतीत राखीव जागा नाहीत.

अदालती पंचायत आठवड्यातून दोनदा बसावी असा नियम आहे, पण येथील अदालती पंचायत गेल्या दोन वर्षांत एकदाही बसली नाही.

इंडियन पिनल कोडचे कलम ३२३ चे, रु० ५००·०० पर्यंतचे दिवाणी आणि साध्या मारहाणीचे खटले चालवण्याचा ह्या अदालतीला अधिकार आहे. तिला रु० ५० पर्यंत दंड करता येतो.

ग्रामसंचालनाची ही सारी यंत्रणा खोहरीच्या समाजधारणेला असमर्थ तर ठरलीच, पण दलितांच्या पिळवणुकीचे ती एक जबर शस्त्र झाल्याचे आपल्याला पुढे आढळून येते.

बाहच्या परिसरात गेल्या वीस वर्षांत सहा टोळ्या संघटित झाल्या आणि त्यांनी मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश व राजस्तान या तीनही राज्यात धुमाकूळ घातला. मानसिंगाची टोळी त्या सर्वांत मोठी होती. तिचा दरारा व अनुशासन ही उत्तम प्रतीची होती व मानसिंगाला सामाजिक प्रतिष्ठाही भरपूर मिळाली.

मध्यप्रदेशचे आय्० जी० पी० श्री० रुस्तुमजी यांच्या मते मानसिंगाच्या मृत्यूनंतर डकैतीच्या गुन्हेगारांचे सारे मानचित्रच बदलले. आज मोठ्या टोळयांचे दिवस संपले असून, खूपशा किरकोळ टोळ्या मात्र उरल्या आहेत. ह्या सर्व टोळ्या मिळून—त्यांची

संख्या वीसएकवीस असावी—दोनशे डाकू असावेत. ह्या टोळ्या कधी परस्परांशी सहकार्य करितात तर कधी शत्रुत्व. ह्या किरकोळ टोळ्यांपैकी मेवाराम रामनाथची टोळी स्वातंत्र्यदिनानंतर (इ० स० १९४७) लौकरच अस्तित्वात आली. आपल्या टोळीचे नेतृत्व करणारे हे दोघे भाऊ जातीने ब्राह्मण असून खोहरीचे रहिवाशी होते.

मेवाराम डाकू का झाला ह्याबद्दल खेडूत दोन वेगवेगळी कारणे सांगतात. त्यापैकी काहींचे म्हणणे आहे की घनशामदास चौबे, राहाणार कामेत्री चंदरपूर, ह्याचा खोहरीच्या बटेश्वरीच्या मेहुणीशी अनैतिक संबंध होता. ह्या बाईला दिवस गेल्यामुळे गर्भपात करवावा लागला. बटेश्वरीच्या सासऱ्याला त्याचे लांछन वाटले आणि त्याने चौबेचा खून करण्याची भर बटेश्वरीला दिली. तेव्हा काही डाकूंच्या मदतीने मेवाराम, बटेश्वरी, बदनसिंग (सर्व ब्राह्मण) व रामदयाल (धनगर) ह्यांनी चौबेचा खून केला. त्यावेळी मेवाराम त्याची बारा बोअरची गन घेऊन आला. पुढे मेवारामवर खटला भरण्यात आला. पण तो जामिनावर सुटून आला असताना, जन्मठेपेची शिक्षा होण्याची शक्यता त्याने वकिलाकडून ऐकली आणि आपल्या भावासह तो ओहोळात मानसिंगाकडे गेला.

दुसरे काही म्हणतात की मेवाराम पूर्वीपासून जनावरे पळवी व वस्तू चोरून त्या खोहरीच्या रामदयाल ब्राह्मणाकडे गहाण ठेवी. इ० स० १९४७ साली मानसिंगाने स्वातंत्र्योत्सव केला, तेव्हा मेवाराम डाकू म्हणून जाहीर केला गेला नव्हता.

मेवारामने घनशाम चौबेचा खून केल्यावर त्याला मुखिया रामेश्वरने जामीन दिला. कोणी म्हणतात की त्याने नंतर लगेच बेहड पकडला, तर कोणाच्या मते त्याने खटला लढण्याच्या हेतूने रामदयालकडे आपल्या गहाण ठेवलेल्या वस्तू परत मागितल्या तेव्हा रामदयालने त्याच्याशी भांडण करून तो काही धोका करील ह्या भयाने आपल्या नातलगांकरवी त्याचा जामीन रद्द करवला. पुढे मेवाराम केसमधून सुटल्यावर त्याने बेहडाची वाट धरली.

पुढील तेरा वर्षांत मेवाराम व रामनाथच्या टोळीने मानसिंगाच्या आश्रयाने तसेच स्वतंत्रपणेही खूप हत्या केल्या. त्यापैकी सात मौजा खोहरी येथे झाल्या. त्यांची जातवारी : ठाकूर १, मल्लाह १, चांभार ५ अशी होती. ह्या हत्यांची पार्श्वभूमी आपण पाहू या.

इ० स० १९४६–४७ सालची गोष्ट असावी. मेवाराम आपल्या शेताकडे जात होता. दिवस होळीचा असल्याने पोरे सर्वत्र चिखलफेक करण्यात गुंग होती. मेवारामला जाताना पाहून काही चांभार पोरांनी चिखल व घाणेरडे पाणी फेकून त्याचे कपडे घाण केले. चांभाराच्या पोरांचा उद्दामपणा पाहून मेवारामला संताप आला. त्यावेळी हरिया चांभार त्याच्याबरोबर होता. त्याने मेवारामची समजूत घालण्याचा प्रयत्न केला : "होली का दिन है. बच्चोंसे क्या नाराज होना. चलता ही है..." हरियाच्या ह्या सांत्वनाने मेवारामच्या संतापाचा पारा उतरण्याऐवजी जास्त चढला मात्र. "जियादा

बको नही. होली मनाते है न बचे तुम्हारे? अच्छा है. अब घरपीछे तीस रुपये चंदा ला दो. नही तो गोलीसे उडा दूंगा. ध्यान रखो. और देखो. मुखियाको (रामेश्वर) कुछ पता न चले. नही तो तुम्हारी खैर नही."

हरियाने घाबरून चांभारांना सर्व हकीकत सांगितली. मेवारामला डाकू चारणा, जात मल्लाह, राहणारा पुरा देवीसिंग, मौंजा खोहरी, तसेच डाकू बहौरी, जात गूजर राहणारा जोमर्दका पुरा ह्यांचा पाठिंबा असल्याने चांभार गडबडून गेले.

ज्यांना ऐपत होती त्यांनी घरटी तीस रुपये गोळा करून गुपचूप मेवारामला दिले. पण गरिबांनी काय करावे? अखेर काही चांभार डाकू मानसिंगाला शरण गेले. मानसिंग खोहरीला आला. त्याने चांभारांना डाकू चारणाकडे नेले. चारणा कुठे बाहेर गेलेला होता. त्याची व मानसिंगाची गाठ पडली नाही. तेव्हा मानसिंगाच्या सांगण्यावरून चांभारांनी त्याची गुरे हाकून आणली.

"जाव, तुमको कोई कुछ नही करेगा. जो कोई कुछ करेगा तो मेरी बंदूक उसे उडा देगी." मानसिंगाने त्यांना अभय दिले. त्यानंतर चारणा व मेवाराम यांनी चांभारांना झाल्या गोष्टीची जाणीव दिली नाही; पण मेवारामने मानसिंगला बंदूक देऊन त्याला वश मात्र करून घेतला. पुढे मानसिंगाचा पोलिसांशी सामना झाला, तेव्हा त्या सामन्यात मेवारामही हजर होता. सामन्यात एक मृत्यू झाल्याने मेवाराम खटल्यात सापडला, आणि जामिनावर सुटून आल्यावर त्याने बेहड पकडला. वरील चिखलफेकीचे प्रकरण मेवाराम विसरला मात्र कधीच नाही.

ह्या घटनेप्रमाणेच, गुमानसिंग का पूराच्या सामाजिक जीवनाबद्दलच्या नवीन काही गोष्टी येथील घटनांवर प्रकाश पाडणाऱ्या आहेत.

१. पूर्वी गुमानसिंग का पूरामध्ये केवळ चार चांभार कुटुंबे मेलेली जनावरे ओढून नेत व त्यांच्या कातड्याचे जोडे करीत. ह्या कुटुंबांना इतर चांभार समाज हीन लेखीत असे. इ० स० १९४६–४७ च्या सुमाराला त्यांनी, चांभारांच्या जातीला पूर्ण प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या हेतूने, वरील काम बंद केले. तेव्हापासून सर्व जाती आपआपली मेलेली जनावरे ओढून टाकतात. ह्या गैरसोयीमुळे उच्चवर्णियांना, विशेषतः ब्राह्मणठाकुरांना, चांभारांची चीड आली.

२. त्यानंतर एकदोन वर्षांनी एका कोरीच्या (विणकर) विहिरीत पडून गाय मेली. तिला काढावयाला सर्व जातींनी सहकार्य दिले. चांभार मात्र बोलावूनही त्या कामाला आले नाहीत, आणि त्यामुळे संतापून ब्राह्मण व ठाकूर तरुणांनी त्या रात्री चांभार पोरांना चोपून काढले. ह्यानंतरही चांभार नमले नाहीत वा त्यांनी आपला मार्ग सोडला नाही.

३. पूर्वी ठाकूर-ब्राह्मण चांभारांकडून बिगार घेत. चांभारांना बिगार देणे आवडत नसल्याने कायद्याचे पाठबळ मिळताच त्यांनी ती बंद केली त्यामुळेही उच्च वर्ण त्यांच्यावर जास्त रागावले.

४. इ० स० १९५२च्या निवडणुकीत दिवाण गोकरणसिंग ह्या स्वतंत्र उमेदवाराने मानसिंग-चारणा वगैरेंची मदत मिळवली. दिवाण गोकरणसिंगला मते देण्याबद्दल मानसिंग व चारणा या दोघांनी खेडुतांना आदेश दिला. त्यानंतरही त्याचा प्रतिस्पर्धी काँग्रेसी उमेदवार चतुर्वेदी निवडून आला, तेव्हा चांभार व इतर हलक्या जातींनी आपली फसवणूक केली असा डाकूंना संशय आला.

ह्याच सुमारास खेड्यात गटबाजी सुरू झाली.

इ० स० १९५०च्या निवडणुकीत वैजिनाथ ब्राह्मण गुप्त मतदानपद्धतीने मुखिया झाला. पण जमीनदारी नष्ट होण्यापूर्वीच्या काळात एक हजारपेक्षा अधिक वस्तीच्या मौजात एक जास्तीचा मुखिया पोलिस नेमू शके. ह्या अधिकारात वैजिनाथचा पराजित प्रतिस्पर्धी रामेश्वर हा जास्तीचा मुखिया नेमण्यात आला. रामेश्वर व वैजिनाथ दोघेही खेड्यातील लब्धप्रतिष्ठित व वजनदार ब्राह्मण होते. पण सत्तेसाठी दोघांच्यात चुरस उत्पन्न झाल्यावर तिचा परिणाम सर्वत्र गटबाजी होण्यात झाला.

मानसिंगाची व वैजिनाथची जुनी मैत्री होती. तिला त्याने पुन्हा उजळा दिला. मानसिंगाकडे तो पुष्कळदा ओहळात भेटीला जाई; मानसिंग मात्र कधी खोहरीला येत नसे. वैजिनाथने मानसिंगाशी नव्याने नाते जोडल्यावर त्याचा प्रतिस्पर्धी रामेश्वर हा पोलिसांचा मुखबीर होणे स्वाभाविकच होते. पण त्यामुळे खोहरीच्या मौजातली गटबाजी चांगली दृढमूल झाली. एका बाजूला डाकू व त्याचे साथीदार आणि दुसऱ्या बाजूला पोलिस व त्यांचे मुखबीर, ह्या वाटणीतून फारच थोडेजण पक्षातीत शिल्लक राहिले. ह्या परिस्थितीत सामाजिक वातावरण तंग होणे अपरिहार्य होते. दिनांक ४-१०-१९५२ रोजीं सर्व प्रकारांची परिसीमा झाली. त्या दिवशी मेवाराम, रामनाथ व चारणा ह्यांनी गुमानसिंग का पूरा येथील हिंमत व छत्रपाल ह्या दोन चांभारांचा खून केला. खून झाले त्याच रात्री रामनाथ चांभाराचे घरही जाळण्यात आले. ह्याबाबत काही गडरियां(धनगर)वर खटले भरण्यात आले, पण मुख्य गुन्हेगार मेवाराम, रामनाथ व चारणा मात्र पोलिसांना सापडले नाहीत. ह्या हत्यांचे कारण, गावकऱ्याच्या मते, डाकूंचा राग सर्व चांभार जातीवरच होता, कारण मेवारामवर चिखल फेकण्याइतके व बिगार बंद करण्याइतके चांभार माजले होते, हे होय.

त्यानंतर खोहरीच्या पंचायतीची बैठक भरविण्यात आली. ठाकूर व ब्राह्मण जातींच्या वयोवृद्धांनी चांभारांची झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आणि पुनश्च असा प्रकार होणार नाही असे आश्वासनही दिले. मात्र वरील गुन्ह्यांबद्दल खटले चालू नयेत असे त्यांचे मागणे होते. वरील आश्वासनामुळे असो वा धमक्यांमुळे असो, पंचायतीच्या म्हणण्याला चांभार राजी झाले. खटला—बहुधा पुरावा न दिल्याने—काढून टाकण्यात आला व पकडलेले लोक सुटून परत आले.

ह्यानंतर खोहरीमध्ये तीन वर्षे शांतता नांदली. पण दिनांक २४-११-५५ रोजी रामनाथने सकाळी नऊ वाजता एका मल्लाह तरुणाला गोळी घालून गुन्हेगारीचे नवे

पर्व सुरू केले. खेडूत म्हणतात की त्या तरुणाचा एका मुखियाच्या नातीशी अनैतिक संबंध आला, आणि त्या कुटुंबाची गावात छीथू होऊ लागली, म्हणून हा खून करण्यात आला होता. रामनाथला पाचारण करणारात गंगासिंग, त्याचा भाचा घमंडी ब्राह्मण व टीकमसिंग ठाकूर होते असे मृताच्या भावाने सांगितल्याने हेही तीन इसम पकडले गेले.

खोहरीची ग्रामपंचायत पुन्हा एकदा बसली. पुन्हा आपसात करण्याची बोलणी झाली व पुन्हा सरकारी साक्षीदार कोर्टात वेळेवर हजर न झाल्याने खटला काढून टाकण्यात आला.

इ० स० १९५५ नंतर पुनश्च दोनअडीच वर्षे ताणाताणीत पण मोठा गुन्हा न घडता लोटली. पण इ० स० १९५८ मध्ये बैजिनाथच्या विरुद्ध पक्षाचे लोक मेघसिंग ठाकूर, रामखिलावन मल्लाह व रामेश्वर ब्राह्मण (सर्व खोहरीचे राहणारे) ह्यांची शेते जाळणाऱ्यात मेवाराम, रामनाथ, रामदयाल, बदनसिंग ही खोहरीची आणि गंगासिंग व घमंडी ही गुमानसिंग का पूराची माणसे होती. मेवाराम, रामनाथ तर ओहोळात परतले, पण बाकी सर्वांवर खटला होऊन ते जामिनावर परत आले. त्यानंतर त्यांना पुन्हा पकडण्यात आले, कारण पूरा देवीसिंग येथील अधेराम मल्लाह हा रामेश्वरच्या पक्षाचा असल्याने त्याला मारण्यासाठी वरील लोकांनी मेवारामला निमंत्रण दिल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. ह्या घटनेने अधेराम हा मुखबीर असावा असा संशय मेवारामला आला आणि अधेरामला दिनांक १६-११-५८ गोळी घालण्यात आली.

ह्यावेळीं वातावरण विलक्षण तापलेले होते व केव्हा काय होईल ह्याचा भरवसा नव्हता. तेव्हा इ० स० १९५८ च्या डिसेंबरअखेर पुन्हा पंचायत भरवण्यात आली. ह्यावेळीं भोवतालच्या मौजांनूनही कित्येक लोक हजर होते. सभेला एक हजार लोक असावेत, असा अंदाज आहे. सभेला श्रीमती विद्यावती ठाकूर एम्० एल्० सी० हजर होत्या. त्यांनी आपल्या प्रयत्नांनी अनेकांना पोलिसांच्या जुलमापासून वाचवलेले असल्याने जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल श्रद्धा होती. विद्यावती ठाकूरनी दोन्ही मुखियांना सांगितले की "बैजिनाथने डाकूंपासून व रामेश्वरने पोलिसांपासून गाव राखावे, तरच गावात शांती होईल." त्यांची सूचना पंचायतीला पसंत पडली. ती दोन्ही मुखियांनीही कबूल केली व त्याप्रमाणे ठरावही झाला.

असे म्हणतात की सभा चालू असतानाच मेवाराम, रामनाथ वगैरे डाकू बैजिनाथच्या घरात बसून सभेचे कामकाज ऐकत होते. कोणी म्हणतात की देवीसिंग का पूराचा डाकू जयसिंग सभेतच बसलेला होता, त्याने इतर डाकूंना ह्या सभेचा साद्यंत रिपोर्ट दिला.

काही असो. वरील सभेनंतर तीनच दिवसांनी, दिनांक ३१-१२-५८ च्या रात्रीची नऊ वाजताची गोष्ट. रूपा, कन्हाई, लुक्का, रामनाथ, मेवाराम आपआपल्या

टोळ्यांसह खोहरीला आले. ते सर्व डाकू खाकी युनिफॉर्ममध्ये होते. त्यांना ओळखून खोहरीचे रामसुंदर ठाकूर व हरगोविंद चांभार आणि त्याचा भाऊ चुडामण, तसेच गुमानसिंग का पूराचे दोन चांभार लज्जा व शंकरा आणि वैजनाथचा मुलगा बंकिलाल ब्राह्मण त्यांच्यामध्ये सामील झाले.

प्रथम डाकूंनी गावाच्या सीमेवर टेहळणीला माणसे उभी केली. त्यानंतर घराघरात शिरून त्यांनी खालील माणसे बाहेर काढून आणली : १. गुलजारी, २. रामनाथ, ३. रामरतन उर्फ रतन (सर्व चांभार), ४. बाबूसिंग ठाकूर.

त्यांना ओढून नेताना उठलेला कल्होळ व इतरत्र पसरलेली भीषण शांतता कल्पनेने जाणता येते. चांभारवस्तीत असलेल्या चौरस्त्यावर त्यांना गोळ्या घालून डाकू निघून गेले. शेते जाळल्याची पोलिसात तक्रार केल्याबद्दल गुलजारी व बाबूसिंग यांनी आपल्या प्राणांची किंमत दिली होती. रामनाथ व रामरतन ह्यांनी शंकरा चांभाराला डाकूंशी संबंध न ठेवण्याबद्दल सांगितले, हे एक व शिवाय एका गोठ्याच्या खरेदीबद्दलही त्यांचा काही बांधा पडलेला होता हे दुसरे. कारण त्यांचे हे अपराध, डाकूंच्या मते, देहदंडाला पुरेसे होते.

पहिल्या पंचायतीची धुळवड रक्ताने खेळण्यात आली होती. ह्याही वेळी पंचायत बोलावली गेली. पुन्हा चांभारांची माफी मागण्यात आली. त्यांनी तरी माफी न द्यावी तर काय करावे? त्यांना वाली कोण होता? आज त्यांची तीनच माणसे मेली होती. भांडण न मिटवले तर उद्या किती बळी जातील कोणी सांगावे! अखेर माफी मान्य करण्यात आली. इतक्या उघडपणे खून झाले असताही शंकरा व लज्जा या दोघांशिवाय कोणाविरुद्ध साक्षीदार देण्यात आला नाही. सारेच आरोपी सुटून आले. अशा रीतीने खोहरी पंचायत ही संस्था व्यवहारात अन्यायाला व जुलमाला पाठीशी घालणारी आणि समतेचा गळा दाबणारी संस्था होऊन बसली.

इ० स० १९६० मध्ये मेवाराम रामनाथची टोळी खलास झाली, पण खोहरीची दहशत मात्र होती तशीच कायम राहिली. पोलिसांच्या मुखबिरांच्या भयाने वैजिनाथ परिवारासह बाहला राहावयास गेला, तो तेथे दोन वर्षांपेक्षा जास्त दिवस राहिला. त्याच्या पश्चात त्याचे घर, सामान, इतकेच नव्हे तर पंचायतीचे रेकॉर्डही भस्मसात झाले. मुखबिरांनी वदनसिंग व रामदयाल यांची घरेही धुंडाळली. असा काही प्रसंग उद्भवेल अशी शंका असल्यामुळे वैजिनाथचा परिवार इतरत्र गेलेला होता आणि म्हणून तो बचावला. डाकूंच्या निर्दालनानंतर शेर झालेले मुखबीर आता लोकांकडून पैसा वसूल करू लागले; त्यांचे सामान लुटू लागले. खेडुतांनी मला सांगितले की मुखबीर त्यांच्याकडून जबरीने शेती करवतात, सर्व तऱ्हेची बिगार घेतात. लोकांची जनावरेही ते अनेकदा हाकून नेतात.

हे मुखबीर कोण आहेत? त्यांची भरती कशी व कोण करिते? त्याला काय योग्यता व गुण लागतात? पोलिसांचे ज्येष्ठ अधिकारी ह्याबद्दल मुग्धता स्वीकारतात.

त्या मुखबिरांची कार्ये व कर्तव्ये (functions and duties) कोणाला ठाऊक नाहीत वा त्यांना त्याबद्दल मिळणारे विशेष हक्क व बक्षिसे ह्याचाही कोणाला थांग नाही. मात्र असे दिसून येते की डाकूपीडित परिवाराला बंदुकीचे लायसेन्स देण्यात येते. पुढे क्रमशः हा परवानादार पोलिसांना डाकूंच्या हालचालींबद्दल सांगू लागतो व कालांतराने तो मुखबीर बनतो.

डाकू नमले की खेड्याला मुखबीर छळतात. रामेश्वर आज मेलेला असला तरी त्याची दोन मुले तेच काम अजून करीत आहेत. इतिहास असे सांगतो की ह्या परिस्थितीत मुखबिरांच्या छळाला कंटाळून खेडूत डाकूंना केव्हातरी पाचारण करितात. इ० स० १९५१ मध्ये मानसिंगाला खोहरीने असेच निमंत्रण दिले होते. मग चारपाच मुखबिरांना गोळ्या घालून डाकूंचे राज्य व दहशत सुरू झाली होती. आजही इतिहासाचे चक्र आपली प्रदक्षिणा पुरी न करो म्हणजे झाले.

ह्या गडबडीत पोलीसअधिकारीही लावालाव्या करण्याचा संभव दिसतो. रामेश्वरचा मुलगा रामनारायण आणि विरुद्ध पक्षाचे बदनसिंग व रामदयाल ह्यांना परस्परांचे खून करण्याबद्दल एका सर्कल ऑफिसरने सांगितल्याचे लोक बोलतात. रामनारायणाने सर्कल ऑफिसरचा आदेश नाकारला. त्यानंतर रामनारायणाला मेवारामने अपहरण करून नेल्यावर ह्या अधिकाऱ्याने रामेश्वरला सांगितले की "खोहरीचा साठ वर्षे वयाचा दयाराम ब्राह्मण ह्याने तुझ्या पोराला ठार मारले आहे." ह्या सांगण्यावर विश्वासून मुखबिरांनी दयारामला ठार केले व सूड म्हणून नंतर मेवारामने रामनारायणला मारले. डाकूंकडून क्वचित गैरसमजानेही सामान्य माणसे मुखबीर म्हणून मारली जातात. दिनांक १९-३-६० रोजी पंडित लज्जाराम (राहणार फतेपूर) व तुलसी (राहणार खोहरी) असेच हकनाक मारले गेले. जी चूक डाकू करितात, ती पोलिसांकडून होणे तितकेच स्वाभाविक आहे आणि त्याच्या तक्रारी आपण दस्युभूमीचे दर्शन ह्या प्रकरणातही वाचल्या आहेत. खेड्यात सर्वत्र होणारी जमिनीची भांडणे येथेही होतात, त्यामुळे काही मृत्यू होणे अपरिहार्य आहे व ते तसे होतात. "हातात बंदुकी असल्याने खून होतात." हे आचार्यांचे शब्द कदाचित ह्याच हत्यांना उद्देशून असतील.

पोलिसांच्या मते इ० स० १९६० मध्ये मेवाराम हा सामन्यात मेला तर गावकऱ्यांच्या मते बाह तालुक्यातील एका गावच्या लोकांनी त्याला मारले. सत्य काय असेल ? मेवारामच्या डोक्यावर किती बक्षीस होते ? ते कोणाला मिळाले ? काळाच्या पोटातील ही सत्ये कधीच बाहेर येणार नाहीत. कदाचित आपल्याला खरेखोटे करण्याची जरूरही पडणार नाही. पण खेड्यातील जनतेच्या मनात पोलिसांबद्दल असणारा अविश्वास व अनादर मात्र ह्या अफवांवरून स्पष्ट होतो. बिकट प्रसंगी अशा अफवा किती हानिकारक असतात, हे युद्धकालाने आपल्याला शिकवलेलेच आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

## २. अपहरण : एक तंत्र

त्या दिवशी सायंकाळी, मध्यप्रदेशचे गव्हर्नर श्री० ह० वि० पाटसकर ह्यांच्याशी दस्युभयसमस्येबद्दल बोलण्याची सुसंधी मला मिळाली होती. "डाकूंनी आपले तंत्रही बदलले आहे. डाके घालण्यापेक्षा त्यांना अपहरण सोपे वाटते. आणि तेही स्वाभाविक आहे. माझा मुलगा त्यांनी नेला तर मी पैसे देऊन त्याला परत आणीन का पोलिसला खबर देत बसेन ?" खरेच होते त्यांचे म्हणणे.

श्री० पाटसकरांचे वय सत्तराच्या वर असावे. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न व खेळकर आहे. कोणत्याही घटनेचा सहज स्वीकार करून तिचा अन्वयार्थ लावण्याचा त्यांचा निष्णात वकिलाचा स्वभावही मला लागलीच पटला.

श्री० पाटसकरानी सांगितलेलीच गोष्ट मला त्या दिवशी दुपारी मध्यप्रदेशचे वादविषय झालेले आय्० जी० पी० श्री० रुस्तुमजी ह्यांनी सांगितली होती. मध्यप्रदेशातील एका आठवड्याच्या माझ्या वास्तव्यात मी अपहरणाच्या दोनतीन बातम्याही वाचल्या होत्या. त्या अपहरणांबद्दल मागे एकदा चरणसिंगही म्हणाले होते, "किसीका बच्चा अपहरण करके डाकू ले जाय तो कोई पुलीसको खबर नही देता." पैसा देऊन पोरगा सुखरूप मिळवण्याचा मार्ग पालकांना जास्त सुखकर वाटतो. पोलिसांना खबर कोणी देत नाहीच पण पोलिसांना सुगावा लागून चौकशी सुरू झाली तरी पालक सत्य सांगावयास कचरतात. ते खुशाल सांगतात, "लडका मामाके घर गया है—शहर भेजा है." इत्यादी.

लहान मुलांची अपहरणे होत असल्याने डाकूंबद्दल जनतेमध्ये तिरस्काराची भावना निर्माण होत आहे, हे श्री० रुस्तुमजींचे म्हणणे मात्र मला पटले नाही. ज्यांच्या घरावर पूर्वी दरवडे पडत त्यांचीच मुले आता अपहृत होतात. त्यांच्याबद्दल काल नसलेली सहानुभूती आज निर्माण का व्हावी ? मुलांचे खून ह्यापूर्वीही होतच असत. त्याबद्दल विशेष काही वाटण्याच्या पलीकडे आज चंबळखोऱ्यातील माणसे गेलेली आहेत.

अपहरणांची संख्या डाक्यांच्या मानाने आता वाढली असली तरी पूर्वी अपहरणे होत नसत, अशातला भाग नाही.[1] शिवपुरी जिल्ह्यातला प्रसिद्ध डाकू अमृतलाल ह्याने अपहरणात लाखो रुपये मिळवले. अमृतलाल धूर्त आणि बुद्धिमान होता. आपली अपहरणे व दरवडे ह्यांची तो व्यवस्थित आखणी करी आणि त्यामुळे हजारो रुपये

---

१. भिंडमधील आकडे पुढे पाहा.

मिळवतानाही त्याला अनेकदा रक्ताचा थेंबही सांडावा लागत नसे. त्याची काही उदाहरणे पुढे देत आहे.[1]

विजयादशमीचा शुभ दिवस होता. उमरीच्या राजप्रासादात प्राचीन परंपरेप्रमाणे राजेसाहेब आपल्या शस्त्रास्त्रांचे पूजन करण्यात गुंतलेले होते. ह्यावेळी खैराचे एक मोठे ठेकेदारसाहेब राजेसाहेबांकडे आले. त्या भागात खैराचे व्यापारी सुप्रसिद्ध व प्रतिष्ठित आहेत. त्यामुळे राजवाड्यातल्या पहारेकऱ्यांनी गडबडून ठेकेदारसाहेबांना आत जाऊ दिले व ठेकेदारसाहेब थेट देवघरात जाऊन पोचले. तेथे त्यांनी खिशातून पिस्तूल काढून सर्वांना आपआपल्या जागी गप्प बसवले आणि नंतर एक तासभर वस्तू विस्कळित फेकून प्रासादातून पंचाण्णवहजार रुपयांची लूट व उत्तम अस्त्रे घेऊन शांतपणे ठेकेदाराच्या वेषातला अमृतलाल परत गेला.

इ० स० १९५८ अखेर मध्यभारत मध्यप्रदेशात विलीन झाला. अमृतलालने निर्माण केलेली दहशत आता आटोक्यात येईल अशी लोकांना आशा वाटू लागली. पण तेवढ्यात मोरेना जिल्ह्यात एका वरातीला अडवून, त्याने चाळीस हजार रुपयांची लूट मिळवली. ह्याशिवाय वरातीबरोबर एक श्रीमान शेट होते, त्यांनाही अमृतलालने धरून नेले. ह्या शेटजींकडून पन्नास हजार रुपयांची खंडणी घेऊन त्यांना मुक्त करण्यात आले व अशा तऱ्हेने लोकांच्या आशेवर बोळा फिरला.

अमृतलालच्या अत्याचाराने सारा प्रदेश विलक्षण घाबरा झाला, आणि सर्वत्र सरकारवर टीका होऊं लागली. अखेर अमृतलालविरुद्ध मोहीम आखण्यात आली. ह्या मोहिमेची जणू थट्टा करण्याच्या हेतूने लौकरच अमृतलालने धमरच्या ठाकूरसाहेबांच्या कोठीवर दरवडा घातला. त्या दिवशी त्यांच्या कोठीवर उत्सव होता. एखाद्या वावटळीप्रमाणे वीसएक लोक घेऊन अमृतलाल तेथे पोचला. उत्सवाचे दीप विझवून अस्त्रे व सोनेनाणे घेऊन अमृतलाल परत गेला आणि जाताना ठाकूरसाहेबांचे एकदोन आप्तही त्याने धरून नेले.

नंतर लौकरच मुंबई-आग्रा रस्त्यावरून काही लोकांना त्याने पकडून नेले. त्या दिवशी 'दोल'चा उत्सव होता. मुंबई-आग्रा रस्त्यावरील हनुमानमंदिरात 'दोल-उत्सव' करण्यासाठी एक ट्रक घेऊन काही लोक गेलेले होते. उत्सव संपण्याच्या आतच अमृतलालने त्या लोकांना घेरले आणि शिवपुरीच्या प्रसिद्ध श्रीमंत कुटुंबातील अकरा माणसांना त्याच ट्रकमध्ये घालून अमृतलाल स्वतः ट्रक चालवून घोर जंगलात त्यांना घेऊन गेला. ह्या लोकांनी सुटकेसाठी किती खंडणी दिली असेल कोण जाणे, पण अमृतलालने जबर खंडणी घेतली असेल हे उघड आहे. ज्यांनी खंडणी दिली, त्यांची अमृतलालने बंदिवासाच्या अवधीत राजाप्रमाणे बडदास्त ठेवली; ज्यांना खंडणी भरता आली नाही त्यांना स्वर्गवासाला पाठवले.

---

१. अभिशप्त चंबळ : तरुणकुमार भादुडी, प्रकरण १३ वरून

अमृतलाल हा शिवपुरी जिल्ह्यातील पोहरी गावच्या आदर्श विद्यालयाचा विद्यार्थी होता. सात इयत्ता शिकून त्याने शिक्षण सोडून दिले. त्यानंतर काही दिवस त्याने अध्यापनही केले; पण ते जीवन त्याला फार दिवस भावले नाही. तो लौकरच, इ० स० १९४०च्या सुमारास, चोरीच्या अपराधासाठी पकडला गेला. पोलिसच्या लॉकपमधून भिंतीला भोक पाडून स्वातंत्र्य हस्तगत केल्यानंतर पंधराएक वर्षे त्याने गुन्हेगारीचाच व्यवसाय केला. त्याला मद्यमदिराक्षीचे विलक्षण वेड होते. हा त्याचा शौक त्याने पुरा केलाच, पण पुष्कळसा पैसाही त्याने जोडला होता. त्या पैशांच्या भांडणात त्याचा मुलगा बालो हाही मातीला मिळाला हे आपण पाहिलेले आहे.

'अपहरणा'च्या तंत्राचा उपयोग अमृतलालने मोठ्या प्रमाणावर केला हे खरे. पण ते तंत्र दौलतराव शिंद्यांचा सेनानी बापू शिंदे ह्यानेही वापरले होते. अजमीरच्या तळघरात कोंडलेल्या बंदींपैकी खंडणी भरण्यास असमर्थ ठरलेली माणसे तेथेच तडफडून मेली होती. तेव्हा चंबळमधील डाकूंना अपहरण ही पिढीजात परंपरा वाटत असली पाहिजे. अपहरणात पुरुष व मुले दोन्ही सापडतात. अनेकदा डाकूंची मागणी पूर्ण करण्याचे सामर्थ्य मुलांच्या पालकांना नसते; त्यामुळे पोरांचे हाल होणे अपरिहार्य होते.

अडोखरहून पकडून नेलेल्या आपल्या नातवाची आजाने सांगितलेली अशी कहाणी उपोद्‌घातात आली आहे.

अपहृत मुलासाठी नित्य रडणाऱ्या पांडवी गावातील वृद्धाची कहाणी आजही आपले मन कातर करते. लाखनसिंगाने ही मुले पकडून नेली आणि खंडणी न मिळाल्याने त्या पोरांची प्रेते त्याने नदीमध्ये वाहवली. मुलांच्या अपहरणामुळे अर्धवट वेड लागलेल्या पित्याला ही वार्ता सांगण्याचे धैर्य कोणाला व्हावे? तो त्यांना रात्रंदिवस शोधीत फिरत राहिला, "आ जा मेरे लाल, आ जा मेरे बेटे."[१]

'कायदा व सुव्यवस्था' ह्यांना डाकूंचे बदललेले तंत्र जास्त जड जाणारे आहे. अपहरण व खंडणी ह्या मार्गामुळे त्यांच्या साथीदारांपैकी चोरमालाचे व्यापारी हा एक दुवा कमी होऊन, त्यांचे काम राजरोसपणे, डाकूंच्या भक्ष्यस्थानी पडलेल्यांकडूनच करवून घेतले जाईल असा संभव दिसतो. अशा परिस्थितीत डाकूसमस्या किमान अवधीत सोडवणे हाच मार्ग शासनसंस्थेला उपलब्ध आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. .......... विभाग ..........
क्रमांक .......... नों. दि. ..........

१. अभिशप्त चंबळ : तरुणकुमार भादुडी; पान १३३

# पुनः परिभ्रमण

मी प्रथम दस्युभूमीत गेले तेव्हा मला दस्युसमस्येची असलेली माहिती फार त्रोटक होती. दोन वर्षांच्या वाचन-विचार-मननानंतर तेथील समाजाचे एक आगळे चित्र माझ्या नजरेसमोर साकारू लागले; परंतु कल्पनाचित्रे नेहमीच अपुरी असतात, कारण त्यांना लांबी-रुंदीची दोनच परिमाणे आपण वापरतो. खोलीचे तिसरे परिमाण अनुभवातून निर्माण करावे लागते आणि त्याच हेतूने मी सप्टेंबर १९६३ मध्ये चंबळ-घाटीमध्ये पुन्हा परिभ्रमण करण्याचे ठरवले.

पावसाळ्याचे दिवस, प्रदेशात सर्वत्र चिखल माजलेला, त्यामुळे मी मागच्या-प्रमाणे खेड्यांचा प्रवास करू शकले नाही. तथापि ह्या पुस्तकातील निष्कर्षांशी विशेष तऱ्हेने निगडित असलेल्या व्यक्तींना एकवेळ भेटण्याची इच्छा होती ती मात्र ह्या परिभ्रमंतीत पूर्ण झाली.

मागच्या भ्रमणामध्ये चंबळखोऱ्याचे शब्दचित्र रेखाटलेले आहे. ह्यावेळी मला भेटलेल्या बहुतेक व्यक्ती वाचकाच्या डोळ्यासमोर आहेत. तेव्हा त्यांचे शब्दचित्रांकन करण्याचे प्रयोजन तर मला वाटत नाहीच, पण मोकळ्या मनाने केलेल्या चर्चांचा सर्व भाग प्रसिद्ध करून त्या व्यक्तींना अन्याय करणेही मला योग्य वाटत नाही. त्यामुळे हे पुनः परिभ्रमण विविध निष्कर्षांना अनुसरून वा उरलेले धागे त्रोळवण्यासाठी लिहिलेले आहे.

## [अ] चंबळघाटीची सामाजिक परिस्थिती

चंबळघाटीतील सामाजिक परिस्थितीबद्दल पुढील आकडे बोलके आहेत. ते १९६२ सालची स्थिती दाखवतात.

अ. जिल्हा : भिंड.
क्षेत्रफळ : १७१८ चौरस मैल.
लोकसंख्या : ६,४१,२२६; दाटी (density): ३७३ माणसे चौरस मैलास.
खेड्यांची संख्या : ९५२

| | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| ग्रामीण लोकसंख्या | ३,२०,१५० | २,७३,४२२ |
| शहराची लोकसंख्या | २६,६१६ | २१,०२८ |
| एकंदर | ३,४६,७६६ | २,९४,४५० |

हरिजन : १,१३,९९२ (२२ टक्के)
चांभार, भंगी, कोरी (विणकर) धोबी : स्वतंत्र आकडे मिळाले नाहीत.
गिरिजन (Scheduled Tribes) : ३८५ (७ टक्के)
सवर्ण : ब्राह्मण, रजपूत, बनिया : ३० टक्के असावेत.

| ब. शिक्षणसंस्था | मुलांच्या | मुलींच्या |
|---|---|---|
| १. प्राथमिक शाळा | ६०२ | ७८ |
| २. माध्यमिक शाळा (मिड्ल) | ७५ | ६ |
| ३. उच्च माध्यमिक (हायर सेकंडरी) | ८ | २ |

४. महाविद्यालये : २ (भिण्ड व अडोखर)
५. वेसिक ट्रेनिंग इन्स्टिट्यूट : ३ (स्त्रियांनाही प्रवेश.)
६. सर्टिफिकेट ट्रेनिंग कॉलेज : १

क. वैद्यकीय सोय :
दवाखाने : १. सिव्हिल हॉस्पिटल १ : खाटांची संख्या ४०
२. ग्रेडेड डिस्पेन्सरीज ४[१]
३. अनग्रेडेड डिस्पेन्सरीज १
४. आयुर्वेदिक डिस्पेन्सरीज २८
५. टी० वी० क्लिनिक १
६. लेप्रसी क्लिनिक व डिस्पेन्सरी १
७. प्रायमरी हेल्थ सेंटर ४
मॅटर्निटी व चाईल्ड वेलफेअर सेंटर ९
कुटुंबनियोजन केंद्र १
ग्रामीण कुटुंब नियोजन क्लिनिक ७

[३१-३-६२ पर्यंतची वरील माहिती सिव्हिल सर्जन, भिंड ह्यांच्याकडून तपासून घेतलेली आहे]

१ ह्यात काही खाटा असून त्यांची संख्या ३६ आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय ...
... शाखा.

ड. रेल्वेमार्ग लांबी : ५२ मैल; नॅरो गेज (भिंड ते ग्वाल्हेर)
रस्तेलांबी : ३०० मैल; नद्यांवर सर्वत्र पूल नाहीत, त्यामुळे पाऊस पडताच वाहतूक अडते.
पोस्टऑफिसे : ८७
तारऑफिसे : ५
टेलिफोनऑफिस : १ (भिंडला)

इ. बाजारपेठ : भिंडची मध्यम प्रतीची
निर्यात : जवस, सरसू, डाळी.

फ. उद्योग : १. डाळ, तेल, कणीक, ह्यांच्या गिरण्या.
२. सोप फॅक्टरी (ती नुकतीच बंद पडल्याचे समजले.)

वरील माहिती असिस्टंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मोरेना ह्यांच्याकडून घेतलेली आहे.

१९५५–१९६० ह्या सहा वर्षांचे पोलिसांकडून मिळवलेले गुन्हेगारीचे आकडे.

| | १९५५ | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० |
|---|---|---|---|---|---|---|
| १. डाके | ३४ | १६१ | १०७ | ४८ | ३२ | ६१ |
| २. दरवडे | ९ | २० | २१ | ४५ | ५९ | ५३ |
| ३. खून | ४५ | ५३ | ६७ | ५४ | ५१ | ४६ |
| ४. दंगा (Riot) | २ | १९ | १९ | २१ | २७ | ३९ |
| ५. घरफोडी | २७५ | २५७ | १७० | २५४ | ३२७ | ३२९ |
| ६. जनावरांची चोरी | २९ | ५६ | ४७ | ८५ | १४२ | १८० |
| ७. अपहरण (kidnapping) | ६ | ९ | ३२ | २१ | ३७ | ४४ |
| ८. इतर चोऱ्या | १२३ | १२० | २१० | ३६६ | ३५८ | ३६७ |
| ९. बारीकसारीक | २२५ | २६३ | २५४ | ३०१ | ३७२ | ४४९ |
| एकंदर | ७४८ | ९५८ | ९३३ | ११९५ | १४०५ | १५६८ |

[भिंड जिल्ह्याबद्दलचे आकडे चंबळ-घाटी-शांती-समितीचे सेक्रेटरी श्री० हेमदेव ह्यांच्याकडून मिळाले. त्यांची मी त्याबद्दल ऋणी आहे.]

येथे गुन्हेगारी वाढत्या प्रमाणावर असून बंदुकीच्या परवान्यांची वाढती संख्या त्यांना आळा घालू शकलेली नाही. खालील माहिती भिंडच्या जिल्हाधिकाऱ्याकडून घेतल्याचे श्री० लल्लूसिंग म्हणाले :

बंदुकींच्या परवान्याचे लोकसंख्येशी प्रमाण :

१९६० : ३५४ माणसांमागे १ परवाना

१९६३ : २९ माणसांमागे १ परवाना

हे परवाने घेणारे मुख्यतः सवर्ण व कांही अहीर (गवळी), गडरिया (धनगर) असून त्यात चांभार फार थोडे आहेत.

## [ब] दस्युभूमीत अत्यंज

चांभाराकडून गोळा करण्यात येणाऱ्या चंद्याबद्दल आचार्य विनोबा भावे ह्यांनी कोठे शब्दही उच्चारलेला नाही; त्याअर्थी ह्या जुलमाचा त्यांना संशयही आला नसावा हे उघड आहे आणि त्याप्रमाणे मी मागच्या एका प्रकरणात म्हटलेही आहे. तथापि हा चंदा म्हणजे काय प्रकार आहे आणि तो कसा व का वसूल करण्यात येतो हे समजल्यावाचून मला समाधान वाटेना.

माझ्या पुनर्भ्रमणाचा एक महत्त्वाचा उद्देश ह्या समस्येचे स्वरूप समजावून घेणे हा होता आणि त्यासाठी मी सुरुवातीला प्रत्येक व्यक्तीला प्रश्न विचारीत होते. ह्या पैलूवर प्रथम प्रकाश पाडला—त्यांना सोईसाठी आपण श्री० बाबूलाल म्हणू—बाबूलाल यांनी. बाबूलालजी पन्नाशीच्या पुढे गेलेले, अजून कंबरेशी बारीकपणा राखून असलेले गृहस्थ आहेत. डाकूक्षेत्राचा त्यांना अडीच वर्षांचा परिचय आहे. त्या अवधीत पोलिस-सबइन्स्पेक्टर ह्या नात्याने त्यांनी काही सामन्यांमध्ये भागही घेतलेला आहे. ते मला म्हणाले, "चांभाराकडून चंदा वसूल केला जातो, कारण दस्युभूमीमधील ही जमात त्यातल्या त्यात सधन आहे. एकतर चांभार हा ठाकुरांपेक्षा जास्त उद्योगी व म्हणून जास्त चांगला शेतकरी आहे. तो शेतात काबाडकष्ट करतोच, पण त्याच्या बरोबरीने त्याचा सारा परिवारही—स्त्रिया व मुले—शेतात राबतो. त्यामुळे त्याची पिके जास्त चांगली येतात. ह्याशिवाय शेतीची खेड्यातील काही परंपरागत कामे त्याच्याकडे सोपविलेली असतात आणि त्यासाठी त्याला धान्यात मोबदला मिळतो. उदाहरणार्थ, खळे सारवण्याचे काम तो सर्व गावासाठी करतो व आपले बलुते वसूल करतो. त्यामुळेही त्याची प्राप्ती वाढते."

श्री० बाबूलालजींनी सांगितलेले तिसरे कारण मला अशक्य न वाटले तरी त्याबाबत अवश्य ती चौकशी मात्र मी करू शकले नाही. त्यांच्या सांगण्याप्रमाणे, "दस्युभूमीत स्त्रिया अल्पसंख्यांक आहेत. चांभार स्त्रिया अनेक ठिकाणी ठाकुरांच्या रक्षा असतात, त्यामुळे चांभारजमातीला बरीच प्राप्ती होते." स्त्रिया अल्पसंख्यांक



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.

असल्याचे भिंडबद्दल घेतलेल्या आकड्यावरून स्पष्ट दिसते. भारतात जेथे जेथे लैंगिक विषमता निर्माण होते, तेथे खालच्या वर्गाच्या स्त्रिया वरच्या वर्गातील पुरुषांची ही विशेष आवश्यकता भागवताना आढळून येतात. श्री० बाबूलालजींच्या विधानाला चरणसिंगजींनीही अभावितपणे दुजोरा दिला. ते मला म्हणाले की, "यहां स्त्रियोंकी कमी होनेके कारण एक नया धंधा चल पडा है, स्त्रियों को लाकर बिक्री करने का." त्यांनी दिलेल्या उदाहरणातील स्त्री चांभारच होती.

चंद्याबद्दल चरणसिंगजींनी मला अधिक माहिती पुरवली. चरणसिंगजींबद्दल दस्युभूमीचे दर्शन ह्या प्रकरणात माहिती आलेली आहे. ह्या वेळी पूर्वीचे हसरे, धैर्यशाली चरणसिंग माझ्या प्रत्ययला आले नाहीत. एक तऱ्हेच्या निराशावादाने झाकळलेल्या चरणसिंगांचा कडूपणा माझ्या मनाला चटका देऊन गेला.

चरणसिंग म्हणाले की इ० स० १९५०-५१मध्ये जमीनदारी नष्ट होण्यापूर्वी सारी जमीन जमीनदारांचीच असे. हे जमीनदार बहुशः ठाकूर, ब्राह्मण, कायस्थ असे सवर्ण लोक असत. ह्या जमीनदारांचे तीन वर्ग कल्पिता येतात. त्यापैकी श्रीमंत म्हणजे पुष्कळ जमीन असणारे लोक शेती लावून काढीत. अगदी कमी शेतीवाले शेती घरी करीत आणि मधला वर्ग काही शेती हाताने करी आणि त्या उत्पन्नाला लावून काढलेल्या शेतीच्या उत्पन्नाची जोड देई. ह्यांची कुळे बहुशः चांभार असत.

जमीनदारी नष्ट झाली; त्यामुळे श्रीमंत जमीनदार भूमिहीन झाला, परंतु त्याची त्याला फारशी आच लागली नाही. त्याला जमीनदारीबद्दल मिळालेली भरपाई भरपूर होती. त्याची मुले शिकलेली व सरकारी नोकऱ्यातून होती व अजूनही ती सरकारी नोकरीत जात आहेत. मध्यम वर्गाच्या शेतकऱ्याचे मात्र विलक्षण नुकसान झाले. तो घरी थोडी शेती करीत असे, त्यामुळे त्याची बहुतेक जमीन कुळांच्या मालकीची होऊन ते भूस्वामी बनले. ही कुळे शेतात भरपूर परिश्रम करून आपल्या पूर्वापारच्या मालकांपेक्षा जास्त पीक काढतात. मध्यम वर्गाच्या जमीनदाराला त्याचा संताप येणे स्वाभाविक आहे.

ह्या सुमारालाच चांभारांनी वेठ व बिगार देणे बंद केले; कारण त्यांच्यावर आता कायद्याने तशी सक्ती उरलेली नाही. चांभारांनी मेलेली गुरे उचलणेही सोडले. ह्या सर्व गोष्टींनी ठाकूर-ब्राह्मणाच्या संतापात जास्तच भर पडली.

जाती-जमातीतील वैमनस्ये अशा तऱ्हेने उकलून सांगून चरणसिंगजी म्हणाले, "चांभारांकडून चंदा वसूल केला जातो पण तो ते चांभार आहेत म्हणून नव्हे, तर सधन आहेत म्हणून केला जातो."

चंदा गोळा करण्याच्या पद्धतीबद्दल ते म्हणाले, "डाकू चंदा मागायला कधीच जात नाहीत. प्रत्येक भागात त्यांचे अडते असतात. त्या अडत्याला टोळीचा नेता बोलावून सांगतो, 'मला अमुक दिवसांच्या आत अमुक हजार रुपये तुझ्या खेड्यातून गोळा करून पाहिजेत.' तो अडत्या मग घरवारी पट्टी आकारतो. ही पट्टी गावातील सर्वच घरांवर बसते, मात्र सधन घरावर ती अधिक बसते. मुदत भरण्यापूर्वी प्रत्येक घर

आपली पट्टी पूर्ण करते; मग धान्य, जमीन, जनावरे विकावी लागोत, वा गहाण टाकावी लागोत, की त्यांना इतरत्र दरवडा घालावा लागो. पैसा गोळा करता न आल्यास प्राणास मुकावे वा गाव सोडून जावे हेच पर्याय असतात. दोन्हीपैकी कुठलाही पर्याय एखाद्याने अवलंबिला तरी गावकरी खुश होतात. कारण एखादा माणूस मेला काय किंवा परागंदा झाला काय, त्याची उघडी पडलेली जमीन कोणीतरी दंडेलीने दाबू शकतो." स्लीमनने वर्णन केलेल्या भूमियावट ह्या 'खेळा'चे स्मरण येथे होणे अपरिहार्य आहे.

चरणसिंगजींनी न सांगितलेल्या कित्येक गोष्टी आपल्याला येथे कल्पनेने जाणता येतात. अडते सारे ठाकूर, त्यामुळे त्यांची सहानुभूती ठाकुरांकडे व म्हणून ठाकुरांच्या घरावर बसणाऱ्या चंद्याचा बोजा हलका असतो. त्याच कारणाने सधन चांभार जमातीला हा बोजा मोठ्या प्रमाणात उचलावा लागतो. पोलिसांची मदत घेण्यापेक्षा चंदा देऊन मान मोकळी करणे हे गावकऱ्यांना सोपे वाटते. त्यामुळे पोलिसांजवळ 'चंद्या'बद्दल कुठलेही रेकॉर्ड असत नाही. त्याचप्रमाणे "डाकूंना चार हजार पाहिजे असले तर अनेकदा आठ हजार गोळा करून अडत्या चार हजार आपल्या खिशात घालतो" हे चरणसिंगजींचे म्हणणेही आपल्याला तेव्हाच पटते.

माझे एक वकील मित्र मला म्हणाले की, "चांभाराकडून चंदा गोळा केला जातो, पण त्यापेक्षाही चांभारांच्या हत्या सर्वात अधिक होतात. कारण चांभाराने वेठबिगार नाकारल्याने आणि मेलेली जनावरे ओढून नेण्याचे वर्ज्य केल्यामुळे सर्व हिंदूंना फार अपमानित वाटत आहे." चांभारांच्या हत्यांचे तुलनात्मक आकडे मला गोळा करता आले नाहीत. मेवाराम रामनाथ ह्या टोळीबद्दल आलेल्या माहितीत वरील विधानाला पुष्टी मिळालेली आहे. जेथे घाम गाळून उत्पादन केलेल्या संपत्तीचा उपभोग नागरिक निश्चिंतपणे घेऊ शकत नाही, तेथे शासनसंस्थेची झालेली हार सहज दिसावी इतकी स्पष्ट व लांछनास्पद आहे.

## [क] दस्यूंसह एक दिवस

आपण पिंजऱ्यात वाघ नेहमीच पाहतो. पण जंगलात वाघ असल्याची अफवा ऐकली तरी आपल्या छातीत धडकी भरते. तो वाघ नरभक्षक असला तर आपली विलक्षणच तारांबळ होते.

जे वाघाला, तेच डाकूंनाही लागू आहे. मेलेले, कैद केलेले—आचार्यांना समर्पित झालेले—दस्यू पाहण्यासाठी लोकांची जी रीघ लागली, ती मेलेल्या वाघाला पाहावयास येणाऱ्यांच्या गर्दीसारखीच होती.

वाघाच्या नैसर्गिक जीवनाची कहाणी शोधून काढण्याचे कष्ट अनेक निसर्गप्रेमी लोक करीत आलेले आहेत. डाकूंचे नित्य जीवन अशा तऱ्हेने निरीक्षिण्याची संधी माणसाला मिळणे अशक्य आहे हे उघड आहे.

संपूर्णतः नैसर्गिक नव्हे, पण जवळपास त्याचसारखी, स्वतंत्र डाकू-जीवन न्याहाळण्याची संधी आचार्य विनोबा भावे ह्यांचे निकटवर्ती आणि पंचविशीच्या आतले तरुण श्री० गौतम ह्यांना मिळाली. गौतम उत्तम फोटोग्राफर आहेत, लहानपणापासून आचार्यांच्या जवळ राहिलेले आहेत. स्वर्गवासी श्री० जमनालाल बजाजांचे ते नातू आहेत व त्यांची आचार्यांवर श्रद्धा आहे. ह्या अनेक कारणांमुळे लोकमनच्या[1] टोळीकडे जाताना मेजर यदुनाथसिंह ह्यांनी गौतमची सहकारी म्हणून निवड केली असावी.

गौतम आता तो इतिहास बहुतांशी विसरलेले आहेत, पण त्यांनी सांगितलेला काही भाग पुढे उद्धृत केलेला आहे :

आम्ही जीपमधून रात्री तेथे पोचलो. गाव दुर्गम ओहोळांच्या पोटात वसलेले होते. आमच्या जीपला लागलीच ललकारी देण्यात आली. नंतर एक माणूस कंदील घेऊन पुढे आला. त्याने कंदील आमच्या तोंडापाशी धरून आमचे चेहरे नीट न्याहाळले. आमचा परिचय पटल्यानंतर आम्हाला मान्यता देण्यात आली.

गावाच्या बाहेर वडाचा प्रचंड वृक्ष होता. त्याच्याखाली खाटा टाकण्यात आल्या. नंतर हातपाय धुण्यासाठी पाणी व जेवण आले. जेवणात चपात्या, वरण व भाजी होती. प्रत्येक पदार्थात भरपूर साजूक तूप ओतलेले होते.

मी त्या वडाखालीच खाटेवर झोपलो. गावामध्ये टेहळणी करणारे लोक हातात बंदुका घेऊन गावाकडे येणाऱ्या मार्गावर नजर राखून होते. झोपताना अर्ध्या शेराचा मोठा बंपर भरून ताजे गरम दूध मला देण्यात आले. त्यानंतर जनरलसाहेब डाकूंशी चर्चा करण्यात गुंतले आणि ह्या दुर्गम स्थानी येताना झालेल्या शिणामुळे मला झोप लागली.

मला तेथे ठेवून जनरलसाहेब सकाळी परत बाबांच्या कँपमध्ये गेले होते. मी उठल्यावर नदीकिनारी प्रातर्विधी उरकून दातवण केले आणि नदीवर आंघोळही करून घेतली.

आता बागींना माझा विश्वास वाटत असल्यामुळे वातावरण खेळीमेळीचे होते. मला स्नानानंतर मोठा बंपर भरून दूध पुन्हा देण्यात आले. इतके दूध पिणे मला जमेना, तेव्हा ते लोक म्हणाले, "वा. तुम्ही आमचे पाहुणे. तुमचे आदरातिथ्य करणे हा आमचा धर्म आहे."

ह्या वेळीही त्या मंडळींच्या खांद्यावर बंदुकी होत्या व गळ्यात काडतुसांचे पट्टे होते. मी विचारता ते म्हणाले,

---

१. आचार्य विनोबा भाव्यांना आत्मसमर्पण करणाऱ्या टोळीचा प्रमुख लोकमन शर्मा ऊर्फ लुक्का.

"आम्ही दिवसाचा एक क्षणही बंदुकीला विसंबत नाही. प्रातर्विधी, स्नान, जेवण, झोप—सर्व वेळेला ती आमच्या सांगाती असते."

दूरवर टेहळणी करण्यासाठी एक माणूस उंच झाडावर चढून बसलेला होता. अशी टेहळणी सर्वदा करावी लागते असे मला समजले.

दुपारच्या जेवणाला आम्ही गावात गेलो. ह्या गावात वीस-पंचवीस घरे असून ती सर्वच ठाकुरांची होती. सर्व घरी बागींना लोकांचा स्नेह लाभलेला दिसला. ते बागी गावातील घरात वाटून दिलेले होते व त्या सर्वांना लोक मोठ्या आदराने वागवताना दिसले. गावातील स्त्रियांचे वर्तन ह्या मंडळींशी मोकळेपणाचे वाटले. ते स्त्रियांना मा, बहेन, भाभी, मौसी अशा नात्यांनी आपलेपणाने संबोधीत.

त्यांचा विनोदही गोळी चालवण्याचाच दिसला. आम्ही जेवत असताना एक म्हणाला, "भाभी, देखो, रोटी ठीक सेंकना, नही तो गोलीसे उडा दूंगा." बायकांना ह्या थट्टेचे काही वाटताना दिसले नाही.

ह्या लोकांना गोरसाची आवड खूप दिसली. साजूक तूप व भरपूर दूध खावेप्यावे, नदीच्या पाण्यात मनसोक्त पोहावे, असा त्यांचा रिकामपणाचा कार्यक्रम मला दिसला.

त्यांच्यापैकी लोकमनचा व माझा निकट संबंध आला. इतरांच्या हृदयपरिवर्तनाबद्दल मी काही सांगू शकत नाही, पण लोकमनचे विचार खरोखरीच बदललेले दिसले. बाबांच्या पदयात्रेत राहून मला अनेकांच्या सहवासात रोज यावे लागते. पण लोकमनइतका चांगला माणूस मी क्वचितच पाहिला असेल.

दुपारी मेजरसाहेब सर्व टोळीला नेण्यासाठी ट्रक घेऊन आल्यावर गौतमने त्यांच्याबरोबरच त्या खेड्याचा निरोप घेतला.

## [ड] डाकूपीडित कुटुंबातील कांही मुले

घराचा पोशिंदा डाकूंच्या गोळ्यांना बळी पडल्यावर, मागे राहिलेल्या मुलांचे व स्त्रियांचे काय होते? स्त्रियांबद्दल या प्रकरणात दस्यूभूमीचे दर्शन बरीच माहिती आलेली आहे. डाकूपीडित परिवारातील काही मुलांबद्दल खाली माहिती देत आहे.

(अ) कुसुमदेवी : नागरातल्या ज्या वृद्ध मातेचे वर्णन मागे आलेले आहे ती हिची आजी. तिचा पिता मोहरसिंग 'ज्या मेल्या'ने मारला 'तो मेला' वस्तुतः पोलिसांचा माणूस नसून लाखनच्या पक्षाचा होता असे आढळून आले. लाखनच्या

मृत्यूनंतरही त्याला दोष न देता पोलिसांनाच अपराधी कसे मानण्यात येते ह्याचे हे आणखी एक उदाहरण.

ग्वाल्हेरला श्री० गोदावरी केतकर या सर्वोदय-पात्राचे कार्य करितात आणि जमणाऱ्या निधीतून गेली दोन वर्षे (१९६२ ते १९६४) प्रतिमास रुपये आठप्रमाणे डाकूपीडित सहा विद्यार्थ्यांना त्या मदत देतात. कुसुमदेवी ही एकच कन्या मदत मागण्यासाठी आलेली आहे. ती इ० स० १९६३ मध्ये दुसरीतून पास होऊन तिसरीत गेली.[1]

(ब) विश्वनाथ: इ० स० १९५४ च्या ऑगस्टमध्ये एका पोलीस व डाकू यांच्या सामन्यात (गाव विंद्वा, पोलिस ठाणे सहखो, जिल्हा आग्रा येथे,) इटावाजवळ मानसिंगाचा मुलगा तहसीलदारसिंह पोलिसच्या हाती सापडला. विंद्वा हे खेडे अहीरांचे (गवळी) आहे.[2] ह्या खेड्यात पोलिस पोस्ट तत्काळ कायम झाल्याने तेथील लोकांवर सूड घेणे मानसिंगाला शक्य झाले नाही. तेव्हा विंद्वाच्या अहीरांशी सोयरसंबंध असणारी तीन गावे मानसिंगाने निवडली. महुआ; उत्तर प्रदेश; जोरी अहीर; मध्य प्रदेश; व परसेना, मध्य प्रदेश ह्या विंद्वापासून पंधरा मैलांच्या अंतरात असणाऱ्या तीन गावात प्रत्येकी अकरा अहीर मारण्यात आले. विश्वनाथ त्यापैकी जोरी अहीर गावचा.

एका संध्याकाळी, पुरुषमंडळी बाहेर ओट्यावर बसली असताना, डाकूंनी अचानक येऊन विश्वनाथच्या दाराशी फाडफाड सहा माणसे ठार मारली आणि नंतर घराला आग लावून दिली. विश्वनाथ व त्याची धाकटी बहीण ही दोन मुले घरात होती. विश्वनाथच्या आईने धैर्याने घरात जाऊन मुले बाहेर आणली. तिला एक मूल खांद्यावरून आणताना पाहून मानसिंगाचा भाचा हुजूरी ह्याने ते मूल हिसकून घेतले व जमिनीवर टाकले. त्याच्या गळ्यावर जोड्याचा पाय देणार इतक्यात पोराच्या किंचाळ्यावरून ती मुलगी आहे असे त्याच्या ध्यानी आले. हुजूरीने पाय मागे घेतला. "लडकी को क्या मारे ?" हा तिरस्काराचा भाव !

बाईच्या पायात चांदीची जाड कडी होती. लोखंडाच्या सळईने डाकूंनी ती कडी उलवली. पायाच्या हाडांचा टेकू म्हणून उपयोग केल्याने झालेल्या जखमांचे वण आजही बाईच्या पायावर आहेत. त्यानंतर बाई मुलीला घेऊन मानसिंगाकडे गेली व म्हणाली, "दाऊ, लोक म्हणतात, दाऊच्या राज्यात बायकापोरांवर कोणी हात टाकत नाही. तुम्ही माझ्या घरातले सहा पुरुष मारले, घर जाळले, माझ्या अंगाला हात लावून पायातली कडी उचकटून घेतली. आता तुम्हीच न्याय करा."

---

१. सर्वोदय पात्र का कार्य, पुस्तिका, लश्कर, ग्वालियर, १९६०–६२ : संग्राहिका गोदावरी केतकर.

२. रिपोर्ट फॉर द प्रोजेक्ट फॉर द स्टडी ऑफ डेकॉइटस् इन द चंबल व्हॅली: राजिंदर गर्ग

कपाळाला हात लावून मानसिंग म्हणाला, "मी काहीच केले नाही. ज्याच्या त्याच्या नशिबाच्या गोष्टी. मी करणारा कोण?"[१]

ह्या तीन खेड्यांपैकी एका खेड्यात एक अकरा-बारा वर्षांचा मुलगा गोळ्यांचे आवाज ऐकून पळाला व एका ठाकुराच्या दाराशी लपला. डाकू त्याच्या मागेच होते. पोरगा म्हणाला, "मला मारू नका. मी अहीर नाही, ठाकूर आहे." पण इतर ठाकुरांनी डाकूंना खरे सांगितल्यामुळे त्या पोराला गोळी घालण्यात आली असे म्हणतात.[२]

विश्वनाथच्या घरी आज त्याचा लंगडा वडील भाऊ, त्याची आई व धाकटी बहीण एवढेचजण आहेत. कर्ता पुरुष नसल्याने घरची चार एकर जमीन कसणारा कोणी नाही. विश्वनाथ सध्या चंबळघाटी शांतिसमितीने यंदाच काढलेल्या छात्रावासात राहत असून तो चौथ्या वर्गात शिकत आहे. गतवर्षी त्याला रु० १६·५० ची शिष्यवृत्ती मिळत असे.[३]

(क) फूलसिंग : ह्याचा पिता, कंचना चमार, अंबाह तहसिलीत लभेडपुरा गावचा राहणारा. ह्या गावात पाना डाकूच्या टोळीची काही माणसे पकडली गेली, म्हणून पानाने सर्व गाव उध्वस्त केला. तेव्हा चांभार तेथून जवळच कुकथरी गावात जाऊन वसले. काही लोकांनी पानाला सांगितले की, 'कंचना चांभारानेच तुझी माणसे पकडून देववली'; त्यामुळे कंचना इ० स० १९६१ मध्ये पानाच्या टोळीची शिकार झाला. त्याची आई म्होतूर करून निघून गेली. आता फूलसिंह आपल्या काकाकडे अंबाहला राहतो. त्याचे वय सहासात वर्षांचे आहे, व तो पहिली पास होऊन दुसरीत गेला आहे. त्याला आठ रुपयांची शिष्यवृत्ती मिळत आहे.[४]

(ड) श्री० रूपसिंग : हा परसोना गावचा राहणारा. मानसिंगच्या टोळीने जी अकरा माणसे मारली त्यात ह्याच्या बापाचाही नंबर लागला. ह्याच्या कुटुंबात आज एकेचाळीस वर्षांची आई, बारा वर्षांचा भाऊ आणि सहा वर्षांची धाकटी बहीण एवढे लोक आहेत. ह्याचे वय अकरा वर्षांचे असून हा पांचवीत शिकत आहे. घरी बारा बिघे जमीन आहे, पण ती कसावयास कर्ता पुरुष उरलेला नाही. रुपसिंग सध्या भिंडला, शांतीसमितीने सुरू केलेल्या छात्रावासात राहतो. गतवर्षी त्याला रु० १६·५० ची शिष्यवृत्ती मिळत असे.[५] वरील चार मुलांशिवाय इतर शेकडो मुले असहाय जीवन व्यतीत करीत असतील, हे उघड आहे.

---

१. विश्वनाथची आई—चरणसिंगजींच्या निवेदनाप्रमाणे
२. चरणसिंगजी
३. छात्रावास में रहकर शिक्षा प्राप्त करनेवाले बालकों की संक्षिप्त जानकारी : बच्चा नं० ५
४. सर्वोदय पात्र का कार्य; पान ४
५. छात्रावास में रहकर शिक्षा प्राप्त करनेवाले बालकों की संक्षिप्त जानकारी : बच्चा नं० ४

## [ई] दस्यू व बेहड

डकैतीची व बेहडांच्या आश्रयाची जनमताने निरगाठ घातलेली आहे ह्याचा प्रत्यय मला पदोपदी आलेला आहे. इ० स० १९६३ च्या मार्च–एप्रिलमध्ये तृतीय पंचवार्षिक योजनेसाठी 'ओहोळ–पुनरर्जन' योजना स्वीकृत होताच, भारतीय वृत्तपत्रांमधून खबरा आल्या, "दस्युवृत्ती के निवृत्ती के लिये बेहड समतल करने की योजना". मागे एका प्रकरणात 'दस्युवृत्तीला ओहोळांचे प्रश्नच कारण असू का शकत नाहीत' ह्याचे विवेचन आले आहे. तरीदेखील सरकारने स्वीकारलेली योजना समजावून घेऊन, तिचा दस्युवृत्तीवर परिणाम होणार अशी लोकांची भावना का झाली आहे, ह्याचे विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. ती योजना थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

मध्यप्रदेश सरकारच्या प्रेरणेने, 'भारतीय पाणी व वीज कमिशन'ने ह्या प्रश्नासाठी इ० स० १९५६ मध्ये एक कमिटी नेमलेली होती. मध्यप्रदेश सरकारने स्वीकृत केलेली योजना वरील कमिटीच्या शिफारशींवर आधारलेली आहे.

आपल्यापुढील प्रश्नाची परिस्फुटता करिताना कमिटीने "ओहोळांचा प्रश्न म्हणजे शतकानुशतके होत आलेली जमिनीची धूप हा आहे" असे म्हटले आहे. ह्या प्रश्नाची गंभीरता विशद करिताना कमिटीने ओहोळांच्या काठांचा खडा उतार, त्याची पंचवीस फूट ते शंभर फूटपर्यंतची खोली व त्यांच्या उगमापाशी असलेल्या शेतांमधील सुपीक माती वाहून जाऊन होणारे नुकसान ह्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत.

कमिटीने मध्यप्रदेशच्या ग्वाल्हेर, भिंड व मोरेना ह्या तीन जिल्ह्यांचा विचार करून, ह्या जिल्ह्यांच्या एकंदर जमिनीचा १२ टक्के व वहीत शेतजमिनीचा २९ टक्के इतका भाग ओहोळाखाली आहे, असे म्हटले आहे. दरवर्षी ओहोळाचे क्षेत्र वाढत जाते, कारण ओहोळ उगमाच्या पाठीमागे चरत जातात. कमिटीने दिलेल्या ह्या आकड्याप्रमाणे इ० स० १९४३ ते ५१ ह्या आठ वर्षांत ओहोळात गेलेली शेतजमीन ६,०४,०२५ एकरांवरून ६,१९,१४८ एकरांपर्यंत वाढली. ओहोळ जुने होऊन खूप रुंदावले म्हणजे गावे व शेते ओहोळांच्या रुंद पात्रात पुनश्च वसतात. उदाहरणार्थ, खडीत ही पुन्हा वहितीत आलेली जमीन जमेला धरूनही वाया गेलेल्या[1] जमिनीचे क्षेत्र पंधरा हजार एकरांनी किंवा २½ टक्क्यांनी वाढलेले वरील आकड्यावरून दिसून येते आणि ह्यावरून ह्या प्रश्नाचे गांभीर्य व निकड नीट लक्षात येते.

ही धूप थांबविण्याचे उपाय सुचविण्यापूर्वी, कमिटीने इ० स० १९५४ मध्ये छोंडा व बागचीनी ह्या गावी मध्यप्रदेश सरकारने केलेले प्रायोगिक प्रकल्प, माधवराव शिंद्यांच्या वेळेचा पिंपरगावचा प्रयोग, त्याचप्रमाणे भिंड जिल्ह्यात केलेली जंगलांची

लागवड नजरेखाली घातली होती. बागचीनी व छोंडा येथे ओहोळांच्या उगमाच्या जवळच्या अजून न वाहिलेल्या जमिनीचे संरक्षण व उथळ ओहोळांच्या जमिनीचे पुनरर्जन असा दुहेरी कार्यक्रम हाती घेतलेला होता, तर पिंपरगावला पुनरर्जनाचा प्रयोग करण्यात आला होता. त्याचे आकडे खालीलप्रमाणे होते.

| गावाचे नाव | संरक्षण एकर | पुनरर्जन एकर |
|---|---|---|
| बागचीनी | ८१० | ५९० |
| छोंडा | ३७२ | ७० |
| पिंपरगाव | — | ६० |

सव्वीस वर्षांपूर्वी झालेल्या पिंपरगावच्या प्रयोगात एका ओहोळाच्या पात्रात एंशी फूट लांबीची दगडविटांची तीन फूट रुंदीची भिंत बांधण्यात आली होती. वीस वर्षांच्या अवधीत ह्या भिंतीमागचा वीस फुटांचा खड्डा गाळाने भरून येऊन साठ एकर जमीन हाती आल्याचे कमिशनला दिसून आले. आज ती जमीन प्रतिवर्षं दोन पिके देत असते. छोंडा व बागचीनीचे प्रयोग त्याच मार्गाने चालू असून बागचीनीला दोनशे एकर जमीन इ० स० १९५६ पर्यंत पुन्हा परत मिळालेली आहे.

ह्या प्रयोगांचा अभ्यास करून कमिटीने तीन क्षेत्रे कल्पिली :

१. ओहोळांना लागून असलेली पठारे

२. सखल, पंधरा ते वीस फूट खोलीचे, ओहोळ

३. खोल, विस्तृत, विशेषतः चंबळच्या किनाऱ्याचे ओहोळ.

ह्या तीन प्रकारच्या जमिनींसाठी कमिटीने तीन वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना सुचवलेल्या आहेत :

१. अजून न धुपलेली पण ओहोळांच्या जवळ सरकलेली जमीन—तिला समान उंचीवरचे बांध घालून, त्या बांधापासून ओहोळांकडे जाणाऱ्या उताराचा खडेपणा भर घालून कमी करावा. ह्या बांधाला आधार म्हणून, वरील उतारावर झाडेझुडपे, विशिष्ट प्रकारची गवते इत्यादी वनस्पती लावाव्यात आणि वरच्या जमिनीत शेतीचे सुधारलेले तंत्र वापरावे, अशी कमिटीची शिफारस आहे.

असे संरक्षण किती एकर जमिनीला द्यावे लागेल ह्याबद्दल पाहणी झालेली नसल्याने कमिटीला आकडे उपलब्ध नव्हते; त्यामुळे तिला अंदाजाने काम करावे लागले. तिच्या मते वरील जिल्ह्यातून वाहणाऱ्या चंबळ व तिच्या उपशाखा सांख, अशारी, कुयरी वगैरे नद्यांचा मिळून सुमारे पंधराशे मैलांचा किनारा असावा. किनाऱ्यापासून आत सरासरी दोन मैलांपर्यंत संरक्षण द्यावे लागेल. म्हणजे एकोणीस लाख एकर जमिनीला बांधबंदिस्ती (contour bunding) घालाव्या लागतील, असा अंदाज कमिटीने नमूद केला आहे.

ओहोळांखाली असणाऱ्या सहा लाख एकर जमिनीपैकी तीन लाख एकर जमीन शेतीसाठी पुनरर्जित करता येईल असे मत कमिटीने व्यक्त केले आहे. त्यासाठी कमिटीच्या शिफारशीप्रमाणे ओहोळांचे त्यांच्या पाणलोटा(Catchment area)-प्रमाणे वर्गीकरण करून प्रत्येक क्षेत्र वेगळे हाताळावे लागेल. सखल ओहोळांना उगमाकडून सोईस्कर जागी दडे दिल्यास त्या दड्यांच्या मागे गाळ साचेल व पुढील काही वर्षांत तेथील मळीची सुपीक जमीन पिके देऊ लागेल. हे दडे मातीचे किंवा बांधकामाचेही देता येतील. विशिष्ट पाणउतारावरचे सर्व दडे संपूर्ण तयार झाल्यावर त्या भूभागात पर्वताच्या कुशीत खोदलेल्या शेतांप्रमाणे पायऱ्या-पायऱ्यांनी नवी शेते उपलब्ध होतील हे उघड आहे.

तिसऱ्या प्रकारच्या जमिनीत वनचराईला गुरे बंद करून जंगलांची लागवड करण्याची सूचना ह्या कमेटीने केलेली आहे. वरील उपाययोजना तात्काळ हाती घेण्यासाठी अजून दीर्घमुदतीच्या योजनेत क्षेत्राची पाहाणी, बांधबंदिस्ती दाखवणारे नकाशे (contour map) वगैरे गोष्टींचे उल्लेख असून, नद्यांचे पूर जेथवर पोचतात ते क्षेत्र योजनेत दाखल न करण्याबद्दल सांगितलेले आहे.

ओहोळ-पुनरर्जन-कमिटीच्या शिफारशीचा विचार करून मध्यप्रदेश सरकारने पुढील पाच वर्षांसाठी मान्य केलेली योजना सव्वापाच कोटी रुपयांची असून, योजनेच्या अंती सव्वालाख एकर जमीन पुनरर्जित होईल असा मध्यप्रदेशच्या शेतीखात्याचा अंदाज आहे.

कोणत्याही देशाला, प्रचंड प्रमाणावर आपल्या जमिनीची धूप झालेली परवडत नाही. जमिनीची उणीव भासू लागल्याने वेळोवेळी भूमिसंपादनाचे प्रकल्प अनेक देशातून लहानमोठ्या प्रमाणात चालू होत असतात. हॉलंडने प्रचंड बंधारे बांधून समुद्रापासून मिळवलेल्या जमिनीची कथा भूगोलाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला माहीत असते. मुंबई बेटात समुद्र मागे हटवून आपणही जागा मिळवलेली आहे. केरळात अशा जागेवर समुद्र पुनराक्रमण करीत असल्याने होत असलेल्या अनवस्थेचे वर्णन गेल्या काही महिन्यात वृत्तपत्रे देत आली आहेत. अशा परिस्थितीत शेतकीप्रधान चंबळघाटीलाही तेथील धूप थांबवणे हे अगत्याचे व तातडीचे काम वाटणे स्वाभाविकच आहे. शिवाय चंबळप्रकल्पात कोटा बराजपासून निघणारे कालवे ह्या प्रदेशातून जाणार आहेत. येथील सुपीक माती वाहून जाऊ देत राहिल्यास कालव्याचे पाणी व त्या प्रमाणात प्रकल्पावर केलेला खर्च ही दोन्ही व्यर्थ जातील. ह्या सर्व गोष्टींमुळे जमिनीचे संरक्षण, ओहोळांचे पुनरर्जन व जंगलाची लागवड ह्या तीनही बाबी विकासाच्यासाठी आवश्यक व अनमोल आहेत.

वर वर्णिलेली ओहोळ पुनरर्जन योजना व्यवहार्य नसल्यास दुसरी एखादी योजना आखावी लागेल; पण ह्या सर्व योजना दस्युसमस्यानिरपेक्ष आहेत. एवढेच नव्हे ता ह्या दोन समस्यांची पातळीदेखील संपूर्णतः निरनिराळी आहे. ओहोळ-पुनरर्जन हा

निसर्गशक्तीशी मानवाने अविरत चालवलेल्या चिरकालीन झगड्याचा अविभाज्य भाग आहे. दस्युसमस्या मात्र विशिष्ट मानवी परंपरातून निर्माण झालेली, अल्पमुदतीची, तुलनेने छोटी समस्या आहे. ती आपल्याला दुष्कर व प्रचंड वाटते, कारण आपण तिच्या फार निकट आहोत.

ओहोळ-पुनरर्जन कमिटीने आपल्या योजनेचा संबंध दस्यूशी कोठेही जोडलेला नाही. ह्या योजनेचे हिरिरीचे पुरस्कर्ते व आता विशेष अधिकारी असलेल्या श्री० कर्णीकरांना त्याबद्दल विचारले असताना ते म्हणाले, "लोकांना जमिनीची भूक आहे. ती भागताच दस्युसमस्या आपोआप थोडी मऊ पडेल." दस्युसमस्येशी तेवढ्याच धैर्याने झुंज घेणारे मध्यप्रदेशाचे इन्स्पेक्टर ऑफ पोलिस श्री० रुस्तमजी ह्यांना तोच प्रश्न विचारला असतांना ते म्हणाले, "कुठल्याही सामाजिक परिवर्तनाचा परिणाम येथील परिस्थितीवर होणे अपरिहार्य आहे." ह्या दोन्ही अधिकाऱ्यांनी दस्यूंची आसऱ्याची ठिकाणे पुनरर्जनाने नष्ट होण्याचा संभव उल्लेखिला नाही, हे ध्यानात ठेवण्याजोगे आहे. चंबळ-प्रकल्पाप्रमाणेच पुनरर्जनाची निकडीची समस्याही फार मागे (तिसरी पंचवार्षिक योजना) पडलेली आहे; ह्याचा अर्थ ह्या योजनांना योग्य तो पाठिंबा केंद्रसरकारात मिळाला नसावा. असा पाठिंबा मिळवण्याच्या प्रयत्नात ही योजना दहशत निर्माण करणाऱ्या दस्युसमस्येला जोडली गेली असेल असा संभव वाटतो. श्री० नरसिंहराव दीक्षित, मध्यभारताचे गृहमंत्री, ह्यांनी केंद्रीय सिंचाई व विद्युत् खात्याच्या मंत्र्यांना लिहून त्यांचे लक्ष बेहड क्षेत्रातील डाकूंच्या उपद्रवाकडे वेधले व आपले मत दिले की, "सुदूर भविष्यात, ओहोळ भरल्यावर, दस्यूंची लपण्याची स्थाने क्रमशः नष्ट होतील आणि डाकूंच्या टोळ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आज खर्चावे लागणारे अक्षरशः लक्षावधी रुपये वाचतील."[1]

श्री० दीक्षितांनी हा युक्तिवाद केला एवढेंच नव्हे तर केंद्रसरकारला तो मान्यही झाला असावा. ह्या रिपोर्टानंतर जवळपास सात वर्षांनी, केंद्रीय शेतकी-मंत्री डॉ० रामसुभग सिंग हे पुनरर्जनयोजलेला पाठिंबा देताना भोपाळ येथे म्हणाले की "...(ह्या योजनेने) नवीन जमीन नांगराखाली येईल, येवढेच नव्हे तर समाजविघातक तत्त्वांपासून हा प्रदेश मुक्त करण्यात तिचा खूप उपयोग होईल."[2]

खरे तर, ह्या योजनेचा दस्युसमस्येवर उपकारक परिणाम होणार नाही. कारण दस्युसमस्या ही उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व राजस्थान ह्या तीन राज्यातील अकरा जिल्ह्यांना पीडणारी व्याधी आहे. पुनरर्जनयोजना ह्या अकरा जिल्ह्यांपैकी फक्त तीन मध्यप्रदेशीय जिल्ह्यांना लागू होणारी योजना असून दस्यूंना आश्रय देणारे बेहड,

---

१. रिपोर्ट ऑन रॅव्हीन रेक्लमेशन इन् मध्य भारत, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, सेंट्रल वॉटर अँड पावर कमिशन, जुलै १९५६

२. हिंदुस्तान टाइम्स : २६-२-६३

खणून वा बुलडोझरने सारखे करण्याची कल्पनाही त्या योजनेमध्ये स्वीकृत केलेली नाही.

पुनरर्जन-योजना जोम धरीपर्यंत दस्युसमस्या नष्ट झालेली नसली, तर ही योजना अमलात आल्याने दस्यूंची आश्रयस्थाने पुष्कळच बळकट होण्याचा संभव मात्र बराच आहे.

बांधबंदिस्ती, त्यांचे क्रमशः उतरणारे उतार व त्यावर लावण्यात यावयाची झाडेझुडपे व गवत ही सर्व लपूनछपून हल्ला करावयास अत्यंत उपयुक्त असतात, हे वाघाची शिकार करणारा कोणीही शिकारी चांगले समजावून सांगेल. उथळ ओहोळांच्या पुनरर्जनात, ही शेतजमीन विविध पातळ्यांवर असल्याने, जमिनीत एकाकी काम करणाऱ्या शेतकऱ्यांचे अपहरण वा हत्या करणे सुलभ होईल हे आपल्या कल्पनाशक्तीलाही जाणवते. रुंद, विस्तृत व खोल ओहळात घनदाट जंगले लावली जातील, तेथे गुरांनाही चराईला बंदी असेल. ह्या जंगलामधून काही वर्षांनंतर सूर्यकिरणांचा प्रवेशदेखील दुर्गम होईल. गनिमी काव्याच्या युद्धात अशी जंगले आक्रमण करणे किती विकट काम असते ह्याचा अनुभव दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेश व मलाया येथे लढलेल्या आपल्या सैन्याला भरपूर आहे.

दस्युसमस्येला पुढेमागे साहाय्यक होऊ शकणारी ही योजना स्वीकारणे अनिष्ट नाही का, असा एक प्रश्न पुढे येण्याचा संभव आहे. त्याचे उत्तर येवढेच आहे की घराला घूस लागली की आपण घर पेटवून देत नाही. ओहोळांच्या पुनरर्जनाची योजना ही चारदोन तपांपेक्षा अधिक काळ घेणारी योजना असून ती क्रमशः तीनही राज्यातील, शांत व अशांत अशा सर्वच ओहोळांना लागू होणारी योजना आहे. ह्याच्या उलट डाकूसमस्या ही निकडीने सोडवण्याची समस्या आहे. 'ओहोळ समतल करून दस्युसमस्या नष्ट करण्याची' एखादी योजना कोणी काढली तरी ती योजना पूर्ण होईतो लागणारी पन्नास वर्षे आपण शेकडो जिवांच्या हत्या स्थितप्रज्ञ वृत्तीने पाहाणार आहोत का? कोणत्याही शासनसंस्थेला तिच्या सत्तेला दिलेले आव्हान इतक्या अवधीपर्यंत उपेक्षिता येत नसते. तेव्हा बेहड समतल करून दस्युसमस्या सोडवण्याचा, लोकांना भ्रमात पाडणारा प्रचार जितक्या लवकर संपेल, तितका त्याचा अंत दस्युसमस्येला व ओहोळांच्या पुनरर्जन योजनेलाही उपकारकच होईल. आणि ह्या दोन गोष्टींचा अर्थाअर्थी संबंध नाही, हे नागरिकाला लौकर उमजल्याम त्याला योग्य निर्णय घेणे सुलभ होईल.[1]

---

१. 'दस्यू व बेहड' हें प्रकरण तयार करतांना पुढील साहित्याचा उपयोग केला आहे : (अ) मध्यप्रदेश पोलिस पत्रिका (जानेवारी १९६२) मधील लेख : चंबळ डेव्हलपमेंट प्रोजेक्ट—एम्० जी० कर्णीकर, आय्० ए० एस्०, सेक्रेटरी टु गव्हर्नर, मध्यप्रदेश. (ब) रॅव्हीन रिक्लेमेशन इन मध्यप्रदेश, थर्ड फाइव्ह इयर प्लॅन—एम्० जी० कर्णीकर. (क) रिपोर्ट ऑन रॅव्हीन रिक्लेमेशन इन मध्यभारत, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, सेंट्रल वॉटर अँड पॉवर कमिशन, जुलै १९५६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
पुनः संस्करण विभाग
अ. क्र. ........ विभाग ......
क्रमांक ........ नों. दि.

## [फ] चंबळ-घाटी-शांतिसमिती

ह्या समितीची स्थापना आचार्य विनोबा भावे ह्यांनी मे १९६० मध्ये केली. तिच्या दोन शाखा आग्रा व भिंड येथे काम करीत असून भिंडमध्ये तिचे मुख्य कार्यालय आहे. समिती ही रजिस्टर्ड संस्था नसून, आज तरी तिचे कार्यकारीमंडळ सर्वसेवासंघाकडून नेमले (nominate केले) जाते.

ज्या वेळी समिती स्थापन झाली, त्या वेळी कार्यकर्त्यांच्या आकांक्षा मोठ्या व उत्साह दांडगा होता. त्या वेळी या क्षेत्रात तेरा कार्यकर्ते होते; आज १९६३ मध्ये केवळ आठ बाकी राहिलेले आहेत व त्यापैकी सहा स्थानिक आहेत.

समितीच्या कार्यात पूर्वीही 'पैरवी' (आत्मसमर्पितांचे खटले चालवणे) व 'पुनर्वास' (सुटून आलेल्यांना व त्यांच्या परिवारांना पुनर्वसनासाठी मदत देणे) ह्या बावी होत्या; पण त्यांच्या जोडीला तेव्हा असलेले पदयात्रा, जनसंपर्क, सर्वपक्षसभा, परागंदा झालेल्यांना भेटणे, समजावणे वगैरे कार्यक्रम मात्र आज संपूर्णतः मागे पडलेले दिसले.

या क्षेत्रातील परिस्थितीबद्दल काहीही आकडे कुठेच उपलब्ध नाहीत. ही माहिती गोळा करण्याचा प्रयत्न समितीने केलेला नाही. तिचे मनुष्यबळ अत्यंत अपुरे आहे, एवढेच नव्हे तर काम करीत असलेली माणसे आपल्या अज्ञानामुळे ह्या कामाला उपयोगी पडू शकत नाहीत.

'गांधीयन इन्स्टिटयूट ऑफ स्टडीज, वाराणसी' ह्या संस्थेने श्री० राजिंदरलाल गर्ग नावाचा सोशॉलॉजीचा अभ्यासक ह्या क्षेत्रात इ० स० १९६१ मध्ये दोन वर्षांसाठी पाठवला होता. श्री० गर्ग यांनी सरकारी असहकारातूनही तयार केलेला एक रिपोर्ट मला पाहावयास सापडला. दुर्दैवाने वरील कार्य त्यानंतर बंद करण्यात आलेले दिसले.

अशा तऱ्हेने समितीचे कार्य कसेबसे पुढे रेटले जात असले तरी खऱ्या व टिकाऊ कार्याचा पाया ह्यापुढे येथे घातला जाईल असे मला वाटले.

'दस्युभूमीचे दर्शन' या प्रकरणात अनेक मुलांना 'समिती-सहायता' म्हणून रु. १६·५० मिळत असल्याचे उल्लेख आलेले आहेत. श्री० ई० डब्ल्यू० आर्यनायकम् ह्यांना ह्या कार्यासाठी जर्मनीतून जी मदत पाठण्यात आली त्यातून त्यांनी तेहतीस गरजू मुलांना शिष्यवृत्त्या दिलेल्या होत्या. त्यांची वाटणी खालीलप्रमाणे झाली.

| सवर्ण | शूद्र | अतिशूद्र | एकंदर |
|---|---|---|---|
| २ | २५ | ६ | ३३ |
| | | | (पैकी २ मुली) |

ह्यापैकी परिवारांची वाटणी अशी होती :

| डाकूपीडित | गरीब | समर्पित | एकंदर |
|---|---|---|---|
| २५ | ४ | ४ | ३३ |

यंदा भिंडला छात्रावास उघडला गेल्यानंतर ह्या मुलांना तेथे बोलावण्यात येऊन समितीने त्यांची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. त्याच वेळी घरी राहणारांना छात्रवृत्ती न देण्याचा निर्णय घेण्यात आला. खेड्यात छात्रवृत्तीपायी जे गैरसमज पसरत होते, त्यांना आळा घालण्याचे कार्य अशा रीतीने आता होण्याचा संभव आहे.

ग्वाल्हेरमध्ये सर्वोदय-पात्राचे कार्य करणाऱ्या श्री० गोदावरी केतकर या पात्राच्या दानातून रु० आठ शिष्यवृत्ती गतवर्षापासून देतात त्याची वर्गवारी :

| सवर्ण | शूद्र | अतिशूद्र | एकंदर |
|---|---|---|---|
| ३ | १ | २ | ६ |
| | | | (एक मुलगी) |

समितीचे कार्यकर्ते क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करीत असल्याने डाकूपीडितांखेरीज इतर गरजूंनाही मदत देताना आढळतात; पण श्री० केतकर मात्र डाकूपीडित परिवारातील बारा वर्षांच्या आतील मुलांनाच मदत देतात. त्यांना 'चंदा' देणारांची तशी इच्छा असल्याचे त्या म्हणाल्या.

जुलै १९६३ मध्ये भिंडला छात्रावास सुरू करण्यात आला. तेथे तेहतीसपैकी फक्त तेरा विद्यार्थी आले. पुष्कळशी आठदहा वर्षांची मुले 'दूर पाठवायला फार लहान आहेत' असे घरच्या स्त्रियांना वाटते. एक वृद्ध आंधळी आजी म्हणाली,

"बाबा; माझा नवरा डाकूंनी मारला, जवान पोरगा मारला; आता माझी आंधळीची काठी दूर नेऊ नका. मला आता कशाचा विश्वास वाटत नाही. पोराचा शब्द ऐकल्याविना चैन पडत नाही." म्हातारी अंथरुणाला खिळलेली आहे. ह्या परिस्थितीत तिचा नातू आणण्याचे धैर्य कोणाला होईल?

छात्रावासात सध्या दहा विद्यार्थी असून त्यांपैकी सहा डाकूपीडित व चार 'साधनहीन' म्हणजे गरीब आहेत. छात्रावासाला श्री० लल्लूसिंग व श्री० महावीरसिंग ह्या दोन उत्साही कार्यकर्त्यांचे परिश्रम सोडून इतर काहीच लाभलेले नाही. पैसा नाही, साधने नाहीत; आहेत फक्त स्वप्ने व परिश्रम. पण पैशापेक्षा परिश्रम व स्वप्ने महत्त्वाची असतात, हा धडा महाराष्ट्राने आपल्या समाजसेवकांच्या हाताखाली गिरवला असल्याने, छात्रावास क्रमशः वाढत जाईल असा मला विश्वास वाटला.

छात्रावासात जातपात पाळली जात नाही. सारी कामे विद्यार्थी हाताने करितात. त्यांना पोळ्या भाजून द्यावयास वृद्ध लल्लूसिंगजी उभे राहिलेले मी स्वतः पाहिले.

मुलांसाठी मी वेगळा वेळ काढून ठेवला होता. दुपारच्या वेळी मुले माझ्या-भोवती कडे करून बसली होती. प्रथम त्यांना लाज वाटत होती. मग हळूहळू तो बुजरेपणा गेला. 'आईची आठवण काढून रडतो कोण?', 'सर्वांत खोडसाळ कोण?', 'मारामाऱ्या कोण करतो?' ह्या प्रश्नांनंतर मुले मोकळ्या मनाने बोलली. त्यांना वसतिगृह आवडते? हं! मग ह्यावेळी शेतात असलेल्या खायच्या वस्तूंची यादी सुरू झाली. मला त्यातल्या दोनच वस्तू परिचित होत्या, फूट (वाळूक) व भुट्टा (मक्याची कणसे); पण पोरे रंगात आल्याने मजा वाटली. दोन विद्यार्थी दहावीच्या वर्गात असून बाकी प्राथमिक शाळेत आहेत. चीनच्या हल्ल्याबद्दल मी विचारले, "बीनारानी सेना मे भरती हो गई. ठीक किया ना उनने?"

दहावीतला रामसिंग म्हणाला, "बहने क्यों लडने जायेंगी? हम उनकी रक्षा करेंगे, हम लढेंगे." संकुल युद्धाबद्दल बोलणे झाल्यावर मात्र "हां आझादी सबकी है, सबको लडना होंगा" असे मुले म्हणाली.

त्यांना खाण्याला पैसा अपुरा पडतो. "माणशी साडेसोळा रुपयात वरणपोळी फक्त देता येते."—लल्लूसिंगजी म्हणाले.

रात्री महावीरभाई म्हणाले, "मुले आणणे जबाबदारीचे काम आहे, विशेषतः पैसा नसताना. परंतु ही मुले इथे राहतील तर गावातील वैमनस्यापासून दूर राहतील. सूडाचे विचार कदाचित बळावणार नाहीत. जातपातीचा विचारही कमी होईल."

श्रीमती गोदावरी केतकरांच्या योजनेन्वये मदत मिळालेली सहा व छात्रावासात राहणारी दहा अशी सोळा मुले सोडून शिवाय दोन मुलांना समितीची मदत मिळते. त्यापैकी एक आत्मसमर्पित भगवानसिंगचा भाऊ बी० ए० च्या वर्गात आहे. दुसरा विद्यार्थी लोकमनचा मुलगा. हा इंदूरच्या विसर्जनाश्रमात होता. "लोकमनच्या पत्नीने प्रथम त्याला प्रक्षोभक पत्रे लिहून पित्याच्या शत्रूचे निर्दालन करण्यास आव्हान दिले" असे अनेकांकडून माझ्या कानावर आले. पुढे स्वतः लोकमनने मुलाला ह्याबद्दल समजावून चुकीच्या मार्गाने न जाण्याबद्दल सांगितले. सध्या हा मुलगा ग्वाल्हेर येथे लोहारकी शिकत असून त्याचा अभ्यासक्रम दीड वर्षांचा आहे. त्याला समिती दरमहा तीस रुपयांची मदत देते.

समितीचे उत्पन्न रुपये सव्वीस हजार असून अंदाजपत्रक रुपये बत्तीस हजाराचे आहे. ही सव्वीस हजाराची मदत गांधी-स्मारक निधी व सर्व-सेवा-संघ ह्यांच्या उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश येथील शाखांमधून येते. अंदाजपत्रक तुटीचे असून त्यामुळे जास्त काम करण्यास वाव नाही हे उघड आहे.

पुनर्वसनामध्ये विशेष नाव खडीत येथील प्रभूचे आहे. अपहरणासाठी वीस महिन्यांची शिक्षा भोगून सुटल्यावर, प्रभूला चंबळ-घाटीमधील वर्धा गावी वीस बिघे उत्तमपैकी जमीन समितीने दिली, आणि साधनांसाठी त्याला रुपये १२५० देण्यात

आले. हे धन 'वॉर ऑन वॉट'च्या शेफील्ड व डर्बीशायर ग्रूप (इंग्लंड)च्या श्री० हंटरकडून श्री० बनवारीलाल चौधरींच्या हस्ते आले.

पुनर्वसन हा शांतिसमितीच्या कार्याचा एक भाग आहे, त्याचप्रमाणे आत्म-समर्पितांचे काय झाले ह्याची आपल्याला विशेष जिज्ञासाही आहे. श्री० हेमदेवजींनी मला एकंदर एकवीस लोकांची माहिती सांगितली. ह्या एकवीसपैकी दहा लोक सुटून आले आहेत. त्यांच्यापैकी प्रभू व लच्छी आणि मुहरमन व त्यांच्या परिवाराला भेटण्याची मला फार इच्छा होती. कारण त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांना मी ह्यापूर्वी भेटले होते. दुर्दैवाने पावसामुळे झालेल्या चिखलामुळे मला खडीतला जाणे शक्य नव्हते. तेव्हा खालील माहितीचे स्वरूप पुस्तकी आकड्याचे आहे

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | १. रामअवतार | सुटून आला | घरी राहतो. |
| | २. खचेरा | सुटून आला | बैलगाडीवर काम करतो. |
| | ३. श्रीकिशन | सुटून आला | कुटुंबात राहतो. उत्तम हलवाई. मजुरी. |
| | ४. पतिराम | सुटून आला | घरी राहतो. |
| | ५. करणसिंग | सुटून आला | सावकारी. घरी राहतो. |
| | ६. दुर्जन | सुटून आला | घरी राहतो. |
| | ७. प्रभू | सुटून आला | ह्याच्या पुनर्वसनाची माहिती वर आलेली आहे. |
| | ८. लच्छी | सुटून आला | बिझिनेस करण्याच्या विचारात. घरी राहतो. |
| | ९. जंगजीत | आताच सुटून आला | घरी जाणार. |
| | १०. मुहरमन | सुटून आला | (कनेराला) घरी पंच निवडून आला. |
| ब. | ११. डरू | जन्मठेप | |
| | १२. तेजसिंग | जन्मठेप | तिघांवरही इतर खटले चालू आहेत. |
| | १३. लोकमन | जन्मठेप | तेजसिंग व डरू यांना सुप्रीम कोर्टाने अपील करण्याची परवानगी नाकारली. |
| क. | १४. रामदयाल | ७ वर्षे कैद | अलाहाबाद हायकोर्टात अपील. |
| | १५. बदनसिंग | ७ वर्षे कैद | अलाहाबाद हायकोर्टात अपील. |
| | १६. मटरे | ७ वर्षे कैद | अलाहाबाद हायकोर्टात अपील. |
| | १७. भूपसिंग | ७ वर्षे कैद | अलाहाबाद हायकोर्टात अपील. |
| | १८. कन्हाई | ७ वर्षे कैद | अलाहाबाद हायकोर्टात अपील. इतर केसेस मध्य प्रदेशात. |

| | | |
|---|---|---|
| १९. रामसनेही | १२ वर्षे कैद | उत्तर प्रदेश अपीलात. |
| | ७ वर्षे कैद | राजस्थान |
| २०. भगवानसिंग | मध्यप्रदेशात केस चालू | |
| २१. विद्याराम | मध्यप्रदेशात केस चालू | |

निश्चित माहितीच्या अभावी ह्या ‘हृदयपरिवर्तितां’बद्दल काही लिहिणे धोक्याचे आहे. तरी सुटून आलेले लोक कामाला लागलेले दिसत नाहीत. ‘घरी बसून खाण्याइतकी’ श्रीमंती कोणाच्याहीपाशी नाही. जेलातून मुक्त होताच मुहरमनला पंच निवडून देण्यात येते. हेही मनुष्यस्वभावाला व कनेऱ्याच्या वातावरणाला अनुसरून नाही. त्याच्या मुलाला मिळणाऱ्या रुपये ३३ च्या शिष्यवृत्तीबद्दल दस्युभूमीचे दर्शन या प्रकरणात दिलेले आहे. प्रभूला ‘उत्तमपैकी’ २० बिघे जमीन का देण्यात आली ? हा प्रश्नही मला पडलाच. भोवतालच्या अज्ञान लोकांची “गुन्हेगारी लाभदायक असते” अशी समजूत होण्याचा संभवही मला दृष्टिआड करिता आला नाही.

ह्यापूर्वीही पोलिसांकडे हजर होणारे अनेक लोक असत, आजही आहेत. त्यांच्यापैकी अनेक परत दस्युवृत्तीकडे वळल्याचे दाखलेही इतिहासात जमा आहेत. आत्मसमर्पितांपैकी कोणी वक्रमार्गाने जाणार नाही, अशी खात्री कोणालाही देता येणार नाही. त्यामुळेच मला छात्रावासाचे कार्य सर्वांपेक्षा जास्त मोलाचे व मूलग्राही वाटले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अ. क्र. .............. विभाग ..............
क्रमांक .............. नों. दि. ..............

# निरोप

इतिहासाचा, विज्ञानाचा आणि वस्तुस्थितीचा मागोवा घेत केलेला माझा प्रवास येथे संपला. माझ्या श्रांत हातातील धुरकट व अंधुक मशालीच्या लालसर-पिवळट प्रकाशात, ह्या समस्येवर पसरलेली गूढतेची अवगुंठने किंचित बाजूला सारून, तिच्या प्रचंड स्वरूपाचा तोंडवळा मला निरखता आला, एवढ्यातच मला समाधान मानले पाहिजे. कारण माझ्या मशालीचा मिणमिणता प्रकाश अधिक काही दाखवण्यास असमर्थ आहे, ह्याची जाणीव मला आहे. ह्यापुढे ताज्या दमाचे, नव्या उत्साहाचे, ह्या विषयाचे जाणकार नवयुवक माझी मशाल फेकून देऊन, नव्या शोधक ज्योती उजळून त्यांच्या तेजस्वी प्रकाशात पुढे जातील. त्यांचाच तो अधिकार आहे.

ह्या तरुणांना अवश्य ती साधने व सोयी उपलब्ध करून देण्याच्या कार्याची धुरा मात्र आम्हा वडील माणसांच्याच खांद्यावर आहे. ह्या समस्येवर, आजपर्यंत, विविध सरकारे बहुधा मौन पाळून आहेत. त्यांना समस्येचे स्वरूप आकलन झालेले नाही, की त्यांना ती समस्या विशेष कठीण वाटत नाही, की जनतेला विश्वासात घेण्याची नवी परंपरा पाडणे त्यांना साधत नाही? काय सांगावे? ही संशयरत्नमाला पुष्कळच लांबवता येईल; तरी एक मात्र खरे की अजून ह्या समस्येभोवती गूढतेचे दाट धुके पसरलेले आहे

लोकसत्ताक स्वतंत्र भारताची शासनव्यवस्था शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणात सर्व अभ्यासूंना खुली असावी, जिज्ञासू नागरिकाला सहज माहिती मिळावी, हे सर्व दृष्टींनी सर्व संबंधितांच्या कल्याणाचे आहे. शासनाच्या मौनाने वा लपवाछपवीने लोकांच्या मनात अकारण विकल्प निर्माण होतात. प्रचलित शासनसंस्था जनतेला परकी व

अविश्वासार्ह वाटते, याचे महत्त्वाचे कारण आपल्या शासनसंस्थेचा बऱ्याच अंशी 'पडद्याआड' चालणारा कारभार हे आहे. श्री० रुस्तुमजी ह्यांनी मला सांगितलेली एक घटना हा मुद्दा विशद करील.

विनोबाजींसमोर आत्मसमर्पण करणाऱ्या कैद्यांपैकी काहींनी, आपल्याला विजेचे धक्के देण्यात आले अशी तक्रार जेलमधून केली. विजेच्या धक्क्यांमुळे कातडीला काळे डाग पडतात, तेव्हा वरील तक्रारीची शहानिशा कोणालाही करिता आली असती. वरील प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या पातळ्यांवर तीनदा करण्यात येऊन प्रत्येक वेळी ती तक्रार पुराव्याच्या अभावी निरर्थक ठरवण्यात आली, परंतु आजही दस्युक्षेत्रात ही तक्रार कानावर येतेच व माझ्याही कानावर आली.

कुठल्याही समस्येबद्दल अपुऱ्या माहितीवर होणारी जनतेची टीका ही विधायक टीका होऊ शकतच नाही; कारण दुखणे काय व कुठे झाले आहे हे समजल्यावरच योग्य उपाययोजना करिता येते. कुठल्याही समस्येचे सम्यक्स्वरूप आकलन करण्यास लागणारी साधने उपलब्ध झाल्यावर तिचा अभ्यास वेगवेगळे लोक, वेगवेगळ्या दृष्टिकोनातून करू लागतात. ह्या अभ्यासामुळे 'व्यक्ती तेवढे उपाय' असा प्रसंग उद्भवण्याची शक्यता असते. तरी टीकेचा अकरणात्मक प्रकार थांबून, विधायक सूचना पुढे येऊ लागतात, चर्चेची पातळी उंचावते व त्या विविध सूचनांमधून काही नवीन विचार व नवीन मार्ग उपलब्ध होण्याचा संभव असतो.

कुठल्याही समस्येचे स्वरूप समाजाला समजावण्याचा आणखी एक मोठा फायदा असतो. आज प्रत्येकजण त्या समस्येवर आपआपल्यापरीने उपाय सुचवीत आहे. समस्या समजल्यास त्या उपायांची इष्टानिष्टता व व्यवहार्यता मोजण्याचा मानदंड सर्वांना उपलब्ध होईल. 'ओहोळ-पुनरर्जन' वा तत्सम योजना दस्युवृत्तीला उपकारक होण्याचा संभव नसूनही मान्य केली जाईल; मध्य-प्रदेशाने दस्युसमस्येविरुद्ध केवढेही भगीरथ प्रयत्न केले तरी ती नामशेष होणार नाही; दस्यु थोडे उत्तरेला मेवातमध्ये किंवा पश्चिमेला थारच्या वाळवंटात हटतील किंवा चंबळचा प्रवाह ओलांडून राजस्तान वा उत्तरप्रदेशाच्या ओहोळात आसऱ्याला जातील, हे आपल्याला समजेल. वरील कल्पना ही लेखिकेच्या कल्पनेचा विलास आहे असे समजण्याचे कारण नाही; कारण आजच भिंडमोरेनाचे ओहोळ सोडून डाकू शिवपुरी-ग्वाल्हेर येथील जंगलात आश्रयाला गेलेले आहेत.[1] दस्युसमस्या अजरामर का वाटते हे समजल्यावर साऱ्या दोषांचे खापर सरकारच्या माथी फुटणार नाही.

आपल्या संपूर्ण ज्ञानदृष्टीला प्रत्येक योजना आपल्या मानदंडाने मापता येईल. चंबळघाटी-आतंक-निवारण समिती[2] नावाच्या एका संघटनेने भारतसरकारकडे एक

---

१. ऑपरेशनल प्रॉब्लेम्स इन इरॅडिकेटिंग डेकॉयटी मीनेस : ए० एफ्० रुस्तुमजी, परिच्छेद ७

२. टाइम्स ऑफ इंडिया : २०-७-१९६२

योजना विचारार्थ पाठविली आहे. 'डाकूग्रस्त अकरा जिल्हे केंद्र सरकारने एका शासनाखाली आणावे' ही समितीची सूचना इतरांनीही वेगळ्या स्वरूपात केलेली आहे. 'दरमहा शंभर रुपये वेतनावर पन्नास लाख माणसे ह्या क्षेत्रातील विविध कल्याणकार्यासाठी' नेमण्याची तिची सूचना मात्र पूर्ण पिंजून पाहता तिच्यातले खाचखळगे स्पष्ट दिसतील. भारतसरकार पन्नास लाख माणसे नेमण्यास लागणारा खर्च करावयास असमर्थ आहे हे उघड आहे. पण निवडणुकीच्या विशिष्ट वातावरणात अशी पाच हजार माणसे नेमता येतील. त्या नेमणुकीचे सामाजिक परिणाम ही माणसे कोणत्या जातीतून येतात ह्यावर अवलंबून राहील हे उघड आहे. विविध उपायांची छाननी करणे कसे अवश्य आहे हे दाखवण्यापुरतेच हे उदाहरण दिलेले आहे.

आपण दस्युसमस्येचा गंभीरतेने विचार केला व वृत्तपत्रातून तळमळीने लिहिले तरी संबंधित सरकारांना त्या समस्येचे महत्त्व किती वाटते ? ही समस्या 'नित्य मरे त्याला कोण रडे' ह्या न्यायाने उपेक्षिली जाते का ? अशा उपेक्षेचे दूरगामी परिणाम काय होतील ?—हे प्रश्नही अज्ञानात असणाऱ्या विचारी जनतेला समजणार नाहीत. 'खरेच का दस्युसमस्येची उपेक्षा होते ?' असा अविश्वास व्यक्त करणार प्रश्न प्रत्येक सुबुद्ध व्यक्ती विचारते. पोलिसांच्या इन्स्पेक्टर जनरलने अगदी अलीकडे (२-९-६३) केलेले खालील विधान ह्या उपेक्षेला साक्षी आहे.[1]

".. माणसे (men) उपलब्ध करण्याचा प्रश्न सदैव उभा असतो. दुसऱ्या एखाद्या भागात दंगे व अव्यवस्था होण्याचे भय असतानाही दस्युक्षेत्रात दल (force) ठेवावे का ? का आपण विशेष सशस्त्र पोलीस, व्यवस्थेला धोका आलेल्या क्षेत्रात हलवून, दस्युक्षेत्र अरक्षित सोडावे ?

"हे एक दुर्दैवी सत्य आहे की, दस्युक्षेत्रातील सुरक्षितता, राज्यात इतरत्र होणाऱ्या गडबडीवर, दंगे उभे करू पाहणाऱ्या जातीय चळवळींवर, आदिवासी, मजूर किंवा विद्यार्थी ह्यांच्या अस्वस्थेवर किंवा राज्याच्या शांतीला विघातक अशा कुठल्याही परिस्थितीवर, मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे."

दस्युभूमी अरक्षित सोडून अनेक माणसांचे वित्त व जीवित धोक्यात घालण्याचा शासनसंस्थेला अधिकार आहे काय हा कायद्याने विचार करण्याचा गंभीर प्रश्न आहे. परंतु दस्युसमस्या ही फुरसतीची समस्या मानण्याला आपण मान्यता देणार किंवा नाही, हे समस्येचे ज्ञान नीट असल्यावाचून आपण कसे ठरवणार ? जबलपूरचा जातीय दंगा; रायपूरचा मजुरांचा संप, जगदळपूरच्या आदिवासींची गडबड ह्यापेक्षा दस्युसमस्या कमी चिंतेचा विषय आहे काय ? जबलपूरच्या दंग्याच्या उपशमनार्थ सशस्त्र पोलिस हलवल्यावर आठनऊ महिन्यात दस्युभूमीत एकवीस टोळ्या नव्याने उभ्या राहिल्या आणि त्यांनी गेले सहा महिने विलक्षण धुमाकूळ घातला. पोलिसांना ह्या धुमाकुळाची

१. ऑपरेशनल प्रॉब्लेम्स इन इरॅडिकेटिंग डेकॉयटी मीनेस : ए० एफ्० रुस्तुमजी; परिच्छेद ८

अपेक्षा इ० स० १९६२ च्या सुरुवातीलाच होती, कारण तसें भविष्य जानेवारी १९६२ मध्ये एका उच्च पोलिसअधिकाऱ्याने मला सांगितले होते. डाकूंच्या नव्या प्रादुर्भावाची खात्री असतानाही दस्युभूमी अरक्षित ठेवण्याइतके संकट जबलपूरला उभे होते का? बाहेरून मध्यप्रदेश सरकारला साहाय्य मिळवणे शक्य होते किंवा नाही?—हे सारे प्रश्न पिंजून आपण निर्णय न घेतला तर डाकूंची 'धाकटी पाती' होण्याचा प्रसंग 'मौनं संमतिलक्षणम्' ह्या न्यायाने आपल्यावर येतो ना?

दस्युसमस्येच्या संदर्भात आपली दंडसंहिता व तत्संबंधित एव्हिडन्स ॲक्ट, क्रिमिनल प्रोसिजर कोड इत्यादि इतर कायदे हे किती दोषयुक्त आहेत हे 'गुमानसिंग का पूरा' ह्या प्रकरणावरून स्पष्ट होते. खुनासारख्या गंभीर घटना घडल्यावर पंचायतीने प्रत्येक वेळीं चांभाराची माफी मागावी. काही अंशी भयाने, काही अंशी "गेले जीव काही परत येत नाही, मग ही सूडबुद्धी कशाला" ह्या विचाराने, त्यांनी साक्षीदार कोर्टातून गैरहजर ठेवावेत आणि गुन्हेगार सहीसलामत सुटून जाऊन पुन्हा नवे गुन्हे करावयास स्वतंत्र राहावेत, हा बनाव भयानक नाही का? कायद्याच्या अपुरेपणाची, अक्षमतेची, दोषांची अशी अनेक उदाहरणे सहज गोळा करिता येतील. जर समतेचे राज्य येथे स्थापण्यासाठी नेहमीचा कायदा स्थगित करून दस्युग्रस्त प्रदेशात लष्करी अंमल स्थापन करावा लागला, तर तो करण्याचा निर्णयही आपल्यालाच घ्यावा लागेल. लष्करी कायदा दांडक्याचा उपयोग करावयाचा तो पद्धतशीरपणे करील. दस्युक्षेत्रातील प्रत्येक खेडे काट्याच्या तारेने घेरून घेईल. परिचयपत्रे (identity cards) जवळ बाळगणे आवश्यक करील. अपराध्यांना भराभर गोळ्या घालील. ह्या गव्हाबरोबर किडेही चिरडले जातीलच. पण लष्करी कायद्याचा वरवंटा काही काळ फिरल्यावर मुदतबंदीची सरसहा माफी घोषित करता येईल. इ० स० १९४७ साली दुसऱ्या महायुद्धातून पळून आलेल्या व कायद्याच्या भयाने लपूनछपून राहणाऱ्या व पोटासाठी गुन्हेगारीचा आश्रय करणाऱ्या पूर्वसैनिकांबाबत इंग्लंडने अशी माफी दिली होती.[1] नागा प्रदेशात मुदतबंदीची सरसहा माफी (amnesty) १ जुलै ते ३१ ऑगस्ट १९६३ ह्या दोन महिन्यांसाठी भारत सरकारने जाहीर केलेली आहे.[2] पण हे सारे निर्णय जनतेला घ्यावे लागतील आणि त्यासाठीही ह्या समस्येची समग्र माहिती आपल्याला उपलब्ध व्हावी लागेल.

ह्याच संदर्भात ह्या प्रश्नाबाबतची आपली भूमिकाही एकदा आत्मपरीक्षण करून समजून घेतली पाहिजे.

अन्यायाला तोंड देण्याचे एक लहानसे साधन म्हणून आपण आजवर दस्युवृत्तीचा सतत वापर करीत आलो असल्यामुळे आपल्या मनामध्ये प्रचलित सत्तेबद्दल

---

१. ग्रुप प्रॉब्लेम्स इन क्राइम अँड पनिशमेंट : मॅन्हीम हरमन; पान ११४

२. स्टेट्स्मन : २१-८-१९६३

सूक्ष्म नावड व अनादर आणि त्या सत्तेला आव्हान देणारांबद्दल एक सहानुभूती व आदरभाव वसत असतो. सत्तेला उघड आव्हान देणाऱ्या डाकूंना आपण कितीही निखंदले तरी आपल्या मनात त्यांच्याबद्दल पुरेसा तिरस्कार केव्हाही नसतो. ह्या विषयावर प्रसिद्ध होणारे वाङ्मय व चित्रपट ह्याला साक्ष आहेत. अलीकडे 'फकीरा' ही मराठी व 'देवी चौधुराणी' ही बंगाली अशा दोन कादंबऱ्या माझ्या वाचनात आल्या, तसेच 'गंगाजमना' व 'मुझे जीने दो' हे दोन चित्रपटही माझ्या पाहाण्यात आलेले आहेत. फकीरा डाकू होतो, कारण दुष्काळात ब्रिटिश सरकारने त्याच्या जमातीला नाकारलेले दुष्काळनिवारण साहाय्य! गंगा डाकू होतो कारण त्याच्या जमीनदाराने त्याच्यावर केलेला जुलूम. देवी चौधराणीचे भांडण असते ब्रिटिश अन्यायाविरुद्ध. जर्नेलसिंग डाकू का होतो ह्याची कारणमीमांसा 'मुझे जीने दो' मध्ये केलेलीच नाही.

अन्यायाला तोंड देणारी ही माणसे, लोककथांमधून, श्रीमंत व दुष्ट माणसांनाच लुटतात व मारून टाकतात. त्यांचे दरवडे सरकारी तिजोरीवर पडतात. लुटून आणलेले धन ती माणसे गरीबांच्या कल्याणार्थ वेचतात, व त्यांचे वाली होतात. ह्या व असल्या कारणामुळे प्रथमतः दरिद्री व नंतर सर्वच लोक 'अन्यायाला तोंड देणाऱ्या' ह्या माणसांबद्दल आदराने बोलू लागतात. अशा पद्धतीने डाकूंना सामाजिक प्रतिष्ठा लाभते. खानदेशात एके काळी सुप्रसिद्ध असलेला डाकू तंट्या भिल्ल, ह्या पुस्तकात वारंवार उल्लेखिलेला राजा मानसिंग, ही वरील पद्धतीची उदाहरणे आहेत.

डाकूगिरी ही एक वृत्ती आहे. तिला स्वतःचेच काही अपरिहार्य नियम लागू होतात. प्रसंग पडल्यास स्त्रीपुरुष, बाल-वृद्ध, गरीब-श्रीमंत, जो आडवा येईल त्याला कापून काढावे लागते. ह्याचा अनुभव देशभक्तीने प्रेरित होऊन ध्येयनिष्ठेने दरवडे घालणाऱ्या सच्चरित्र युवकांनाही ह्या शतकाच्या आरंभी आला हे आपण दृष्टिआड करितो. दस्युवृत्ती करणारांपैकी काही दस्यु सद्वर्तनी असले तरी त्यांना कुठलेही ध्येय नसते. जनतेचे कल्याण त्यांना अभीष्ट नसते. तेव्हा दहशतवादी युवकांपेक्षा त्यांचे वर्तन वरच्या पातळीवर जाईल ही कल्पनाही करणे हास्यास्पद आहे. शिवाय बहुतेक डाकू मद्यमदिराक्षीचे आणि द्यूताचे भोक्ते असतात. त्यातील एखादा दयावंत असेल, पण बाकी सारे क्रूर व निर्दय असतात. त्यांच्या निर्दयतेने व क्रूरपणाने निर्माण झालेल्या दहशतीवरच मुळी त्यांचे अस्तित्व व सुरक्षितता ही अवलंबून असतात.

दरवडेखोरी ही अन्यायाविरुद्ध बंड म्हणून होते, त्याचप्रमाणे जुने अन्याय टिकवून धरण्यासाठीही होऊ शकते, हे आपल्या ध्यानी लौकर येत नाही. कारण आपला वर्ग जुलूम करणाराचा असतो. महाराष्ट्रात नवबौद्धांना सोसावा लागत असलेला सवर्ण हिंदूंचा छळ हा अन्याय टिकवून धरण्यासाठी केलेल्या बंडाच्या प्रकारात मोडतो. १८५७ चे क्रांतियुद्ध हेदेखील ह्या स्वरूपाचे प्रतिक्रांतियुद्ध होते. चंबळखोऱ्यात आज चालत असलेली दस्युवृत्ती ही त्याच जातीची, सवर्ण हिंदूंची आजवरची मिरासदारी राखण्यासाठी केलेली बंडखोरी आहे. आपल्याला ह्या बंडखोरीबद्दल

वाटणाऱ्या सुप्त व सूक्ष्म सहानुभूतीमुळे ह्या प्रश्नाची निकड आपल्याला वाटत नसेल, ही शक्यताही आपण ध्यानी ठेवली पाहिजे.

ह्या संदर्भात पोलिसांबद्दलचीही आपली धारणा आपण तपासून पाहणे जरूर आहे; कारण पोलीसदल हे आपल्या हातातले एक शस्त्र मात्र आहे ह्याचा आपल्याला वारंवार विसर पडतो. कुठलीही सत्ता फार काळ अनियंत्रित राहिल्यास जुल्मी बनणे अपरिहार्य असते, ह्याला पोलिसदलही अपवाद नाही. तेव्हा चंबळखोऱ्यात राहणारे पोलीसदल जुलूम करील तर त्यात नवल नाही. त्या जुल्माला पोलिसांचा भ्रष्टाकार जबाबदार असेल, तेवढ्याच प्रमाणात प्राणभयदेखील असेल. नागराला वर्षेच्या वर्षे कँप करून पडलेला सरकारी अधिकारी श्री० किन व त्याच्या हाताखाली तळहातावर शिर घेऊन रात्रीवर रात्र, थंडीवाऱ्यात, पाण्यापावसात गस्त घालणारे शिपाई यांच्या मनावर कुठलाच ताण येत नसेल का? आपल्याला कोणी विचारता नाही, ह्या जाणिवेने हे पोलीसदल निष्काळजी बनत नसेल का? अल्पवेतनावर ह्या प्रदेशात शांतिस्थापनेची जबाबदारी खांद्यावर घेतलेल्या ह्या दलाबद्दल आपल्याला अज्ञान आहे, बेपर्वाई आहे. आपण पूर्ण विचार केला म्हणजे डाकूंच्या जुलुमाइतकाच पोलिसांचा जुलूमही संत्रस्त करणारा असला, तरीही पोलिस कालचक्राच्या प्रगतीला तर डाकू त्या चक्राच्या पिछेहाटीला कारण होतील हे उघड दिसेल. ह्याचा अर्थ पोलिसांचा भ्रष्टाचार लोकसत्तेला पोषक होतो असा मात्र नाही. त्याबद्दल परिशिष्टात अधिक उहापोह केलेला आहे.

'फकीरा' ह्या कादंबरीमध्ये वर्णन केलेले अस्पृश्य मांग जातीचे डाकू व चंबळघाटीत धुमाकूळ घालणारे रजपूत-ब्राम्हण डाकू—दोघांना हाताळण्याचे तंत्र वेगळे असावे लागेल हे विचारांती उघड होईल. मांग लोकांची धडपड आपल्या दीन दशेतून वर येण्याची, त्यांची मागणी समतेची व म्हणून आजच्या काळाच्या पावला-बरोबर पावले टाकणारी आहे. तेथे त्यांचे उद्दिष्ट संपूर्ण समाजाच्या कल्याणाचे आहे; प्रश्न फक्त त्यांनी वापरलेल्या साधनांचा आहे. त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करण्यास आवश्यक ते साहाय्य समाजाने दिल्यास, त्यांची 'बगावत'—बंड—लागलीच संपेल, हा अनुभव आपण तेलंगणात घेतला आहे. चंबळखोऱ्यातील डाकू करीत असलेली मागणी विषमतेची, अन्याय टिकवण्याची आहे. तिला आपण कधीही संमती देऊ शकत नाही, कारण त्यांच्या मागणीला संमती देणे हा आत्मघात आहे. इथे मतभेद साधनापुरता मर्यादित नसून, तो मतभेद उद्दिष्टांच्या, सामाजिक जीवनाच्या गाभ्यालाच हात घालतो. इथे कुठलीही तडजोड करता येत नाही. भारतातल्या अनेक समस्या आपल्या राज्यकर्त्यांनी जनतेच्या शक्तींना नमून, जनमताने सोडवलेल्या आहेत, ह्याचा अनुभव महाराष्ट्र स्थापनेपूर्वी आपण घेतलेला आहे. चंबळखोऱ्यात मात्र केवढीही दंगल माजली तरी हा उपाय आपल्याला वापरण्याची शक्यता केव्हाही उद्भवणार नाही हेही उघड आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

चंबळच्या ओहोळांमधली समस्या ही एक सामाजिक समस्या आहे, हे सर्वांनाच मान्य आहे. ही समस्या सनातन, सामाजिक विषमता टिकवून धरण्यासाठी—ज्या विषमतेने आज पण आपले सहजीवन उध्वस्त केले आहे व जिच्या गाळात आपला विकास, उत्कर्ष व भविष्य ही फसून पडलेली आहेत, त्याच विषमतेला जीवनदान देण्यासाठी—केलेल्या प्रयत्नांतून निर्माण होणारी समस्या आहे, हे उमजल्यावाचून ह्या समस्येबद्दलची आपली उपेक्षावृत्ती सुटणार नाही. ही झुंज प्रतिक्रांतीची आहे हे पटल्यावरच आपल्या प्रयत्नांना निश्चित स्वरूप येऊ लागेल.

त्यानंतरच एका बाजूला पडलेल्या ह्या प्रदेशात दळणवळणांच्या साधनांचे जाळे विणण्याची चौकशीसमितीची शिफारस आपल्याला महत्त्वाची वाटेल. कारण पोस्ट-ऑफिसे, तारायंत्रे, टेलिफोन, बिनतारी संदेशवाहक, रस्ते, रेल्वे, पेट्रोलवर चालणारी द्रुतगतीची वाहने ह्या विविध साधनांनी शासनाची सत्ता दृढ होत असते. त्याचे हात दंगलीच्या स्थळीं सहज व चटकन पोचतात आणि दंगलीची ठिणगी मुळातच विझवता येते.

ज्यांना दंगलीचा उपसर्ग पोचावयाचा, त्यांनाही शासनाच्या क्षमतेबद्दल विश्वास उत्पन्न होतो आणि अन्यायाला, जुलुमाला प्रतिकार करण्याचे त्यांचे धैर्य वाढते व त्यांच्यातून नेतृत्व निर्माण होते. जनतेचा विश्वास व पाठिंबा कुठल्याही शासनाला बहुमोल स्थैर्य देतात; लोकशाहीचा तर तो आत्माच! ह्या आत्म्याला आवाहन करण्याचा उपाय आपण फुकट जाऊ देणार नाही.

दळणवळणाच्या साधनाइतकेच महत्त्व ह्या मागासलेल्या प्रदेशाच्या औद्योगीकरणाला आहे. चंबळप्रकल्पाची स्वस्त व मुबलक वीज त्या प्रदेशाला आता उपलब्ध होते आहे. वीज व दळणवळणाचे मार्ग दोन्ही एकत्रित झाल्यावर गिरण्या, कारखाने वगैरे उभारणे फारसे जड जाणार नाही. सामाजिक समतेचा पुरस्कार मुक्या व निर्जीव यंत्राइतक्या हिरिरीने आजवर कोणीही केलेला नाही. उभ्या जगात सामाजिक गुलामगिरीची तटबंदी, गेल्या दोनअडीच शतकात, यंत्राच्या रूळाखाली ढासळून पडली, आणि तेथे समतेचे, न्यायाचे, स्वातंत्र्याचे राजमार्ग तयार झाले.

यंत्र स्वभावतःच समतेवर अधिष्ठित आहे. उच्च-नीचतेचे, जन्मजात मोठेपणाचे मूल्य त्याच्या परिचयाचे नाही. त्याला फक्त कुशल व प्रवीण हातांचा स्पर्श समजतो. ह्या हातांच्या दिग्दर्शनाखाली ते सुरळित चालते आणि लयीत येऊन आपला निर्मितीचा, भरपूर उत्पादनाचा हेतू सफळ करिते. एकदा यंत्रे बसवल्यानंतर, 'मग राजाराणी सुखाने राहिली' अशा थाटाची त्याची उपेक्षा आपण करू शकत नाही. त्याच्या अंगप्रत्यंगात नित्य नव्या सुधारणा कराव्या लागतात; आणि नवनवीन संशोधनाच्या अनुषंगाने त्याची विविध परिवर्तनेही अपरिहार्य होतात. यंत्रसामग्रीच्या कळा साकल्याने आकळण्याचे सामर्थ्य फक्त जातिवंत प्रज्ञेलाच लाभलेले आढळून येते.

माणसाला जन्म देताना, हा गोरा–हा काळा, हा हिंदू–हा मुसलमान, हा ब्राह्मण–हा धेडचांभार, हा पुरुष–ही स्त्री, हा श्रीमान–हा गरीब असे भेद माणसामाणसात,

परमेश्वराने का केले, वेदपठणाचा अधिकार किंवा सोन्याच्या ताटात जेवण्याचे भाग्य मूठभर लोकांना वाटताना लायकीचा कोणता निकष वापरला, हे त्याचे त्याला ठाऊक. पण 'अक्कल वाटताना' आपण पुरातन काळी केलेल्या ह्या पंक्तिप्रपंचाचे भान त्याला राहत नसावे; कारण प्रज्ञेचे वाटप जगातील सर्व मानवी समाजामधून व समाजाच्या सर्व थरांमधून समप्रमाणात केलेले आढळून येते. यंत्रयुगाची प्राणप्रतिष्ठा केल्यावर धुळीत लोळणारी प्रज्ञाही वेचून आणावी लागते. आणि आपल्या कर्तृत्वाची साक्ष पटल्यावर ही ज्वलंत प्रज्ञा सामाजिक भेदांविरुद्ध यशस्वी विद्रोह करून उठते. यंत्राचा हा स्वभावगुण दस्युभूमीतही आपला प्रभाव दाखवील व समतेला आवाहन करील.

यंत्रयुगाचा प्रणेता प्रज्ञावंत आहे. त्याच्या प्रज्ञेला पैलू पाडावे लागतात व ते कार्य शिक्षणाच्या द्वारे साधावे लागते. यंत्रयुगाच्या सुरुवातीला आर्थिक विषमता व अन्याय वाढतात; पण ह्या अन्यायाचे उत्तरही शिक्षणच शोधू शकते.

भारतात आज साक्षरताप्रसाराची आपल्याला निकड भासते, त्याचे एक महत्त्वाचे कारण आपले औद्योगीकरण हे आहे. शिक्षणाच्या बाबतीत दस्युभूमी त्रेतायुगात झोपलेली आहे. ती जागृत झाल्यानंतरच औद्योगीकरणाने येणारी भरभराट तिच्या पदरात पडू शकेल.

एकीकडे समस्येचा अभ्यास करीत, बळाच्या जोरावर गुन्हेगारी दडपून टाकीत, सुलभ दळणवळण, औद्योगीकरण, भरपूर शिक्षण ह्यांच्या दीर्घ मुदतीच्या योजना आपण कार्यान्वित करू शकलो तर दस्युभूमीचे मानचित्र पुढच्या पंधरावीस वर्षांत पार बदलून जाईल. मात्र ह्या उपाययोजनेने दस्युसमस्या शांतपणे प्राण सोडील व सर्वत्र आबादीआबाद होईल अशी अपेक्षा आपण केल्यास ते आपल्या राजकीय भोळेपणाचे द्योतक ठरेल. शांतता तर राहोच, पण बहुजनसमाजात होणाऱ्या जागृतीच्या प्रमाणात दंगल वाढणार नाही अशी हमी घेणेदेखील कठीण आहे. कारण आपले उपाय म्हणजे रूढीच्या, अज्ञानाच्या, दास्याच्या खोल गर्तेच्या तळाशी शतकानुशतके खितपत पडलेल्यांना वर चढून येण्यासाठी बांधलेले दोर आहेत. त्यांना त्या पाताळात घालून तेथेच डांबून ठेवणाऱ्या मिरासदारांना त्यांचे सीमोल्लंघन परंपरागत धर्माच्या दृष्टीने पापाचे वाटेल. बळीला पाताळात घालणाऱ्या वामनाने त्याच्या औदार्याची स्तुती केली, पण त्याचे राज्य मात्र त्याला परत न देता इंद्राला दिले. शतकांच्या नैराश्यानंतर वर चढून येणारा बलिराजाचा मानसबंधू—आजचा अंत्यज—हा माघारा फिरणार नाही, द्विज त्याला वर येऊ देणार नाही. ह्या परस्पर हितसंबंधाच्या विरोधातून निर्माण होणारा संघर्ष सुरुवातीला तीव्रतर व्हावा हे स्वाभाविकच आहे आणि तशीच अपेक्षा आपण केली पाहिजे.

हीच प्रक्रिया झपाट्याने औद्योगीकरण करणाऱ्या भारतात सर्वदूर सुरू होत आहे आणि कान देऊन ऐकल्यास तिची चाहूलही लागते आहे. समाजाचे खालचे थर जागृत व प्रतिकारक्षम बनत आहेत, पण त्यांना आपल्यात सामावून घेण्याइतके

औदाय व समज वरच्या थरातून त्याच वेळी निर्माण करण्याचे मार्ग अजून तत्त्वचिंतक द्रष्टयांनाही स्पष्ट झालेले नाहीत. गांधीजी व विनोबा ह्यांना सामाजिक तत्त्वज्ञानातील ह्या उणिवेची अंधुक जाणीव असावी आणि म्हणून त्यांचे हृदयपरिवर्तनाचे व आत्मोदयाचे प्रयास व प्रयोग ! तथापि ह्या उणिवेची जाणीव व ती भरून काढण्यासाठी केलेले प्रयोग ही दोन्ही अजून बाल्यावस्थेत आहेत. त्यामुळे आज साऱ्या जगात अशांततेचे व विद्रोहाचे वातावरण सर्वत्र आढळून येत आहे तसेच भारतातही होण्याचा संभव आहे. भारतात सध्या सुरू झालेले प्रचंड सामाजिक संक्रमण, एका पातळीवर पोचल्यावर, वादळी व विनाशक स्वरूप धारण करण्याचा संभव आहे. आजही आपण त्या पातळीकडे सावकाश पण निश्चयाने जात आहोत. एखाद्या पिढीत भारतीय समाज त्याच्या मगरमिठीत सापडण्याची शक्यता आहे. हा प्रसंग येण्यापूर्वी आपल्याला मिळणारा अवधी व त्या अवधीत आत्मोदय साधण्यात आपल्याला येणारे यश ह्यांच्या प्रमाणात त्या वादळाचा उपसर्ग आपल्याला कमी पोचेल आणि त्याची विनाशक शक्ती कमी होईल हे उघड आहे. आजही लष्करी हुकूमशाह्यांनी वेढलेला भारत आत्मोदयाला मान्यता देऊन माणुसकीला आवाहन केल्याकारणाने आपल्या लोकशाही निष्ठेवर स्थिर आहे. हे जरी खरे असले तरी आपले उद्दिष्ट आपल्यापुढे स्पष्ट साकार झालेले नसल्याने, वैचारिक गोंधळ निर्माण होऊन, विविध स्वरूपाच्या अन्यायाला व गुन्हेगारीला समाजाकडून सहानुभूती व उत्तेजन ही मिळतात; पांढरपेशांचे गुन्हे (white-collar crime), वायकामुलांचा व्यापार (white slave traffic), जातीय दंगली, दरवडेखोरी—असे पाशवी आत्याचार राजरोसपणे घडू शकतात. ह्या समाजविघातक प्रवृत्ती फोफावतात त्या आपल्या वैचारिक कमकुवतपणामुळे. आत्मोदय साधण्याच्या प्रयत्नात आपल्या विचारांचा गोंधळही कमी होईल असा संभव आहे; कारण मनुष्य कृती करतानाच आपल्या चुकाही समजून घेतो.

दस्युसमस्या भारताची एकमेव समस्या नाही; त्याचप्रमाणे जातीय दंगलीइतकी ती भयानकही नाही. औद्योगीकरणाच्या वाटचालीत समाजाची नवी घडी बसेल, त्यात ही प्रतिक्रांतीची ठिणगी आपोआप विझून जाण्याचा संभवही आहे. पण नरभक्षक आपल्या मरणाने मरेल अशी वाट पाहण्यात माणुसकीचा व पुरुषार्थाचा मनाला खटकणारा अभाव आहे.

आपण आज तत्त्वतः माणुसमात्राच्या जीवनाचे मोल मान्य केले आहे. त्याचा निर्वेधपणे जगण्याचा अधिकार कबूल केला आहे. त्याच्या संरक्षणाची हमी आपल्या लोकशाहीने दिली आहे. अन्नपुरवठा, वाढती लोकसंख्या व तत्सम अनेक प्रश्नांपेक्षा दस्युसमस्या कमी गंभीर मानली तरी तिचे आव्हान, ह्यापूर्वी वेळोवेळी म्हटल्याप्रमाणे, आपल्या मूलभूत श्रद्धांना, आपण दिलेल्या वचनांना आहे.

आपल्या वचनाला, आपल्या शब्दाला जागणे हे लोकशाहीचे आद्यकर्तव्य आहे. प्रत्येक समाजाची प्रगती वा पीछेहाट ही त्याच्या माणुसकीवर, त्याच्या तत्त्वनिष्ठेवर

व ती तत्त्वनिष्ठा निभवण्यासाठी तो समाज करीत असलेल्या प्रामाणिक प्रयत्नावर व निःसीम त्यागावर अवलंबून असते, हे आपल्या लोकशाहीने सतत ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

खंडप्राय भारताच्या प्रचंड समस्यांच्या संदर्भात दस्युसमस्या ही एखाद्या कुसळासारखी आहे. दस्युभूमीचे क्षेत्र सारे दोनअडीच हजार चौरस मैल आहे. तिची लोकसंख्या अर्ध कोटी भरेल. ही एरव्ही क्षुल्लक समस्या सोडवण्याची आपल्याला निकड एवढ्यासाठी निर्माण झालेली आहे की, आपल्या लोकसत्ताकाच्या मूलभूत श्रद्धेला—प्रत्येक माणसाला मानाने जगण्याचा, प्रामाणिक परिश्रम करण्याचा व त्या परिश्रमांचे फळ उपभोगण्याचा अधिकार आहे, ह्या मूलभूत अधिकाराला—येथे आव्हान मिळाले आहे.

स्वतंत्र भारताने आपल्या जन्मापासून अनेक संकटांना तोंड दिले आहे, अनेक समस्यांची उत्तरे शोधून काढलेली आहेत. दस्युसमस्येचे छोटे कुसळ काढावयास त्याला कठीण जाणार नाही. त्या समस्येकडे त्याने एकदा गंभीरपणे पाहणे मात्र अवश्य आहे. स्वतंत्र भारत जर मनःपूर्वक नियोजन करून कामाला लागेल तर पुढच्या एका दशकाच्या अवधीत दस्युभूमीचे मानचित्र संपूर्णतः बदलून जाईल.

इ० स० १९७४ मध्ये ह्या प्रदेशात मैलोगणती अंतर मला पायाने तोडावे लागणार नाही. कंगवा हरवल्यास किंवा पाण्याची बाटली तुटल्यास पोरसाच्या बाजाराची वाटचाल करावी लागणार नाही.

सुगीच्या दिवसात मला जागोजाग बैलगाड्याच तर काय पण ट्रकची वाहतूकही मोठ्या प्रमाणावर आढळेल. गिरण्यांची धुराडी जागोजाग दिसतील. त्यांचे भोंगे पहाटे जाग आणून मला संत्रस्तही करितील. ह्या गिरण्यांकडे वाहणारा मजुरांचा लोंढा पाहून मी कदाचित म्हणेन, "शीः! जुनीच चंबळ चांगली होती ह्यापेक्षा."

नागरा येथील कुसुमदेवींच्या जराजर्जर आजीच्या दुलईत बसून रात्री मुले म्हणतील, "बडी नानी, गोष्ट सांग ना—हां, त्या लाखनची."

ती अंध वृद्धा आपल्या क्षीण हातांनी पोराचे डोके थोपटून म्हणेल, "तुमच्या आजाला गोळी घातली बरं त्याच्या लोकांनी. मोठा दुष्ट माणूस होता तो...आता डाकू राहिले नाहीत."

मग मध्येच एखादे पणतवंड तिला अडवून म्हणेल, "ए बडी नानी, बंदूक पाहिलीय् का तू? गोळी कशी घालतात तुला ठाऊक आहे?"

दुसरा एखादा म्हणेल, "गप्प बस ग जरा! ए बडी नानी!..."

'बडी नानी'च्या शेजारीच खाटेवर अंथरूण पसरून, तिच्या घरात आलेल्या विद्युद्दीपाच्या प्रकाशात डायरी लिहिताना, समाधानाने निवळ झालेला त्या वृद्धेचा चेहरा न्याहाळण्यासाठी मी क्षणभर थांबेन.

हाही भाग्यशाली योग माझ्या जीवनात येईल कदाचित. कोणी सांगावे!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ विभाग ............
क्रमांक ........ नों दि. ............

# परिशिष्ट

दस्युभूमीत हिंडताना जागोजाग पोलीसदलाबद्दल ऐकलेल्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी 'दस्युभूमीचे दर्शन' त्या प्रकरणात येऊन गेल्या आहेत. दस्युभूमीत कार्य करणारे एक प्रामाणिक व कळकळीचे कार्यकर्ते 'श्रीराम' कळवळून मला म्हणाले, "वहनजी, चंबळघाटीत होणाऱ्या पोलिसांच्या अत्याचाराचे दर्शन न घडवणारे डाकूसमस्येचे विश्लेषण म्हणजे रामावाचून रामायण होईल."

'श्रीराम'चा प्रामाणिकपणा स्पष्ट होता. तेव्हा पोलीस व डाकू ह्यांच्या संबंधात भ्रष्टाचाराच्या तक्रारींना तर्काचा निकष लावणे मला आवश्यक वाटले आणि म्हणूनच ह्या नाजुक व चिघळलेल्या प्रश्नाची दखल घेणे क्रमप्राप्त झाले.

भारतीय पोलीसदलाची सुरुवात दोन शतकांपूर्वी लॉर्ड कॉर्नवालिस ह्याने केली. शांतिप्रस्थापना व शांतिसंरक्षण ही कार्ये ह्या दलाने यशस्वितेने केली, पण त्याही वेळी हे दल सोज्वळ म्हणून प्रसिद्ध नव्हते. क्रमशः सारा भारत ब्रिटिशांच्या हाती गेला. तो काळ भारताला अत्यंत अस्वस्थतेचा व धामधुमीचा होता. नवीन ब्रिटिश राजकर्त्यांना येथे शांतिस्थापनेचे दुष्कर कार्य करावयाचे होते. सुरुवातीला सर्वसाधारण जनतेने त्यांचे स्वागत उत्साहाने केलेले नव्हते. स्वतःला धर्म, भाषा, परंपरा सर्वच दृष्टींनी परकीय असणारे हे गर्वोद्धत राज्यकर्ते लोकांना फार दिवस आवडले नाहीत. तथापि जनतेपुढे दुसरा चांगला पर्याय नसल्याने त्यांनी नवी राजवट चाळीस वर्षे चालवून घेतली होती. अशा वेळी, ह्या उदासीन प्रजाजनांकडून पाठिंब्याची, सहकाराची अपेक्षा करणे व्यर्थ होते. त्यामुळे ब्रिटिश राजवटीला 'सामा'पेक्षा दंड-भेदांवरच जास्त भर द्यावा लागला. त्यामुळे पोलीससंघटना, कायद्याने नसली तरी वस्तुतः, निरंकुश सत्ताधारी झाली. पोलीस

व त्यांचे हस्तक जनतेला सदैव शत्रुवत वाटत राहिले. सदैव विरोधाला तोंड देणाऱ्या पोलीसदलाला जनतेबद्दल सहानुभूती नव्हती; अनेकदा ह्या दलात स्थानिक जनतेला अपरिचित अशा गटांमधून लोकांची भरती केली जाई आणि ते लोक जनतेपासून अलिप्त राहत. अशा तऱ्हेने पोलीसदल जनतेपासून एकाकी पडले व आपल्या निरंकुश सत्तेमुळे ग्रामीण विभागाचे अनभिषिक्त राज्य त्याला मिळाले. निरंकुश सत्ता नेहमी अमर्याद भ्रष्टाचार करिते. पण परंपरागत निरंकुश राजांच्या भ्रष्टाचाराची लोकांना सवय असल्याने पोलिसा-विरुद्ध क्वचितच तक्रार होई. पोलीसदलाचे हे स्थान आपल्या लोकसत्ताकात मोठ्या प्रमाणात तसेच कायम आहे; हा आहे ह्या भ्रष्टाचाराबद्दलच्या तक्रारींचा पाया. जनता स्वतंत्र, स्वाधिकारी झाली; पोलीसदल वास्तवात निरंकुश राहिले. ह्या दोघांचा संघर्ष निर्माण होणे क्रमप्राप्तच होते. जनतेचे धनीपण व्यवहारात मान्य होईपर्यंत ह्या दलाबद्दलच्या तक्रारी दूर होण्याचा संभव थोडा आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पोलिसांच्या भ्रष्टाचाराला, जुलमाला औषध आहे ते त्या दलाच्या पुनर्घटनेचे.

पोलिसांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी फार जुन्या आहेत. डकैती व ठगी प्रतिबंधक खात्याच्या अहवालांमधून ह्या तक्रारी वारंवार आढळतात. एक अहवाल तर जणू स्वतःचेच समाधान करीत म्हणतो, "पोलीस तरी ह्या जनतेमधूनच येणार. जशी जनता तसेच पोलिस."

हातातल्या दांडक्याचा उपयोग करण्याचे बाळकडू आपल्याला पुरातन काळापासून मिळालेले आहे. शरीरदंडाचा उपयोग जगातील सर्वच समाज करीत आले आहेत; पण गेल्या दीडदोन शतकात पश्चिमेकडे पुष्कळसे संशोधन होऊन गुन्ह्याचे निर्मूलन वा नियंत्रण करण्यासाठी शरीरदंडाचा उपयोग निषेधार्ह गणला गेला. परतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांना प्रजेबद्दल इतकी आपुलकी नव्हती. त्यामुळे भारताच्या पोलीसदलाच्या कार्यपद्धती मात्र बदलल्या नाहीत.

भारत स्वतंत्र झाला तरी पोलीसदलाच्या संघटनेत फारसा फरक पडला नाही. त्यांचे मालक बदलले. त्या मालकांची दृष्टी बदलली नाही. कार्यकारी (executive) व न्याय (judicial) ही खाती वेगळी करण्यात आपण करीत असलेली दिरंगाई ह्याचेच हे द्योतक आहे.

हा सर्व विचार करिता, पोलिसाबद्दल ऐकू येणाऱ्या विविध तक्रारींमध्ये सत्याचा मोठा अंश दडलेला असावा असे गृहीत धरल्यास चूक होणार नाही. वर्तमानपत्रात येणारी प्रतिवृत्ते व विविध न्यायालयांचे निकाल वरील निष्कर्षाला पाठिंबाच देतात.

पोलीसदलाची संघटना दोषयुक्त आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिगत भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्याची कुठलीही व्यवस्था ह्या संघटनेच्या कारभारात नाही. चारित्र्यसंपन्न माणसाला वर येण्याचे विशेष साधन नाही की भ्रष्ट माणसाचा भ्रष्टाचार चटकन दिसण्याची सोय नाही. त्यामुळे 'हर चीज पाच आना' हा नियम अमलात येतो व ह्या अराजकात स्वतंत्र विचाराचे, धडाडीचे, दलितांबद्दल सहानुभूती बाळगणारे, कर्तव्यदक्ष लोक बहुधा मागे पडतात.

पोलीसदलाच्या संघटनेचे वरील सर्व दोष मान्य करूनही, पोलीस व दस्यू ह्यांचे अन्योन्यसंबंध देह व मन ह्यासारखे निकट किंवा अपरिहार्य मात्र नाहीत. 'दस्युवृत्तीला पोलीस कारण आहेत' किंवा 'एकीकडून डाकू व दुसरीकडून पोलीसदल जनतेला त्राहित्राही करितात' ही विधाने विचाराची गुंतागुंत मात्र व्यक्त करितात.

भारतीय पोलीसदल ही स्वच्छेने वागणारी स्वसंचलित शक्ती केव्हाच नव्हती. पूर्वी ह्या दलाचे संचालन परकी सत्तेच्या हातातले हत्यार होते; आज भारतीय जनसत्ताकाच्या हातामधले ते एक अवजार आहे. हे अवजार गंजले, जुनाट झाले, विषारी वा निरुपयोगी ठरले तर ते तोडून फेकण्याचा संपूर्ण अधिकार जनतेला आहे. पोलिसांच्या बेकायदा किंवा अन्याय्य वर्तनाविरुद्ध बोलण्याचा अधिकारही जनतेला आहे. परंतु अशी कार्यवाही करिताना नुसती टीका न करिता काही विधायक कार्यक्रम आखावा लागेल.

हा कार्यक्रम अंगावर घेण्याजोगी दोन पीठे दृष्टिसमोर येतात. त्यापैकी एक म्हणजे वकिलांच्या संघटना किंवा बार-काउन्सिल्स. उपजीविकेच्या निमित्ताने वकिलांचा पोलिसांच्या कार्यपद्धतीशी निकट संबंध येतो. साक्षीपुराव्यांमधून पोलिसांच्या बेकायदेशीर वागण्याची उदाहरणे सहज गोळा करिता येतात व उपलब्ध पुराव्याची छाननी करून योग्य ते निष्कर्ष काढण्याचे धंदेवाइक शिक्षणही त्यांना असते. दुर्दैवाने बारकौन्सिलसनी ह्या समस्येची आजवर दखल घेतलेली नाही.

बारकौन्सिलपेक्षाही शक्तिशाली पीठ आपल्या कायदेमंडळाचे आहे. कायदेमंडळात जनतेवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्यायांना तुरळकपणे वाचा फोडण्यात येते. परंतु ह्या समस्येची मूलग्राही चर्चा अजून तरी झालेली नाही. पोलीसदलाची संघटना तर दूर राहो, पण फौजदारी कोर्टाच्या कार्यपद्धतीत बदल करण्याचे प्रयत्नही कोणी केलेले नाहीत. क्रिमिनल प्रोसीजर कोडमध्ये होणाऱ्या दुरुस्त्या त्याच्या बाह्यांगापुरत्याच मर्यादित असतात. कायदेमंडळातील राजकारण ह्याला जबाबदार आहे, की अजूनही मागच्या शतकात वावरणारी आपली जमीनदारी मनोवृत्ती कारण आहे, की आपल्याला आजही परदुःख शीतळ वाटते हे सांगणे कठीण आहे. कारणे काही असली तरी आज ही दोन्ही पीठे वरील प्रश्नांची उपेक्षा करून आहेत हे एक कटू सत्य आहे.

अन्यायाविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार जनसत्ताकात व्यक्तीलाही असतो. त्या दृष्टीने चंबळेच्या पदयात्रेत आचार्यांना पोलिसांविरुद्ध आपल्या प्रवचनामधून बोलण्याचा अधिकार अवश्य होता. पण सत्तारूढ मंत्रिमंडळे त्यांच्याभोवती रुंजी घालीत असताना त्यांनी प्रचाराचा मार्ग अवलंबिण्याचे कारण मात्र समजत नाही. आणि प्रचारातही, सत्ताधारी पक्षाला दोषी समजण्याऐवजी त्यांनी पोलिसांना दोष द्यावा हे मनाला पटत नाही. कायदेशीर व तर्कशुद्ध मार्ग न अनुसरिता पोलीसदलाला दोष देत राहणे म्हणजे "काय करू? माझा हात मोठा वाईट आहे. गुन्हे तोच करतो." असे म्हणण्यासारखे आहे.

आपल्याला लोकसत्तेची कल्पना इतकी नवी आहे आणि तिचे अस्तित्व जाणवण्याचे प्रसंग इतके क्वचित आपल्यावर येतात की आपले विचार अजूनही जुन्या सारणीतूनच

वाहत राहतात. त्यामुळे पोलीसदलाला स्वतंत्र, जुलमी पण शक्तिशाली समजून आपली टीका शब्दांकित होते. जनतेने निवडून दिलेले आमदारही आपल्या मतदारसंघात होणाऱ्या जुलमाला तोंड फोडीत नसल्याने हा डाव सतत कुजत पडलेला आहे. जणू एकदा निवडणुक संपली म्हणजे पाच वर्षेपर्यंत आमदार व जनता ह्यांचे संबंध उरतच नाहीत.

ह्या विचित्र बनावामुळे होणाऱ्या परिणामाचा आणखी एक दाखला दस्युभूमीत मिळाला. आचार्यांनी 'पोलीसदल बरोबर दस्यू' हे समीकरण मांडले, त्यातली तर्कदुष्टता स्पष्ट करण्याचे कार्य करावयास लोकांचे प्रतिनिधी पुढे आले नाहीत. लोकनियुक्त सरकारदेखील मूग गिळून बसले. ह्यासंबंधात निवेदने झाली ती पोलीसअधिकाऱ्यांची. लोकसत्तेच्या संदर्भात आचार्यांनी घेतलेल्या भूमिकेतील मूलभूत दोष विशद करण्याचे त्यांना कारण नव्हते. त्यांनी हरकत घेतली आचार्यांच्या 'प्रेम–अभियाना'ला; त्यामुळे पहिला गुंता उकलण्याऐवजी जास्तच गुंतला. 'पोलीस अभियान' का 'प्रेम-अभियान' ही निवड करण्याचा अधिकार लोकांना त्यांच्या संविधानाने दिलेला आहे; आपण ही गोष्ट विसरून गेल्याने लोकसत्ताकाच्या अधिकाराचा अतिक्रम करून निवेदने करण्याची संधी नोकरशाहीला सापडली. आपल्या वैचारिक गोंधळामुळे नोकरशाहीचे समर्थन करून आपण आपल्या सत्तेला खोट आणणारा एक दुष्ट पायंडा पाडला.

ज्या अधिकाऱ्यांनी ही निवेदने केली, त्यांच्या कर्तव्यदक्षतेबद्दल, प्रामाणिकपणा व कळकळीबद्दल आपल्याला आदर वाटावा असेच विचारी, सुसंस्कृत व पक्षरहित ते अधिकारी आहेत. श्री० रुस्तुमजी आमच्या भेटीत मला म्हणाले, "मी भाव्यांच्या पदयात्रेच्या बाजूचा होतो. धार्मिक वृत्तीच्या डाकूंना आचार्य चार शब्द समजुतीचे सांगतील व ह्या समस्येची तीव्रता थोडी तरी कमी होईल अशी मला आशा होती. पण प्रकार उलटा घडला. आचार्यांनी सारा दोष पोलिसांना दिला. अखेर डाकू ही जनतेची आराध्यदेवते होण्याचा प्रसंग उभा राहिला. उपरती त्यांना होण्याऐवजी पोलिसदलाला होईल असा रंग दिसू लागला. 'हत्या करून आम्ही पापाचे धनी का व्हावे ?' असा प्रश्न पोलिसदल विचारू लागले तेव्हा मला बोलणे भाग पडले."

श्री० रुस्तुमजीसारख्या कार्यक्षम व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यापुढे केवढा बिकट प्रसंग होता ह्याची कल्पना येऊन मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. तरी देखील सनदी नोकरांनी अशी वादग्रस्त निवेदने करणे शासनसंघटनेच्या मूलतत्त्वांशी सुसंगत ठरु शकत नाही. इ० स० १८४५ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड एलेनबरोने कर्नल स्लीमनला हाच इशारा दिलेला होता. लोकांनी निवडून दिलेल्या शासनाधिष्ठित पक्षाने आचार्यांच्या प्रेम-अभियानाला पाठिंबा देण्यात चूक केली असेल तर त्या चुकीचे परिणाम तिने भोगावे हे ओघानेच येते. अशा चुका लोकसत्ताकांत पुन्हाही होतील. त्या चुका सनदी नोकरांना त्यांच्या दूरदृष्टीमुळे फार हानिकारक व म्हणून असह्य वाटल्यास, राजिनामा देऊनच त्यांनी आपला प्रचारांचा मार्ग मोकळा करून घेणे योग्य व इष्ट ठरेल.

'सत्ताधारी राजकीय पक्ष पोलिसदलाचा उपयोग स्वार्थासाठी करून घेण्याचा धोका

असतो' हा बर्ट्रांड रसेल ह्यांनी दिलेला इशारा येथे ध्यानी ठेवणे योग्य होईल. पोलिस-दलाचा असा उपयोग भारतात होत नाही अशी ग्वाही आज कोणी देऊ शकणार नाही. आजच्या सत्ताधारी पक्षाला विरोध करणारा शक्तिशाली पक्ष अस्तित्वात येईतो सारी सरकारी संघटना सत्ताधिष्ठित राजकीय पक्षांच्या बाजूने राबणे अपरिहार्य आहे. जेव्हा सत्ता खांदेपालट करण्याची शक्यता शासनयंत्राला स्पष्ट दिसेल, तेव्हा शासनयंत्रातील व्यक्ती निःपक्ष राहण्याचा प्रयत्न करतील. जेव्हा सत्ताधारी पक्षालाही खांदेपालट होण्याची शक्यता दिसेल, तेव्हा सत्तेच्या आसनावरून उतरल्यावर, आपल्याला हानिकारक होणारे पायंडे न पाडण्याची दक्षता सत्ताधिष्ठित पक्ष घेऊ लागेल. तोवर परिस्थिती आहे तशीच राहील असा संभव वाटतो.

दस्युभूमीत भ्रष्टाचार आहे व भरपूर आहे. जसा तो भारतात सर्वदूर आहे. पण त्या भ्रष्टाचाराची सूत्रे आपल्याच हाती असल्यामुळे, त्याची दखल ह्या पुस्तकात घेतलेली नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ..................
नों. दि: ..........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अ. क्र. .... विभाग .... ........
क्रमांक.............. नों. दि. ...............

REFBK-0014397

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# संदर्भ ग्रंथ


1. BHATTA, SHRIKRISNA DATT — चंबळ के बहडोंमें.
2. BHADUDI, TARUN KUMAR — अभिशाप्त चंबळ.
3. East, Sir NORWOOD and MANWEL, Sir ALEXANDER Society and the Criminal.
4. GARG, RAJINDER LAL — Report for the Project for the Study of Dacoits in the Chambal Valley (for private circula[illegible] only)
5. GHATE, VITTHALRAO— पांढरे केस हिरवी मने.
6. GHOSH, RAI SAHIB JAMINI MOHAN — Sanyasi and Fakir Raiders in Bengal.
7. GOUR, SIR HARI SINGH — The Indian Penal Code.
8. JEEJIBHOY, J. R. R. — Bribery and Corruption in Bombay
9. JONES, HORWARD — Crime and Penal System.
10. JOSHI S. P. — मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार.
11. KALIDAS — मेघदूत.
12. KARNIKAR, M. G. — Ravine Reclamation in Madhya [illegible]
13. KARNIKAR, M. G. — Chambal Development Project [illegible] in मध्यप्रदेश पुलिस पत्रिका, जानेवारी १९६३.
14. KELKAR, N, C. — मराठे व इंग्रज (मराठेशाहीचे शतसांवत्सरिक वाङ्मय [illegible]
15. KERAWALA, PERIN C. — A Study in Indian Crime.
16. KETKAR, GODAVARI — सर्वोदय पात्र का कार्य, लश्कर, ग्वालियर, [illegible]
17. MACNAUGHTEN, R. A. — Memoirs of the Military Operation of the Nagpur Subsidiary Force.

18. MANHEIM, HERMANN — Group Prolems in Crime and Punishment.
19. MANHEIM, HERMANN — Social Aspects of Crime in England between the Wars.
20. MORRIS, TERENCE — Criminal Area, a Study in Social Ecology.
21. MUJUMDAR, R. C.
ROY-CHOUDHARI, H. C.
DUTT, KALIKINKAR — An Advanced History of India.
22. NEHRU, JAWAHARLAL — Glimpses of World History.
23. An Officer of the Company — Origin of Pindaris.
24. OAK, V. K. — नामदार रावराजे दिनकरराव राजवाडे ह्यांचे चरित्र.
25. RANADE, M. G. Late Mr. Justice — Introduction to the Satara Raja's and Peshwa's Diaries.
26. RANCHHODDAS, RATANLAL and THAKORE, D. K. (Editd by) . Law of Crimes.
27. ROSE, G. M. (Edited by) The Institutions of Advanced Societies.
28. RUSSELL, BERTRAND — Power
29. Rustumji, A. F. — Operational Problems in Eradicating Dacoity Menace — Script of the Radio talk on A. I. R. Station Bhopal on 2nd September, 1963.
30. SARDESAI, G. S. — Selections from the Peshwa Daftar.
31. SARKAR, J. N. and SARDESAI, G. S. : (Edited by) English Records of Maratha History.
32. SATHE, ANNA BHAU — फकीरा.
33. SAVARKAR V. D. — The Indian War of Independence 1857.
34. SHASTRI, ACHARYA CHANDRASHEKHAR — भारतीय आतंकवाद का इतिहास.
35. SINHA, SHISHIR KUMAR — Early Rulers of Khajuraho.
36. SMITH V. A. — The Early History of India Including The Invasion of Alexander the Great.
37. SMITH, V. A — Oxford History of India.
38. Spear Percival (Edited by) : India, Pakistan and West.
39. TAHMANKAR, D. V. — The Rani of Jhansi.
40. TODA, JAMES — Annals and Antiquities of Rajasthan.
41. Tucker, Sir Francis — The Yellow Scarf—Life of Col. Sleeman.
42. WELLS, H. G. — An Outline of World History.
43. ZINKIN, TAYA — Reporting India.

ग्रामीण ग्रंथ

## Reports and other Records


1. Administration Reports of Gwalior State 1888-92.
2. Administration Reports of Gwalior State 1924, 25, 26, 27, 28 29, 30, 31, 32, 33.
3. Annual Report relating to the Suppression of Dacoity in Bengal (1875 A. D.)
4. General Policy Darbar 1922 A. D. Jild No. 1 — Riyasat Gwaliar.
5. Memorandum Hidayat Va Khayalat Darbar No. 15 dt, 15-3-24.
6. Report of the Bind Morena Crime Situation Inquiry Committee, Madhya Bharat, 1953.
7. चंबल-घाटी-शान्ति-समिति : छात्रावास में रहकर शिक्षा पानेवाले बालकों की संक्षिप्त जानकारी.
8. Report on Ravine Reclamation in Madhya Bharat, Government of India — Central Water and Power Commissiont July, 1956.
9. Report on the working of Thaggi and Dacoity Department 1890 A. D.
10. Report on the working of Thaggi and Dacoity Department 1891 A. D.
11. Report on the working of Thaggi and Dacoity Departmen- 1895 A. D.
12. Report on the working of Thaggi and Dacaity Department 1898 A. D.
13. Report on the working of Thaggi and Dacoity Department 1902 A D.
14. Sedition Committee Report (1918).
15. Statistics of Crime of Dacoity and Poisoning in British Territory for the years 1867, '68, '69 and 1875.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

विभाग


अ. क्र

क्रमांक नों. दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

क्रमांक वि:

नोंद दि.



# चंबळची दस्युभूमी

गीता साने

चंबळच्या दस्युसमस्येचे आव्हान आपल्या मूलभूत श्रद्धांना, आपण दिलेल्या वचनांना आहे. आपण आज तत्त्वतः माणुस मात्राच्या जीवनाचे मोल मान्य केले आहे; त्याचा निर्वेधपणाने जगण्याचा अधिकार कबूल केला आहे. त्याच्या संरक्षणाची हमी आपल्या लोकशाहीने दिली आहे. खंडप्राय भारताच्या प्रचंड समस्यांच्या संदर्भात दस्युभूमीचे क्षेत्र सारे दोन अडीच हजार चौरस मैल आहे; तिची लोकसंख्या अर्ध कोटी भरेल. ही एरव्ही क्षुल्लक अशी समस्या सोडवण्याची निकड आहे ती तिच्यातल्या आव्हानामुळे. दस्युसमस्या सोडवणे भारताला कठीण जाणार नाही, पण त्या समस्येकडे त्याने एकदा गंभीरपणे पाहणे मात्र अवश्य आहे. मनःपूर्वक नियोजन करून कामाला लागले, तर पुढच्या एका दशकाच्या अवधीत दस्युभूमीचे मानचित्र संपूर्णतः बदलून जाईल.